१९६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५७८

# वृत्तपत्र-मीमांसा

लेखक

कै. नरसिंह चिंतामण केळकर

संपादक

का. न. केळकर

किंमत : रु. ४·००

REFBK-0014371

नीलकंठ प्रकाशन, पुणें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५७८

# वृत्तपत्र-मीमांसा

न. चिं. केळकर

निबंध
३८४९
सं. २॥
३.६.६५
१५७८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८४९ वि: निबंध
क्रमांक १५७८ नों. दि: ३।६।६५

# वृत्तपत्र-मीमांसा

प्र. ... संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०३७९
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

लेखक
कै. नरसिंह चिंतामण केळकर

संपादक
का. न. केळकर

REFBK-0014371

किंमत : रु. ४.००

नीलकंठ प्रकाशन, पुणें

प्रकाशक :

**प्रकाश दामोदर रानडे**

नीलकंठ प्रकाशन,

१६४३ सदाशिव पेठ, पुणें ९

**किंमत चार रुपये**

प्रथमावृत्ति : फेब्रुवारी १९६५

[ या ग्रंथासंबंधी पुनर्मुद्रण, भाषांतर, उतारे वगैरे सर्व हक्क अरविंद काशिनाथ केळकर, ३३/२५, डेक्कन जिमखाना, पुणें ४ याजकडे आहेत. ]

मुद्रक :

**रा. ना. सरनाईक**

सुलभ मुद्रणालय,

२९१ शनिवार पेठ, पुणें ९

# प्रास्ताविक

‘ वृत्तपत्र-व्यवसाय ’ हा विषय पुणें व नागपूर विद्यापीठांनीं आपल्या शिक्षण-क्रमांत नुकताच समाविष्ट केला आहे; व अनेक विद्यापीठांतून व खासगी शाळांतूनहि त्याच्या शिक्षणाचा उपक्रम होण्याचा यापुढें संभव असल्यामुळें कै. न. चिं. केळकर यांनीं लिहिलेलें “ वृत्तपत्र-मीमांसा ” हें पुस्तक प्रसिद्ध करण्यात आनंद वाटतो. हिंदुस्थानांत वृत्तपत्रें निघाल्याला एक शतकावर काळ होऊन गेला. या काळांत ज्यांनीं संपादक म्हणून हिंदुस्थानांत लोकजागृतीचें कार्य केलें अशा नामांकित शंभर लोकांची नांवें सांगतां येतील. व तीं नांवें या पुस्तकांत पृ. ७१–७२ वर दिली आहेत. महाराष्ट्रांत तर केसरी व मराठा पत्र म्हणजे वृत्तपत्र–शिक्षणाचें चालतें बोलतें आद्यपीठ होतें! त्या वर्तमानपत्रांच्या कामगिरीचा अर्ध-शतक-समारंभाचा सुवर्णदिन प्राप्त झाला तेव्हां श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या डोळ्यापुढें नुसत्या केसरीचेंच नव्हे तर अनेक वृत्तपत्रांनीं गेल्या शतकांत केलेलें महनीय कार्य उभें राहिलें. आणि त्या कार्याचा गौरव करण्याकरितां केसरीच्या सुवर्ण-ज्युबिली-अंकांत पुस्तकाचीं दोनशें छापील पृष्ठें होईल इतका वृत्तपत्रांचा विस्तृत इतिहासच त्यांनीं लिहिला. तेंच समग्र लिखाण या पुस्तकाला उपयोगी पडलेलें असल्यामुळें, “ वृत्तपत्र-मीमांसा ” या नांवानें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या पुस्तकांतील शेवटच्या प्रकरणाशिवाय सर्व मजकूर त्यांनीं सलग एकाच वेळेला लिहिला असल्यानें हें पुस्तक सुसूत्र व एकसंधि झालें आहे. आणि शेवटच्या प्रकरणांत संपादकीय शिक्षण, तसेंच वृत्तव्यवसायांत आज कोणत्या गोष्टी आहेत आणि पुढें त्यांत कोणत्या सुधारणा पाहिजेत याबद्दल स्वतःचें स्वानुभव व सूचना सांगून या विषयाचा त्यांनीं “ उपसंहार ” केला आहे. यामुळें, दोनचार ठिकाणीं संपादकीय टीपा-टिपणें देण्यापेक्षां या पुस्तकाच्या रचनेंत मला विशेष कांहींच करावें लागलें नाहीं. प्रस्तुत पुस्तकाचें उद्दिष्ट आणि पृष्ठमर्यादा सांभाळण्याकरितां, केसरी व मराठा यांची उत्पत्ति व वाढ यांपैकीं कांहीं मजकूर मी कमी केला, यापेक्षां ग्रंथकर्त्याच्या लिखाणांत मी कोणताहि बदल केलेला नाहीं.

तात्यासाहेबांना लिहिण्याची हौस जन्मसिद्ध होती. नुसती हौस नव्हे तर हव्यासहि. यामुळें लो. टिळकांनीं त्यांना बोलावल्यावर ‘ ती संधि आपण उडी घालून घेतली ’ असें त्यांनीं म्हटलें आहे. याचें कारण ते खरेखुरे हाडाचे ‘ वर्तमानपत्रकार ’ होते. कित्येकांकडून ‘ साहित्यसम्राट् ’ या पदवीनें त्यांचा उल्लेख केला जातो. पण त्यांचा जीवितहेतु व हें विशेषण यांत माझ्या मतें दूरान्वय घडतो. कारण उत्तम साहित्य लिहिणारा उत्तम वर्तमानपत्रकार होऊं शकेलच असें नाहीं. निबंधमालाकार चिपळूणकरांप्रमाणें त्यांचें वर्णन कोणी “ निबंधकार केळकर ” असेंहि करतात. पण केवळ उत्तम निबंध लिहितां येणें, ही गोष्ट केसरीचे संपादक होऊन राजकीय पुढारीपण पत्करण्याला पुरेशी नाहीं हें कोणीहि मान्य करील. म्हणून, “ केसरीकर्ते केळकर ” किंवा “ वर्तमानपत्रकार केळकर ” हेंच त्यांचें वर्णन यथार्थ ठरेल. लोकमताला वाचा फोडण्याकरितांच वर्तमानपत्राचा जन्म आहे; आणि आपण त्या लोकमताचे प्रतिनिधि आहों, अशी त्यांचीं शेवटपर्यंत भावना होती. १८९७ पासून १९४७ पर्यंत म्हणजे अर्धशतक त्यांचा केसरीशीं संपादक व लेखक म्हणून ऋणानुबंध होता. केसरीचे अमोघ शस्त्र हातीं आल्यावर त्याचा उपयोग संपादक या नात्यानें त्यांनीं कोणत्या सार्वजनिक कार्यांकडे कसा केला; नंतर ट्रस्टी या नात्यानें केसरीला ‘ संस्थे ’ चें रूप दिलें व टिळकांच्या मृत्यूनंतर अठरा वर्षांनीं केसरीचे कोषागार निष्कर्जी समृद्ध अशा स्थितींत ठेवून त्यांनीं केसरीच्या विश्वस्तपदाची सत्ताहि दुसऱ्यांचे हातीं कशीं सोंपविलीं, हा सर्व इतिहास त्यांनीं आपल्या ‘ गतगोष्टी ’ नामक आत्मचरित्रांत लिहिला आहे. भावी काळांत ज्यांना संपादक व्हावयाचें असेल किंवा वृत्तपत्रांचें चालकत्व करावयाचें असेल त्यांना अनुभविक मार्गदर्शन म्हणून अशीं पुस्तकेंच चाळावीं लागतील. लेखक हा जन्मसिद्ध असला तरी त्याची स्फूर्ति त्याला कोठून तरी दुसऱ्या दिव्यावरच उजळून घ्यावी लागते. श्रेष्ठ मनुष्याची एखादी आठवण किंवा त्याचें एखादें वाक्यहि मार्गदर्शक म्हणून जन्मभर उपयोगी पडतें. या दृष्टीनें या पुस्तकांतील “ कांहीं मनोरंजक आठवणी ”त अनेकांना आपापली भर घालतां येईल. व नुसत्या वृत्तपत्रविषयक आठवणींचेंच पुस्तक कोणी काढलें तर तेंहि फार मनोरंजक व उद्बोधक होईल.

वृत्तपत्रांत लेख लिहिण्याचें लेखकानें मनांत आणलें तरी, काय लिहावयाचें आणि कसें लिहावयाचें ? याचा प्रश्नच पडतो. " शुद्ध कसें बोलावें आणि शुद्ध कसें लिहावें, तसेंच हें शुद्ध कां ? आणि हें अशुद्ध कां ? हें व्याकरण शिकल्यानें समजतें, " हें वाक्य पुष्कळांना अवगत असेल. पण उत्तम लिखाणाचें कोठेंहि ' व्याकरण ' असूं शकेल काय ? आणि अलीकडे कांहीं पुस्तकांत बातमी कशी लिहावी, मुलाखती कशा व्याव्यात वगैरे ' धडे ' दिले आहेत ते वाचून तीं तीं सदरें कोणी लिहूं शकेल काय ? याकरितां, पुष्कळ वाचणें, पुष्कळ मनन करणें, पुष्कळ लिहिणें आणि पुष्कळ फाडणें, हा जो या पुस्तकांत पृ. १३८ वर ग्रंथकर्त्यानें मार्ग सांगितला आहे तोच लेखक होण्याचा माझ्या मतें खरा राजमार्ग आहे. उत्तम लेखकांचें लेख वारंवार वाचणें व तो कित्ता आत्मसात् करून त्या लिहिण्याचें अनुकरण करणें हाहि लेखनकला संपादन करण्याचा दुसरा मार्ग आहे. या दृष्टीनें वृत्तपत्र-लेखकांना मार्गदर्शक अशीं निवडक उताऱ्यांचीं पुस्तकें टीपांसह प्रसिद्ध होणें फार आवश्यक आहे. हें काम जो साक्षेपी संपादक शहाणपणानें करूं शकेल त्याचा भावी लेखकांवर उपकार तर होईलच, पण टिळक, आगरकर, किंवा चिपळूणकर, केळकर इत्यादि ज्या महनीय लेखकांनीं इतिहास घडविला त्यांच्या लेखणीची किमया कशांत होती याचें संशोधन होऊन, त्यांची प्रभावी भाषा वाङ्मयांत कलाकृतीप्रमाणें साकार व चिरस्थायी केल्याचें त्याला पुण्य लाभेल !

स्वतः प्रस्तुत लेखकानें वृत्तपत्र-लेखनाचे धडे ती. तात्यासाहेबांच्या साहचर्यांत घेतले. आणि माझ्याप्रमाणेंच ज्या ज्या हौशी तरुणांचा त्यांचेशीं यत्किंचित् संबंध आला त्यांना प्रोत्साहन् देऊन त्यांनीं ' लेखक ' बनविलें आहे. त्यांतील कांहींजण आज ' वर्तमानपत्रकार ' म्हणून पुढें आले आहेत. तरुण उपवर मुलीचा बाप ज्याप्रमाणे ' हा मुलगा माझा जावई होण्याला योग्य आहे काय ? ' असें न्याहाळत असतो त्याप्रमाणें, लो. टिळक प्रत्येक तरुणाच्या चेहऱ्याकडे आशेनें पहात असत ! तात्यासाहेबांचीहि तशीच दृष्टि होती. कोणांत कांहीं, तर कोणांत दुसरें कांहीं असें कमी अधिक असावयाचेंच. पण कोणाचाहि कमीपणा न मानतां त्या सर्वांचा उपयोग त्यांनीं केसरीच्या कामाकडे करून घेतला. उत्तम प्रुफ-करेक्टर हा ' अर्धा संपादक ' आहे असें ते मानीत.

आणि खरोखरच १९१०–१२ सालीं मराठ्याचीं मुद्रितें तपासणारा एक फार मोठा व्यासंगी मनुष्य पुढें पुण्यांतील एका कॉलेजांत अर्थशास्त्राचा प्रोफेसर झाला ! आणि प्रुफें तपासणारा दुसरा एक तरुण गेलीं कित्येक वर्षे मुंबईच्या एका प्रसिद्ध दैनिकाचा संपादक आहे ! १९१४ सालापासून आजतागायत केसरी संस्थेचा सारा इतिहास माझ्या डोळ्यासमोरूनच गेला आहे. आणि सदर संस्थेचा मीहि स्वतःला एक ऋणानुबंधी मानीत असल्यामुळें, ‘ केसरी ’ म्हटलें म्हणजे माझ्या मनांत किती अनेकविध आठवणी जागृत होत असतील याची वाचकांनींच कल्पना करावी !

दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तमानपत्रांचा खप अतिशय वाढला; यामुळें अनेक धनिकांनीं ह्या धंद्यांत लक्ष घालून वर्तमानपत्रें आपल्या मालकीचीं केलीं. एकाच व्यक्तीच्या मालकीचीं अनेक वर्तमानपत्रें असणें याला Chain Papers ( सांखळी पत्रें ) असें म्हणतात. त्याप्रमाणें आज गोएंका, दालमिया, बिर्ला, फ्री प्रेस, आनंदबझार प्रत्रिका, आगरवाल, सौराष्ट्र-ट्रस्ट वगैरे सुमारें वीस ‘ सांखळ्या ’ आहेत. मुंबई राज्यांतील नव्वद टक्के खपाची दैनिकें फक्त सहा व्यक्तींच्या हातांत आहेत ! इतर निर्जीव वस्तूंच्या व्यापाराप्रमाणेंच वर्तमानपत्रांचा धंदा मानतां येत नाहीं. कारण प्रत्यक्ष समाजजीवनाशीं त्याचा संबंध येतो. म्हणून अशा तऱ्हेनें कांहीं थोड्या व्यक्तींच्या हातीं वर्तमानपत्राचें केंद्रीकारण होणें फार धोक्याचें आहे, असें प्रेस कमिशननें ( १९५४ चा रिपोर्ट ) आपलें मत दिलें आहे. पण हें सर्व खरें असलें तरी, सध्यांच्या वर्तमानपत्रांनीं यांतूनच आपला मार्ग काढला पाहिजे. पूर्वींच्या संपादकांच्या वेळीं वर्तमानपत्रें चालविण्याला धड भांडवल नसे; प्रेस ॲक्ट, राजद्रोहाचा कायदा वगैरे अनेक अडचणी असतांना त्यांतूनहि त्यांनीं मार्ग काढला ! तर आजच्या काळीं वरील कोणत्याहि अडचणी नसतांना, केवळ अनेक वर्तमानपत्रें एकाच्या मालकीचीं झालीं म्हणून सगळें स्वातंत्र्य नष्ट झालें, अशी ओरड काय म्हणून करावी ? भारत सरकारच्या प्रेस-कमिशनप्रमाणेंच अमेरिकेंतील वृत्तव्यवसायाबद्दल A free and Repsonsible Press हा शिकॅगो विद्यापीठानें संशोधन केलेला रिपोर्ट प्रसिद्ध आहे. त्यांत एक वाक्य गमतीचें आढळलें. तें असें कीं, “ ज्याला ‘ स्वातंत्र्य ’ म्हणतात तें पूर्वीं, आज किंवा कोणत्याहि काळीं कधीं

अस्तित्वांत असूं शकेल काय ? " Equity varies with the foot of the Chanceller. अशी एक विनोदी म्हण आहे. म्हणजे कायदा तोच तरी पण न्यायाचें माप न्यायाधीशाप्रमाणें वेगवेगळें असतें ! त्याप्रमाणें, जुन्या संपादकाच्या ध्येयवादाहून नव्यांचा ध्येयवाद कदाचित् वेगळा असेल; पण कोणत्या तरी ध्येयवादाच्या खडकावर त्यांना आपले पाय रोवावेच लागतील. 'A river makes its own bed' ही म्हण त्यांनीं विसरूं नये. त्यांतूनच मार्ग निघेल.

भारत सरकारचा प्रेस-कमिशन रिपोर्ट, इंग्लंडच्या पार्लमेंटनें केलेला रॉयल कमिशन रिपोर्ट ( १९४७–४९ ), अमेरिकन वृत्त-व्यवसाया-बद्दल रिपोर्ट ( १९४६ ), तसेंच The Press in Germany हें अलीकडील पुस्तक, अशीं अनेक पुस्तकें या विषयाच्या माहितीकरितां मीं वाचलीं आहेत. तथापि, " वृत्तपत्र-व्यवसायाचें भवितव्य काय ? " हा विषय या पुस्तकाच्या कक्षेंत येतो असें वाटत नाहीं म्हणून त्याबद्दल येथें कोणतीच चर्चा करूं इच्छीत नाहीं. या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत हर्स्ट, नॉर्थक्लिफ, गोएंका व बिर्ला या भांडवलवाल्यांचा उल्लेख ग्रंथकर्त्यानें केला आहे. ( पृ. १५० ) यावरून बदलत्या काळाचीं पावलें त्यांच्या नजरेस आलींच होतीं; आणि त्यावरूनच, " आहे काय व हवें काय ? " याबद्दल तपशीलवार सूचना त्यांनीं केल्या आहेत त्या वृत्तपत्र-लेखकांना बहुमोल व मार्गदर्शक वाटतील. तितक्या जरी कसोशीनें अंमलांत आणल्या तरी वर्तमानपत्रांना नांव मिळेल असा विश्वास वाटतो.

तीं० तात्यासाहेबांचें वाङ्मय नीटनेटकें संपादन करून पुस्तकरूपानें पुढें मांडतांना मनाला फार संतोष वाटतो. अलीकडे वृत्तव्यवसाय-शिक्षणाचा नवा उपक्रम सुरू झाला असल्यामुळें हें पुस्तक पुढें आणण्यांत औचित्य वाटलें. या विषयाची आवड असणारांना त्याचा उपयोग होवो एवढीच इच्छा आहे.

ता. १० फेब्रुवारी १९६५<br>पुणें

**का. न. केळकर**

---

# विषयानुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | वर्तमानपत्र-मीमांसा ... ... | १ |
| २ | विलायती वर्तमानपत्रांचा इतिहास ... | १० |
| ३ | हिंदी वर्तमानपत्रांचा इतिहास ... | १८ |
| ४ | अखबारनवीस ... ... | २० |
| ५ | हिंदी अखबारांचे नमुने ... ... | २२ |
| ६ | हिंदी पत्रांचें समालोचन ... ... | ३३ |
| ७ | अँग्लो इंडियन पत्रांची हकीगत ... | ३७ |
| ८ | महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें ... ... | ४३ |
| ९ | जुना ज्ञानप्रकाश ... ... | ४६ |
| १० | बंगाल्यांतील वर्तमानपत्रें ... ... | ५२ |
| ११ | मद्रासचें 'पुढारी' वर्तमानपत्र ... | ६० |
| १२ | वर्तमानपत्रें व देशी-विदेशी भाषा ... | ६४ |
| १३ | इकडील वर्तमानपत्रें ... ... | ६७ |
| १४ | प्रेस ॲक्टची कामगिरी ... ... | ७३ |
| १५ | वर्तमानपत्रांना लागणारा कागद ... | ७५ |
| १६ | दीर्घायुषी वर्तमानपत्रें ... ... | ७७ |
| १७ | केसरी व मराठा यांची उत्पत्ति व वाढ | ७९ |
| १८ | केसरी व मराठ्यावरील आपत्तींचे प्रसंग | ९६ |
| १९ | केसरीची मालकी व संपादकीय धोरण | १०६ |
| २० | केसरीचा व तुरुंगाचा ऋणानुबंध ... | ११३ |
| २१ | केसरी संस्थेची सांपत्तिक स्थिति ... | ११५ |
| २२ | कांहीं मनोरंजक आठवणी ... ... | १२२ |
| २३ | संपादकीय शिक्षण ... ... | १३४ |
| २४ | वृत्तव्यवसायांतील माझा अनुभव ... | १४२ |
| | परिशिष्ट : | |
| | माझ्या कांहीं आठवणी | १५६ |
| | कांहीं उपयुक्त पुस्तकें ... ... | १६० |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८४८१ वि: निबंध
क्रमांक २५७८ कौ. कि. ३।धध५



लो. टिळक व न. चिं. केळकर
( १९०४ सालीं घृष्णेश्वराच्या देवालयांत घेतलेलें छायाचित्र )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८४८९ वि: ...
क्रमांक ... १५८५ ... नों. दि. ...
संग्रहालय ठाणे
दा. क्र. ...

# ‘ वर्तमान-पत्र ’-मीमांसा

‘ वर्तमानपत्र ’ या नांवावरूनच त्यांतील मुख्य व अवश्य अंग कोणतें याचा बोध आपोआपच होतो. वर्तमान म्हणजे चालू स्थिति. वर्तमान याला ‘ वृत्त ’ हाहि एक समानार्थक शब्द आहे. वृत्त म्हणजे जें घडलेलें तें. पण वृत्त शब्दावरून जसा मुख्यतः भूतकाळाचा बोध होतो, तसाच वर्तमान या शब्दावरून मुख्यतः चालू काळाचा बोध होतो. अर्थात् या दोहोंपैकीं जें ‘ वर्तमान ’ त्यालाच ताजेपणा असल्यामुळें, वृत्तपत्र यापेक्षां वर्तमानपत्र हेंच नांव अधिक सार्थ ठरतें. पण हें अर्थातच केवळ तात्त्विक विवेचन झालें. प्रत्यक्ष व्यवहारांत गतगोष्टी व भूतकालीन वृत्त यांचाहि समावेश होतोच. किंबहुना तो करावाच लागतो. कारण खरा खरा वर्तमानकाळ हा सुईच्या अग्राहूनहि निरुंद व बारीक असा आहे. एका सेकंदांतहि जर १०० भाग पाडतां आले, तर एकशतांश सेकंद हाच कदाचित् खरा वर्तमानकाळ होईल. पण मनुष्याची आकलनशक्ति ही त्याच्या इंद्रिय-व्यापारावर अवलंबून असते; व मानवी इंद्रिय-व्यापारच इतका वेळ घेतात कीं गोष्ट घडणें आणि इंद्रिय-व्यापारानें तिचें आकलन करणें यांत एकशतांश सेकंदच काय पण सेकंद दोन सेकंदहि जातात. म्हणजे गोष्ट घडली भूतकालांत व तिचें आकलन झालें वर्तमानकालांत असेंच केव्हांहि होणार. आणि मनुष्याच्या इंद्रियांसमोर प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टींची जर ही स्थिति, तर त्याच्यापासून जितक्या दूर दूर कोणत्याहि गोष्टी घडतील तितका अधिकाधिक काल त्या त्याला कळण्याला लागणार आणि स्वतः त्यालाच कळण्याला जर कांहीं काळ लागणार, तर तीच गोष्ट तो कोण्या दुसऱ्याला कळवणार झाला तर आणखीहि अधिक वेळ लागणार हें उघडच आहे. मग भूतकालांत घडलेल्या गोष्टीला वर्तमान कसें म्हणावयाचें ?

याचें उत्तर हेंच कीं वर्तमान हा शब्द, ज्या कालीं गोष्ट ‘ घडली ’ त्या कालाचा खरोखर दर्शक नसून, गोष्ट ज्या कालीं ‘ समजली ’ त्या कालाचा वाचक होय. या दोहोंतील सूक्ष्म भेद समजून सांगण्याकरितां आपण एक प्रसिद्ध उदाहरण घेऊं ! इजिप्तमधील राजघराण्याच्या थडग्यांत प्रेतें

पुरलीं त्याला हजारों वर्षें लोटलीं. पण त्या प्रेतांबरोबर पुरलेल्या वस्तूंचीं कांहीं वर्णनें आपणाला प्रथम १९३० सालीं वर्तमानपत्रांत वाचावयास सांपडलीं असें समजूं या. उदाहरणांत, थडग्यांत पुरल्या जाण्याचा या वस्तूंचा काळ जरीं हजारों वर्षांइतका जुना असला तरी आपल्याला त्या जोंपर्यंत अज्ञात होत्या, तोंपर्यंत त्या होत्या नव्हत्या या दोनहि गोष्टी आपणास सारख्याच नव्हत्या काय ? पण ज्या दिवशीं त्यांचीं वर्णनें आपणाला वाचावयाला सांपडलीं त्या दिवशींच त्या आपल्याला ज्ञानगम्य झाल्या. पुरलेल्या वस्तु हजारों वर्षांच्या जुन्या पण आज झालेलें त्यांचें ज्ञान हेंच आम्हांला ताजें ! आतां या वस्तु सांपडल्याची बातमी इंग्लंडांतील लोकांना आमच्या आधीं दोन दिवस, व त्याच्याहि पूर्वीं खुद्द इजिप्तमधील लोकांना आणखी दोन दिवस आधीं कळली असेल. या दृष्टीनें, म्हणजे दोन देशांतील लोकांच्या तुलनेने, त्या बातमीचा ताजे-शिळेपणा वाटेल तर मोजावा, पण ज्याला जेव्हां ही बातमी प्रथम कळली, तेव्हां ती त्याला ताजीच होती. एकाच मनुष्यासंबंधानें बातमीचा ताजेपणा शिळेपणा मोजावयाचा तर मात्र असें म्हणतां येईल कीं, ज्याला जी एकादी बातमी प्रथम कळली त्याला तीच फिरून मागाहून कळली तर ती मात्र पुरती शिळी. अर्थात् ‘ वर्तमान ’ या शब्दाचा अर्थ प्रथम कळलेली म्हणून ताजी ‘ अशी जी बातमी ’ ती असाच केला पाहिजे.

बातमीचा मुख्य गुण गोष्ट घडण्याचा ताजेपणा नसून गोष्ट घडलेली कळण्याचा ताजेपणा होय. हा ताजेपणा म्हणजेच नवेपणा. नवेपणा हेंच नवलाईचें बीज होय. जुनी किंवा शिळी बातमी नवल उत्पन्न करूं शकत नाहीं. जशी एकादी कोटी तशीच बातमी. म्हणजे ती प्रथम ऐकावी तेव्हांच नवल वाटतें. पण फिरून तीच ऐकली म्हणजे तिचें नवल वाटत नाहीं. नवल या शब्दांत नव म्हणजे नवीन हा मुख्य शब्द असून ल हा एक प्रकारचा प्रत्यय आहे; व तो प्रत्यय कार्यकारणभावदर्शक आहे. दुर्दैवानें बातमी या उर्दू शब्दाला समानार्थक असा एकादा संस्कृत शब्द रूढ नाहीं कीं, ज्यांत नव हा शब्द गर्भित किंवा बीजभूत आहे. रूढीनें नवल या शब्दाचा अर्थ मूळ कारणांपासून सुटून कार्याकडे अधिक झुकलेला आहे. यामुळें नवल हा शब्द उच्चारला म्हणजे, घडणाऱ्या गोष्टीच्या नवीनतेचा बोध होत नाहीं असें नाहीं

पण ती नवी गोष्ट ऐकून मनाला वाटणाऱ्या आश्चर्याचाच बोध त्या शब्दापासून अधिक होतो.

पण इंग्रजी भाषेंत News हा शब्द असा आहे कीं, बातमीच्या नवीनपणाचा बोध उत्पन्न करणारा New हा शब्दच News या शब्दात ग्रथित झालेला आहे. इंग्रजी New व संस्कृत नव हे शब्द एकच होत. नव हा संस्कृत शब्द लॅटिन व फ्रेंच या भाषांच्या द्वारें इंग्रजींत प्रविष्ट झाला आहे. आणि इकडे नव या शब्दाला परिणामार्थी ' ल ' हा प्रत्यय लावण्यात येऊन नवल हा शब्द बनला, त्याचप्रमाणें तिकडे New या शब्दाला S हा अनेकवचनार्थक प्रत्यय लागून त्यापासून विविधतेचा– वैचित्र्याचा अर्थ पूर्ण होतो.

News या शब्दाची अर्थव्युत्पत्ती दुसऱ्याहि एका रीतीनें केलेली पाहण्यात येते. पण ती केवळ मौजेच्या दृष्टीनें, खऱ्या व्युत्पत्तीच्या दृष्टीनें नव्हे ! ती मौजेची व्युत्पत्ती अशी कीं, News हा चार अक्षरी शब्द असून त्यातील प्रत्येक अक्षर एकेक निरनिराळ्या दिशेचा वाचक आहे. म्हणजे N = North उत्तर. E = East पूर्व. W = West पश्चिम. S = South दक्षिण = अर्थात् News म्हणजे या चारीहि दिशांनी म्हणजे चोहींकडून आलेली बातमी. यात बातमीच्या उगमांच्या क्षेत्रविस्ताराचें गमक आहे व हल्लीं जगाच्या सर्व भागांतून आलेली बातमी वाचावयास सांपडतेहि. या दृष्टीनें पाहतां या मौजेच्या व्युत्पत्तींत खरेपणा नसला तरी मार्मिकपणा खास आहे. पण त्यांत बातमीचा नवेपणा व त्या नवेपणापासून उत्पन्न होणारी नवलाई किंवा आश्चर्यप्रतीति यांचें गमक नाहीं. म्हणून व हेंच वस्तुतः पहिल्या गमकाहून अधिक मार्मिक आहे हें कोणीहि कबूल करील.

असो. अशा रीतीनें ' वर्तमान ' या शब्दांत भूतकालवाचक गोष्टी कशा येऊं शकतात हें सांगितलें. पण या गोष्टीबरोबरच भविष्यकालीन गोष्टींचाहि वर्तमान या शब्दांत समावेश होऊं शकतो. हें सांगितलें पाहिजे अमुक एक गोष्ट घडली असें ऐकल्यास तिच्यावर आपला जितका विश्वास बसतो तितका अमुक एक गोष्ट घडणार किंवा घडेल असें म्हणल्यास तिजवर विश्वास बसत नाहीं. कारण इतिहास हा निश्चित, व भविष्य हें अनिश्चित. जें घडेल तें घडलें नाहीं असें करणें हें ईश्वराच्याहि हातीं नाहीं. पण जें पुढें घडणार

म्हणजे आज घडलेलें नाहीं, अजून घडावयाचें आहे, तें फसविणें म्हणजे घडूं न देणें ही गोष्ट जशी देवाधीन किंवा दैवाधीन, तशी कांहीं अशीं मनुष्याधीनहि आहे. अर्थात् या अनिश्चितपणामुळें त्याची नवलाई मनाला तितकी वाटत नाहीं. तथापि, मागें भूतकालीन गोष्टीबद्दल जें सांगितलें तें भविष्यकालीन गोष्टींविषयींहि समजावें. म्हणजे भविष्यकाळीं घडणारी गोष्ट हाहि बातमीचा ( वर्तमानाचा ) विषय होऊं शकेल. पण ती गोष्ट घडण्याच्या संबंधापेक्षां ती गोष्ट घडणार अशा आज होणाऱ्या ज्ञानाचाच संबंध त्यांत अधिक येतो. व या दृष्टीनें जगाच्या उत्पत्तीपासून जगाच्या अंतापर्यंत कोठेंहि केव्हांहि घडणारी गोष्ट ही देखील आपणाला प्रथमच नव्यानें कळतें तेव्हां त्याला वर्तमान हें नांव यथार्थतेनें देतां येईल.

वर्तमान म्हणजे नवी बातमी हा वर्तमानपत्राचा मुख्य विषय ठरला. पण वर्तमान किंवा नवी बातमी ऐकावी अशी जी बुद्धि किंवा वासना मनुष्याला होते ती कां ? याचें विवेचन वेगळेंच करावें लागतें. व तें विवेचन करतांनाहि थोडेंबहुत तत्त्वज्ञानांत शिरावें लागतें. आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेंच बोलावयाचें तर, मनुष्याला नव्या बातम्या वाचण्या—ऐकण्याची जी इतकी उत्कट किंवा अनिवार वासना होते, तिचें कारण, मनुष्य हा सर्वज्ञ ईश्वराशीं स्पर्धा करण्याची इच्छा करतो; किंवा 'स्पर्धा' सोडली तरी दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र हेतूनें आपण सर्वज्ञ होण्याची तो इच्छा करीत असतो, असाच सिद्धान्त मांडावा लागतो. "नव्या बातम्या ऐकण्याची चटक" येथपासून "सर्वज्ञ ईश्वराशीं स्पर्धा" येथपर्यंत फारच मोठी मजल असल्याकारणानें, वरील सिद्धान्त मांडणें म्हणजे मनाला येईल तें बोलणें किंवा जीभ उचलून टाळ्याला लावणें असें सकृत् दर्शनी सहजच वाटतें. परंतु तें जितकें आश्चर्यकारक आहे तितकेंच तें खरेंहि आहे. या सिद्धान्ताच्या विवेचनाचा प्रारंभ म्हणून आपण इतर कांहीं गोष्टी पाहूं व तपासूं त्या अशा. मनुष्य हा सर्वज्ञ ईश्वराशीं स्पर्धा करण्याची इच्छा धरो किंवा न धरो, पण तो आपल्या संग्रहीं असणाऱ्या ज्ञानावर केव्हांहि संतुष्ट नसतो ही गोष्ट मात्र कोणीहि नाकबूल करणार नाहीं. आणि असंतोष हा 'श्रियोमूलं' हा सिद्धान्त सर्वसंमतच आहे. अर्थात् आहे त्याहून अधिकाधिक ज्ञान मिळविणें ही गोष्ट मनुष्य प्रयत्नसाध्य मानतो व त्या प्रयत्नाला लागतो. पण कोणताहि प्रयत्नसाधनावरच

अवलंबून. आणि मनुष्याची ज्ञानसाधनें म्हणजे त्याचीं इंद्रियें हींच होत. अर्थात् या इंद्रियांच्या उपयोगानें प्रत्यक्ष अनुमान उपमान इत्यादि रीतीने तो आपल्या ज्ञानाची वाढ करतो. नसेल तें नवें मिळवितों. एकांगी असेल तें अनेकांगी करतों. असंस्कृति असेल ते संस्कार देऊन कमावतों. या गोष्टी प्रत्यक्ष व अनुमान यांच्या योगाने होतात. आणि उपमानाच्या रीतीनें त्याला हा उपयोग होतों कीं, स्वतःची भूमिका न सोडता तो कल्पनेनें क्षणभर परवस्तुकाया-प्रवेश करितो; आत्मौपम्यानें तेथें मिळविलेला काल्पनिक अनुभव व स्वतःच्या भूमिकेंत मिळविलेला प्रत्यक्ष अनुभव यांची तो जोड घालतो.

तसेंच इंद्रियाच्या उपयोगांतहि तो शक्य तेथवर अनेक इंद्रियें एकदम कामाला लावून संकीर्णज्ञान अनुभविण्याचा प्रयत्न करितो. याची फोड थोड्याशा उदाहरणांनीं होईल. रसनेंद्रियाचें काम जीभ करते. पण तिला जसा एकेरी रसाचा स्वाद घेतां येतो तसाच अनेक रसांच्या मिश्रणाचाहि स्वाद ती घेऊं शकते. म्हणून मनुष्य रसनेच्या द्वारे रसज्ञान होईल तितकें अधिक वाढवितो. मनुष्याच्या खाण्यांत अगदीं एकेरी रस थोडे असतात. त्याच्या मिश्रणाशिवाय तो बहुधा पदार्थ खातच नाहीं. म्हणून तो निर-निराळ्या प्रकारचे मसाले किंवा पंचामृतासारखीं पक्वान्नें बनवितो. पण खाण्याचा पदार्थ नुसत्या रसनेला रुचकर लागणारा असल्यानें त्याचें समाधान होत नाहीं. म्हणून तो रुचकर पदार्थांनाहि शक्य तितका नयनमनोहर आकार देतो. विलायती टेबलावरील गोड ‘ पुडिंगा ’ना सुंदर आकार देतात किंवा ‘ केक्स ’ ना मनोऱ्याचा आकार देतात. साखरेचीं चित्रें नुसत्या साखरेपेक्षां मुलांना अधिक आवडतात. साखरेच्या नुसत्या पुडीला सौंदर्य नाहीं. मेणबत्ती हा खाण्याचा पदार्थ नाहीं. पण शुभ्र साखरेची कांडी मेणबत्तीसारखी गोल व तुकतुकीत करतां आली तर, साखर खाण्यांत तोंडाला व मेणबत्ती पाहण्यांत डोळ्याला जें एकेरी सुख मिळतें तें साखरेची मेणबत्ती खाण्यानें दुणावणार नाहीं काय ? पक्वान्नांत केशर घातल्यानें रसना, घ्राण व नेत्र या तिन्ही इंद्रियांचें समाधान एकदम होतें. केशराची रुचि फारशी चांगली नसते, पण त्याचा रंग व स्वाद हीं दोन्ही उंची दर्जाचीं आहेत खास ! फोनोग्राफनें कर्णेंद्रियाचा संतोष होतो, पण ‘ टॉकीज ’चा नवा प्रकार घेतला तर त्यांत मनुष्याची हालचाल पाहून डोळ्यांना व भाषणें-

गाणीं ऐकून कानांना असा उभयविध आनंद एकाच क्षणीं होतो, मेजवानीच्या वेळीं गाणें किंवा बँड चालू ठेवण्यांत एका रसनेंद्रियानें किंवा एका कर्णेंद्रियानें कधीं न होणारा असा सजोड दुहेरी आनंद मिळवून देणें हाच खरा हेतु नसतो काय? पाठीशीं तक्क्या ठेवायचा तो नुसता मऊ असला म्हणजे स्पर्शेंद्रियांना सुख भरपूर मिळेलच. तर मग तक्क्यावर चित्रें वेलबुट्टी कां काढावयाची? तर त्वगिंद्रियाबरोबर चक्षुरिंद्रियालाहि समाधान व्हावें म्हणून!

या सर्व उदाहरणांवरून ज्ञान व अनुभव अधिकाधिक मिळविण्याविषयीं मनुष्याचे प्रयत्न, कसे सुरू आहेत हें लक्षांत येईल. तेंच तत्त्व नवी नवी बातमी ऐकण्याविषयींच्या मनुष्याच्या लालसेला लावावें म्हणजे झालें. बसल्या बैठकीस एकाच क्षणीं जगांतील जितकी अधिकांत अधिक बातमी मिळेल, तितका मनुष्याला अधिकच आनंद होतो. व हा आनंद वाढविण्याच्या भरांत सर्वज्ञ ईश्वराशीं मनुष्य नकळत स्पर्धा करतो असें म्हटलें तर त्यांत वावगें तें काय आहे! आज रेडिओच्या व वायरलेसच्या साहाय्यानें तो हजारों मैल दूर असलेल्या पदार्थांचे रंग रूप व त्यांनीं उत्पन्न केलेला आवाज यांचा अनुभव घेतो. तेंच पुढें जाऊन अशी कल्पना करूं कीं, पुराणांतील अंतर्ज्ञानी योग्याप्रमाणें, मनुष्याला बसल्या बैठकीस स्वतःच्या इंद्रियांना व मनाला रेडिओचे किंवा वायरलेसच्या यंत्रांचें रूप देतां आलें, व हव्या त्या ठिकाणीं हव्या त्या वस्तूंचें ज्ञान मिळवितां आलें, तर तें त्याला इष्ट वाटणार नाहीं काय? किंबहुना, शास्त्रज्ञ मनुष्याचा तसा प्रयत्नहि आजहि सुरू नाहीं काय? वर्तमानपत्रें वाचण्याच्या आवडीची मीमांसा करतांना इतक्या खोल पाण्यांत शिरल्याशिवाय खरोखरच गत्यंतर नाहीं.

अज्ञात असलेल्या गोष्टींचें ज्ञान होणें हा मनुष्याचा एक शाश्वत आनंदच आहे. पण या ज्ञानांतहि दोन प्रकार असतात. एक आत्मनिरपेक्ष व दुसरा आत्मसापेक्ष. प्रायः यच्चयावत् निर्जीव सृष्टीचें ज्ञान हें सामान्यतः आत्मनिरपेक्ष, व सजीव सृष्टीपैकीं मनुष्य समाजासंबंधानें ज्ञान हें आत्मसापेक्ष असा भेद करितां येईल. याचें कारण असें कीं, मनुष्यसमाजाविषयीं म्हणजे त्यांतील व्यक्तीविषयीं जें ज्ञान मनुष्याला मिळतें यावरून तो स्वतः आपली व या इतर व्यक्तींची मनांत तुलना करीत असतो व या तुलनेनें त्याच्या निरनिराळ्या भावना प्रदीप्त होतात.

समजा, आफ्रिकेंतल्या रानटी मनुष्याविषयीं म्हणजे त्यांच्या रानटीपणाविषयीं नवी माहिती कळली म्हणजे हा मनुष्य मनांत म्हणतो, “ वा ! मी अशा लोकांपेक्षां किती श्रेष्ठ आहे ? ” म्हणजे त्याची अहंकारभावना येथें प्रदीप्त झाली. याच्या उलट अमेरिकेंतील अत्यंत सुधारलेल्या लोकांच्या व्यवहाराची कांहीं अपूर्व बातमी कळून तो चकित झाला म्हणजे त्याच्या तुलनेनें आपण किती मागासलेले आहों असें वाटून तो खजील होतो. आपल्यासारखे गुण किंवा दोष ज्याच्यांत आहेत अशा लोकांचे गुण प्रगट करणारें वर्तमान त्यांच्या कानावर आलें म्हणजे त्याला बरें वाटतें. कारण त्याला जोडीदार मिळतात, आणि त्यांचें आत्मसमर्थन होतें.

मनुष्यस्वभावाचा हा एक प्रकार झाला. पण दुसरा व याहून अधिक चांगला असाहि प्रकार असूं शकतो. म्हणजे आपल्यापेक्षां कमी सुधारलेल्या किंवा अधिक दुःखी माणसांचें वर्तमान ऐकल्यानें याच्या मनांत अहंकारबुद्धि किंवा श्रेष्ठत्वाची भावना न उद्भवतां, दयेची किंवा अनुकंपेचीच भावना उत्पन्न होईल. तसेंच आपणांपेक्षां अधिक सुधारलेल्या किंवा अधिक सुखी समाजाची बातमी त्याला समजली असतां तो ख़जील होणार नाहीं किंवा त्याला त्याच्याविषयीं मत्सर वाटणार नाहीं. तर स्वतःची सुधारणा करण्याविषयीं त्याच्या मनांत उमेद व आशाच उत्पन्न होईल. असो. हीं केवळ कांहीं उदाहरणें होत, व अशींच आणखीहि उलटसुलट उदाहरणें देऊन, नवीन बातमी ऐकल्यानें मनुष्याच्या कोणकोणत्या भावनांवर कसकसा परिणाम किंवा प्रतिक्रिया होते हें सहज सांगतां येईल. परंतु येथें इतका विस्तार करण्याचें कारण नाहीं. सांगण्याच्या मुद्दा इतकाच कीं, नवीन बातमी कळणें, म्हणजे नवें ज्ञान होणें, यापासून मनुष्याची बुद्धि व त्याच्या भावना या जाग्रत होतात. आणि आपणाला सर्वज्ञत्व किंवा सर्वशक्तिमत्त्व लाभावें अशी जी गुप्त आकांक्षा त्याला असते ती क्षणमात्र किंवा कणमात्र तृप्त झाल्यासारखी त्याला वाटते.

निर्जीव सृष्टीचें ज्ञान हें देखील मनुष्याला कुतूहलकारक असतें. पण त्यांत कोणत्याहि प्रकारची सामाजिक तुलना नसून फक्त भय, चिंता, लोभ, बुद्धि इत्यादि त्याचे विकार जाग्रत होतात. स्पष्ट पदार्थांचे नवे गुणधर्म कळले तर

शास्त्रज्ञ मनुष्याला आणखी नवीन शोध लावण्याची उमेद वाटते. लोभी कारखानदाराला आपल्याला द्रव्यलाभाचें एक नवीन साधन मिळालें असें वाटतें. अशाच रीतीनें नव्या खाणीचा शोध लावणें हें एकाला आनंदकारक तर दुसऱ्याला दुःखकारक होऊं शकतें. देशावर पाऊस एकंदरीनें कमी पडला हें ऐकून जी चिंता वाटते तिच्यापेक्षां कालांतरानें जळाऊ सरपणाचीं जंगलें किंवा कोळशाच्या खाणी संपून जाणार या बातमीनें वाटणारी चिंता कमी असते. आणि त्याच्याहि फार पलीकडे गेलें असतां, सूर्य हाहि एका काळीं विझून जाईल ही बातमी ऐकून ज्याला चिंता वाटेल असा मनुष्य सहसा आढळणार नाहीं. तथापि, त्यांतल्या त्यांत विचारी शास्त्रज्ञाला असली बातमीहि चिंतेचा झटका देऊन गेल्याशिवाय राहाणार नाहीं.

वर्तमानपत्रांच्या वाचकांनीं वरील विचारसरणी लक्षांत ठेवून जर मधून मधून स्वतःच्या मनाला प्रश्न करून विचारलें कीं, " मला ही विवक्षित बातमी वाचून ऐकून काय वाटलें ? माझी कोणती भावना जागृत झाली ? " तर त्याचें मन त्याला त्या प्रश्नाचें उत्तर देईल. परिप्रश्नाची पद्धत अंगिकारिली असतां, स्वतःच्या मनासारखा गुरु दुसरा कोणताच भेटणार नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां, वर्तमानपत्र हें केवळ एक उपलक्षण ठरेल. आणि मासिकें व पुस्तकें हीं त्याच दृष्टीनें उपयोगी ठरतील.

अशा रीतीनें बातमीचें म्हणजे नव्या ज्ञानाचें महत्त्व वर्णन करण्यांत आलें खरें, पण ही बातमी मनुष्याला कशी कळते ? याचीं उत्तरें दोनच होऊं शकतात. एक, स्वतः मनुष्य बसल्या जागचा उठून हलेल, चालेल हिंडेल, प्रवास करील व स्वतःच्या इंद्रियांनींच ती मिळवील, किंवा हें त्याचें काम त्याच्याकरितां दुसरा कोणी तरी करील तरच होणार. या दृष्टीनें पाहतां, शें-पन्नास वर्षांमागें ज्ञान मिळण्याचें व बातमी कळण्याचे हे दोन्ही प्रकार फारच मर्यादित होते. मनुष्य पायानें चालला तर रोज फार तर १०–५ कोस चालेल व तो घोड्यावरून किंवा उंटावरून गेला तरीहि १५–२० कोसांपेक्षां अधिक जाणार नाहीं. व ही जी मर्यादा एकाला तीच इतर सर्वांना. तसेंच मनुष्यानें मनुष्याला भेटून बातमी सांगावयाची असें म्हटलें तर एका दिवसांत किंवा एका वर्षांतहि किती माणसें एकमेकाला भेटणार ? आणि जीं भेटणारीं

तींहि वरीलसारख्या मर्यादेनेंच बांधलेलीं. यामुळें नवी बातमी किंवा नवें ज्ञान असें कितीसें मिळणार ? बसल्या जागेवरून जगाचें ज्ञान व्हावयाचें तें पूर्वीं अर्थात् संकुचितच असे. गेल्या शतकापर्यंत आमच्या इकडील पंडित व विद्वान् हे हिंदुस्थानांत नऊ खंड पृथ्वी व दहावें खंड काशी असें मानीत असत. त्याचप्रमाणें, उलट इंग्लंडांतल्या लोकांना हिंदुस्थानांतील अंतरांची कल्पना नसल्यामुळें, मुंबई व कलकत्ता शहरें जवळ जवळ एकमेकाला लागून असावीं अशा विचारानें, मुंबईस जाणाऱ्या प्रवाशाजवळ सहज कलकत्त्याच्या स्नेह्याला पोंचविण्याकरितां ते पत्रें देत. आणि लंडनहून असें निघालेलें पत्र मुंबईस पोंचावयाला सहा महिने व पुढे कलकत्त्यास पोंचावयाला आणखी दोन महिने मिळून लिहिणारा व वाचणारा यांतलें अंतर तुटण्याला ८ महिने लागत. पण ही स्थिति आतां पूर्णपणें पालटली आहे. आणि स्वतः प्रत्यक्ष हिंडून-फिरून बातमी ऐकण्यासांगण्याची त्याची शक्ति जशी मोटारी, जहाजें व विमानें यांच्यायोगानें बेसुमार वाढली, तशी तारायंत्र, विद्युत्संदेश, यांच्यायोगानें बसल्या जागेवरून विचारविनिमय करण्याचीहि त्याची शक्ति बेसुमार वाढली आहे. किंबहुना असें वाटतें कीं, तरफांच्या तारामुळें वादी-संवादी सुस्वरांच्या उत्तर-प्रत्युत्तरानें किंवा अनुसंधानें बीन व सतार यांच्या ध्वनिमर्यादेंतली जागा शब्दमय बनते, तशीच या नव्या रणनांनीं सर्व जग बसल्या बैठकीला ज्ञानमय बनत चाललें आहे व त्याची प्रतीति होण्याचें एक मुख्य साधन वर्तमानपत्र हें होऊन राहिलें आहे.

# विलायती वर्तमानपत्रांचा इतिहास

बातमी व टीका हा वर्तमानपत्रांचा मुख्य विषय म्हटला तर वर्तमानपत्रांचे आद्यस्थान ग्रीक देशांतील जुन्या रंगभूमीला द्यावें लागेल. कारण त्या वेळी प्रयोग होणाऱ्या नाटकांतून पुष्कळ वेळां ताजी बातमी व त्यावरील चुरचुरीत टीका यांचा समावेश केला जात असे. युरोपायडीज, सोफ्लाक्लीस, एस्चिलस, ॲरिस्टोफेनिस यांच्या नाटकांतील विषय प्रचलित चळवळीचेच पुष्कळसे असत. नाटकगृहाबाहेर घडणाऱ्या चालू गोष्टी नाटकगृहांत पात्रांच्या तोंडून वदविणें व त्यांवर इतर पात्रांच्या तोंडून टीका करवणें हा लेखी वर्तमानपत्रांच्या ऐवजीं बोलक्या वर्तमानपत्रांचाच प्रकार झाला. झेनोफान वगैरे इतिहासकार हे अर्धे शाहिरी बाण्याचे व अर्धे वर्तमानपत्रांच्या खास बातमीदारांच्या पेशाचे होते. सीझरने ' ॲक्टा डायरना ' नांवाचें वृत्तपत्र सन ६१ सालीं सुरू केलें. त्यांत राजधानींत घडणाऱ्या गोष्टींची रोजची ताजी खबर असे.

विलायती वर्तमानपत्रांचा पूर्वज म्हटला म्हणजे तें एक दुमडलेलें चौकोनी हँडबिल असे, व तें कारणपरत्वें प्रगट होई. रस्त्यांतून फेरीवाले तें विकीत व आजच्यासारखेंच तोंडानें त्यांतील चटकदार बातम्यांचें बीजयंत्र ओरडून सांगत. त्यांत मुख्यतः परदेशांतील लढाया, देशांतील खून अत्याचार म्हणजे एकंदरीनें अद्भुत गोष्टीच असत. सामान्य माणसाकरितां ही तजवीज झाली. पण त्या वेळचे अमीर-उमराव, मुत्सद्दी व अर्थातच राजेलोकही आपापले दूत व वृत्तलेखक परदेशीं ठेवून ताजी बातमी आणवीत असत. हे य पत्रांचे लेखक मोठेसे विद्वान् नसत. पण मोठे चौकस व गुप्त बातम्या काढणारे, व त्या रंगवून सांगणारे असत. किंबहुना हे गुण अंगीं असणाऱ्या लेखकांचीच योजना या कामीं होई; कांहीं कांहीं जुनीं वृत्तपत्रें इतकीं रसभरित व यथार्थ वर्णनाचीं वाचावयास मिळतात कीं, त्यांचे लेखक आजच्या पुढारी वर्तमानपत्रांचेहि खास बातमीदार होऊं शकले असते.

वर्तमानपत्र या अर्थाचे मूळचे इंग्रजी शब्द कोरंट व गॅझेट हे होत. कोरंट म्हणजे संकलित वर्तमान किंवा वृत्त. त्याहि पूर्वीचा शब्द गॅझेट हा असून

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५४५९ वि: निबंध
... नों दि: ३।५।६५


तो गॅझिटी—गझा ' या इटालियन शब्दांपासून बनला आहे. इटाली देशांत व्हेनिसच्या उपराष्ट्रांत सोळाव्या शतकामध्यें गॅझा नामक वृत्तपत्रें प्रचलित होतीं. युरोपांत व इंग्लंडांत त्यांचा प्रवेश पूर्वी सांगितलेल्या वृत्तलेखांच्या किंवा बातमीपत्रांच्या द्वारें झाला. ही बातमीपत्रें प्रायः मंगळवारीं व शनिवारीं परदेशांतून येत. पण त्यांचा सुकाळ झाल्याबरोबर सरकाराची त्यांवर वक्रदृष्टि झाली. छापील वृत्तपत्रें ही सरकारच्या मालकी हक्काची बाब असून ज्याला तें खासगी मालकीचें काढावयाचें असेल त्यानें सरकारी परवाना काढावा असा कायदा होता. आणि असा परवाना काढल्याशिवाय जे दडपून वृत्तपत्रें छापीत त्यांच्यावर खटले होत, व स्टार चेंबर नांवाने प्रसिद्ध असलेलें जुलमी न्यायकोर्ट ( १६३७ ) त्यांना कडक शासन करी. पण राजाच काय, ब्रिटिश पार्लमेंटालाहि हा हक्क मोठा मौल्यवान वाटे. म्हणूनच पार्लमेंटच्या बैठकीला सभासदांशिवाय इतर परकी मनुष्यांनीं हजर राहू नये, व पार्लमेंटाच्या खास रिपोर्टांशिवाय दुसऱ्यांनीं पार्लमेंटांतील वादविवादाचे रिपोर्ट प्रसिद्ध करू नये असें ठरविण्यांत आलें होतें. सॅम्युअल जॉन्सन् हा विद्वान् लेखक म्हणून पार्लमेंटचें वादविवादाचे रिपोर्ट तयार करण्याचें काम त्याच्याकडे देण्यांत आलें होतें. पण तो निवळ बातमीवरून घरीं बसल्याच ते रिपोर्ट आपल्या मनानें कल्पनेनें तयार करी ! सन १७७४ पासून खरे रिपोर्ट असे प्रसिद्ध होऊं लागले. आणि आतां तर काय, पार्लमेंटाचें खास रिपोर्टर समग्र भाषणें शब्दान् न शब्द छापतातच, पण वर्तमानपत्रांच्या रिपोर्टरांना सभागृहांत मोठ्या मानानें प्रवेश मिळत असून दोनप्रहरचीं भाषणें संध्याकाळीं व संध्याकाळचीं व रात्रीचीं भाषणें सकाळीं प्रसिद्ध होतात. तथापि, अजूनसुद्धां सभागृहांत येऊन बसणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकावर व रिपोर्टरवर पार्लमेंटाच्या स्पीकरची हुकूमत बिनतक्रार चालते. १९२९ सालीं व गतवर्षीच्या प्रारंभीं दिल्ली येथील कायदेमंडळाचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनीं टाइम्स् ऑफ इंडियाच्या बातमीदाराला याच मुद्द्यावर माफी मागण्यास भाग पाडलें; आणि होम मेंबर सर जे. क्रेरार यांच्याशीं त्यांचा सुप्रसिद्ध झगडा झाला तोच याच मुद्द्यावर.

विलायतेंत पुष्कळ दिवसपर्यंत छापील वृत्तपत्रांना सरकारी परवाना काढावा लागे. त्यासंबंधाचा कायदा १६९२ त रद्द झाला. पण पूर्वी त्यांना जबर

# विलायती वर्तमानपत्रांचा इतिहास

बातमी व टीका हा वर्तमानपत्रांचा मुख्य विषय म्हटला तर वर्तमानपत्रांचें आद्यस्थान ग्रीक देशांतील जुन्या रंगभूमीला द्यावें लागेल. कारण त्या वेळीं प्रयोग होणाऱ्या नाटकांतून पुष्कळ वेळां ताजी बातमी व त्यावरील चुरचुरीत टीका यांचा समावेश केला जात असे. युरोपायडीज, सोफ्लाक्लीस, एस्चिलस, ॲरिस्टोफेनिस यांच्या नाटकांतील विषय प्रचलित चळवळीचेच पुष्कळसे असत. नाटकगृहाबाहेर घडणाऱ्या चालू गोष्टी नाटकगृहांत पात्रांच्या तोंडून वदविणें व त्यांवर इतर पात्रांच्या तोंडून टीका करवणें हा लेखी वर्तमानपत्रांच्या ऐवजीं बोलक्या वर्तमानपत्रांचाच प्रकार झाला. झेनोफान वगैरे इतिहासकार हे अर्धे शाहिरी बाण्याचे व अर्धे वर्तमानपत्रांच्या खास बातमीदारांच्या पेशाचे होते. सीझरने ' ॲक्टा डायरना ' नांवाचें वृत्तपत्र सन ६१ सालीं सुरू केलें. त्यांत राजधानींत घडणाऱ्या गोष्टींची रोजची ताजी खबर असे.

विलायती वर्तमानपत्रांचा पूर्वज म्हटला म्हणजे तें एक दुमडलेलें चौकोनी हँडबिल असे, व तें कारणपरत्वें प्रगट होई. रस्त्यांतून फेरीवाले तें विकीत व आजच्यासारखेंच तोंडानें त्यांतील चटकदार बातम्यांचें बीजयंत्र ओरडून सांगत. त्यांत मुख्यतः परदेशांतील लढाया, देशांतील खून अत्याचार म्हणजे एकंदरीनें अद्‌भुत गोष्टीच असत. सामान्य माणसाकरितां ही तजवीज झाली. पण त्या वेळचे अमीर-उमराव, मुत्सद्दी व अर्थातच राजेलोकही आपापले दूत व वृत्तलेखक परदेशीं ठेवून ताजी बातमी आणवीत असत. हे या पत्रांचे लेखक मोठेसे विद्वान् नसत. पण मोठे चौकस व गुप्त बातम्या काढविणारे, व त्या रंगवून सांगणारे असत. किंबहुना हे गुण अंगीं असणाऱ्या लेखकांचीच योजना या कामीं होई; कांहीं कांहीं जुनीं वृत्तपत्रें इतकीं रसभरित व यथार्थ वर्णनाचीं वाचावयास मिळतात कीं, त्यांचे लेखक आजच्या पुढारी वर्तमानपत्रांचेहि खास बातमीदार होऊं शकले असते.

वर्तमानपत्र या अर्थाचे मूळचे इंग्रजी शब्द कोरंट व गॅझेट हे होत. कोरंट म्हणजे संकलित वर्तमान किंवा वृत्त. त्याहि पूर्वीचा शब्द गॅझेट हा असून

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८४८१ वि: निबंध
नों दि: ३।६।६५



तो गॅझिटी–गझा ' या इटालियन शब्दांपासून बनला आहे. इटाली देशांत व्हेनिसच्या उपराष्ट्रांत सोळाव्या शतकामध्यें गॅझा नामक वृत्तपत्रें प्रचलित होतीं. युरोपांत व इंग्लंडांत त्यांचा प्रवेश पूर्वीं सांगितलेल्या वृत्तलेखांच्या किंवा बातमीपत्रांच्या द्वारें झाला. ही बातमीपत्रें प्रायः मंगळवारीं व शनिवारीं परदेशांतून येत. पण त्यांचा सुकाळ झाल्याबरोबर सरकाराची त्यांवर वक्रदृष्टि झाली. छापील वृत्तपत्रें ही सरकारच्या मालकी हक्काची बाब असून ज्याला तें खासगी मालकीचें काढावयाचें असेल त्यानें सरकारी परवाना काढावा असा कायदा होता. आणि असा परवाना काढल्याशिवाय जे दडपून वृत्तपत्रें छापीत त्यांच्यावर खटले होत, व स्टार चेंबर नांवाने प्रसिद्ध असलेलें जुलमी न्यायकोर्ट ( १६३७ ) त्यांना कडक शासन करी. पण राजाच काय, ब्रिटिश पार्लमेंटालाहि हा हक्क मोठा मौल्यवान वाटे. म्हणूनच पार्लमेंटच्या बैठकीला सभासदांशिवाय इतर परकी मनुष्यांनीं हजर राहू नये, व पार्लमेंटाच्या खास रिपोर्टांशिवाय दुसऱ्यांनीं पार्लमेंटांतील वादविवादाचे रिपोर्ट प्रसिद्ध करू नये असें ठरविण्यांत आलें होतें. सॅम्युअल जॉन्सन् हा विद्वान् लेखक म्हणून पार्लमेंटचें वादविवादाचे रिपोर्ट तयार करण्याचें काम त्याच्याकडे देण्यांत आलें होतें. पण तो निवळ बातमीवरून घरीं बसल्याच ते रिपोर्ट आपल्या मनानें कल्पनेनें तयार करी ! सन १७७४ पासून खरे रिपोर्ट असे प्रसिद्ध होऊं लागले. आणि आतां तर काय, पार्लमेंटाचें खास रिपोर्टर समग्र भाषणें शब्दान् न शब्द छापतातच, पण वर्तमानपत्रांच्या रिपोर्टरांना सभागृहांत मोठ्या मानानें प्रवेश मिळत असून दोनप्रहरचीं भाषणें संध्याकाळीं व संध्याकाळचीं व रात्रींचीं भाषणें सकाळीं प्रसिद्ध होतात. तथापि, अजूनसुद्धां सभागृहांत येऊन बसणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकावर व रिपोर्टरावर पार्लमेंटाच्या स्पीकरची हुकूमत बिनतक्रार चालते. १९२९ साली व गतवर्षीच्या प्रारंभी दिल्ली येथील कायदेमंडळाचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनीं टाइम्स् ऑफ इंडियाच्या बातमीदाराला याच मुद्द्यावर माफी मागण्यास भाग पाडलें; आणि होम मेंबर सर जे. क्रेरार यांच्याशीं त्यांचा सुप्रसिद्ध झगडा झाला तोच याच मुद्द्यावर.

विलायतेंत पुष्कळ दिवसपर्यंत छापील वृत्तपत्रांना सरकारी परवाना काढावा लागे. त्यासंबंधाचा कायदा १६९२ त रद्द झाला. पण पूर्वीं त्यांना जबर

स्टांप-ड्यूटीहि द्यावी लागे. १६८८ ची राज्यक्रांति होऊन प्रजास्वातंत्र्य प्रस्थापित झाल्यावरहि, सन १७१२ साली इंग्लंडमध्यें स्टॅंप ॲक्टानें वर्तमानपत्रांच्या प्रत्येक पानामागें एक पेनी कर बसविला. त्याबरोबर पुष्कळ लहानमोठीं वर्तमानपत्रें बंद पडलीं. याला उद्देशून स्विफ्ट लिहितो–" झाले ! ग्रब स्ट्रीटचें वाटोळें झालें. स्वतः वृत्तपत्रेंच मेल्यानें आतां खून भुताटक्या यांच्या गोष्टी वाचकांना कोठून वाचावयास मिळणार ? ' किती पडती किति दडती कितीएकांचीं धृतायुधें गळती ' अशी स्थिति झाली आहे. कांहीं वर्तमानपत्रें दुसऱ्यांत घुसून गेलीं. कांहींच्या नाकाला सूत धरलें आहे. कांहीं धैर्य धरून राहिलीं त्यांना वर्गणी वाढवावी लागली. वर्तमानपत्रांच्या कागदांवर स्टांप मारून आणलेला पाहा. केवढा तो अगडबंब तांबडा चांद. तो तयार करून कापून चिकटवावयालाच अर्धी पेनी खर्च येईल ! " पण स्टांप ड्यूटी बरोबर जाहिरातींवरहि कर असे. आणि कागदांच्या कारखान्यांवरहि स्थानिक एक्साईज जकात असे. स्टांप ड्यूटी चार पेन्सांपर्यंत वाढली होती. पण १८१५ पासून हे कर कमी होण्यास प्रारंभ झाला. १८५३ सालीं जाहिरातीवरचा कर उठला, १८५४ त एकंदर स्टांप ड्यूटी वर्तमानपत्रांवरून उठली. १८६१ त कागदाच्या कारखान्यांवरचा कर उठला. त्याचप्रमाणें टपालाचे दर जे प्रथम भारी होते तेहि पुढें कमी झाले. इतर कर कमी झाल्याचा फायदा लंडन शहरांतील वर्तमानपत्रांना झाला तसाच पोस्टाचे दर कमी झाल्याचा फायदा बाहेरगांवच्या वर्तमानपत्रांना झाला. त्यामुळें आज विलायतेंत वर्तमानपत्रांचा इतका सुकाळ झाला आहे कीं, साधारण दोन-तीन हजार वस्तीच्या गावांत मुद्दां खास त्या गावचीं अशीं एक किंवा अनेक वर्तमानपत्रें चालतात.

वर्तमानपत्रांत प्रतिष्ठित व गचाळ हा भेद चोहोंकडे सनातनच आहे. विलायतेंतील पहिलें वृत्तपत्र सन १६२२ सालीं नॅथेनियल बटर या नांवाच्या बातमीविक्यानें काढलें. त्यांत तत्कालीन जर्मन युद्धाच्या बातम्या असत, व तें बऱ्यापैकीं होतें म्हणतात. पण त्या पुढील कित्येक वृत्तपत्रांचें वर्णन सॅम्युअल नांवाच्या गृहस्थाने खालील मासलेवाईक शब्दांत केलेलें आढळतें :

" या विषारी खाजट सुरवंटांना आग कां नाहीं लागत ? काय पण एकेकांची सोज्वळ नांवें. पण तीन ओळी तरी ओळीनें नीट सभ्य समंजस

लिहितील तर शपथ ! आंत पाहावें तर कोणाच्या धर्मभावना दुखीव, कोणाला गंडा घाल, हे त्यांचे उद्योग. त्यांनीं छापखानेवाल्याला बुडवावें, छापखानेवाल्यांनीं स्टॉलवाल्यांना, स्टॉलवाल्यांनीं फेरीवाल्यांना आणि फेरीवाल्यांनीं गिऱ्हाइकांना व इतरांना बुडवावें हा यांचा क्रम ! इतकें करून सर्पासारखे फुसफूस करावयाला तयार ! आठवड्यांतला एकहि दिवस सुनका जात नाहीं. एकामागून एक येत असतात. जसा कांहीं खोखोचा खेळ खेळतात ! ''

यानंतर या वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातमीसंबंधानें या टीकाकारानें जें वर्णन केलें आहे तें इतकें सुश्लिष्ट आहे कीं, तें जसेंच्या तसें मूळच्या इंग्रजींतच लिहिलेलें अधिक बरें. तो म्हणतो—

" No rest day or night with these cursed caterpillars, Perfect Passages, Weekly Occurrences, Scout, Spye, Politicus, Diurnal, the Devil and his dam. If the states have occasion for soldiers they my no doubt press a whole regiment of these paper vermine...To see men grossly abused in their beliefs, the whole Nation deceived and gulled out of their money, by a company of impudent snakes, of whome ( one only excepted ) I dare ever none of them was ever guilty of writing three lines of sense. They prey upon the Printer or Stationer, the Stationer on the Hawker and the Hawker on everybody. But the cream of the jest is, how they take their times and rises, one upon Monday, t'other on Tuesday, a third on Wednesday, and so come over one another's backs as if they were playing at leapfrog...It would much refresh a man with Laughter to consider how these Rakeshames piece and patch up that above said account which they weakly diffuse amongst the people. 'News'

and this weak's News. For they have more tricks in their Rotations than a Cook of a three penny ordinary has with his cold meet. First he boils it, if he miss a good custom he roasts it, it that will not serve he stews it, and if he miss then too he minces it, but if in case of hot weather he be prevented of performing all his pleasure upon it, he casts it stinking and full of maggots into the Prisoners basket beseeaching God to mistake that necessity which he had to rid himself of stinking meat for pure charity.'

इतर बातमीविक्ये व छापखानेवाले यांना त्या वेळीं एक प्रतिस्पर्धी होता. तो म्हणजे चहा-कॉफीचा दुकानवाला. चहा हा अलीकडचा. त्याच्यापूर्वी विलायतेंत कॉफीचें राज्य होतें. आणि आजहि युरोपांतील इतर देशांत कॉफीचेंच चहावर वर्चस्व आहे. चहा पिणारें असें राष्ट्र इंग्लंडच ! असो. विलायतेंत दारूच्या दुकानाबरोबर कॉफीचीं दुकानें तेव्हां रस्तोरस्तीं असत. पण या दोन दुकानांत फरक हा कीं, प्रतिष्ठित लोक जरी दारू पीत तरी दारूचें दुकान हें किती झालें तरी अप्रतिष्ठितच मानलें जाई ! उलट कॉफीचें दुकान (याला ' कॉफी हाऊस ' अशी लोकप्रिय संज्ञा असे) हें अत्यंत प्रतिष्ठित मानले जाई. इतकेंच नव्हे तर एका काळीं ' म्हणजे अठराव्या ' शतकांत कॉफी हाउसेसचा उपयोग प्रतिष्ठित लोकांच्या ' क्लबा '-सारखा होत असून त्यांना विद्वच्चर्चेचीं मुख्य केंद्रें समजलीं जात. कोणी कोणाच्या घरीं जाणें हें अर्थात् गैरसोयीचें. यजमानाला खर्च व उठाठेव. एकच मनुष्य ती किती सोशील ?

त्याऐवजीं कॉफी हाऊसची खाणावळ केव्हांहि अधिक सोयीची. हवें तेव्हां जावें. कॉफी आयती तयार. वाटेल त्यानें वाटेल तितकी घ्यावी व आपल्या पुरते पैसे द्यावे. फार तर बरोबर कोणी स्नेहीसोबती बोलावून नेला तर त्याचेंहि बिल द्यावें. पण यदृच्छेनें चार लोक एकत्र जमले तर ज्याचें बिल तोच भागवी. अशा रीतीनें अडचण न होतां चार लोक एकत्र


जमण्याची ती जागा होती. शिवाय कॉफी एकदम पिऊन टाकणें ही रीत नसून ती थोडथोडकी घुटकीत बसणें ही रीत असल्यानें मध्यंतरीं बोलणें चालणें हें हवेंच असतें. कॉफीपानाला त्यानें रंग येतो. आणि हें बोलणें चालणें समवयस्क, समव्यवसायी, व समसंस्कृत अशा लोकांमध्यें होत असल्यास त्या संभाषणाला व त्या कॉफीला फारच गोडी येते. पण सुसंस्कृत माणसें जमून संभाषण व्हावयाचें असतां नुसती विद्वच्चर्चाच होत नाहीं, तर हास्य-विनोद, थट्टामस्करी, आणि खरें बोलावयाचें तर थोडी कुटाळकीहि होते. आणि अशा या मिश्र संभाषणाला ताजी बातमी हा मुख्य आधार असतो. अर्थात् आपली कॉफी पुष्कळ खपावी तर गिऱ्हाइकांनीं पेल्यावर पेले मागून घ्यावे, पेले अधिक खपावे तर गिऱ्हाईक अधिक वेळ दुकानांत बसून राहावें, तें अधिक वेळ चालण्याला ताज्या बातमीचा पुरवठा अधिक पाहिजे हें ओघानेंच येतें ! अर्थात् ही बातमी वर्तमानपत्रांतूनच मिळावयाची. म्हणून कॉफी हाऊसवाले आपल्या खर्चानें मिळतील तितकीं ताजीं वर्तमानपत्रें विकत घेऊन कॉफीच्या टेबलांवर ठेवीत. पण धंद्यांतून धंदा सुचावा त्याप्रमाणें या दुकानदारांना स्वतःचीं वर्तमानपत्रेंच काढावीं असें एक वेळ वाटूं लागलें व ती टूम सुरु झाली. सन १७२८ सालीं लंडनच्या कॉफी हाऊसवाल्यांनीं सहकारी भांडवलानें कंपनी काढून सर्वांचें मिळून एक वर्तमान ( दैनिक व अनेक आवृत्त्यांचे ) पत्र काढावें असें ठरविलें. आणि तें खपावें म्हणून इतर वर्तमानपत्रांवर कॉफीहाऊसमध्यें बहिष्कार घातला. पण याला उत्तर म्हणून लंडनच्या वर्तमानपत्रकारांनीं असा धाक घातला कीं, " ठीक आहे. आम्ही ही समाईक भांडवलाची कंपनी काढून तुमच्या दुकानांसमोर आमचीं कॉफीचीं दुकानें घालूं आणि मग तुमचा तमाशा पाहूं." या धमकीचा उपयोग झाला, व कॉफीहाऊसवाल्यांचा मालकीचीं वर्तमानपत्रें निघण्याचें रहीत झालें.

अठराव्या शतकापर्यंत संपादक ( एडिटर ) हा शब्द प्रचारांत नव्हता. स्वतः बातमीविक्या हा मालक, हाच मुद्रक, व हाच संपादक असे. तो प्रतिष्ठित शब्द १७०९ सालीं सुप्रसिद्ध ग्रंथकार ॲडिसन यानें टॅटलर पत्राच्या संबंधात, त्याचा सुप्रसिद्ध मित्र व समव्यवसायी जो स्टील त्याला प्रथम लावून उपयोगांत आणला असें म्हणतात. ' टॅटलर ' हें वृत्तपत्र असें समजलें जाई; परंतु त्यांत वृत्त म्हणजे बातमी अशी नसे. प्रचलित बातमीवर व

त्याहीपेक्षां प्रचलित समाजस्थितीवर टीकात्मक निबंध पत्रव्यवहार किंवा टीकात्मक गोष्टी किंवा रूपकें असत. हें पत्र ॲडिसन, स्विफ्ट, स्टील, ॲटरबरी, गार्थ वगैरे सुप्रसिद्ध लेखकांनीं चालविले होतें. आणि त्यांतील लेख हा १८ व्या शतकांतील उत्तम इंग्रजी वाङ्मयाचा नमुना म्हणून अद्यापि समजला जातो. विलायतेंत 'टॅटलर' मागून निघालेले 'स्पेक्टेटर' हें पत्र पहिल्याहून अधिक प्रसिद्ध आहे व त्याचा मुख्य संपादक ॲडिसन् हा होता. त्यानंतर 'गार्डियन', 'लव्हर', 'लीडर' या नांवाचीं अशींच इतर अनेक पत्रें निघालीं. त्याचें कारण प्रतिष्ठित वाङ्मयभक्तांना वर्तमान-पत्रांसारखें कांहीं तरी काढावें लिहावें असें वाटे, तत्कालीन बातमीविक्या वर्तमानपत्रांच्या अप्रतिष्ठित परिवारांतून मोकळे होऊन स्वतःचें कांहीं वैशिष्ट्य दाखवावें अशी इच्छा त्यांना झाली होती. व तशी होणें स्वाभाविक होतें. विलायतेंत प्रथम स्टॅंप ॲक्ट सुरू होऊन वर्तमानपत्र चालविणें ही गोष्ट खर्चाची झाली. यामुळें बरींच वर्तमानपत्रें बंद झालीं. त्याला उद्देशून ॲडिसन लिहितो—"स्टॅंप ड्यूटी आज सुरू झाली. पण दैव असें कीं, त्याबरोबर चालू युद्धेंहि थांबलीं. तेव्हां आतां आमच्या या बातमीविक्या पत्रांचें काय होणार? युद्धाची रम्यकथा खरी, पण ती वर्तमानपत्रांतून काल्पनिक द्यावी तर युद्धच थांबले व रम्यकथेचा आधार तुटला. बरें, घरगुती बातम्या तिखटमीठ लावून सजवून लिहाव्या म्हटलें तर स्टॅंप ड्यूटी उरावर बसली. तेव्हां पातळ पंतगासारखीं किंवा झाडपाल्यासारखीं प्रसिद्ध होणारीं बातमी-पत्रकें आतां नाहींशीं होणार. बोलूनचालून आतां हा शरद् ऋतूच आहे. आणि शरद् ऋतूंत पत्रें गळून पडणें हा नियमच आहे. मग तीं वृक्षपत्रें असोत किंवा वृत्तपत्रें असोत."

विलायतेंत टॅटलर, स्पेक्टेटर वगैरे केवळ टीकात्मक व निबंधात्मक वृत्त-पत्रांच्यानंतर लंडन मॅगेझिनसारखीं प्रतिष्ठित मासिकें आणि लंडन टाईम्ससारखीं प्रतिष्ठित वर्तमानपत्रें यांचें युग सुरू झालें. मासिकांचे अंक महिना—महिन्यांनीं निघत तरी त्यांत युरोप खंडांतल्या व जगांतल्या बातम्या बातमीपत्रांच्या रूपानें दिल्या जात. व त्या तेव्हां ताज्याच असत. कारण तारायंत्र तेव्हां अस्तित्वांत आलें नव्हतें. आणि जोंपर्यंत तारेनें बातमी येत नाहीं तोंपर्यंत पत्रानें येईल तीच बातमी ताजी. त्यांतहि चढाओढीला जागा होती. ती

# The LONDON MAGAZINE.



## Or, GENTLEMAN's *Monthly Intelligencer*;

### For JANUARY, 1768.


Caveat against Enthusiasm 3
[illegible] on Eph. ii. 3. 4
Address to the Livery of London 5
Short Account of *False Delicacy* 6
The Fortune of Marcellus 7
The Cobbler Character described 8
The History of the last Session of Parliament, &c. &c. 9—14
Proceedings on East-India Affairs 13 & *seq.*
Late Changes in the Ministry accounted for 14
Another Letter from Rousseau 15
Case of a fractured Rib and a remarkable Emphysema 17
Letter from Hexham on emphysematous Cases 18
Account of the late Eruption of Mount Vesuvius ib.—20
Vanity and Folly of the French satirized 21
Curious Particulars in Regard to the striking Likenesses of Persons 22
Humourous Proposal for new Improvem. 23
Character of the Parliament of 1641, 24
Account of the Attempt for seizing the five Members ibid.
An interesting Letter 25
Self-made modern Philosophers 26
Over-bearing of Infidelity 27
The Friends of Religion painted Out 28
Rules for the Clergy to Temporize 29
Description of Holkam House 30—32
Convenient Apartments 32
Paintings at Holkam 33
A base and barbarous Stratagem 34
Address to the Electors of Norfolk and Norwich 35—37
Scheme to prevent the begging of Servants at Public Inns 38
A curious Query 39
Address to the Manufacturers ibid.
Of the double Horns of the Rhinoceros 40
Anecdotes of Louis Jordano 41
An impartial Review of new Publications 41—42
Makarony Fables 43
Macpherson's critical Dissertations 44
An Essay upon Prints 45
Warner on the Gout 47
Ingram on the Lime ibid.
POETICAL ESSAYS 48
A new Song set to Music
Story of False Delicacy, a Comedy
THE MONTHLY CHRONOLOGER 50
Marriages and Births; Deaths 52
Ecclesiastical Preferments ibid.
Promotions Civil and Military ibid.
Bankrupts; Course of Exchange ibid.
FOREIGN AFFAIRS 53
Monthly Catalogue of Books ibid.
Stocks, Grain; Wind and Weather [illegible]


With a fine representation of the
COLUMBA CRESTATA, another of the DOUBLE HORNS of the RHINOCEROS,
AND
The Fourth Part of the Plan of the Road from LONDON to BERWICK,
All beautifully engraved on Copper.


LONDON: Printed for R. BALDWIN, at No. 47, in Pater-noster Row;
Of whom may be had, compleat Sets, from the Year 1732, to this Time, neatly bound or stitched, or any single Month to compleat Sets.


१७६८ सालीं निघालेल्या ' लंडन मॅगेझिन 'चें मुखपृष्ठ

# ज्ञानप्रकाश

सत्य — ज्ञान

पुस्तक १ कागद २ — शहर पुणे

तारीख २६ फेब्रुआरी सन १८४८ ईसवी मीती फाल्गुन शुद्ध ४ शके १७७०

ज्ञानप्रकाशनामक वर्तमानपत्राची

| कीमत | रुपये |
|---|---|
| दरसाल १० | अर्धेसाल ६ |
| तीनमहिने | दरमहिना १ |

आठवड्याचें पंचांग

| ति. | तारीख | वार | विशेष |
|---|---|---|---|
| ४ | फाल्गुनशुद्ध २६ फेब्रुआरी | सोमवार | कि० ४ दि० २९ |
| ५ | २७ | मंगळवार | अमृ० |
| ६ | २८ | बुधवार | |
| ७ | २९ | गुरुवार | |
| ८ | १ मार्च | शुक्रवार | दग्ध० |
| ९ | २ | शनवार | दग्ध |
| १० | ३ | रविवार | सुखी |

हा तेरा दिवसांचा पंचरजोडा आहे सत्य आहे

नीरख
मागील कागदा प्रमाणेच आहे

कोणास ग्रंथ छापावयाचा असेल तर ज्ञानप्रकाश छापखान्यात थोडे किमतीत तयार करून देईल

हवा
उष्ण अंश ८०

विकावयाचे जीनसाची
जाहीर खबर

पुण्याचे लष्करात आगामहमद मीरज्याफरयांचा खाली लिहीलेला माल विकावयाचा आहे

नंबर
१ कोर्ट संबंधेल साहेब याचे पाजरख्या यांमळा कीन्स मीराजवळ.
२ बंगला घरराहू जवळ.
३ घर दुमजला पक्के बांधलेले सदर बाजारात
४ सदर बाजारा जवळ कौलारू घर
५ बंगला कौलारी मजबूत बांधलेला - दुसरे पुरोपी अमलदारीस देईल
६ बंगला पक्का बांधलेला शहराचे ठिकाणी लाम जनराल बीअर्वार माॅऱ्यांचा बंगल्याजवळ
७-८ ९ तीन बंगले आठवे पलटणीचे लैनेत
१० घोरपडीचे रुईनेन बंगला १

यापैकी माल ज्यास घ्यावयाचा असेल त्याणे पहिले नंबरचे बंगल्यात आगामहमद मीरज्याफर यांजकडे त्यास लिहून पाठवावे.

सरकारी कामदारांच्या नेमणुका

मीस्तर ग्रासाहेब उत्तर प्रांताचे रिविन्यु कमीशनर नेमले

मीस्तर हन्टर साहेब पुण्याचे असटींग जड्ज नेमले

[हें ज्ञानप्रकाश वर्तमानपत्राचें पहिल्या वर्षाच्या तिसऱ्या अंकाचें दर्शनी चित्र आहे.]

' ज्ञानप्रकाश 'च्या पहिल्या वर्षांच्या अंकाचें मुखपृष्ठ

अशी कीं, सरकारी टपाल व्यवस्थितपणें दरआठवड्यास किंवा रोज यावयाचेंच. पण सरकारी व्यवस्था विश्वसनीय असली तरी कांहींशी धीमी असते. म्हणून सरकारी टपालपेटींत पत्र न टाकतां किंवा सरकारी टपालगाडींत न बसतां खास बातमीदारानें स्वतःचें वेगळें वाहन भाड्यानें घेऊन प्रवास केला असतां तो किंवा त्याचें पत्र सरकारी टपालापेक्षां बरेंच आधीं मिळण्याचा संभव असे. आणि लंडन टाईम्ससारख्या दैनिक पत्रांनीं हा क्रम ठेविलाहि होता. म्हणून ताज्या बातमीकरितां महिनाभर थांबणें हें लोकांना आवडेनासें होऊन मासिकांच्या अंकांतून बातमी वाचणें मागें पडून, वाचकांचा भर दैनिक वर्तमानपत्रावर पडला. हळूहळू मासिकांनीं टीका, निबंध वगैरे, विचार करून स्वस्थपणानें लिहिण्याचे लेख प्रसिद्ध करण्याचें कामच तेवढें आपणाकडे ठेवून घेतलें. पण वर्तमानपत्रांनीं दोनहि कामें चालू ठेविलीं. म्हणजे ताज्या बातम्या देण्याबरोबर ते टीकात्मक किंवा लहान निबंधात्मक वर्णनात्मक असे लेखहि घालूं लागले. आज लंडनमधील ‘ स्पेक्टेटर ’, ‘ सॅटरडे रिव्ह्यू ’ यांनींच काय ती जुन्या ‘ टॅटलर ’, ‘ स्पेक्टेटर ’ वगैरेंची थोडीशी ओळख शिल्लक ठेविली आहे. एका बाजूला ‘ पिअरसन ’, लंडन, वगैरे मासिकें व दुसऱ्या बाजूला निवळ वर्तमानपत्रें यांचा सांधा जोडण्याचें काम ‘ स्पेक्टेटर ’, ‘ सॅटरडे रेव्ह्यू ’ वगैरे पत्रें करतात.

# हिंदी वर्तमानपत्रांचा इतिहास

वर्तमानपत्राचा धंदा इतर कित्येक धंद्यांप्रमाणें हिंदुस्थानांत बाहेरूनच आलेला आहे. याचें कारण, एक तर छापखान्याची विद्या इकडे इंग्रजांपूर्वी एतद्देशीय लोकांना अवगत नव्हती. आणि दुसरें कारण असें कीं, वर्तमानपत्रांचा प्राण म्हणजे सार्वजनिक विशेषतः राजकीय चळवळ तीही पूर्वी इकडे नव्हती. इंग्रजांपूर्वी इकडे देशी राज्यें होतीं परंतु तीं एकतंत्री राज्यें होतीं. युरोपाप्रमाणें लोकांना म्हणून प्रजा या नात्यानें कांहीं हक्क आहेत अशी कल्पना राजे लोकांनीं नव्या पद्धतीनें मान्य केलेली नव्हती व राज्यवैभव म्हणजे राजाचें वैभव असा होता! ज्याच्या मनगटांत जितका जोर असेल तितकें त्यानें आपलें राज्य वाढवावें. मात्र राज्य म्हटलें म्हणजे त्यांत अठरा खातीं येतातच. आणि म्हणूनच त्यांच्या अनुषंगानें लोकांनाही नोकरी उद्योग पैसा वैभव प्राप्त होत असे. युरोपप्रमाणें इकडे स्वदेशी लोकांचीं राज्यें होतीं व तीं स्वतंत्रहि होतीं. पण त्यांत राजे हेच फार स्वतंत्र होते. राज्यांत ज्याला मानमान्यता पैसा वगैरे मिळाला त्याला मिळाला. उद्योगानें व पराक्रमानें मिळवितांहि येई. परंतु प्रजेच्या हक्कांना उद्देशून राजाविरुद्ध चळवळ अशी कांहीं होत नसे. युरोपांतहि झाला तरी सतराव्या शतकांत जुलमी पद्धतीचा पुरा नायनाट झाला होता असें नव्हे. परंतु प्रजास्वातंत्र्याच्या चळवळीला प्रारंभ झाला होता इतकी गोष्ट निर्विवाद आहे. आणि या चळवळीला मुख्यतः मदत छापखाने व वर्तमानपत्रें यांचीच होती. ती झाली तरी जुलमी राज्याच्या जुलमांतून सर्वस्वीं सुटलीं होतीं असें नाहीं. किंबहुना त्यांच्यावरच राजे लोकांचा पुष्कळच दांत होता. पण त्यांनींच अखेर जिंकली. व जनतेच्या हातीं जर खरें शस्त्र म्हणून कोणतें यशस्वी झालें असेल तर तें छापखाने व वर्तमानपत्रें हेंच होय.

कोणत्याहि राज्यक्रांतीच्या पूर्वी युरोपांत छापखाने व वर्तमानपत्रें यांचाच सुळसुळाट झालेला आढळून येतो. विशेषतः फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी ही गोष्ट चांगलीच दिसून आली. व यालाच उद्देशून कार्लाइल यानें फ्रेंच राज्यक्रांतीवरील आपल्या ग्रंथांत वर्तमानपत्रकारांचा बहुमानपुरस्सर उल्लेख केला आहे. तो म्हणतो :—

"Great is journalism. Is not an able Editor ruler of the world? Being a persuader of it? Though self-elected yet sanctioned by the sale of his numbers whom indeed the world has the readiest method of disposing if need be, that of mearly doing nothing to him; which ends in starvation." तसेंच "Speculative philosophism once an ornament and wealth of the saloon will now coin itself into mere practical propositions and circulate on street and high-way universally with result that a fourth estate of the able Editor springs up increases and multiplies, irrepressible, incalculable new printers and new journals."

हिंदुस्थानांत अद्याप आजहि राज्यक्रांति अशी सुरू झालेली नाहीं. तथापि, राजकीय चळवळ जी आज इतक्या सुस्थितीला आलेली आहे तिचें पुष्कळसें श्रेय छापखाने व वर्तमानपत्रें यांनाच द्यावें लागेल. देशी राज्यांत लिहिण्याची कला लोकांना माहीत नव्हती असें नाहीं. सुंदर हस्ताक्षराला त्या काळीं मान होता. इतकेंच नव्हे तर मजकूर चांगला जुळवून चटकदार लिहिणारे लोकहि तेव्हां असत. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें तर छापील ऐतिहासिक कागदपत्रांत वाचकांना अशीं पुष्कळ घरगुती व राजकारणी पत्रें वाचावयास सांपडतील कीं, त्यांना वाङ्मयाचें स्वरूप आहे असें म्हणतां येईल. चटकदार, चित्ताकर्षक लिहिण्याची कला त्या काळीं बातमीपत्रें लिहिणाऱ्या लोकांना चांगलीच साधली होती. त्या काळची दरबारी अखबरनवीसांनीं लिहिलेली, वकिलांनीं लिहिलेलीं अशीं कांहीं बातमीपत्रें इतकीं चांगलीं आहेत कीं, आजचे कसलेले वर्तमानपत्राचे बातमीदार तीं वाचून त्यांचें कौतुक करतील.

घरगुती पत्रांत अर्थात् घरगुतीच मजकूर असणार. परदरबारच्या वकिलांच्या पत्रांत मुख्यतः राजकारणाच्या बातम्या, डावपेंच व तदंगभूत इतर राजदरबारची माहिती हीं असतच. परंतु कांहीं बातमीदार असे सुरस गोष्टीवेल्हाळ आढळतात कीं, अवांतर नित्रळ बाजारी गप्पाहि ते लिहीत, पण त्याच इतक्या चांगल्या लिहीत कीं, त्या वेळीं त्या वाचणाराप्रमाणें आजहि त्या वाचणाऱ्यांना मोठी मौज वाटते व आनंद होतो.

⌘ ⌘ ⌘

# अखबारनवीस

अखबार या शब्दाचा अर्थ बातमीपत्र किंवा खबर. ही लिहिण्याची चाल मुसलमानी दरबारांत पुष्कळ दिवसांपासून चालत आली आहे. ह्या कामावर स्वतंत्र लोक नेमलेले असत. त्यास अखबारनवीस असें म्हणत. त्यांचें मुख्य काम म्हणजे राजदरबारांत झालेल्या महत्त्वाच्या गोष्टी, राजकारणें, मुत्सद्द्यांचे वादविवाद, लढायांचीं वर्णनें वगैरे सर्व प्रकारच्या बातम्या इत्थंभूत लिहून ठेवणें हें असे. असल्या बातमीपत्रांचा संग्रह फक्त श्रीमान् लोकच करीत. शिकल्यासवरलेल्या लोकांना यांच्या गरिबीमुळें अशीं पत्रें पहाण्यास मिळत नसत. गांवाच्या धर्मशाळेंत उतरणारा प्रवाशी हा त्या काळचा मध्यमवर्गाचा व गरीबवर्गाचा बातमीदार. धर्मशाळेंत उगम पावून या बातम्या बाजारांत पसरत. मोठाल्या पेढ्यांतून अगर बड्या अमीरउमरावांकडे ज्यांचें जाणेंयेणें असे तेहि तेथें ऐकलेल्या चार दोन गोष्टी आपल्या मित्रमंडळींत सांगत. तेथून त्या आणखी प्रसृत होत. या दोन मार्गांशिवाय साधारण लोकांना बातम्या कळण्याचे आणखी मार्ग नव्हते.

जें राजदरबारांत तेंच मोठाल्या व्यापारी पेढ्यांतूनहि चाले. यांचे गुमास्ते किंवा शाखा मोठमोठाल्या शहरांतून असावयाच्या. त्यांचेकडूनहि हें वार्ताहरणाचें काम होत असे. हे जे “ अखबार ” येत ते राजदरबारचे असोत अगर अमीरउमरावांचे असोत, त्यांतली बातमी गुप्त राहत नसे. एकाच्या तोंडून दुसऱ्याला या रीतीनें ती सर्व शहरभर थोडक्याच वेळांत पसरे. हीं पत्रें जरी बातम्यांनीं युक्त असत तरी त्यांच्यांत व आजच्या वृत्तपत्रांत फार फरक आहे. या ‘ अखबारां ’मधून फक्त “ काय काय घडलें ” एवढेंच कळे. पण कसल्याहि विषयाची चर्चा अगर राजकारण व समाजकारण यांविषयीं ऊहापोह यांचें त्यांत नांवहि नसे. ही चाल मराठी राज्यांतहि होती, व नाना फडणविसांच्या कारकीर्दींत तिचा फारच प्रसार झाला. सर्व हिंदुस्थानामध्यें मराठ्यांची राज्यसत्ता जसजशी संस्थापित होऊं लागली तसतसे तिजबरोबर अखबारनवीस हेहि सर्वत्र पसरूं लागले. चोहोंकडच्या राजकीय उलाढालींच्या गुप्त बातम्या राखणें हें चतुर मुत्सद्यांचें पहिलें कर्तव्य

होय. नानाफडणविसांनीं तें किती उत्कृष्ट रीतीनें सिद्धीस नेलें, हें दाखविण्यास त्यांच्या कारकीर्दींतील अखबरा पुऱ्या आहेत. इंग्रज, निजाम, पाटीलबाबा, हैदर, टिपू, नागपूरकर भोसले, होळकर, दिल्लीचे बादशहा, लखनौचे वजीरप्रभृति सर्व बड्या प्रकरणांजवळ नानांचे गुप्त हेर असत. ते तेथील अखबार लिहून पाठवीत असत. श्रीमंत पेशवे व नाना यांस रीतीप्रमाणें दरबारी पत्रें त्या त्या संस्थानिकांकडून, सरदारांकडून किंवा वकिलांकडून येत असत तीं वेगळीं. परंतु त्याशिवाय गुप्त रीतीनें ह्या अखबार येत असत. त्यामध्यें कच्ची हकीगत सविस्तर लिहिली जात असे. अशा अखबारा दिल्ली, लखनौ, भागानगर, श्रीरंगपट्टण, कलकत्ता, मद्रास व पांडेचरी येथील परराज्यांतील वकीलहि परस्परांस पाठवीत असत, व त्यावरून पुनः पुण्यास बातमी जात असे. त्यामुळें एकाच गोष्टीचे सर्व ठिकाणांहून प्रत्यंतर पुरावे मिळत असत. उदाहरणार्थ, महादजी शिंद्यांनीं गुलाम कादराचा वध करून शहाअलम बादशहास तख्तनशील केलें ही बातमी दिल्लीहून सविस्तर पुण्यास येत असे, व पुन्हां तीच भागानगराहूनहि कळत असे. कित्येक ठिकाणच्या अखबारा सावकार लोकांकडूनहि जात असत. नानाफडणविसांनीं ह्या कामावर अति शोधक व मतभेदतत्पर अशीं माणसें ठेविलीं होतीं. निजामच्या दरबारीं निंबाजी माणकोजी म्हणून एक फार प्रख्यात अखबारनवीस होता. दिल्लीच्या दरबारीं गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव हे वकील असत. ते बादशाही अखबार लिहून पाठवीत असत. महादजी शिंदे यांजकडील आपाजी राम हे दरबारी पत्रें लिहीत असत. जोधपूर–जयपूरांकडील वकील कृष्णाजी जगन्नाथ हे रजपुतांचीं राजकारणें कळवीत असत. होळकरांकडील नारो हरि हे सर्व तिकडील वर्तमानपत्रें लिहीत असत. नागपूरकर भोसल्याकडील दिनचर्या श्रीराम सदाशिव हे लिहीत. तात्पर्य, सर्व हिंदुस्थानमध्यें प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणीं नानांचे अखबारनवीस होते. ह्यांची बातमी देण्याची अगदीं कमाल असे. ह्यांच्याकडून कित्येक सरदारांच्या दिनचर्या देखील लिहिल्या जात असत.

# हिंदी अखबारांचे नमुने

इंग्रज लोक हिंदुस्थानांत आपल्या आतषबाजीचे कौशल्य दाखवून एतद्देशीय संस्थानिकांस संतुष्ट करीत असल्याचें दाखले सांपडतात. लखनौच्या नवाबाच्या दरबारीं, इ. स. १७९० च्या सुमारास इंग्रजांनीं आतषबाजीचा म्हणजे दारुकामाचा एक अपूर्व तमाशा दाखविला होता. त्याच्या वर्णनाचें वातमीपत्र लखनौच्या वकिलानें नानाफडणविसांना पाठविलें आहे. ते मनोरंजक असून त्यांत त्या वेळच्या इंग्रजी दारुकामाचें मजेदार वर्णन आहे, म्हणून मासल्याकरितां येथें दिलें आहे :

: १ :

" करारनामे इंग्रज आतशबाज विलायतेहून कलकत्यास येऊन, आतशबाजीच्या हुन्नरांत आपलें हातचें कौशल्य कलकत्तेकर साहेबाला करून दाखवून, दोन वेळ मातबर इनामें कडोन सरफराज झाला होता. ही गोष्ट चहूंकडे वाजट व दुनियांत महशूर झाली. मिस्तर इडोर व अलपूसाहेब बहादर लखनौकर यांनीं त्याची उत्तम विद्या पाहून कीं ते या मुलखाच्या सदरांस अपूर्वतर आहे सबब आतशबाज पाठवून देण्याकरितां कलकत्यास लिहिलें. सहा महिने झाले कलकत्तेकराच्या बमोजीब आतशबाज मजकूर लखनौत येऊन आतशबाजी तयार करीत होते. त्यास आतशबाजी तयार झाल्यावर इडोर व अलपूसाहेब यांनीं चंद्र १९ मोहरमी हरकाराच्या ज्मातदाराच्या हातीं मिर्जा आमानी यांस सांगून पाठविलें. संध्याकाळीं ऐन तयारीच्या समयी तुकडा आकाशीं प्रगट झाला म्हणजे ढग आला. सबब, ते दिवशीं महकूफ ठेवून, चंद्र २० विसावीचें रात्रीं तमाशा पहावयाचे ठरावांत आले ते दिवशीं मिर्जा आमानी वाटेतून फिरून आपल्या घरीं दाखल झाले. आज चंद्र २० विसावीच्या रात्रीं आभाळ स्वच्छ होतें. दुसऱ्यानें तयारी झाली. मिर्जा आमानी हसनरजाखा व हैदरबेगखा व राजे मंगतराव व सर्व कारभाऱ्यांच्यासहित मिस्तर इडोर व अलपूसाहेब यांच्या मकानीं विविपुरास गेले. करार अतीशबाज यांनीं प्रथम अतशबाजी......तयार केली, व एका चौकोन्या

खांबावर पुतळा [ उभा ] निश्चय केला होता कीं, बंदूक लागतांच हाच पुतळा आतशबाजीस सुरू होईल. त्यास कितीएक इंग्रजांनीं बंदुका मारल्या, निशाण लागले नाहीं. राजे जवानसिंग यांनींही बरकंदाजी चांगली केली. गोळी निशाणास न लागली शेवटीं मिर्जा अमानी यांनीं खाशी बंदूक घेऊन आपल्या स्वहस्तें सोडली, तथापि निशाण चुकलें. या घालमेलींत रात्र प्रहराहून अधीक होऊन गेली. करार मजकूर यानें पुतळ्याचा तमाशा तहकूब ठेवून, आपल्या हातानें एका आतशबाजीच्या झाडास बत्ती दिली. त्या झाडांतून अपूर्व फुले निघाली, कीं कधींहि कोणी पाहिली नसावी. एका नळाच्या कुलाब्यांतून भडका निघाला. त्यांतून हे दृष्टीस येत होते कीं, दाऊदीची फुलें व केशराच्या कपाच्या व हिरवी फुले लवलवींत व सुरूचीं झाडें प्रफुल्लित व लसलशीत जशीं बागांत उत्पन्न होतात तशीं प्रगट झालीं. हा तमाशा एक घटकापर्यंत राहिला तों एकाएकीं दुसऱ्या नळ्यांतून भडका निघोन असमानांत गेला. त्यांतून सितारे आकाशांत उंच जाऊन फिरते समयीं रंग दुसरा म्हणजे सहस्त्रावधी सर्प फणा काढून पृथ्वीवर पडत होते. त्याचप्रमाणे आणखी आतशबाजींतून शतावधी मासे मोठे आतश बाजीच्या रोशनीतून निघोन, सिताऱ्याप्रमाणे आकाशांतून पृथ्वीवर पडत होते. त्याचप्रमाणे त्यानंतर एका क्षणांत आतशबाजींतून पर्जन्याचा मोसम पैदा झाला. पर्जन्याची वृष्टि झिरभिर नजरेस पडूं लागली, व दुसऱ्या आतशबाजीच्या झाडांतून अपूर्व नक्षा दृष्टीस आला. म्हणजे एक मशीद ती गजांची, बहुतच अपूर्व तर प्रगट झाली. कांहीं वेळ हाच नक्षा कायम राहिला. तो त्यांतून एकाएकीं बंदुकीच्या व तोफेच्या शलकेचे आवाज सुरू झाले. आवाज येथवर उंच होऊं लागले कीं, बिबिपुराहून लखनौच्या लोकांनीं ऐकले. हा तमाशा समाप्त झाला कीं, एका आतशबाजीच्या नळाच्या भडक्यांतून सूर्य बाहेर येऊन आकाशीं चालला, व आपल्या प्रकाशें करून त्या मैदानास प्रकाशित केले. असाच चंद्राचाही तमाशा नजरेस आला. शेवटीं एका आतशबाजेंतून सूर्यमुखीच्या फुलाप्रमाणे फूल भ्रमण करीत निघाले व अपूर्व कारागिरी केली होती कीं, त्या फुलाच्या फिरण्यांत ही बैत स्वच्छ अक्षरे काढून सर्व लोक तमाशा पाहाणारांच्या दृष्टीस आली. करारानें सफदौला बहादूर यांच्या एकबळेकडोन आपली कामगिरी नादर केली. सारांश, अशी आतशबाजी

होती कीं, मागेही कधीं कोणी ऐकली नाहीं व पाहिली नसावी. सर्व लोकांनीं इंग्रजांस बहुत शाबासकी दिधली, व दीड प्रहर जालियावर मिर्जा आमानी तेथून स्वार होऊन आपल्या घरीं दाखल झाले. चंद्र २१ एकवीसचें प्रातःकाळीं सर्व कारभाऱ्यांनीं खिलत दिलें. मिर्जा गुलामहुसेनखानास पांच पारच्याचा खिलत पश्चिमेच्या रुखसतेबाबत देऊन, दोन घटका चढल्यावर कूच करून सैरजुमाडेऱ्यांत दाखल झाले."

: २ :

अपत्यें गंगाधरानें कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. येतील कुशल तागायत आषाढ शुद्ध २ पावेतो मुक्काम पुणे येथें वडिलांचे आशीर्वाद क्षेम असो विशेष. राजकी वर्तमान लोहगडावरील गृहस्थाची फारच घालमेल पडली. राजश्री त्रिंबक विनायक यास दिवाणगिरी जामिनी दाखल कबूल केली. पंधरा हजार फौज पदरची ठेवावी. [ असा ठराव झाल्याची ] बाजारी वदंता आहे. कांहीं दरबारी बोलतात. सत्यमिथ्या भगवान जाणे. इकडे इष्ट चिन्हे याप्रमाणें जाहलीं खरीं.

पुरंदर घेतला आणि नीळकंठ महादेव तेथें गेले तेव्हां तेथून बाळोबा मांडवगणे सासवडास गेले होते. तेव्हां गांवाजवळ संगमेश्वर देव आहे. तेथील नदीमध्यें विहिरा होता. त्यांतील झऱ्यास रक्त येऊं लागलें. ते समयी हे स्वतः गेले आणि त्यांत अंगवस्त्र टाकलें. तें भिजलें तों रक्ताप्रमाणें पाणी आणि पिळिलें तों रक्त पडलें. असें तीन दिवस होते. त्यांस एक महिना जाहला.

मौजे निंबगांव टांकली, घोडनदीतीर, येथें ज्येष्ठ वद्य एकादशीचे दिवशीं सायंकाळीं दिवस दोन घटका ते समयीं गांवचे दहा पांच माणूस गांवकरी तीरास गेले होते. तेथील कौतुक–मेघडंबर आलेसें जाहलें. आणि अकस्मात् एक मोठा घागरी एवढा वाटोळा एक दगड पडला आकाशावरून. तो भूमिगत होतो तो तेथून धूर निघाला तों आभाळास लागला. तेव्हां वर गर्जना जाहली. वृष्टी एक बित्ता पावेतों दगडाची जाहली. हें कौतुक जवळील पाहात आहे तों तो दगड घोड्याएवढा जाहला. गडबडत नदींत गेला. हे भयभीत तोंपर्यंत होते. मग सावध होऊन जागा बघितला तों हातभर खोल मात्र आहे. आणि बिघाभर दगड पडले आहेत. त्यांनीं

गांवांत जाऊन सांगितलें. मग सर्वभोंवर गांवांमधील ( लोक ) पाहण्यासीं आले. तेथूनही फडणिसांनीं कारकून पाठविला. तो देखील पाहून आला.

( हे पत्र राजश्री गंगाधर बापूजी ओक फडणीस यांनीं पुण्याहून आम्हांस पाठविलें. त्याची नक्कल करून वडिलांस पाहावयास पाठविली आहे. )

: ३ :

सेवेशी. विसाजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ जमादिलावलपर्यंत यस्थास्थित असे. विशेष. स्वामीकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाही. तरी सविस्तर लिहावया आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व अप्पासाहेब लिहितात त्याजवरून विदित होतच आहे. काशीयात्रेचा मजकूर तूर्त सालमजकुरीं दमलासा दिसतो. कारण राजश्री हरिपंततात्यांची पोटदुखी बरी होत नाही, यास्तव उपाय नाही. याजमुळें राहण्याचा विचार दिसतो. राजश्री गोविंदराव गायकवाड यांस वस्त्रें दिलीं; परंतु त्यांस कोणी धनवान दिवाण मिळत नाही. सरकारची फौज द्यावयाची त्यांजसमागमें रास्ते यांनीं जावें असें घाटत आहे. सात हजार फौज व तीन हजार गाडद सरकारची द्यावी असें ठरविलें आहे. मानाजी गायकवाड यांचेंहि बोलणें लागलें आहे. पन्नास लाख रुपये देतो, व याखेरीज दरबारखर्च व गोविंदराव यांचें समजुतीबद्दल कांहीं मुलूखहि देईन म्हणतो. परंतु यांणीं वस्त्रें दिलीं याजमुळें अवघड पडलें आहे. मग काय घडतें पहावें. शिंदे यांचा हिशेब तूर्त पहात आहेत. शिंदे याणी कर्ज सरकारवर सात कोटी काढलें आहे! 'कर्ज मागत नाही, परंतु हिशेबांवर मखलासी करून द्यावी. कर्ज महाल मुलूख आहे. त्याऐवजी फेडून घेऊं;' असें बोलतात. आम्हाकडील हिशोबाचे वगैरे अद्यापि कांहीं जावसाल नाहींत. मामलती हुजूर विल्हे लावणें. तरी लावाव्या; परंतु आमचे स्वारीचा फडशा झाडून करून द्यावा; अशीं बोलणीं पडलीं आहेत. सरंजामाचें महाल तूर्त सोडीत नाही म्हणतात. काय ठरतें पाहावें. भाऊसाहेबांचें म्हणणें आणखी पंधरा रोज वाट पाहीन. नाहीं तर मुलाचा व्रतबंध करावयास निघून जाईन. यांचें म्हणणें व्रतबंध येथेंच करावा. भाऊसाहेबांचें म्हणणें येथें करीत नाहीं. ऐशीं बोलणीं पडलीं आहेत. नानांचे तो रहाणें

जाल्याचा भाव दिसतो. माघ मासांत निश्चय होईल. शिंदे नेहमीं तळ धरून बसले आहेत. जाण्यायेण्याची वार्ता देखील बोलत नाहींत. तात्या सिद्धटेकाहून जाऊन आले; परंतु पोटदुखीस गुण येत नाहीं. पोट दुखतच आहे. तात्यांचे स्त्रीस देवी आल्या आहेत. पुण्यांत महागाईचा कडाड भारी. चार साडेचार शेर धारण झाली आहे. राजश्री आनंदराव व हरबाजीराव धुळप यांस आरमारचा सुभा सांगितला आहे. पुण्यांत गल्ला आणावयाचा उद्योग केला आहे. गुजराथेंत पीक जालें आहे. तिकडून जलमार्गें आणावा ऐसें केलें आहे. शिंदे याजकडील फौजा हिंदुस्थानांत आहेत. त्यांपैकीं अंबोजी इंगळे उदेपूरच्या बंदोबस्तास ठेविले होते. उदेपूरकरांचा कारभारी होता. त्यानें कुंभळनेर किल्ला पहाडी होता तो बदलून होता. त्याजवर उदेपूरकर यांचा खजिना बहुत होता ऐशी वदंता आहे. तो किल्ला इंगळे यांणी घेतला, म्हणोन पत्रें आलीं, त्याजवरून खुशीच्या तोफा सरकारच्या पंचवीस व शिंदे यांच्या जाहल्या. फत्ते जाली. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब काल श्रीमंताकडे दादांस नातू झाला याची साखर घेऊन गेले होते. शृंगेरीकर स्वामी येथें आले आहेत. त्यांचा खटला पडला आहे. कृपा लोभ असावा हे विज्ञापना.

: ४ :

" अपत्यें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंतांचे लग्नाचा निश्चय झाल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. फाल्गुन शु॥ ८ भौमवारीं प्रहर दिवसास देवक प्रतिष्ठा झाली. उपरांतील श्रीमंत दुसरे मजल्यावर दिवाणखान्यांत बसले. तेथें अहेर झाले. आम्ही त्रिवर्गांनीं अहेर केला. पागोटीं बांधूनच नेलीं तीं श्रीमंतांनीं डोईस घातलीं. वरकड पुढें चौरंगावर ठेवीत आणि नमस्कार करीत. याप्रमाणें तीनचार घटका बैठक झाली. उपरांतिक श्रीमंत भोजनास गेले. संध्याकाळीं सीमंतपूजन जालें. उपरांतीक वाग्निश्चय करावयास नाना गेले. वाग्निश्चय जाला, फाल्गुन वद्य ९ सौम्यवारीं चार घटका दिवसास प्रस्थानास बोलावयास आले. सात घटका दिवसास श्रीमंतांची स्वारी निघाली. राजश्री महादजी शिंदे आले होते. अकरा घटका दिवसास स्वारी राजश्री गणेशपंत गोखले खासगीवाले यांचे वाड्यांत आहेत तेथें दाखल झाली. खासगीवाले यांचे वाड्याचे पाठीमागील बागेंत वाद्यालगत सरकारचा

दलबादल डेरा दिला आहे तेथें झाडून मुत्सद्दी व सरदार यांची बैठक झाली होती. चवदा घटका दिवसास लग्न झाले. तोफांच्या सरबत्त्या झाल्या. राजश्री महादजी शिंदे यांणीं अहेराचें जवाहीर दिले. कडीं जडावाचीं सिंहाचे तोंडाचीं दोन, कंठी मोत्यांची एक, शिरपेंच एक, याप्रमाणें व वस्त्रें येणेंप्रमाणें दिलीं. जवाहीर किंमत अजमासें पंचवीस हजारांचें होतें. तिसरे प्रहरीं इंग्रजाकडील मालीट अहेर घेऊन आला. त्यांणीं वस्त्रें व जवाहीर कंठी मोत्यांची एक जेगा एक व पोंच्या नवरत्नांच्या दोन व शिरपेंच एक व श्रीमंत सौ॥ बाईसाहेबांस पोंच्या दोन येणेंप्रमाणें दिलें. राजश्री नाना फडणीस यांणीं वस्त्रें व जेगा शिरपेंच येणेंप्रमाणें दिलें. राजश्री मानाजी गाइकवाड यांजकडील वस्त्रें व कंठी व बुंदेलें यांजकडील वस्त्रें व कंठी येणेंप्रमाणें अहेर जाले. आम्ही व तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांनीं व दादांनीं वस्त्रें व कंठी एक एक दिली. रात्रीं श्रीमंताजवळील चौकीस आम्हाकडील फौज तीर्थस्वरूप राजश्री दादा घेऊन राहिले होते. दशमीस श्रीमंतांचे पंक्तीस भोजनास आम्हांस मंडळीसह त्रिवर्गास बोलाविले होते. आणखी मुत्सद्दी वगैरे पांचशें असामी भोजनास सांगितले होते. राजश्री शिंदे यांचे नातू दौलतराव यांसही बोलाविले होते. दहा घटका दिवसास भोजन झाले. श्रीमंत मजलसीस डेऱ्यांतच आले होते. दोन तीन घटका मजलस झाली. तेव्हां शिंदे यांच्या नातवांनीं श्रीमंतास बादली पोषाख व श्रीमंत सौभाग्यवती बाईसाहेबास बादली चोळी पातळ व बोढणी व जवाहीर तनमणी पाचेचा एक व जडावाच्या कंगण्या जोड एक छंद-जोड एक व गळेसरी पाचेची व हिऱ्याचे ताइताची एक येणेंप्रमाणें दिलीं. उपरांतीक श्रीमंत निजावयास गेले. शिलेदार वगैरे यांजकडील अहेर समय पाहून तीन दिवस नेहमीं होत होते. एकादशी गुरुवारीं श्रीमंत रुसून सरकारच्या वाड्यांत प्रातःकाळीं आले. प्रहर दिवसास फिरून स्वारी खासगीवाले यांचे वाड्यास गेली. ते दिवशीं शास्त्री व पंडित यांस फराळास बोलाविले होते. रात्रीं आठ घटका रात्रीस सारी मंडळी सरकारचे वाड्यांत जमा जाली. आणि खासगीवाले यांचे वाड्यास चवदा घटका रात्रीस गेले. सोळा घटका रात्रीस ऐरणीपूजा झाल्यानंतर स्वारी निघाली. शिंदेही आले होते. श्रीमंत उभयतां अंबारींत बसले होते. खवाशींत राजश्री आप्पा बळवंत होते. अतसबाजी बहुत जाली. व चिराखदान केलें होतें. स्वारी

बराबर नेहमीं जातां येतां माहीमरातब व तमनतोगा हत्तीवर होते, व नालकी स्वारींत जिलबीस होती. स्वारी साडेवीस घटका रात्रीस वाड्यांत दाखल झाली. तोफांची सरबत्ती झाली. लक्ष्मीपूजन झालें. श्रीमंत सौ॥चें नांव यशोदाबाई ठेविलें. पहाटेची चार घटका रात्र राहिली. तेव्हां श्रीमंत निजावयास गेले. काल द्वादशीस रा॥ गणेशपंत गोखले मंडळीसह वाड्यांत भोजनास आले होते शंभर सव्वाशे असामी भोजनास आली होती. त्यांस वस्त्रे दिली. आज त्रयोदशीस श्रीमंत मांडवपरतणीस भोजनास गेले होते. मला व ती. रा॥ भाऊसाहेव व दादांस श्रीमंतांनीं बरावर भोजनांस जावयास बोलाविलें होतें. वडिलांस कळावें. आम्हाकडील पाण्याचे कारखान्यांवर ती. रा॥ श्रीपतराव व वासुदेव काका होते. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

: ५ :

१ श्री॥ राजश्री बाजीराव बाबासाहेब यांस व अमृतराव जुन्नरास आहेत त्यांस सहकुटुंब बऱ्हाणपुरास ठेवावें. उभयतांस एकी जागा पांच सात लक्षांची जहागीर द्यावी. बाबासाहेब याणी दौलतीस राज्यास अधिकार नाहीं ऐसें पत्र श्री॥ राजश्री अपासाहेब प्रधान यांचे नांवें लिहून द्यावें (असें ठरलें).

१ दौलतराव बाबा शिंदे अलिजा बहादूर याणीं वानवडीवर छावणीस येऊन राहावें (हा बेत केला). बारामतीची कहीं जाहली. चिंधीचोळा गेला.

१ राजश्री नानाकडील कारकून टिपूकडे गेला आहे.

१ श्री॥ राजश्री बापूसाहेब यांचें लग्न शु. पंचमी भृगुवारीं चोवीस घटका दिवसास जाहलें. चार रोज समारंभ बराच जाहला. आज साडे होणार.

१ मीर जुमला नवाबाकडील येथें येऊन गुदस्तां राहिले. त्यांस शिंद्यांनीं धरून नेलें. पांचसातशे करोल येऊन घेऊन गेले.

१ रायगडच्या रोखें चार पलटणें रवाना जाहलीं. घाटमाथा राहावें ऐसा हुकूम आहे. श्रुत होय. पत्र दुसऱ्यांनीं पाहूं नये. हे विज्ञापना.

: ६ :

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ. सफर मु॥ पुणें येथें वडिलांचे आशिर्वादें करून सुखरूप असो

विशेष. वडिलीं छ. ३ सफरचे आशिर्वाद पत्र पाठविलें तें छ. ६ मिनहून पावलें. लिहिला मजकूर कळला. सुंदर गज हत्ती कालच येऊन पावला. घोरपडे यांजकडील स्वार पाठवून देतों म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान तर छ. ५ सफरीं बारा घटका दिवस आल्यानंतर रमण्यांत दक्षणेस प्रारंभ करावयास श्रीमंतांची स्वारी निघाली. मला बरोबर येणेविशीं सरकारचें बोलावणें आलें होतें. स्वारीबरोबर गेलों. स्वारी पर्वतीस जाऊन पर्वतेश्वराचें दर्शन घेऊन रमण्याचे दरवाज्यांत गेले. बारा घटका दिवसानंतर प्रारंभ जाला. मग मला आज्ञा केली जे तुम्ही दुसरे दरवाज्यावर दक्षणा द्यावयास जावें. त्यावरून मी व चि॥ रा॥ महादेवराव दाजी येणे प्रों॥ जाऊन दक्षणेस प्रारंभ केला. नेमणुके प्रों॥ शास्त्री वैदिक पंडित वगैरे आले होते. नेमणुकीची याद व ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाचे प्रतीची याद होती त्या प्रों॥ द्यावयास प्रारंभ केला. दोन तीन घटका दक्षणा दिली. उपरांतिक श्रीमंतांची स्वारी आली. अर्ध घटका बसोन दक्षणा दिली. उपरांतिक तिसरे दरवाज्यास स्वारी गेली. मला आज्ञा झाली जे दक्षणेस बसावे. उपरांतिक चार घटकेनें ती॥ रा॥ भाऊसाहेब आले. बरोबर सारे मुत्सद्दी होते. एक दोन घटका दक्षणा देत होते. उपरांतिक अय्याशास्त्री यांचे बंधु वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री यज्ञेश्वरशास्त्री आले. नंतर शास्त्रीबाबा दक्षणा द्यावयास संध्याकाळीं बसले. आम्ही संध्येस गोटास गेलों. संध्या करून चार घटका रात्रीस दरवाज्यावर आलों. पहाटेच्या चार घटका रात्र राहील तव पावेतों शास्त्रीबावाच दक्षणा देत होते. उपरांतिक वेदमूर्ति राजमान्य राजश्री भास्कर दीक्षित यास दक्षणा द्यावयास बसविलें, आणि पहाटेस स्नानाकरितां मी गोटांत गेलों. स्नान संध्या करून फिरोन चार घटका दिवसास गेलों. तेव्हा चि. रा. दाजी दक्षणा देत होते. ते फराळास आपल्या गोटांत गेले. मग मी दक्षणा द्यावयास बसलों. दहा बारा घटका दिवसास श्रीमंत आले. अर्ध घटका बसले होते. उपरांतिक स्वारी गेली. रात्रौ श्रीमंत रमण्यांतच राहिले होते. भोंवतालच्या फौजा चौकीस होत्या. आम्हाकडील फौज सुद्धां राजश्री गणेश गोविंद आमचे दक्षणेच्या दरवाज्याबाहेर उभे होते. संध्याकाळीं दिवसास राजश्री दौलतराव शिंदे आले, व राजश्री बापू होळकर व भोसले यांजकडील वकील आले होते. शिंदे याणीं घोड्यावर बसून रमण्यांतून

ब्राह्मणास प्रदक्षिणा केली. श्रीमंतांनी रमण्यांतून पायउतारा एक व बाहेरून पायउतारा अनवाणी एक येणेंप्रमाणें दोन प्रदक्षिणा केल्या आणि पर्वतीवर डेरा दिला होता तेथें ब्राह्मणांचा तमाशा पहात बसले. अस्मानीं ब्राह्मण सारे झाले. उपरांतिक तोफांचे बार करविले. ब्राह्मण जाण्याचे वाटेवर हिलाल लाविले होते व चंद्रजोतिहि बहुत लाविल्या. दोन तीन घटका रात्रीं ब्राह्मण सारे रमण्यांतून निघाल्यानंतर श्रीमंतांची स्वारी निघाली. महताप लावीत बुधवारांतून वाड्यांत आली. दक्षणा देणाऱ्याची नेमणुकीची याद सरकारांतून जाली होती नकला पाठविल्या आहेत.

: ७ :

विज्ञापना. पर्जन्य इकडे चांगला होऊन पाणी जाहलें नाहीं. पर्वतीचे तलावास पाण्याचा बिंदु नाहीं ! विहिरींस मोटा लावून रमण्यांत तळें आहे त्यांत पाण्याचा पाट आणून सोडला होता. पुण्यापासून चार कोसांवर मावळांत पर्जन्य चांगला लागतो. नगराकडील वर्तमान तर संन्यासग्रहण केलें. हें खरें किंवा खोटें याचे चौकशीस राजश्री मोरो त्रिंबक गोडबोले गेले आहेत. नगरच्या किल्ल्यावर शिंदे यांजकडील निशाण चढलें. भिसाजीपंत वाडेकर यांस ( आपण ) पत्र पाठविलें होतें त्यास ते पूर्वींच देवाज्ञा जाहले. नगराकडील गृहस्थांनीं संन्यास घेतला नाहीं. शिखासूत्र मात्र टाकिलें होतें, व वस्त्रेंही भगवीं केलीं होतीं म्हणोन बाजारवदंता फार आहे. परंतु संन्यास घेतला नाहींसें वाटतें. इकडे येण्याचें स्तब्ध आहे. पुढें काय होतें पहावें. बाजारांत अवाया भारी उठतात, त्या कागदोपत्रीं देखील लिहावयास येत नाहीं. इतकेयास्तव जोतीस जबानी विनंति करावयास सांगितली आहे. विनंति केल्यानंतर सर्व विदित होईल. श्रीमंत बाजीरावसाहेब यांणी उत्कृष्ट दक्षणा दिली श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब ज्याप्रमाणें देत होते त्याप्रमाणें दिली. ( असे ) जुने मनुष्य आहेत ते बोलतात. पंचमेळ खिचडी केली. त्यांत मोहरा व होन व रुपये, याप्रमाणें दिली म्हणोन गोविंदराव निलकंठ खाजगीवाले बोलिले. वडिलांस कळावें करितां विनंती लिहिली आहे. शेरा दक्षणेचा मागाहून लिहून पाठवितों. व जें आढळेल तें लिहून पाठवितों. कळावें. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना. शेरा आणून पाठविला आहे हे विज्ञापना.

: ८ :

१ कै॥ श्रीमंत दादासाहेबांच्या वेळचीं मनुष्यें दोनशें पावेतों होतीं तीं सर्व आली. हजिरी होऊन खर्चास पावले.

१ जुनरास श्री॥ राजश्री अमृतराव साहेबांकडे दोन अंबाऱ्या विझोल हत्ती व पांच घोडे बहुत शिरा ऐसे रवाना केले.

१ राजश्री मानाजी फांकडे व केसो कृष्ण व आणखी एक गृहस्थास मिळोन पांच सहा हजार फौज ठेवण्यास आज्ञा जाहली. फांकडे बाजीराव बर्वे ऐसे खलबतांत नेहमीं.

* कारकून बाळाजी गणेश याचें बाळसाहेबास पत्र.

१ बळवंतराव नागनाथ यांस सुटका जाहली. मशार निल्हेचे पागेचे फडणीसराव यांस आणावयास गेले. दोन रोजांत येतील.

१ कै॥ रावसाहेबांचें बाळेबंदी शिरपेंच वगैरे सर्व जवाहीर आणोन (बाजीरावसाहेबांनीं) रुबरू पाहिलें. सुवर्णाची उपकरणीं वगैरे पाहिलें. वडिलांस विचारून आणवावीं तें न घडलें.

१ छ० १९ रोज बुधवारीं श्रीमंतांची स्वारी श्रीचिंतामणीस जाऊन अकस्मात वडिलांचे डेऱ्यास आली. वडिलांनीं श्री॥ राजश्री बाबासाहेबांस आपले गळ्यांतील नवरत्नाची माळव अप्पासाहेबास शिंदे यांणीं दिलेली कंठी व दोन पोषाख दिले. येक घटका स्वारी बसली होती.

१ हिंदुस्थांत इंग्रजांनीं व अल्ली गोहर यांचे चिरंजीव याणीं मसलत करावी हा उद्योग केला. त्याजमुळे शिंदेकडील डभई व फौज दिल्लीस गेली. डभई याचा कितवा ऐसेही आवई आहे. एकंदरींत हें खरें असेल तर पायबंद भारी बसला. बहुत करून खरें आहे.

१ शिंदे यांचें म्हणणें राजश्री नाना कारभार करीत नाहींत ही गोष्ट सिद्ध जाहली. परंतु टिपू, नबाब, इंग्रज वगैरे रजवाडे यांस पत्र लिहून आम्हाजवळ द्यावीं कीं, 'बाळाजी जनार्दन यांचा कारभार काढिला. त्यांचे पत्र आलें असतां मंजूर नाहीं.' ऐशीं पत्रें लिहून द्यावीं.

१ सरकारांतून बोलणें पडलें आहे कीं ( नानांनीं ) कारभार सोडिला, परंतु फडणिशी त्यांजकडेच असावी. तेव्हां ( शिंद्याचें ) उत्तर आलें कीं, गुमास्ता ठेवावा. खाशांनीं पारीच्छिन्न येऊं नये.

१ राजश्री नाना फौज पायदळ रुकसत करीत आहेत.

येणेंप्रमाणें बाजारी वार्ता हे विज्ञप्ति ( खरे पत्र नं. ३७७८ पा. ४९५५ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८४८१ वि: निबंध
क्रमांक १५७८ नों वि: ३।५।६५

# हिंदी पत्रांचें समालोचन

हिंदुस्थानांत ज्या लोकांनीं वर्तमानपत्राच्या धंद्याला प्रथमच हात घातला त्यांतील अग्रेसर राममोहन रॉय यांसारखा गृहस्थ होता. एवढें सांगितलें असतां इकडील वर्तमानपत्रांच्या मूळ उत्पत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो. कोणत्याहि नव्या युगाचा असा धर्मच आहे कीं, त्याचें आगमन नव्या विचारांच्या ललकाऱ्यांनीं सूचित होत असतें. विद्यमान स्थितीविषयीं समाजांत असंतोष असणें ही गोष्ट सर्व देशांत व सर्व समाजाला सारखीच लागू आहे. म्हणजे त्या त्या देशांत निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या साधनांनीं नवयुगाची द्वाही फिरविणारे पुरुष सारखेच निर्माण झाले. पण छापखाने निघण्यापूर्वीची ही साधनें इतकीं गुणकारी नव्हतीं इतकेंच काय तें! मत-प्रसार हा एक प्रकारचा भांडवली धंदा आहे असें मानलें तर असें दिसून येईल कीं, इतर धंद्यांत भांडवलांची उलाढाल जितक्या वेगानें होणें कधींहि शक्य नाहीं तितक्या वेगानें ती या मतप्रसाराच्या धंद्यांत होते. या व्यापारांत होणारी ही चक्रवाढ इतर कोणत्याहि धंद्यापेक्षां अधिक तीव्र गतीनें होतें. या धंद्यांतलें भांडवल म्हणजे पैशाचें भांडवल नव्हे, तर विचारांचें भांडवल. लिहिणाराचे विचार समाजांत जाऊन पोहोंचणें, समाजांतील विचार परत लेखकाकडे येऊन पोहोंचणें, हीच ती भांडवलाची उलाढाल. समाजांतील जे पुढारी मतप्रसाराविषयीं उत्सुक असतात तेच फक्त या धंद्यांत शिरतात. राममोहन रॉय हे त्यांतलेच एक होत. त्यांची विद्वत्ता, त्यांचा दर्जा ही लक्षांत घेता बंगालसारख्या जमीनदारांच्या संपन्न देशांत त्यांना इतर रीतीनें उदर-निर्वाहाचा धंदा करतां आला नसता असें नाहीं. किंबहुना त्यांनीं वर्तमान-पत्रकारांच्या धंद्यांत पैसा मिळविलाहि नाहीं. परंतु धंद्यावरून मनुष्याचें नांव पडत असतें त्या दृष्टीनें पाहिलें असतां 'संपादक' या शब्दापेक्षां इतर कोणत्याहि शब्दानें राममोहन रॉय यांचें वर्णन यथार्थतेनें होऊं शकत नाहीं. ते पुढें आले त्या वेळीं वर्तमानपत्रें व छापखाने यांच्यासंबंधानें कंपनी सरकारची दृष्टि थोडी निवळली होती व छापखाना किंवा वर्तमानपत्र काढणाऱ्याला पूर्वीं अटी लिहून देऊनच जे परवाने घ्यावे लागत ते त्या सुमारास बंद

झाले, व मुद्रणस्वातंत्र्याचें युग सुरू झालें. परवान्याची पद्धत बंद झाली त्यामुळें वाटेल तसें तोंडसुख घेणारीं गचाळ वर्तमानपत्रें वाटेल तितकीं निर्माण होऊं लागलीं असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. तथापि, उलट मुद्रण-स्वातंत्र्य मिळालें म्हणून वर्तमानपत्रकारांचा जो दर्जा पूर्वी होता तो एकदम सुधारला असेंहि घडलें नाहीं. सर्व गोष्टी हळूहळूच वृद्धिंगत व्हाव्या लागतात. एरवीं ताशीं ३ मैल चालणारा मनुष्य पायांत बेड्या घातल्या असतां ताशीं अर्धा मैल चालू शकणार नाहीं हें खरें; पण केवळ बेड्या निघाल्यामुळें तो ताशीं १० मैल चालू लागतो असेंहि घडत नाहीं. पायांतील बेड्या ही उपाधी खरी; पण मनुष्याची गति मुख्यतः त्याच्या पायांच्या खंबीरीवर व त्याच्या सांध्याच्या स्नायूंच्या सकसपणावर अवलंबून असते. १८३३ सालीं छापखाने-वर्तमानपत्रें यांजवरील नियंत्रण निघाल्यानें पूर्वीच्या आपत्ती टळल्या इतकेंच काय तें! पण हिंदी लोकांना अजून नवी विद्या पुष्कळ शिकावयाची होती, आणि जुन्या विद्येचाहि नव्या रीतीनें उपयोग करण्याचे शिकावयाचें होतें.

शिवाय वर्तमानपत्रकार मोठा फर्डा लिहिणारा झाला तरी त्याचें चीज करण्याला वाचकवर्गहि वाढावा लागतो. तो वाढावयाचा म्हणजे सामान्य शिक्षणाचा फैलाव समाजांत व्हावा लागतो. १०० वर्षें पूर्वीं इकडील समाजांत शिक्षण किती व कशा प्रकारचें होतें हें प्रसिद्धच आहे. अर्थात् त्या काळीं एकाददुसरा मनुष्यच पुढें यावा, व त्याच्या वर्तमानपत्राला वाचकवर्ग मूठभरच मिळावा, यात आश्चर्य नाहीं! आणि राजा राममोहन रॉय यांच्या लेखांचे वाचक किती होते व त्यांची विद्वत्ता कोणत्या दर्जाची होती याची तुलना तत्सदृश आजच्या गोष्टींशीं कोणी केली असतां, वर्तमान-पत्रकारांच्या यशाच्या गमकाविषयीं पूर्वीं जें सांगितलें तें वाचकांना पटेल. त्या कारणाचीं तीं कार्यें चहूंकडे दिसून येणारच! बंगालांत राजा राममोहन रॉय यांनीं ज्या कारणानें वर्तमानपत्र सुरू केलें त्याच कारणांनीं इकडे मुंबईस भाऊ महाजन यांनीं 'प्रभाकर' वर्तमानपत्र सुरू केलें. तथापि, राममोहन रॉय यांनीं इंग्रजी भाषेचा स्वीकार केल्यामुळें व ते विलायतेंतहि जाऊन आल्यामुळें वर्तमानपत्रकार या नात्यानें त्यांना जी प्रसिद्धी मिळाली ती एका प्रांतिक भाषेंत म्हणजे मराठी वर्तमानपत्र चालविणाऱ्या भाऊ महाजन यांना

मिळाली नाहीं. पण हिंदुस्थानांतील वर्तमानपत्राचा इतिहास लिहिणाऱ्याला समकालीन अशा या दोन संपादकांचा उल्लेख बरोबरच करावा लागेल. असो.

या देशांतील प्रत्येक प्रांतागणिक वर्तमानपत्रांचा इतिहास येथें सांगत बसण्याचें कारण नाहीं. पण गेल्या शतकांत कोठें कोठें कोणतीं वर्तमानपत्रें व कोणतें संपादक नांवारूपास आले हें थोडक्यांत सांगतों. बंगाल्यांत ' रीस अँड रयत ', ' हिंदू पेट्रियट ', ' इंडियन मिरर ', ' अमृत बझार पत्रिका ', ' बंगाली ', ' इंडियन नेशन ', ' वंदे मातरम् ', ' फॉरवर्ड ', ' लिबर्टी ', ' अॅडवान्स ' वगैरे इंग्रजी वर्तमानपत्रें प्रसिद्धच आहेत. यांतील कांहींचा भाग्यसूर्य अस्तंगत झालेला आहे. तथापि, या सर्वांनीं आपल्या परीनें आपल्या काळीं उत्तम लोककार्य केलें. त्यांपैकीं बहुतेक पत्रांचे संपादक नामांकित युरोपियन संपादकांच्या तोडीचे होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. फक्त वाचकवर्ग मर्यादित असल्यामुळे त्यांच्या व यांच्या वर्तमानपत्रांच्या खपाची तुलना करतां येणार नाहीं.

राजा राममोहन रॉय, हरिश्चंद्र मुकरजी, ख्रिस्तोदास पाल, राजकुमार सर्वाधिकारी, कृष्णकमल भट्टाचार्य, शंभूचंद्र मुकरजी, शिशिरकुमार घोष, नरेंद्रनाथ सेन, एन्. एन्. घोष, सुरेंद्रनाथ बानर्जी, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल इत्यादि नामांकित संपादक बंगाल्यांत होऊन गेले.

मद्रासेकडे हिंदी वर्तमानपत्र सुमारें ५२ वर्षांपूर्वीं निघालें. त्याच्या आधीं तिकडे वर्तमानपत्रें विशेष नांवारूपाला आलीं नाहींत. ' हिंदू ' हें प्रथम साप्ताहिक होतें तें हल्लीं दैनिक असून त्याचा दर्जा, त्याचा आकार, त्याचा वाचकवर्ग व त्याचे वजन हीं हिंस्थानांतील पहिल्या प्रतींत मोडतात. या पत्रानें आपल्या डोळ्यापुढें ' लंडन टाइम्स ' हें ध्येय ठेविलें असून त्यानें त्याचें यशस्वी रीतीनें अनुकरण चालविलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ' हिंदू ' पत्र मि. जी. सुब्रह्मण्य अय्यर व वीर राघवाचारी यांनीं सुरू केलें ! त्यानंतर त्या इलाख्यांत जीं वर्तमानपत्रें निघालीं व पुढें आलीं त्यांत ' मद्रास स्टँडर्ड ', ' जन्मभूमि ' इ. विशेष प्रसिद्ध आहेत.

तामिल भाषेंत ' स्वदेश मित्रम् ' हें एकटेंच प्रसिद्ध पत्र आहे. व तेंहि मि. जी. सुब्रह्मण्य अय्यर यांनीं सुरू केलें. मद्रासेकडील वर्तमानपत्रकारांत

पुढील नांवें प्रमुख आहेत— मि. जी. सुब्रह्मण्य अय्य, वीर राघवाचारी, शंकर नायर, नटराजन्, करुणाकर मेनन, परमेश्वरम् पिले, कस्तूररंग अय्यंगार, श्रीनिवासन्, रंगस्वामी अय्यंगार, पट्टाभी सितारामय्या, टी. प्रकाशम् इ. आंध्र प्रांतामध्यें 'जन्मभूमी' शिवाय विशेष नामांकित अशीं वर्तमानपत्रें फारशीं नाहींत. नागपूर प्रांतांत पूर्वी रा. पंडित, पाध्ये, वगैरे वर्तमानपत्रकार झाले. वायव्य प्रांतांत पूर्वी पं. विशन् नारायण धार व गंगाप्रसाद वर्मा, हीं दोनच नांवें प्रमुख होतीं. 'लखनौ-ॲडव्होकेट' हें एकच जुनें पत्र प्रसिद्ध आहे. हल्लीं अलहाबाद येथील 'लीडर' पत्र व त्याचे संपादक मि. सी. वाय्. चिंतामणी यांचें नांव प्रसिद्ध असून इतर पत्रांत व लेखकांत खालील नांवें प्रसिद्ध आहेत—

पंजाब प्रांतांत 'ट्रायब्यून', 'पंजाबी' व 'पीपल' हीं तीनच नांवें प्रसिद्ध आहेत. 'ट्रायब्यून' पत्राशीं गुप्त बाबू यांचें नांव फार दिवस जोडलें गेलें. ते बंगाली होते. पंजाबी लोकांपैकीं लाला लजपतराय यांनाच प्रमुख संपादक हें नांव देतां येईल. त्यांचे शिष्य हल्लींचे 'पीपल' पत्राचे संपादक हे तरुण व होतकरू असून त्यांनीं तें पत्र चांगलें चालविलें आहे. स्वदेशी चळवळीचे वेळीं 'दी पंजाबी' या नांवाचें वर्तमानपत्र लाला लजपतराय यांच्या प्रोत्साहनानें मि. जसवंतराय यांनीं काढलें. पण तें चालविणाऱ्या लाला लजपतराय यांना एकहि चांगला पंजाबी लेखक न मिळाल्यामुळें इकडून लो० टिळकांच्या शिफारशीनें रा. रा. के. के. आठवले नांवाचे गृहस्थ तिकडे नेण्यांत आले होते.

# ॲंग्लो इंडियन पत्रांची हकीकत

इंग्रजांनीं छापखाना व वर्तमानपत्रें आपल्याबरोबर इकडे आणलीं. १७५७ त प्लासीची लढाई झाली. १७७३ सालीं रेग्युलेटिंग् ॲक्टानें गव्हर्नर–जनरल आणि सर अदालत यांची स्थापना होऊन राज्यकारभार सुयंत्रित सुरू झाला. तेथून पुढें सातच वर्षांत सन १७८० च्या जानेवारींत कलकत्ता येथें एका इंग्रजानें हिंदुस्थानांत पहिलें वर्तमानपत्र सुरू केलें. लंडनचा सुप्रसिद्ध टाइम्स त्यानंतर ५ वर्षांनीं जन्माला आला व अजून तो अबाधित सुरू आहे. परंतु हिंदुस्थानांत निघालेल्या या इंग्रजी वर्तमान-पत्रासारखीं अप्रसिद्ध व क्षणभंगुर अशीं पुष्कळ वर्तमानपत्रें विलायतेस यापूर्वीं निघत होतीं. हिंदुस्थानांत १७८७ सालीं उपटलेला हा तशाच प्रकारचा एक संपादक होय. १७८९ सालीं मुंबईस ' दी बॉम्बे हेरल्ड ' नांवाचें पहिलें वर्तमानपत्र निघूं लागलें. पुढच्या सालीं ( १७९० ) ' दी बॉम्बे कूरिअर ' या नांवाचें आणखी एक पत्र निघालें. त्यांतूनच पुढें हल्लींचा ' टाइम्स ऑफ इंडिया ' निघाला व सन १८६१ सालीं या दोन पत्रांच्या नांवाच्या संगमांत ' कूरिअर ' हें नांव बुडून, ' टाइम्स ' येवढेंच नांव शिल्लक राहिलें. कलकत्त्यास १७८० सालीं निघालेल्या पहिल्या पत्राचें नांव ' हिकीज् गॅझेट किंवा जर्नल् ' असें होतें. व त्यांत विलायतेंतील पत्राप्रमाणें बहुतेक सर्व गप्पा, भाकडकथा, शिवीगाळ, बदनामी असाच मजकूर असे. हें पत्र दोन वर्षांतच नाहींसें झालें; त्यामागून ' इंडियन गॅझेट ' नांवाचें पत्र निघूं लागलें. तें यापेक्षां अधिक चांगलें होतें व तें ५० वर्षें चालून १८३३ सालीं ' बंगाल हरकारा ' नांवाच्या पत्रांत सामील झालें व हीं दोन्हीहि मिळून १८६६ सालीं ' इंडियन डेली न्यूज ' नांवाच्या पत्रांत सामील झालीं. सन १८२१ त कलकत्त्यास एका युरोपियन व्यापाऱ्यानें एक सिंडिकेट बनवून ' जॉन बुल इन् दी ईस्ट ' नांवाचें एक दैनिक वर्तमानपत्र काढलें होतें, त्यांतूनच पुढें हल्लींचा ' इंग्लिशमन् ' १८३६ त निघाला. मुंबई इलाख्यांत ' मुंबई कूरिअर ' नंतर १७९१ मध्ये ' बॉंबे गॅझेट ' निघालें. तें सन १९१४ पर्यंत चालूं होतें. व एके काळीं ' टाइम्स '-

पेक्षां याच वर्तमानपत्राला विशेष महत्त्व होतें. या जुन्या काळीं मद्रासकडे वर्तमानपत्रांचीं नांवें फारशीं प्रसिद्ध नाहींत. इतर इलाख्यांतून इंग्रजांनीं वर्तमानपत्रें काढलीं अशीं फक्त मद्रास व पंजाब येथेंच. त्यांत 'टाइम्स' व लाहोरचें 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट' व अलाहाबादचा 'पायोनिअर' हीं काय तीं विशेष प्रसिद्ध आहेत.

सन १८३५ पर्यंतचा काळ अँग्लो इंडियन लोकांनीं चालविलेल्या इंग्रजी पत्रांचाच होता. पण इंग्रजच राज्यकर्ते व इंग्रजच वर्तमानपत्रकार असा मेळ सकृत् दर्शनीं दिसत असला तरी, त्या काळच्या इंग्रज वर्तमानपत्रकारांना कायद्याच्या रूपानें सरकारी अवकृपा बरीच सोसावी लागली. कांहीं बाबतींतला जुलूम कायद्याशिवायहि होई; म्हणजे वर्तमानपत्रकर्ता सरकारला नाठाळ व त्रासदायक असा वाटला तर त्याला उचलून जहाजावर घालून हद्दपार करण्यांत येत असे. 'मुंबई क्रॉनिकल'चे संपादक मि. बी. जी. हॉर्निमन यांना अशाच रीतीनें पकडून हद्दपार करण्यांत आलें तेव्हां ती गोष्ट अपूर्व वाटली. ती अपरिचित नव्हती. पण १८३५ नंतर काळ बदलला. व देशी वर्तमानपत्रकार पुढें येऊं लागले; तसा सरकारचा राग 'अँग्लो-इंडियन' पत्रांवरून कमी झाला. राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचें व सरकारावर टीका करण्याचें काम देशी पत्रकारांनीं उचललें, व 'अँग्लो-इंडियन' वर्तमानपत्रकार हे इंग्रज सरकारचे ऋणानुबंधी बनले. हल्लीं जरी पिनल कोड किंवा प्रेस ॲक्ट हे कायदे नांवानें सर्वांकरितां सारखे आहेत तरी त्यांची अंमलबजावणी मात्र निःपक्षपातीपणाची नाहीं. १८७९ मध्यें तर बोलूनचालून देशी भाषेंतील वर्तमानपत्रांकरितांच वेगळा कायदा करण्यांत आला होता. कंपनीसरकाराकडून राणीसरकाराकडे हिंदुस्थानाचें राज्य गेलें त्या वेळीं हिंदुस्थानांत १९ 'अँग्लो-इंडियन' व २५ देशी भाषेंतून निघणारीं मिळून ४४ वर्तमानपत्रें होतीं. परंतु या सालीं म्हणजे १८५८ तच विद्यापीठें स्थापण्यास इकडे सुरुवात झाली; व इंग्रजी शिक्षण सुरू झालें. त्यानंतर जसजसे दिवस गेले व सुशिक्षित हिंदी लोकांची संख्या वाढूं लागली, तसतसें 'अँग्लो-इंडियन' व हिंदी लोकांनीं चालविलेलीं (देशी किंवा इंग्रजीहि) वर्तमानपत्रें यांचें प्रमाण बदलूं लागलें. हल्लीं तर 'अँग्लो-इंडियन' पत्रें हीं देशी पत्रांच्या मानानें खंडीस रती इतकींच भरतील.

हिंदुस्थानांत प्रथम ज्या इंग्रजांनीं वर्तमानपत्रांचा धंदा सुरू केला त्यांच्याविषयीं स्वतः इंग्रजांनींच जे शेरे लिहून ठेविले ते फारसे भूषणास्पद नाहींत. त्यांतील एक शेरा असा—

" Found unfit to engage in any creditable method of subsistence—दुसरा कांहीं धंदा चालेनासा झाला म्हणून हे लोक संपादक झाले ! " हिंदी वर्तमानपत्रांचे कांहीं हितशत्रू इकडील संपादकवर्गाविषयींहि पुष्कळ वेळां अशा प्रकारचे उद्गार काढतात. पण वास्तविक असे शेरे कोणी कोणत्याहि धंद्यासंबंधानें देणें बरें नव्हे. कारण पुष्कळ धंद्यांची अशी गोष्ट आहे कीं, आधीं धंदा म्हटला म्हणजे त्यांत पडणाऱ्याला त्या धंद्याला लागणारें सर्व शिक्षण आगाऊ मिळालेलेंच असतें असें नाहीं. कांहीं कांहीं धंद्यांत लोक पडतात ते तो धंदा वंशपरंपरागत घरीं चालत आला म्हणून. घरीं किंवा धंद्याच्या दुकानांत जें कांहीं चालतें तें पाहून मिळणारें शिक्षण त्या धंद्याला प्रारंभाला पुरें होतें. आणि मनुष्य एकदां काम करूं लागला म्हणजे अनुभवानें तो सर्वच हळूहळू शिकतो. इतर कित्येक धंद्यांत कांहीं लोक शिरतात ते त्यांत आपली बुद्धि चालेल असें वाटून शिरतात. मग तो मूळचा घरचा नसेना का ! मनुष्य यदृच्छेनें एखाद्या धंद्यांत पडतो, आणि ज्या गोष्टीला मूळ केवळ गरजेनें हात घातला त्यांतच पुढें त्याचा भाग्योदय होऊं शकतो. वर्तमानपत्राप्रमाणें वैद्यकीच्या धंद्यासंबंधानेंहि सर्व देशांतून असाच अपवाद आहे. दुसरें कांहीं हातून करतां आलें नाहीं तर वैद्याचें दुकान काढून बसावें. कारण तेथें भांडवल लागत नाहीं, आणि रोग्याला गुण येण्या-संबंधानें कलिविडंबनांतील श्लोक प्रसिद्धच आहेत. पण या धंद्यांत पडणारे लोकहि कालांतरानें अनुभवानें मोठे निष्णात वैद्य बनल्याचा पुरावा आहे. असो.

हिंदुस्थानांतील ज्या इंग्रजांनीं मूळ वर्तमानपत्रें सुरू केलीं ते विद्येनें किंवा अब्रूनें कसेहि असोत, त्यांनीं त्या वेळच्या नोकरशाहीला सतावून सोडलें होतें यांत कांहीं शंका नाहीं. म्हणूनच, त्यांना वेळीं जहाजांत घालून हद्दपारहि करण्यांत येत असे. या लोकांच्या ठिकाणीं चांगलें चुरचुरीत लिहिण्याचा तरी गुण होता यांत शंका नाहीं, वर्तमानपत्रकाराच्या धंद्यांत हाच गुण प्रमुख मानण्यांत येतो. अंगीं हा गुण असून फिरून त्या गुणाचा उपयोग करण्याचें धाडस लागतें तेंहि या लोकांच्या ठिकाणीं होतें असें

दिसतें. कारण इंग्रजासारखा इंग्रज इकडे आलेला तो सुखासुखी आपली मान फासावर काय म्हणून लटकवील ! इंग्रज मनुष्य लफंगा व बेअब्रूचा असला तरी त्याला त्या वेळींहि या हिंदुस्थानच्या कुरणांत पोटापुरतें गवत कोठेंहि खुडून खावयास मिळालें असतें. त्या वेळच्या इंग्रज वर्तमानपत्रकारांचें वकीलपत्र कांहीं आम्हीं घेतलेलें नाहीं; परंतु त्यांच्याविषयीं हे दोन शब्द लिहिण्याचें कारण असें कीं, हिंदी संपादकावर कित्येक वेळां जे आक्षेप घेण्यांत येतात त्यालाहि तेंच उत्तर देतां येईल. संपादकाचें यश केवळ त्याच्या पत्राचा खप किती होतो किंवा त्याला दरसाल किती शिल्लक बाजूला टाकतां येते यावरूनच करावयाची नसते. हिंदुस्थानांतील प्रमुख म्हणजे राजधानीची शहरें सोडलीं असतां जिल्हानिहाय अशीं पुष्कळ वर्तमानपत्रें दाखवितां येतील कीं, त्यांची बुद्धिमत्ता, देशाविषयीं त्यांची कळकळ व त्यांचें मनोधैर्य हीं राजधान्यांतून चाललेल्या, भरभराटलेल्या व यशस्वी म्हटल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांच्या संपादकांहून कांहीं कमी नसते. याचा अर्थ हाच कीं, यश हें पुष्कळ अंशीं बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतें. केवळ यशापयशावर मनुष्याच्या गुणाची परीक्षा करणें नेहमींच योग्य ठरत नाहीं. असो.

१८ व्या शतकांत विलायतेंतील वर्तमानपत्रें हीं ज्याला ' यलो जर्न्या-लिझम् ' म्हणतात त्याचाच पुष्कळसा मासला होता. यलो म्हणजे रोगट दुष्ट, हलकट, हीन शीलाचें. अर्थात् त्या विलायतेंतलेच लोक तोच म्हणजे वर्तमानपत्राचा धंदा इकडे हिंदुस्थानांत करूं लागले तरी, तोच नमुना वठावयाचा. शिवाय हिंदुस्थानांत आज इंग्रजाला ' मी जेता व हिंदी लोक जित ' या भावनेमुळें आढ्यता आलेली आहे. या आढ्यतेचे दोन परिणाम होतात. एक मन मोकळें करून खुलासेवार लिहिणें वा बोलणें अशा लोकांच्या हातून होत नाहीं. स्तिमितवृत्ति हा आढ्यतेचा एक स्वभावगुण आहे. या गुणामुळेंच श्रीमंत लोक इतरांशीं बोलतांना आपला शब्द महाग विकतात. इंग्रज समाजाच्या आढ्यतेचा दुसरा एक परिणाम असा झाला आहे कीं, या समाजांतील लोक आपल्यांतील भांडणें बाहेर पडूं देत नाहींत. ज्याप्रमाणें कुटुंबकलह गुप्त ठेवण्याची समंजस माणसाची प्रवृत्ति असते त्याप्रमाणें आपापसांतलें कांहीं बिंग बाहेर फुटूं नये अशी हा इंग्रज समाज खबरदारी घेतो. वास्तविक या समाजांतील लोकांत स्पर्धा, चढाओढ, द्वेष, टीका,

निंदा, सामाजिक दुर्गुणामुळें होणारे कलह किंबहुना घातपात नसतात असें नाहीं, पण यांचा मागमूस बाहेर येत नाहीं. १८ व्या शतकांत गोष्ट वेगळी होती. तेव्हां राज्याची घडी बसत होती. कारस्थान, कपट, स्पर्धा, द्वेष यांना तेव्हां पुष्कळ वाव होता. शिस्तीचे लगाम हल्लींइतके तंग आवळलेले नसत. आणि सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, त्या वेळची इंग्रजांनीं इकडे चालविलेलीं वर्तमानपत्रें हीं धंद्यापेक्षां खेळासारखींच अधिक असत. यामुळें खाजगी इंग्रज एकमेकांच्या कुचाळ्या वर्तमानपत्रांतून करीत. इतकेंच काय, पण वॉरन हेस्टिंग्ज व फिलिप फ्रॅंसिस यांच्यासारख्या गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांच्या भांडणांचाहि प्रतिध्वनि या वर्तमानपत्रांतून उमटे. इंग्रज समाजांतल्या घाणेरड्या गोष्टी निरनिराळ्या प्रसंगांनीं व रूपकांनीं हे संपादक बाहेर काढीत. हल्लीं फाटक्यांतल्या फाटका इंग्रज हा हिंदुस्थानांत पैसाच मिळविण्याला आलेला असला तरी, मी एक राज्यकर्ता आहें अशी त्याची भावना असते. म्हणून कोणाहि इंग्रज अधिकाऱ्याचा अभिमानच तो बाळगतो, व ज्याच्या योगानें त्याचा कमीपणा बाहेर दिसेल अशी कोणतीहि गोष्ट वा कृत्य करीत नाहीं. केव्हांहि पाहावें तों हे सगळे सुष्ट दुष्ट इंग्रज आपले बाहेरच्या जगाला दिसायला एक. चित्रसेन गंधर्वाशीं लढणाऱ्या कौरव-पांडवाप्रमाणें १०५ च असावयाचे. शंभर व पांच असे वेगळे दिसावयाचे नाहींत. यामुळें हल्लींच्या इंग्रजांनीं चालविलेल्या वर्तमान-पत्रांच्या प्रतिष्ठितपणांत जर थोडासा थिल्लरपणा मनुष्यस्वभावानुसार आला तर त्याचा उपसर्ग कोणा इंग्रजाला लागावयाचा नाहीं. तर त्याचा मारा हिंदी लोकांवरच व्हावयाचा. हल्लीं बारान् बारा चोवीस वर्षें वर्तमानपत्रें वाचणाराला एका इंग्रजानें दुसऱ्या इंग्रजाला हास्यास्पद केलें असें आढळणार नाहीं. मुंबईचा 'टाइम्स' किंवा कलकत्याचा 'स्टेट्स्मन' हीं सामान्यतः संभावित, प्रतिष्ठित अशींच पत्रें आहेत. तथापि त्यांत 'मॅट्रिक फेल' झालेल्या बंगाली बाबूपासून जगद्विख्यात म. गांधीपर्यंत हिंदी लोकांची खोडी केल्याशिवाय फार दिवस सुनके जात नाहींत. मग ती खोडी गद्य लिहिणारा एक गद्धा करो, किंवा कविस्वरूपी एखादा कपि करो. या पत्रांत यलो म्हणजे रोगट जर्न्यालिझमचा भाग असेल तितका सर्व हिंदी लोकांची कुचेष्टा करण्याकडे खर्च झालेला आसावयाचा.

असो. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, वरील कारणामुळें हल्लींच्या काळांत इंग्रजांनीं चालविलेल्या वर्तमानपत्रांना कायद्याचा उपसर्ग लागत नाहीं, व सरकारची अवकृपा त्यांजवर होत नाहीं. पण १८ व्या शतकांत गोष्ट अगदीं उलटी होती. जीं वर्तमानपत्रें होती तीं इंग्रजांचींच. हिंदी लोकांना इंग्रजी शिक्षण नव्हतें, व वर्तमानपत्रांची ओळखहि नव्हती. मग राष्ट्रीय भावना, कडक टीका, राजद्रोह या गोष्टी कोठून येणार ? म्हणून कायद्याच्या किंवा सरकारच्या अवकृपेचा उपसर्ग लागावयाचा तो इंग्रज वर्तमानपत्रकारांनाच लागे. व असला एखादा संपादक पायांतील कांट्यासारखा खुपूं लागला म्हणजे तो उपटून काढून फेकून द्यावा त्याप्रमाणें त्याला उचलून जहाजावर घालून परत स्वदेशीं पाठवीत. १७९८ पर्यंत हिंदुस्थानांत इंग्रजाला कायमची वस्ती किंवा धंदा करून राहाण्याला स्पेशल परवानगी लागे. म्हणून ती परवानगी काढून घेणें हें संपादकाला शिक्षा करण्याचें सुलभ साधन होतें. या बंधनाचें रूपांतर होऊन, धंदेवार परवाने सुरू झाले. त्यांत वर्तमानपत्राला लागणारा परवाना हा एक येऊन बसला. पण पुढें पुढें या संपादकवर्गा-वरील हीं बंधनें हळूहळू आपोआप शिथिल होऊं लागलीं. कारण इकडील इंग्रज संपादक विलायतेहून आलेल्या वर्तमानपत्रांतल्या बातम्या, लेख किंवा बातमीपत्रें छापीत. व विलायतची बातमी तेव्हां पुष्कळ दिवसांनीं मिळे तिच्याविषयीं उत्सुकता फार म्हणून हीं इकडील पत्रें जगूं द्यावीं असेंहि कंपनी सरकारला वाटे. वेलस्ली, मिंटो या गव्हर्नर जनरलांच्या कारकीर्दी-पर्यंत वर्तमानपत्रांवर बरींच नियंत्रणें होतीं. व १८२३ पर्यंत इंग्रज संपादकांना विलायतेस हद्दपार केल्याचीं उदाहरणें घडलेलीं आढळतात. पण या सुमारास बंगाल्याकडे हिंदी वर्तमानपत्रें सुरू झालीं तेव्हां सरकारला प्रश्न असा येऊन पडला कीं, इंग्रजाला बोटीवर घालून इंग्लंडांत परत पाठवितां येईल, पण हिंदी संपादकाचें काय करावयाचें ? तो हिंदुस्थानालाच पाय चिकटवून राहणार. तेव्हां नियंत्रण हवें, पण कांहीं वेगळें हवें. म्हणून वेगळ्या प्रकारचे नियम करण्यांत आले. पण लॉर्ड बेंटिंग यांच्या कारकीर्दींत हीं नवीन बंधनेंहि बहुतेक गळून पडलीं, व ज्याला मुद्रण-स्वातंत्र्य म्हणतात त्याचा उदय झाला.

# महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें

छापखाने, वर्तमानपत्रें देशांत असणें हें वैभवाचें किंवा भरभराटीचें अवश्य अनिर्वाह्य लक्षण असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्याशिवायहि देश सुखी संमृद्ध, संपन्न असूं शकतो. सुधारणेचीं साधनें हीं इतकीं अगणित आहेत कीं, तीं कधींच पुरीं वाटत नाहींत. आज लोकांना आगगाडी व तारायंत्रें हीं सुधारणेची मुख्य खूण असें वाटतें. पण इंग्लंडचे लोक ज्या एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीला वैभवशाली असें म्हणतात त्या काळीं आगगाडी व तारायंत्र नव्हतें. व वर्तमानपत्रेंहि नव्हतीं. अशाच रीतीनें हिंदुस्थानांतील जुन्या देशी राजांच्या काळीं आगगाड्या, तारायंत्र किंवा वर्तमानपत्रें यांपैकीं कांहींच नव्हतें. तथापि, तेव्हां देशांत वैभव नव्हतें असें म्हणतां येत नाहीं. काळ हा जसा एकच टिकून राहात नाहीं, त्याचप्रमाणें निरनिराळ्या काळाला सुधारणेचीं, उत्कर्षाचीं साधनें आणि वैभवाच्या खुणा याहि एकच एक प्रकारच्या नसतात. आज कोणी हिंदुस्थानच्या लोकांना जर म्हटलें कीं, "तुम्हांला तुमचीं जुनीं राज्यें देतों पण आजचीं आगगाड्या, तारायंत्रें व वर्तमानपत्रें काढून घेतों" तर लोक कबूल होणार नाहींत काय? आम्हांला वाटतें खचित कबूल होतील, व ते म्हणतील कीं, "परकी राज्यसत्ता तरी देशांतून नष्ट होऊं द्या, मग जें काय वैभव, सत्ता, देशांत असेल तिची अधिक चांगल्या रीतीनें वांटणी कशी करतां येईल हें आपण पाहूं! व पाहूंच लागलों म्हणजे वाटतें कीं, तिकडे जशीं वर्तमानपत्रें जन्माला आलीं व परिणति पावलीं त्याचप्रमाणें इकडेहि कां झालें नसतें? प्रजास्वातंत्र्याचें हें एक प्रकारचें वारें आहे. तें एकदा वाहूं लागलें म्हणजे एकाचें पाहून दुसऱ्या देशावर व दुसऱ्याचें पाहून तिसऱ्या देशावर तें वाहूं लागतें. एका टोकाला झारशाहीसारखी जुलमी राज्यसत्ता जर नष्ट झाली व दुसरीकडे चीन-जपानसारखे एशिॲटिक देश प्रजास्वातंत्र्याचा उपभोग घेऊं लागले, तर मध्यें हिंदुस्थानच काय असा मोकळा राहिला असता? आज ब्रिटिश मुलखांतील राज्याप्रमाणें संस्थानिकांच्या राज्यांतहि नवीन राज्यघटना होऊं लागल्याच आहेत कीं नाहींत?

असो. कोणत्या स्थितींत काय झालें असतें याचा खल करीत बसण्यांत व तर्क चालविण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे हें आपण आतां पाहूं.

आतां आपण महाराष्ट्राकडे वळूं! १८१० सालीं मिशनरी लोकांनीं मराठी पुस्तकें छापण्याला या इलाख्यांत सुरुवात केली. त्यांचें पाहिलें पुस्तक 'सिंहासनबत्तिशी' हें होय. अर्थात् मराठ्यांचें सिंहासन इंग्रजांच्या हातीं लागण्यापूर्वीच त्यांच्या मुद्रणकलेनें मराठी 'सिंहासनबत्तिशी' हस्तगत केली. १८२१ सालीं पुण्यास विश्रामबागेंत संस्कृत पाठशाळा सुरू झाली. १८२२ मध्यें मुंबईस 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' स्थापन झाली, व तिला मिळालेल्या रु. ५०,००० तून ग्रंथप्रसिद्धीचें काम सुरू झालें. १८३७ त वे. शा. सं. बाळशास्त्री जांभेकर यांनीं 'दिग्दर्शन' व १८४० त रा. भाऊ महाजन यांनीं साप्ताहिक 'प्रभाकर' वर्तमानपत्र सुरू केलें. १८४२ त पुण्यास इंग्रजी शाळा सुरू झाली. १८४८ सालीं पुण्यास खासगी मराठी शाळा मराठे लोकांकरितां निघाली. १८४९ मध्यें पुण्यास 'ज्ञानप्रकाश' सुरू झाला. १८५१ त पुण्यांतील संस्कृत व इंग्रजी वर्गांना मिळून 'पूना कॉलेज' हें नांव प्राप्त झालें. १८५५ सालीं 'मुंबई एज्युकेशन सोसायटी' मोडली व सरकारी शाळाखातें सुरू झालें. १८५७ सालीं 'मुंबई युनिव्हर्सिटी' निघून मॅट्रिक्युलेशन परीक्षा सुरू झाली. १८६२ सालीं पहिला बी. ए. झाला व त्याच वर्षीं 'इंदुप्रकाश' वर्तमानपत्र सुरू झालें. १८६५ सालीं पहिली वकिली परीक्षा सुरू झाली. १८६६ सालीं पहिला एल्‌एल्. बी. झाला. १८७३ सालीं 'सत्यशोधक समाज' स्थापन झाला. १८७७ सालीं 'दीनबंधु' हें ब्राह्मणेतरांचें वर्तमानपत्र सुरू झालें. १८८१ सालीं 'केसरी व मराठा' हीं वर्तमानपत्रें सुरू झालीं. केसरीच्या आधीं निघालेलीं अशीं कांहीं वर्तमानपत्रें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं होतीं. त्यांपैकीं कांहींचीं नांवें खालीं दिलीं आहेत :—

प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, सुबोध पत्रिका, ज्ञानोदय, वर्तमान-दीपिका, शुभसूचक, बोधसुधाकर, पूर्णचंद्रोदय, वैभवपंच, धूमकेतू, जगन्मित्र, दी नेटिव्ह ओपीनियन, बेळगांवसमाचार, वृत्तवैभव. इ०

१८८० सालांतील मुंबई इलाख्यांतील शिक्षणसंस्थांचे आंकडे पुढीलप्रमाणें होते— मुंबई इलाख्यांत एकंदर शाळा पांच हजारांच्या आंत व एकंदर विद्यार्थी पावणेतीन लक्ष होते. सर्व प्रकारचीं मिळून ८ कॉलेजें, १ आर्ट स्कूल, ४८ हायस्कुलें, १७७ मिडिल स्कूल्स्, २ वैद्यकवर्ग, ५ धंदेशिक्षणाचे वर्ग व बाकी प्राथमिक शाळा, मुलींच्या शाळांची संख्या २८४ होती व ट्रेनिंगचे वर्ग ९ होते. एकंदर विद्यार्थ्यांत ब्राह्मण शेंकडा २३, इतर ५९ व मुसलमान शेंकडा १० असत. शिक्षणाप्रमाणें वाङ्मयाची वांटणी अर्थात् बेताचीच होती. त्या सालच्या सरकारी रिपोर्टांत एकंदर मुंबई इलाख्यांत छापखान्यांची व ग्रंथादिकांची संख्या खालीलप्रमाणें होती :—

छापखाने मुंबईत ४८, महाराष्ट्रांत २३, गुजराथेंत १५. पुस्तकें मुंबईत ५३१. महाराष्ट्रांत ४६५, गुजराथेंत ९४. भाषेच्या दृष्टीनें १०७ इंग्रजी, २०८ मराठी, २०५ गुजराथी अशी वर्गवारी होते. मासिक वगैरे पुस्तकें १५१. एकंदर वर्तमानपत्रें ८३. पैकीं २ इंग्रजी, १० अँग्लो–मराठी, व निवळ देशी भाषेंतील वर्तमानपत्रें ७१. देशी भाषेंतील वर्तमानपत्रांपैकीं ३४ मराठी, ३१ गुजराथी. एकंदर पुस्तकसंग्रहालयांची संख्या ८७ होती, शिळा–छापखाने सुमारें २५ होते. वर्तमानपत्रामध्यें अधिक खप एका गुजराथी वर्तमानपत्राचा होत असून, त्याच्या जास्तींत जास्त १६५० प्रती निघत असत. हजार प्रतींवर निघणारीं वर्तमानपत्रें ६ व पांचशें प्रतींवर खपणारीं वर्तमानपत्रें १४ होतीं.

# जुना ज्ञानप्रकाश

विलायतेंतील व इकडील छापखाने आणि वर्तमानपत्रें यांची तुलना करीत मागें गेलों असतां, ती मोठी मनोरंजक वाटते. या बाबतींत आमच्या हाताशीं दोन साधनें आहेत. त्यांचा थोडासा उपयोग येथें करण्याचें आम्हीं योजिलें आहे. हीं दोन साधनें अशीं : ( १ ) आजच्या पूर्वीं ८१ वर्षांचें म्हणजे १८४९ सालचें ज्ञानप्रकाशाचें ' फाईल '. ज्ञानप्रकाश याच सालीं प्रथम अवतीर्ण झाला व हें फाईल त्याच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षाचें आहे. या फायलीचीं पहिलींच १२ पानें उपलब्ध नाहींत. परंतु ता. २६ फेब्रुवारी १८४९ रोजच्या ज्ञानप्रकाशाचें, म्हणजे पहिल्या वर्षाच्या तिसऱ्या अंकाच्या मुखपृष्ठाचें फोटो ब्लॉकचें चित्र सोबत आम्हीं दिलें आहे, त्यावरून त्याच्या दर्शनी स्वरूपाची थोडीशी कल्पना येईल. हा अंक अवघ्या आठ पानाचा आहे. व एकेका पानाची लांबी सुमारें दहा इंच व रुंदी सुमारें साडेसात इंच आहे. अशा या वर्तमानपत्राची वार्षिक वर्गणी दहा रुपये व दरमहिन्याची वर्गणी एक रुपया होती ! ( २ ) दुसरें साधन विलायतच्या ' लंडन मॅगेझिनचें ' सन १७६८ सालाचें बांधीव पुस्तक हें होय. सन १९३० सालापूर्वीं म्हणजे ८१ वर्षांचा काळ वजा घातला असतां जसें १८४९ हें साल येतें, तसेंच कर्मधर्मसंयोगानें १८४९ च्या पूर्वीं ८१ वर्षांचा काळ वजा घातला असतां १७६८ हें साल येतें. म्हणजे ८० वर्षांच्या दोन टप्प्यांनीं मागें जातां जातां काय दिसतें ? आजच्या केसरी, ज्ञानप्रकाश किंवा यांसारखीं अन्य देशी मराठी वर्तमानपत्रें अथवा आजच्या ' हिंदू ' सारखीं देशी इंग्रजी वर्तमानपत्रें; तसेंच ' टाइम्स ऑफ इंडिया ', ' स्टेटस्मन् ' यांसारखीं आजचीं ' अँग्लो इंडियन ' वर्तमानपत्रें व ' लंडन टाइम्स ', ' डेली मेल ' यांसारखीं विलायती पत्रें घेऊन त्याच्याशीं १८४९ च्या ज्ञानप्रकाश व १७६८ चें ' लंडन मॅगेझिन ' यांची तुलना केली असतां त्यांचीं स्वरूपें, किती वेगवेगळीं आहेत हें पाहून मनाला पुष्कळ बोध होतो. तो हा कीं, छापखाने वर्तमानपत्रें यांच्या दृष्टीनें पाहतां आम्ही विलायतच्या लोकांपेक्षां निदान एक शतक तरी मागें आहोंत !

असो. प्रथम १८४९ च्या ज्ञानप्रकाशाची कांहीं कल्पना यावी म्हणून त्यांचें दर्शनी चित्र सोबत दिलेंच आहे. पण आंतील मजकुराचे कांहीं नमुने देतों. या पत्राचें त्या वेळचें महत्त्व लक्षांत येण्याकरितां ज्ञानप्रकाशाच्या दुसऱ्या म्हणजे १९ फेब्रुवारी १८४९ च्या अंकांत आढळलेला खालील मजकूर कोणतीहि चूक दुरुस्त न करतां दिला आहे :—

" लेब्ररीची वार्षिक सभा भरली त्यात मेहेरबान बोनसाहेबच व मिस्तर रीडिससाहेब व न्यूटनसाहेब व टरकीनसाहेब वगैरे लोक व पुरंधरे व आबासाहेब ढमढेरे प्रमुख ग्रहस्त जमले होते, त्या समई पहिले नंबरचे वर्तमानपत्र सदर्हु साहेब लोक याणी लोकास त्याचा लाभ समजाउन घेत जावें म्हणून शिफार केली. त्याजवरून सरकारी चाकर व ग्रहस्त व सरदार व वकील लोक यांनीं घेण्याचें कबूल करून सह्या घातल्या आज आमच्या वर्तमानपत्र विकत घेणारे यादीवर सह्या पनास ५० आहेत व आणखी ५० मिळतील अशी उमेद आहे म्हणजे या वर्तमानपत्राचा कारखाना नीट चालेल आम्ही मेहेरबान ब्रोन साहेब प्रशीदनूर याचे फार उपकारी आहो कारण कीं सरदार लोक वगैरे याणी समजूत दिल्यावरून सह्या केल्या असे त्या साहेबांनीं या देशच लोकांचे ही यास्तव केलें ही गोष्ट त्याचे स्मरण फार दिवस या लोकामध्ये राह्याजोगे आहे. आम्हास आता खातरी वाटते. कीं, सरदार व सरकारी कामगार हे या वर्तमानपत्रास उछावाने आश्र देतील."

## वर्तमानपत्रांचा उपयोग

ज्ञानप्रकाशकर्ते यांस—विनंती विशेष तुम्ही पत्र काढतां परंतु त्याचा उपयोग बहुतास अजून कळत नाहीं. जे मोटे मोटे म्हणवितात व आपले ठिकाणीं गर्व करून आहेत त्यांस देखील असें वाटतें हा रिकाम उद्योग आहे. परंतु तुमच्यावाटचे मीच बोलतो. बातमीपत्राचे उपयोग फार आहेत. आपले लोकामध्यें तर कोणास बातमी मुळीच कळत नाही. ज्यास त्यास आपला आपला विचार दिसतो ज्याची त्याची नजर आपले घरापुरती असते पुढे काही कळत नाही. याजमुळे हे लोक पुढे सरकत नाहीत. मजुरी करणे हे काही फारसे शहाणपण नाहीं शहाणपण म्हणजे कोठे काय आहे हें पाहणें सर्व देशावर व जगावर नजर ठेवणे माहितगारी करणें यांचें नांव शहापण याज-

करतां आम्ही या लोकाची प्रार्थना करतो की तुम्ही दिवस सुस्ती न राहिलेत त्याची फळे ही भोगता परंतु अजून तरी तुमची नजर दूरवर जाऊं द्या. विद्या करा वर्तमानपत्रादिक वाचीत जा म्हणजे तुम्हांस बहुतकरून माहिती होईल जे न समजेल ते पुसा आणि खातरी करा वाद विवाद करीत जा. म्हणजे तुमची बुद्धी वाढेल विद्येचे शत्रुत्व कराल व कुबुद्धिचा आश्रय कराल तर फजीत पावाल जवळ तुमच्या दोन पैसे असले म्हणून सर्व मुलखात आहेत असे नाही. आपलेसारखा दुसऱ्याचा विचार करावा. हे विनंती.
ता. ५ मार्च १८४९

एक विद्यावृद्धेच्छू

## सरकारवर टीका करण्याचा अधिकार

" आलीकडे कांहीं गृहस्थानी आम्हास असे सुचविले की, आमचे नांव पत्रात दाखल होऊ नये. असे कितीएक उद्गार आमचे कानी आले. त्यास महाराज आपण असें समजावे की कमांडर चीफ व गव्हर्नर जनरल याचे आजचे काळी नानासाहेब भाऊसाहेबासारखे पराक्रम त्यांचीहि नावे कारण परत्वे निघतात व त्यांचे वर्तुणुकेचा विचार होतो कारण कीं जो सरकारची चाकरी करितो त्यांचें वर्तुणुकेविषयीं छापणारें यानीं जें संभवेल तें लिहिण्यास अधिकार आहे कारण कीं जो सरकारचा चाकर तो लोकांचा चाकर आणि छापणारा लोकांचे डोळे आहेत आणि दुसरे असे आहे की बहुधा आधारावाचून आम्ही लिहीत नाही. त्यास आमचे पत्र वाचणारांपैकीं कोणाचे नाव बाहेरचे पत्रात पाहाण्यात आले ते आम्ही जर तुम्हांस कळवावे तर मग छापावे कशास व तुमची चाकरी कशास करावी जे जे कोणी तुम्हास म्हणतील ते आम्ही तुमचे कानावर घालू तुमचे उत्तर असेल तें आम्ही छापु म्हणजे त्याचे निवारण जाहले. छापखाने सुधारणेचे द्वार आहे."

ता. १९ मार्च १८४९

## INDIANISATION

काळे पलटणीतील साहेबलोक इतर कामावर नेमले जातात याजमुळे पलटणीत अंमलदार कमी होतात असा बोभाट सरकारात गेल्यावरून असा

ठराव जाहला कीं, हल्ली पोस्टमास्तर जे आहेत ते पलटणीत पाठवून तेथे काळे लोक नेमावे. सबब दरएक पोस्ट ऑफिसांत हेडक्लार्क पोस्टमास्तर नेमले.

आम्हास वाटते कीं, आशा जागा नेटीव लोकास देतील तर बरे होईल व जसे पोस्टमास्तर तसेच कितीएक पलटणींतील साहेबलोक असि० मास्तर नेमले व त्याच्या जागा अन्कविनांढेल म्हणजे विलायतची सनद नाहीं आशा आहेत त्या जागा काळे लोकास दिल्या असता चांगले आहे शास्त्रात सरकारी कामगाराचे गुण कोणते असावे ते असे लिहिले आहेत. ”

व्यवहारान्नृपः पश्येत् विद्वद्भिर्ब्राह्मणैः सह॥ धर्मशास्त्रानुसारेण क्रोध लोभ विवर्जितः १ श्रुताध्ययनसंपन्नाधर्मज्ञः सत्यवादिनः॥ राज्ञासभासदः कार्या-रिपौमित्रेच ये समः २ या प्रकारचे असावे.

## संस्थानिकावर टीका

“ संपूर्ण जगात पाहिले तरी राजे हे बहुधा मूर्खच असतात तेणें करून राजद्वारी अनाचारादि अनर्थ फार असतात परंतु सर्व जगांत राज्याचे मूर्खपणाविषयीं प्रमुख देश हिंदुस्थान आहे तेथें बहुधा राजा हा शब्द मूर्खवाचक झाला आहे. राजास गरीब लोकाइतकी जरी अक्कल असती तरी राज्ये नीट चालली असतीं परंतु जेथें पाहावें तेथें राजे मूर्ख-शिरोमणी असतात मग राज्याची व्यवस्था कशास पुसावी. अस्तु. असें आहे खरें, परंतु अलीकडे होळकरांचा मुलगा गादीवर आहे त्यांस शिक्षक उमेरसिंग ठेवला आहे तो गुरुही योग्य आणि तदनुसार होळकर यांस विद्याभ्यास चांगला झाला आहे. जर आमचे स्वदेशीच राजे असें कांहीं शाहणे झाले आणि त्यांस क्रोठें काय आहे हें दिसूं लागलें तर फार चांगलें आहे त्यांचें हातून व कांहीं या देशचें लोकांचें कल्याण होईल तर होईल, नाहीं तर अक्षरशत्रूपासून काय होणार ? आणि आजपर्यंत काय झालें हें दिसतच आहे. कारभाऱ्यानें खरें भाषण केलें म्हणजे यजमान मूर्ख होत नाहीं. याचकरितां कारभारी स्पष्टवक्ता असावा. बहुधा कारभारी मुखरंजक भाषण करणारे फार. ते असे कीं, रेडा गाभणा आहे कीं काय ? असा प्रश्न यजमानांनीं केला म्हणजे त्याजवर उत्तर देतात कीं, महाराज

रेडा ५, ५ शेर दूध देतो असें आर्जवी उत्तर करितात. परंतु कोणी असे म्हणत नाहीं कीं हे मूर्खा रेडा कधीं गाभणा होत असतो काय ?

ता. १६ एप्रिल १८४९

## पेनसिन ( पेनशिन )

सरकारांतून चाकरास पेनसिन व्हावयाचें मान हलकें आहे. तथापि सिविल खात्यात कांहीं तरी देतात. परंतु जे विद्याशिखविण्याचे पंतोजी वगैरे आहेत त्यास पेनसिन कितीहि चाकरी केली किंवा कितीहि योग्यता असली तरी देत नाहीं, हें फार आश्चर्य आहे. या सरकारची चाल अशी आहे कीं, जेथें जाईल तेथें हत्ती जाईल. नाहीं तेथें सुई जाणार नाहीं. एकादे वेळेस मोठा उदारपणा करतात, दुसरे वेळेस पराकाष्ठेचा लोभाविष्टपणा करतात. विद्येचे खात्यांतील लोकांस प्रथम पगार थोडे, आणि वृधापकाळी पेनसिने नाहींत. याजमुळें कितेकास आधार नाहींसा होतो. किंवा शक्ती नसली तरी बळेच चाकरी करावी लागते. आम्हास वाटतें कीं, विद्येचे खात्यांतील लोकांचा दावा जबरदस्त आहे. त्यांस पेनसिनें अवश्य असावी व येविशीं सरकारानें कद्रुपणा करूं नये. कारण कीं, हे लोक फार उपयोगी व विद्या शिखविणें हा सरकारचा मोठा धर्म आहे. लढाई जाहली म्हणजे लाखो रुपये खर्च होतात. आणि फळ कांहीं विशेष होत नाहीं. दुसरे मुल्ख मिळतात. परंतु उपयोग काय ? जे मिळाले आहेत, त्यांतील लोकांचें कल्याण करावयाचें टाकून आणखी मुल्ख घेऊन कर्तव्य काय ? याजकरतां विद्येचे कामांत सरकारनें उदारपणा करावा, अमेरिकेंत इंग्लंडांत पाहा किती खर्च विद्ये-करतां देत आहे ? कितीयेक मोटाले विद्वान समुद्रासारखे बहुत त्या देशांत आहेत. तशीच विद्या या देशांत जाहली पाहिजे. कर्नाटकांतील जाहागीर-दारास पुसा कीं इंग्रज हिंदुस्थानात आहेत ? तर तो म्हणेल कीं बेळगांवास आहेत. आणखी कोठें आहेत, कोणास ठाऊक ? याप्रमाणें सर्वत्र गोष्टींची गैर माहिती आहे. यास्तव छापी कागदावर जसा धारा आहे. त्यासारखा धारा या कामाकडे अजि जाऊं द्यावा.

ता. २६ एप्रिल १८४९

## तक्रारी – रस्त्यानें जोरानें तट्टू हांकणें

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

विशेष. मी परवाचे दिवशीं रस्त्यांत जात असतांना एक गोष्ट पाहिली. ती आपणांस कळविण्यासारखी आहे म्हणून लिहितो.

एक गृहस्थ घोड्यावर बसून येत होता. त्याचें घोडें लहान तट्टूसारखें होतें. आणि पुढें पोरगा धावत होता आणि रस्ता पैस होता. तरी मोठ्यानें हाका मारून पैस, बाजूला व्हा म्हणून दूरदूरचे लोक होते त्यांत घाबरें करीत असे.

ज्यास घोडें इत्यादि वाहान अनुकूल आहे त्यांनीं रस्त्यावरचें माणसांस सावध करावें ही गोष्ट चांगली. परंतु सांप्रत लोकांस चोपदार, भालदार नाहींत. याजकरितां त्याचें फळ तें वीतभर घोड्यावर आणि वीतभर पोरावर काढतात, आणि विनाकारण रस्त्यावरचे लोकांस उपद्रव करितात. रस्त्यांत माणसें वाटेवर नसली तर ओरडण्याची काय गरज आहे? परंतु पुढें माणूस धाववून गलबा करावा हें मोठें महत्त्व वाटतें. म्हणून लोक असें करतात असें वाटतें. ही विनंति.

ता. ७ मे १८४९

—पादचारी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ९७३७०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# बंगाल्यांतील वर्तमानपत्रें

इ. स. १७७८ च्या पूर्वी हिंदुस्थानांत मुद्रणयंत्र आलें नव्हतें. हिंदुस्थानांतला पहिला छापखाना कलकत्त्याजवळील श्रीरामपूर येथे केरे ( Carey ) या पाद्रीसाहेबानें स्थापिला. त्याचा उद्देश अर्थातच 'पवित्र ज्ञानाचा' प्रसार करणें हाच होता. बंगाली बायबल हेंच बहुधा हिंदुस्थानांतलें देशी भाषेंत छापलेलें पहिलें पुस्तक असावें.

हिकीचें 'बेंगाल गॅझेट' हेंच हिंदुस्थानांतलें पहिलें छापील वृत्तपत्र. हें इंग्रजींत २९ जानेवारी १७८० या दिवशीं निघालें. पहिला गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्ज याची पत्नी व इतर अधिकारी यांचेसंबंधाने कांहीं अपमानकारक मजकूर छापल्यामुळें दोन वर्षें पुरीं होतात तोंच हें पत्र बंद करावें लागलें. हिकीचें 'Bengal Gazette' नंतर 'India Gazette', 'Calcutta Gazette' व आणखी किती तरी इंग्रजी वर्तमानपत्रें बाहेर पडलीं. त्या वेळच्या वर्तमानपत्रांचें बाह्यस्वरूप जसें ओबडधोबड, त्यांची भाषासरणी जशी असभ्य, तसेच त्यांचे इतर व्यवहारहि जरा दांडगेपणाचे असत. लॉर्ड वेलस्लीनें थोडे नियम करून वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य संकुचित केलें. ( १३ मे १७९९ ) लॉर्ड मिंटो हाहि वर्तमानपत्रकर्त्यांचें बाबतींत कमी निष्ठुर नव्हता. उलट त्यानें संपादकवर्गावर अधिकच कडक बंधनें घालण्याचा ऑक्टोबर १८१३ त प्रयत्न केला.

**'बंगाला गॅझेट'—बंगाली भाषेंत** प्रथम कोणतें वर्तमानपत्र निघालें या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें एकमत नाहीं. लाँग नांवाचा पाद्री १८५५ या सालीं लिहितो कीं, "२३ मे १८१८ या दिवशीं श्रीरामपूरच्या मिशनरी लोकांनीं 'समाचारदर्पण' या नांवाचें बंगाली भाषेंतलें पहिलें वृत्तपत्र काढलें." पण पुढें पांचच वर्षांनीं हें मत बदलून तो म्हणतो कीं, १८१६ सालीं गंगाधर भट्टाचार्य यानें संपादित केलेलें 'बांगाला गॅझेट' हेंच पहिलें बंगाली वर्तमानपत्र होय. मुंबई समाचार त्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे १८२२ मध्यें निघालें असें वाटतें.

**समाचारदर्पण**—तत्कालीन इंग्रजी वर्तमानपत्रांवर सरकारचा राग असूनहि १८१८ च्या एप्रिल महिन्यांत श्रीरामपूरच्या मिशनकडून ‘ दिग्दर्शन ’ नांवाचें मासिक प्रसिद्ध झालें. लगेच एक महिन्याचे आंत ‘ मिशन समाचार-दर्पण ’ नांवाचें बंगाली साप्ताहिक बाहेर पडलें. समाचारदर्पण पत्र अनेक वर्षें चाललें. या पत्राचें हिंदुधर्मविषयक लेख सोडून दिले तरी एकंदरींत त्याची कामगिरी लोकोपयोगी झाली यांत शंका नाहीं. या पत्राचा सरकारी अधिकाऱ्यांवर चांगला वचक असे. निरनिराळ्या प्रश्नांवर लोकांकडून आलेला पत्रव्यवहार त्यांत छापीत असत. म्हणजे वर्तमानपत्रांचा सार्वजनिक कामीं उपयोग करून घेण्याचें शिक्षण या पत्रानें देण्यास सुरुवात केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इ. स. १८४१ मध्यें २५ डिसेंबरला तें बंद पडलें. पण १८५१ च्या ३ मे रोजीं तें पुनः उदित झाल्याचा उल्लेख आहे.

राम मोहन रॉय यांनीं कंपनी सरकारची सेवा सोडली व कलकत्त्याला येऊन देशसेवा करण्याचें ठरविलें. ‘ ज्ञानाच्या प्रकाशानें स्वदेशाला उज्ज्वल करणें ’ हें त्यांचें व्रत होतें. देशबांधवांच्या शिक्षणासाठीं त्यांनीं पुष्कळ विचार व प्रयत्न केले होते. त्यांनीं ओळखलें कीं, वर्तमानपत्रें ही लोकांना शिक्षण देण्याचे कामीं चांगलीं साधनें आहेत. वेळ आलेली होती. तेव्हां देशी वर्तमानपत्रांची स्थापना व उन्नति इकडे त्यांनीं आपलें मन घातलें. ‘ **संवाद कौमुदी** ’ नांवाचें बंगाली साप्ताहिक पत्र ४ एप्रिल १८२१ ला प्रथम प्रसिद्ध झालें. ह्या पत्राची मालकी व व्यवस्था सर्वस्वीं हिंदी लोकांच्या हातीं होती. याची वर्गणी मासिक दोन रुपये होती.

संवादकौमुदी हें पत्र काढून राम मोहन रॉयांनीं एका नव्याच प्रघातास सुरुवात केली. आतांपर्यंत लोकांना बंगाली भाषा ही फक्त बोलण्याची भाषा असें वाटे. हा कालपर्यंत बंगालींत जें लिखाण झालें तें बहुधा कवितारूप होतें. त्यांत संस्कृत शब्दांचा भरणा खूप असावयाचा. यामुळें गद्यलेखनाला बंगाली भाषा अयोग्य असें लोक समजत. ही गोष्ट राम मोहनांच्या पहिल्या पहिल्या लेखांवरून पटतेंहि. त्यांचें हें गद्यलेखन इतकें बोजड वाटतें कीं, त्याचे मानानें त्यांनीं लिहिलेले इंग्रजी व संस्कृत लेख फारच सफाईदार दिसतात ! लेखन अधिकाधिक होऊं लागलें तसतसा बंगाली भाषेचा बोजड-पणा जाऊन इतरहि दोष कमी होऊं लागले.

संवादकौमुदी हें पत्र १८४० पर्यंत म्हणजे २१ वर्षें टिकलें. मिशनरी लोकांना उत्तर देण्यासाठीं म्हणून प्रथम या पत्राचा जन्म झाला खरा. पण राममोहन यांचीं मतें सुधारकी थाटाचीं असल्यामुळें पुराणमतवादी लोकांचें ह्यांचेबरोबर जमेना. तेव्हां त्यांनीं ब्रह्मसमाज स्थापन केला. व 'संवादकौमुदी' त्यांचें मुखपत्र बनलें. ब्रह्मसमाजाच्या कार्याला तोड म्हणून पुराणमतवादी लोकांची धर्मसभा जन्म पावली व तिच्या मुखपत्राचा मान 'समाचारचंद्रिके' ला मिळाला.

वृत्तपत्रांच्या स्वतंत्रतेचा संकोच व वर्तमानपत्रांची स्वतंत्रता फार दिवस टिकली नाहीं. इंग्रजी पत्रांतून विशेषतः सिल्क बकिंगहॅमचें 'कलकत्ता जर्नल' या पत्रांत आक्षेपार्ह व अनिष्टकारक वाटणारे लेख प्रसिद्ध होऊं लागले. लॉर्ड हेस्टिंग्जनें केलेल्या नियमांचें उल्लंघन होत असलेलें सरकारनें पाहिलें. वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याला आळा घालण्याकरितां नवीन कायदा प्रसृत करण्यासाठीं पुनः वाटाघाट सुरू झाली. १० ऑक्टोबर १८२२ या दिवशीं William Butterworth व Baily यांनीं कलकत्त्याच्या मंत्रिमंडळांपुढें देशी भाषेंतील फारशी व बंगाली वृत्तपत्रांसंबंधाने एक लांबलचक वृत्तांत ( Minute ) मांडला.

सन १८२३ ते १८३५ या कालांत, संवाद, तिमिरनाशक, बंगदूत आणि बंगाला हेरल्ड, शास्त्र प्रकाश, संवाद-प्रभाकर, संवाद-सुधाकर, समाचार-सुधा-राजेंद्र, ज्ञानान्वेषण, नित्यप्रकाश, संवाद-रत्नाकर, अनुवादिका, संवाद-मयूख, संवाद-सारसंग्रह, संवाद-सौदामिनी, सत्यवादी वगैरे नियतकालिकें प्रसिद्ध होऊं लागलीं व बहुधा पुष्कळशीं अल्पायुषींच ठरलीं. त्यांपैकी कांहीं महत्त्वाचीं म्हणजे संवाद-प्रभाकर, सत्यवादी हीं होत.

सन १८३० हें वर्ष बंगाली इतिहासांच्या इतिहासांत फार महत्त्वाचें समजलें पाहिजे. कारण या एकाच वर्षी **संवादसुधारक** आणि **संवाद-प्रभाकर** अशीं दोन बंगाली वृत्तपत्रें चंद्रसूर्याप्रमाणें बंगालवर ज्ञानाचा प्रकाश पाडूं लागलीं. संपादक ईश्वरचंद्र गुप्त यांनीं सरकारला केलेल्या इंग्रजी अर्जांत सही मात्र बंगालींत केली होती. २८ जानेवारी १८३० ला याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. याच्या छापखान्याचें नांव संवाद-प्रभाकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



छापखाना असेंच होतें. तें दर शुक्रवारीं निघे. थोड्याच दिवसांत हें पत्र लोकप्रिय झाल्याचें त्या वेळच्या पत्रांतून उल्लेख आहेत.

सुप्रसिद्ध कादंबरीकार बंकिमचंद्र ईश्वरचंद्र गुप्त याचे हाताखालींच वाढला. प्रथम तो पद्यरचनाच करी. पण गुरूच्या सांगीवरून त्यानें गद्याला हात घातला आणि पुढें याच मार्गानें तो कसा नांवलौकिकाला चढला हें सर्वांना माहीतच आहे. यावरून ईश्वरचंद्र हा मोठा योजक पुरुष असावा हे सिद्ध होतें.

बातम्यांखेरीज प्रभाकरामध्यें धर्म, समाज व साहित्य इत्यादि विषयांवर विचार मांडले जात. मोठमोठाल्या व्यक्ती प्रभाकरामध्यें लिहीत. उदाहरणार्थ, राजा राधाकान्त देव प्रेमचंद्र तर्कवागीश, जयगोपाल तर्कालंकार, प्रसन्नकुमार ठाकूर आणि राजकमल सेन. अक्षयकुमार दत्त यांचेप्रमाणें कविश्रेष्ठ रंगलाल, साहित्यसम्राट् बंकिमचंद्र, नाट्याचार्य दीनबंधु आणि मनमोहन, कांगाल हरिनाथ, सोमप्रकाशचें द्वारकानाथ—प्रभृति प्रभाकराच्या कचेरींत उमेदवार आणि ईश्वरचंद्र गुप्त यांचे शिष्य म्हणून कामें करीत.

१ **सत्यवादी, २ संवादसिंधु आणि ३ संवादपूर्ण चंद्रोदय** (१८३५) पहिले इंग्रजी व बंगाली अशा दोन भाषांत प्रसिद्ध होई. दुसरें फक्त बंगाली असे. सत्यवादी इतर पुण्यवान प्राण्यांप्रमाणें फार अल्पायुषी ठरला. संवादसिंधूलाहि लौकरच ओहोटी लागून पांच वर्षांत तो आटून गेला ! तिसरें पत्र श्रीमान लोकांच्या हौशीमुळें जन्मास आलें. तें पाक्षिक होतें.

१८६८ च्या वेळीं जन्माला आलेल्या पत्रांत **अमृतबाजारपत्रिकेचा** प्रामुख्यानें नामनिर्देश केला पाहिजे; शिवाय बंगालप्रांताबाहेर अख्यातहपणें जर कोणतें इकडील पत्र वाचलें जात असेल तर तें हेंच होय. बाबू मोतीलाल ( वास्तविक मतिलाल ) घोष हें या पत्राचे संपादक म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. पण हिला जन्म देण्याचें कामींहि त्यांचा हात होताच. मूळ कल्पना त्यांचे ज्येष्ठ बंधू महात्मा शिशिरकुमार घोष यांची. हे लहानपणापासूनच सार्वजनिक कार्याचे भोक्ते. त्यांचें लक्ष इकडे वेधलें. त्यांनीं पुष्कळ खटपटी केल्या; बरीच चळवळ केली. पण तिकडे एका कोपऱ्यांत चाललेल्या त्यांच्या कार्याचा इकडे कोणाला पत्ताहि नसे. आणि त्यामुळें त्यांची चळवळ जोर धरीना. आपलें वर्तमानपत्र असल्याशिवाय भागणार नाहीं हें त्यांनीं ताडलें.

पण संन्याशाच्या संसाराला शेंडीपासून सुरुवात अशी स्थिति होती. घरची गरिबी, मुद्रणाचें काम कशाशीं खातात तें माहीत नाहीं. पण त्यांचा निश्चय अढळ होता. शिशिरकुमार ४–६ महिने कलकत्त्याला आले व खिळे जुळविण्याचें काम शिकले. छापण्याच्या कामाचीहि त्यांनीं सर्व माहिती करून घेतली. परत अमृतबाजारला गेले. एक लाकडी प्रेस करविला व थोडासा टाईप बरोबर नेलाच होता. पैशाच्या टंचाईमुळें कंपॉझिटर, प्रिंटर व संपादक अशीं तीनहि कामें शिशिरबाबू जातीनें करीत. प्रथम साप्ताहिक म्हणूनच पत्रिका सुरू झाली. पहिले ४–५ महिने काम सुरळीत चाललें. वर्गणीदार ५०० पर्यंत वाढले. लोकांचीं गाऱ्हाणीं चांगल्या तऱ्हेनें उजेडांत येऊं लागलीं. सरकारला हें इष्ट नव्हतें. तेव्हां त्यांना त्रास देण्यास सुरुवात झाली. त्यांच्यावर एक अब्रूनुकसानीचा खटला करण्यांत आला. तो ८ महिने रेंगाळला. पण निकाल त्यांना अनुकूल लागला. थोड्याच दिवसांत त्यांचेवर फौजदारी खटला उभारण्यांत आला. त्यांतूनहि त्यांची सुटका झाली. पण आर्थिक नुकसान फार झालें. शिवाय मलेरिया तापानें शिशिरबाबू वरचेवर आजारी पडूं लागले म्हणून त्यांनीं १८७१ मध्यें कलकत्त्याला बिऱ्हाड हलविलें. पैशाची पंचाईत होतीच. पण एका मित्राजवळचे १०० रु. काढून त्यांनीं एक हातप्रेस घेतला. कलकत्त्याला पहिला अंक १८७२ च्या फेब्रुवारींत बाहेर पडला. कांहीं दिवसांनीं मात्र पत्रिकेचा चांगला जम बसला. तिची भाषासरणी लोकांना पसंत पडली. पत्रिकेचें लिहिणें असें चतुरपणाचें असें कीं, टीका तर सरकारला झोंबावी पण कायद्याच्या कचाट्यांत सांपडूंच नये. ही करामत आजवरहि संपादकांनीं चालू ठेवली आहे. या नाहीं त्या कारणानें इतर सर्व वर्तमानपत्रें सरकारच्या रोषाला बळी पडलेलीं आहेत. पण पत्रिकेला सरकार स्पर्श करूं शकलें नाहीं. पत्रिकेचें लिहिणें निर्भीड, पण समतोल गंभीर आणि विनोदपूर्ण असतें.

कलकत्त्याला आल्यावर Hindu Patriot या पत्राशीं नेहमीं पत्रिकेचा सामना झडे. हिंदू पेट्रिअट हें British Indian Association या संस्थेतर्फे निघत असे. त्याचे संपादक क्रिस्तोदास ( कृष्णदास ) पाल होते. दोघांचीं मतें अगदीं उलट्या दिशांना धावणारीं. पत्रिकेंत सरकारी मुख्य अधिकारी व दुय्यम अधिकारी यांचेवर व्यंग्य चित्रेंहि या वेळीं येत. ज्यूरीचा अधिकार

कॉर्पोरेशनमध्यें लोकांचा मतदानाचा हक्क, नवीन कर इत्यादि बाबतींत पत्रिकेची कामगिरी वाखाणण्यासारखी झाली. आणि तींतच तिच्या लोकप्रियतेचें बीज होतें.

पत्रिका इंग्रजी व बंगाली निघे. सरकारच्या डोळ्यांत पत्रिका खुपत होती. या वेळीं देशी भाषांमध्यें निघणाऱ्या वर्तमानपत्रांचेभोंवतीं गळफांस टाकण्याचा सरकारनें विचार केला. हा कायदा ' व्हर्नाक्युलर प्रेसॲक्ट ' म्हणून प्रसिद्ध आहे. कायदा तर पास झाला व तो अंमलांत आला कीं, पत्रिकेची शंभर वर्षें भरलेलींच होतीं. पण शिशिरकुमार घोष या प्रसंगाला पुरून उरले. एका रात्रींत सर्व परिवर्तन होऊन कायद्याचा अंमल होणार त्या तारखेला सकाळीं लोकांच्या हातांत पत्रिका रोजच्याप्रमाणेंच पडली. पण आज तींत बंगाली अक्षरहि नव्हतें. सर्व पत्रच इंग्रजी झालें व अशा युक्तीनें त्यांनीं आपलें संकट टाळलें. तेव्हांपासून पत्रिका इंग्रजींत निघूं लागली ती कायमची.

बंकिमचंद्र चतर्जी यांचें नामांकित **वंगदर्शन** याच वेळीं अवतीर्ण झालें. मासिकाच्या राज्यांत यामुळें क्रांतिच झाली म्हटलें तरी चालेल. यांचे अगोदर विद्या कल्पद्रुम, विविधार्थसंग्रह, महर्षि देवेंद्रनाथ टागोर यांचें तत्त्वबोधिनी पत्रिका अशीं अनेक मासिकें बंगालींत निघत. आजवर मासिकांमधून तत्त्वज्ञानासारखे रूक्ष विषय यावयाचे असें ठरलेलें. घटपटादि वादाला अनुरूप अशी त्यांची क्लिष्ट भाषा असावयाची. पण वंगदर्शनानें ही स्थिति पार पालटली त्यांत आधुनिक शास्त्रें, नीति, राष्ट्रांचे इतिहास, निरनिराळ्या मनुष्य व प्राणी वंशांची माहिती इत्यादींवर सुंदर व सोप्या भाषेंत लेख येऊं लागले. शिवाय मुळांतच बंकिमचंद्राची भाषा जोरदार होती. पण वंगदर्शनानें याहूनहि निराळेंच काम केलें. आतांपर्यंत कादंबरी म्हणजे इंग्रजीच असावयाची. फार तर तिचें भाषांतर देशी भाषांतून वाचावें एवढेंच लोकांना माहीत. बंगाली भाषेंत स्वतंत्र कादंबरी लिहितां येईल आणि तो एखादा बंगाली लिहील हें कोणास संभवनीयहि वाटत नसे. तेव्हां वंगदर्शनाच्या पहिल्याच अंकांत " विषवृक्षा "चीं कांहीं पानें पाहून लोकांना निराळ्या अर्थानें " चटका " लागला. पहिल्या अंकानें लोक वेडे होऊन गेले. बंकिमचंद्र कलकत्ता विश्वविद्यालयाचे पहिले ग्रॅज्युएट. आंग्ललेखनशैली त्यांनीं पाहिली होती.

तिचा पुरेपूर उपयोग त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून व इतर लेखांतून केला. संस्कृतप्रचुर लालित्यपूर्ण अशी त्यांची भाषा वाचून लोक हुरळून गेले. करमणूक म्हणून मासिकें वाचण्याची गोडी बंकिमबाबूंनीं लोकांना लावली. त्यांच्या अंकाची लोक उत्सुकतेनें वाट पहात. क्रमाक्रमानें त्यांतच दुर्गेनंदिनी, कपालकुंडला याहि नवलकथा आल्यामुळें लोकांना फार कौतुक वाटलें. कांहीं मतभेद झाल्यामुळें वंगदर्शन १८७५ मध्यें बंद पडलें तें पुनः १८७७ मध्यें सुरू झालें. आतां तें त्यांचे बंधु चालवीत. १८८२ सालीं पुनः तें विराम पावलें. पुढें १९१३ मध्यें रवींद्रनाथ ठाकूर यांनीं त्याला पुनरुज्जीवित केलें. पण त्याचाही उपयोग झाला नाहीं.

ब्राह्मोसमाजातर्फे हिंदुसमाज-रक्षणाच्या उद्देशानें **संजीवनी** पत्र काढण्यांत आलें. १८९० मध्यें हितवादीचा उदय झाला. हें पत्र रवींद्रनाथ ठाकूर यांनीं स्थापन केलें. तें फारच लोकप्रिय झालें. याच पत्राचे संपादक होण्याचा मान श्री. देऊसकर या महाराष्ट्रीय गृहस्थांना लाभला होता.

अगदीं अलीकडच्या काळांत आल्यावर “ नायक सुमति व बंगाली ” या त्रयीनें धुमाकूळ माजविलेला दिसून येतो. बंगाली नांवाचाच बंगाली. तो इंग्रजींत निघतो. हा सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं काढलेला सर्वांना माहीत आहेच. आतां तर बंगालीचें संपादकत्वहि मद्रासी इसमाकडे आहे ! फॉरवर्ड, ॲनवर्ड, ॲडव्हान्स, लिबर्टी याविषयीं येथें लिहिण्याचें कारणच नाहीं. साप्ताहिकांत वंगवासी, संजीवनी, हितवादी, वस्तुस्थिति, समय यांची नांवाजण्यासारखी कामगिरी झाली आहे. मासिकांत भारतवर्ष प्रवासी, मानसी मर्मवाणी व भारती यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे. प्रवासीमध्यें निर्भीडपणें प्रचलित प्रश्नावर टीका येते.

हल्लीं खुद्द कलकत्त्यांत सर्व प्रकार मिळून दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें व इतर सुमारें १०० वर पत्रकें आहेत. तीं लोक-शिक्षणाचें, लोकजागृतीचें आणि वाङ्मयसेवेचें कार्य आपापल्यापरीनें करीत आहेत. वाङ्मयाला वाहिलेल्या मंडळींत हल्लीं दोन तट झाले आहेत. लेखनामध्यें भाषा वापरावयाची ती बोलण्याच्या व्यवहारांतील कीं आजवरच्याप्रमाणें तिचें प्रौढ स्वरूप कायम ठेवावयाचें, हा अलीकडे इकडे वादाचा प्रश्न झाला आहे.

रवींन्द्रनाथ ठाकूरआदि लेखकांचें म्हणणें जसें बोलणें तसें लिहिणें हें योग्य; आणि त्यांचें अलीकडचें बहुतेक सर्व लेखन या तऱ्हेचें असतें. दुसरी बाजू श्री. पी. चौधरी यांची. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें लिहिण्याची भाषा ही अगदीं वाचनानुसारिणी राहणें इष्ट नाहीं. रवींद्रबाबूंनीं आपल्या मतप्रसारासाठीं 'सबूजपत्र' नांवाचें मासिक काढलें. त्याला तोंड देण्यासाठीं देशबंधुदास, बिपिनचंद्रपाल, हरप्रसादशास्त्री इत्यादि विद्वानांनीं 'नारायण' नांवाचें मासिक काढलें. या वादाचा निकाल कधीं तरी लागेल का नाहीं याची शंकाच आहे !

बंगालप्रांतीय वृत्तपत्रांच्या इतिहासाचें गाडें येथवर आणून सोडलें. अगदीं आजच्या दिवसांत चालू असलेल्या वर्तमानपत्राविषयीं नामनिर्देशापलीकडे कांहीं लिहिणें इष्ट नाहीं. पण एवढें नमूद करण्यास हरकत नाहीं कीं आजकाल वृत्तपत्रांना जें Fourth Estate म्हणण्यांत येतें त्या पदवीला अनुरूप असें बंगाली वृत्तपत्रांनीं कार्य चालविलें आहे. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें सर्व प्रकारचीं मतें यांतून प्रतिपादन केलेलीं दिसून येतील. पण एकंदरींत धोरण पाहिलें तर तें लोकमतानुवर्ती (Democratic) होत चाललें असल्याचेंच दिसून येईल.

# मद्रासचें पुढारी वर्तमानपत्र

मद्रास इलाख्यांत प्रथमपासून देशी भाषेची आवड व अभ्यास कमी. भाषेच्या दृष्टीनें मद्रास इलाखा हा महाराष्ट्रापेक्षां पुष्कळच अधिक, पण बंगाल्याहूनहि अधिक आंग्लमय किंवा इंग्रजाळलेला होता. यामुळें तिकडे म्हणजे तामीळ नाडूमध्यें पूर्वीं किंवा आजहि देशी भाषांतील वर्तमानपत्रांचें तेज इंग्रजी भाषेंतील वर्तमानपत्रांपुढें पडलें नाहीं. 'स्वदेश मित्रम्' व 'हिंदू' ही दोन्ही पत्रें एकाच हातानें निघालेलीं व प्रथम कांहीं दिवस लिहिलेलीं. परंतु इंग्रजी 'हिंदू' पत्राची सर तामील 'स्वदेशी मित्रमूला' आलेली नाहीं. या दृष्टीनें पाहतां महाराष्ट्र व मद्रास यांचा स्वभाव परस्पर विरुद्ध दिसतो. म्हणजे महाराष्ट्रांत मराठीचा उत्कर्ष व त्या मानाने इंग्रजीचा अनादर, आणि मद्रासेंत इंग्रजीचा उत्कर्ष व त्या मानानें देशी भाषेचा अनादर !

सन १८५०–६० च्या सुमारास मद्रासेस कांहीं देशाभिमानी तरुणांनीं एक संस्था काढली. तिचे पुढारी श्री. लक्ष्मीनरसु चेट्टियार हे होते. तिला 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन' असें म्हणत. तिचें काम पुणें येथील सार्वजनिक सभेसारखें होतें. म्हणजे युक्तिवाद करणारे माहितीनें भरलेले टीका–निबंधात्मक अर्ज सरकारकडे करून, ही संस्था लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घ्यावयाचा प्रयत्न करी. या संस्थेची जागा पुढें मद्रास 'महाजन सभे'नें घेतली. असो. 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन्'चे एक मुखपत्र 'दी क्रेसंट' या नांवाचें इंग्रजी भाषेंत निघे. पण ही संस्था व हें पत्र यांची इतिश्री लवकरच झाली. त्यानंतर राजा सर टी. माधवराव, दिवाणबहादूर रघुनाथराव, रंगानंद मुदलियार वगैरे गृहस्थांनीं 'नेटिव्ह पब्लिक ओपीनियन्' या नांवाचें एक इंग्रजी पत्र काढलें. पण तेंहि फार दिवस चाललें नाहीं. ए. रामचंद्र अय्यर यांनीं 'दी मद्रासी' नांवाचें तसेंच एक इंग्रजी पत्र काढलें त्यांत हें पहिलें सामील होऊन गेलें. सन १८७७ च्या सुमारास सर टी. मुतुस्वामी अय्यर यांची मद्रास हायकोर्टांत न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्याला या पत्रानें कांहीं अंतस्थ कारणामुळें विरोध केला. त्यामुळें

तें लोकांना अप्रिय होऊन जे एकदा ढासळलें तें कायमचें ढासळलें. ए. रामचंद्र अय्यर हेहि पुढें म्हैसुरास जाऊन तेथें हायकोर्टाचे सर न्यायाधीश झाले.

सन १८७८ च्या सुमारास लिटनशाहीनें पुष्कळ खळबळ उडवून सोडली व चांगल्या वर्तमान पत्रांची उणीव सर्वांना भासूं लागली. याच सुमारास कॉलेज सोडून एल्एल्. बी. चा अभ्यास करणारे, किंवा मास्तरकीचा धंदा करणारे, कांहीं तरुण विद्यार्थी मद्रास येथें ट्रिप्लिकेनच्या पेठेंत ' वाङ्मय मंडळ ' नांवाची संस्था काढून, तेथें अनेक प्रकारची चर्चा करीत असत. त्यांत सुब्रह्मण्य अय्यर, टी. रंगाचारियर, पी. रंगाचारियर, केशवराव पंत, एन्. सुबराव व वीरराघव चारियर हे प्रमुख होते. त्यांनीं ' हिंदू ' नांवाचें वर्तमानपत्र काढावयाचें ठरविलें. या कामाला लागणारा पैसा त्यांच्या जवळ नव्हता. पण तरुणपणाची हौस व उमेद भरपूर होती. मात्र वरील सहा तरुणांपैकीं सुब्रह्मण्य अय्यर व वीरराघवाचारियर हे शाळा मास्तरकीच्या धंद्यांत शिरलेले म्हणून त्यांना पगार मिळत असे. लॉ कॉलेजांतील विद्यार्थ्यांना तोहि नव्हता. म्हणून पैशाची जबाबदारी पहिल्या दोघांनींच आपल्या अंगावर घेतली. अशा रीतीनें ता. २० सप्टेंबर १८७८ रोजीं ' हिंदू ' नांवाचें इंग्रजी वर्तमानपत्र सुरू झालें. तें प्रथम साप्ताहिकच होतें. श्रीनिधी छापखान्यांत तें छापलें जाई. पुष्कळ लोकांनीं या तरुणांना " या धंद्याच्या भानगडींत तुम्ही व्यर्थ पडला " असा उपदेश चालविला. यांत फार बूड येईल असेंहि सांगितलें. पूर्वीं बुडालेलें ' नेटिव्ह पब्लिक ओपीनियन ' व ' मद्रासी ' या वर्तमानपत्रांचा दाखलाहि दिला. परंतु त्या सर्वांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सुब्रह्मण्य अय्यर यांच्या मदतीला करुणाकर मेनन, के. सुबराव. व के. नटराजन हे होते. ते सुब्रह्मण्य अय्यर यांच्याहून बरेच लहान. पण त्यांनाहि लिहिण्यावाचण्याची फार हौस. (यापैकीं मि. नटराजन् हे पुढें मुंबईस आले व हल्लीं ते ' इंडियन सोशल रिफॉर्मर ', ' इंडियन् डेली मेल, ' वगैरे पत्रांचे संपादक असून, इंग्रजी लेखनकलेंत फार प्रवीण असल्याचें प्रसिद्धच आहे. ) पण याशिवाय आश्चर्याची गोष्ट ही कीं, या नवीन वर्तमानपत्रांचें कौतुक वाटून एक इंग्रज अधिकारीहि त्याच्या चालकांच्या मदतीला सरसावला. सर्जन मेजर निकलसन् यांनीं

हिंदूचा पहिला अंक पाहाताच ते पत्र कोण चालवितो याची मुद्दाम चौकशी केली, व त्यांना घरीं बोलावून घेऊन अनेक विषयांसंबंधीं धोरण कसें राहावें याविषयीं सल्ला दिला. इतकेंच नव्हे तर मेजर निकलसन् व हिंदू पत्राचे चालक यांच्या दर आठवड्याला नियमानें भेटी होत; व पुढें तर मेजर निकलसन् हें स्वतः हिंदू पत्रांत लेखहि लिहूं लागले. परंतु नेहमीं घडतें त्याप्रमाणें मूळच्या संस्थापकांची जूट राहिली नाहीं. दोघे रंगाचारी हे मुनसफीच्या जागा पत्करून निघून गेले ! मग ते त्यांत लेख कसे लिहिणार ? एन्. सुबराव हें परीक्षा पास होऊन राजमहेंद्री येथें वकिली करण्यास निघून गेले. आणि केशवराव पंत यांनीं मधून मधून लेख लिहिण्याचें काम चालू ठेविलें असलें तरी, वर्तमानपत्राच्या कारभाराची जबाबदारी झेपत नाहीं म्हणून त्यांनीं आपला संबंध रीतसर सोडून दिला. अशा रीतीनें शेवटीं जाग्यावर दोघेच शाळामास्तर राहिले, ते म्हणजे सुब्रह्मण्य अय्यर व वीर राघवाचारियर. यांची जोडी बरेच दिवस टिकली. सुब्रह्मण्य अय्यर हे संपादकीय लेख लिहीत; व वीर राघवाचारियर हे सर्व व्यवस्था पहात. परंतु पत्र वजनदार असले तरी खप बेताचा. जाहिरातीचें उत्पन्न बेताचें. यामुळें पत्राची सांपत्तिक स्थिति हळूहळू खालावत जात होती. पुढें या दोघांचेंहि पटेनासें झालें. सुब्रह्मण्य अय्यर यांना दुर्धर रोग जडला. म्हणून त्यांनीं हिंदूचें संपादकत्व सोडून दिलें. व चरितार्थला कांहीं साधन पाहिजे म्हणून 'स्वदेशी मित्रम्' हे देशी भाषेंतील पत्र हातीं घेतलें. पण अगदीं एकटे राहिल्यावर वीर राघवाचारियर यांच्यातीलहि दोष उघडकीस येऊं लागले. अखेर पत्राला पाऊण लाख रुपये कर्ज झालें, व कांहीं प्रमुख लोकांनीं पांच-पांच हजार रुपये भरून हें पत्र वाचविण्याकरितां एक सिंडिकेट काढण्याचें ठरविलें. पण या सुमारास कै. कस्तूरीरंग अय्यंगार हे पुढें झाले. व त्यांनीं हिंदू पत्र चालविण्याचें आपल्या शिरावर घेतलें. व त्याबरोबर सर्व कर्जहि घेतलें, आणि चमत्कार असा झाला कीं, त्यांच्या हातीं जातांच पत्राची स्थिति एकदम सुधारली. कै. कस्तूरीरंग अय्यंगार हे सव्यसाची होते, म्हणजे ते चांगले लेखक असून शिवाय अंतर्गत व्यवस्थेंतहि ते निष्णात होते. त्यांनीं लौकरच पत्राचा इतका जम बसविला कीं, पत्राचा खप व महत्त्व हीं तर वाढलींच, पण उत्पन्नहि वाढून सालीना हजारों

रुपयांचा नफा उरूं लागला. त्यांनीं सर्व कर्ज तर फेडलेंच; पण छापखाना, इमारत, फौंडरी, चित्रसाहित्य इ० सर्व गोष्टी यथास्थित करून हिंदू पत्राला आज विलायतेंतल्या लंडन टाइम्सची योग्यता जवळजवळ प्राप्त करून दिली आहे. व लंडन टाइम्सप्रमाणें आपलें धोरण ठेविलेलें आहे. म्हणजे देशांतील सर्वांत पुढें गेलेल्या राष्ट्रीय पक्षाशीं सहानुभूति ठेवावयाची, पण सर्वस्वीं एककल्ली कोणचेंहि धोरण स्वीकारावयाचें नाहीं, व भडकून जावयाचें नाहीं.

'हिंदू' व 'केसरी' यांच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत पाहिलें असतां त्या दोहोंत कित्येक बाबतींत साम्य कसें घडत आलें हें सूक्ष्म दृष्टीनें पाहणाराला तेव्हांच कळेल. तें कसेंहि असो. पण १९२८ सालीं हिंदू पत्रांची ज्युबिली झाली, व आज 'केसरी'ची ती होत आहे, हें पाहून हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत या राष्ट्रीय वृत्तीच्या वर्तमानपत्रांची सुवर्ण ज्युबिली करण्याइतकें, म्हणजे अर्ध शतकाचें, आयुष्य लाभून त्यांना स्थैर्यहि आलें आहे हा विचार समाधानकारक असून मनाला खंबिरी आणणाराहि आहे. एखाद्या प्रचंड आवारभर पसरलेल्या कारखान्यांत चौदिशांना रात्रीं पाहारा करण्याकरितां रखवालदार नेमतात, व ते मधून-मधून हुशार, सावध असें म्हणून एकमेकांना जागृत ठेवून धीर देत असतात. हिंदूच्या ज्युबिलीचें वर्तमान ऐकून केसरीला हीच भावना झाली. व आज केसरीची ज्युबिली झाल्याचें वर्तमान ऐकून मद्रासच्या हिंदूलाहि तीच भावना होईल यांत शंका नाहीं.

# वर्तमानपत्रें व देशी-विदेशी भाषा

समुद्रास भरती येऊ लागली म्हणजे ती समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्या व खाड्या, तसेंच जमिनीच्या कोन्या कोपऱ्यांत शिरलेले समुद्राचे भाग, या सर्वांतून एकसारखीच भरत असते. हिंदी जनता हा समुद्र व नवें शिक्षण हा चंद्र हें रूपक केलें असतां असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील ज्या प्रांतांतून हें नवें शिक्षण मिळण्याला सुरुवात झाली होती त्यांतच इतरांच्यापेक्षां आधीं राष्ट्रीय भावनेची भरती भरत गेली. आणि मुंबई, मद्रास, बंगाल या तीन प्रांतांत नवीन शिक्षणाचा उदय सुमारें एकाच वेळीं झाला. असल्यामुळें, त्यांत राष्ट्रीय भावनेच्या वर्तमानपत्रांचा उदयहि जवळ जवळ एकाच वेळीं झाला. कलकत्त्याचा ' बंगाली ', मद्रासचा ' हिंदू ' व पुण्याचा ' केसरी ' हीं नांवें घेण्यासारखीं, म्हणजे निश्चित राष्ट्रीय वृत्तीचीं वर्तमानपत्रें, फार थोड्या वर्षांच्या फरकानें सुरू झालीं किंवा नामांकित संपादकांच्या हातीं गेलीं.

केसरी १८८१ सालांत सुरू झाला. तत्पूर्वीं त्याचें काम मुंबईचें ' इंदुप्रकाश ' हें वर्तमानपत्र चांगल्या रीतीनें करीत होतें. पण तें पत्र अर्धें इंग्रजी व अर्धें मराठी असें होतें. असलें पत्र दोन भाषांत निघणें हें लेखकांच्या हौसेच्या दृष्टीनें सोयीचें वाटलें तरी तें वाचकांच्या गैरसोयीचेंच असतें. इसापनीतींतील दोन बायकांच्या दादल्यासारखी त्यांची गोष्ट होते. तरुण बायकोनें नवऱ्याच्या डोक्यांतले पांढरे केस आवडत नाहींत म्हणून काढून टाकावे, आणि वृद्ध बायकोनें काळे केस आवडत नाहींत म्हणून काढून टाकावें, त्याप्रमाणें ' इंदुप्रकाशाची ' गोष्ट होत असे. निव्वळ मराठी वाचकाला इंग्रजी मजकूर वाचतां येत नाहीं म्हणून ' आपली इतकी जागा गेली ' या हिशेबानें तो नाखूष; आणि पहिल्या पिढीच्या शिकलेल्या लोकांना इंग्रजीचें कौतुक अधिक म्हणून मराठी लेखांकडे ते नाखूष होऊनच पाहात. पुण्याच्या ' ज्ञानप्रकाशा 'चीहि मध्यंतरीं कांहीं दिवस अशीच स्थिति झाली होती. ' सुधारक ' पत्रांतहि प्रथम कांहीं दिवस इंग्रजी व मराठी दोनीहि भाषांत लेख येत. पण ही गोष्ट फायद्याची नाहीं असें पाहून ' ज्ञानप्रकाशा 'नें

पुढें इंग्रजी लेख टाकून दिले; व आतां आर्यभूषण छापखान्याचें किंवा सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचें ' सर्व्हंट ऑफ इंडिया ' नांवाचें सर्वस्वीं इंग्रजी असें स्वतंत्र पत्र निघूं लागलें आहे. दोन भाषांच्या संमिश्र वर्तमानपत्रांची अडचण लक्षांत येऊन, कै. चिपळूणकर, आगरकर, टिळक यांनीं प्रारंभापासूनच ' केसरी ' हें पूर्ण मराठी व ' मराठा ' हें पूर्ण इंग्रजी अशीं दोन स्वतंत्र पत्रें काढण्याचें ठरविलें. दोघांची मालकी व धोरण एकच, पण प्रत्येकाची भाषा मराठी किंवा इंग्रजी म्हणजे एकजिनसी. बंगाल्यांत संमिश्र भाषांच्या वर्तमानपत्रांचा प्रयोग फारसा झाला नसावा असें वाटतें. देशी भाषेंतून लेख–म्हणजे वर्तमानपत्री व ललित वाङ्मयविषयक लेख–लिहिण्याची लज्जत व आवड बंगाली लोकांना पुष्कळ; आणि इंग्रजी ' अमृत बझारपत्रिका ', ' हिंदू पेट्रियट ', ' बंगाली ', ' वंदे मातरम् ' या इंग्रजी वर्तमानपत्रांनीं जशी कीर्ति मिळविली तशीच ' आनंद बझारपत्रिका ' वगैरे बंगाली भाषेंतील पत्रांनींहि मिळविली होती. महाराष्ट्राप्रमाणें बंगाल्यांतहि बंगाली व इंग्रजी अशा एक-जिनसी भाषेंतील वर्तमानपत्रांनीं वेगवेगळ्या रीतीनें आपलें कार्य केलें. एकमेकांच्या पायांत पाय घातले नाहींत. बंगाल्यांत निवळ कित्येक बंगाली भाषेंतील वर्तमानपत्रें खूप लोकप्रिय असून त्यांच्या वर्गणीदारांची संख्या २०-२५ हजारांपर्यंत गेली होती किंवा हल्लीं असेलहि. पण अलीकडे राजकीय चळवळींत सर्व हिंदुस्थान हा एकजीव झाल्या कारणानें, इंग्रजी भाषेंत चाललेल्या बंगाली वर्तमानपत्रांनीं जसें चांगलें नांव कमावलें, तसें निव्वळ बंगाली भाषेंतील पत्रांनीं मिळविलें नाहीं. जमीनदारांच्या मदतीनें चाललेला व युक्तिवा[illegible] असा ख्रिस्तोदास पाल यांचा ' हिंदू पेट्रियट ', त्यानंतरचा विचारांनीं [illegible]स्त पण राष्ट्रीय भावनेच्या तीव्र भाषेचें तीक्ष्ण पाणी दिलेला सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा ' बंगाली ', व त्या मागून ज्वलज्जहाल स्वरूपाचा आणि काव्य व तत्त्वज्ञान यांच्या भाषा-सरणीनें पूर्ण नटलेला अरविंद घोष यांचा ' वंदे मातरम् ' ही बंगाल्यांतील इंग्रजी वर्तमानपत्रांची चढती भांजणी होय. त्यानंतर अलीकडे ' फॉरवर्ड ' वगैरे पत्रें राष्ट्रीय चळवळीला वाहिलेलीं अशीं निघालीं. परंतु त्यांना ' वंदे मातरम् ' पत्राची सर आली नाहीं. बंगाली भाषेंतील वर्तमानपत्रांत राष्ट्रीय भावना होती. पण ' बंगाली '

# वर्तमानपत्रें व देशी-विदेशी भाषा

समुद्रास भरती येऊ लागली म्हणजे ती समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्या व खाड्या, तसेंच जमिनीच्या कोन्या कोपऱ्यांत शिरलेले समुद्राचे भाग, या सर्वांतून एकसारखीच भरत असते. हिंदी जनता हा समुद्र व नवें शिक्षण हा चंद्र हें रूपक केलें असतां असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील ज्या प्रातांतून हें नवें शिक्षण मिळण्याला सुरुवात झाली होती त्यांतच इतरांच्यापेक्षां आधीं राष्ट्रीय भावनेची भरती भरत गेली. आणि मुंबई, मद्रास, बंगाल या तीन प्रांतांत नवीन शिक्षणाचा उदय सुमारें एकाच वेळीं झाला. असल्यामुळें, त्यांत राष्ट्रीय भावनेच्या वर्तमानपत्रांचा उदयहि जवळ जवळ एकाच वेळीं झाला. कलकत्त्याचा ' बंगाली ', मद्रासचा ' हिंदू ' व पुण्याचा ' केसरी ' हीं नांवें घेण्यासारखीं, म्हणजे निश्चित राष्ट्रीय वृत्तीचीं वर्तमानपत्रें, फार थोड्या वर्षांच्या फरकानें सुरू झालीं किंवा नामांकित संपादकांच्या हातीं गेलीं.

केसरी १८८१ सालांत सुरू झाला. तत्पूर्वी त्याचें काम मुंबईचें ' इंदुप्रकाश ' हें वर्तमानपत्र चांगल्या रीतीनें करीत होतें. पण तें पत्र अर्धें इंग्रजी व अर्धें मराठी असें होतें. असलें पत्र दोन भाषांत निघणें हें लेखकांच्या हौसेच्या दृष्टीनें सोयीचें वाटलें तरी तें वाचकांच्या गैरसोयीचेंच असतें. इसापनीतींतील दोन बायकांच्या दादल्यासारखी त्यांची गोष्ट होते. तरुण बायकोनें नवऱ्याच्या डोक्यांतले पांढरे केस आवडत नाहींत म्हणून काढून टाकावे, आणि वृद्ध बायकोनें काळे केस आवडत नाहींत म्हणून काढून टाकावें, त्याप्रमाणें ' इंदुप्रकाशाची ' गोष्ट होत असे. निव्वळ मराठी वाचकाला इंग्रजी मजकूर वाजतां येत नाहीं म्हणून ' आपली इतकी जागा गेली ' या हिशेबानें तो नाखूष; आणि पहिल्या पिढीच्या शिकलेल्या लोकांना इंग्रजीचें कौतुक अधिक म्हणून मराठी लेखांकडे ते नाखूष होऊनच पाहात. पुण्याच्या ' ज्ञानप्रकाशा 'चीहि मध्यंतरीं कांहीं दिवस अशीच स्थिति झाली होती. ' सुधारक ' पत्रांतहि प्रथम कांहीं दिवस इंग्रजी व मराठी दोनीहि भाषांत लेख येत. पण ही गोष्ट फायद्याची नाहीं असें पाहून ' ज्ञानप्रकाशा 'नें

पुढें इंग्रजी लेख टाकून दिले; व आतां आर्यभूषण छापखान्याचें किंवा सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचें 'सर्व्हंट ऑफ इंडिया' नांवाचें सर्वस्वीं इंग्रजी असें स्वतंत्र पत्र निघूं लागलें आहे. दोन भाषांच्या संमिश्र वर्तमानपत्रांची अडचण लक्षांत येऊन, कै. चिपळूणकर, आगरकर, टिळक यांनीं प्रारंभापासूनच 'केसरी' हें पूर्ण मराठी व 'मराठा' हें पूर्ण इंग्रजी अशीं दोन स्वतंत्र पत्रें काढण्याचें ठरविलें. दोघांची मालकी व धोरण एकच, पण प्रत्येकाची भाषा मराठी किंवा इंग्रजी म्हणजे एकजिनसी. बंगाल्यांत संमिश्र भाषांच्या वर्तमानपत्रांचा प्रयोग फारसा झाला नसावा असें वाटतें. देशी भाषेंतून लेख—म्हणजे वर्तमानपत्री व ललित वाङ्मयविषयक लेख—लिहिण्याची लज्जत व आवड बंगाली लोकांना पुष्कळ; आणि इंग्रजी 'अमृत बझारपत्रिका', 'हिंदू पेट्रियट', 'बंगाली', 'वंदे मातरम्' या इंग्रजी वर्तमानपत्रांनीं जशी कीर्ति मिळविली तशीच 'आनंद बझारपत्रिका' वगैरे बंगाली भाषेंतील पत्रांनींहि मिळविली होती. महाराष्ट्राप्रमाणें बंगाल्यांतहि बंगाली व इंग्रजी अशा एक-जिनसी भाषेंतील वर्तमानपत्रांनीं वेगवेगळ्या रीतीनें आपलें कार्य केलें. एकमेकांच्या पायांत पाय घातले नाहींत. बंगाल्यांत निवळ कित्येक बंगाली भाषेंतील वर्तमानपत्रें खूप लोकप्रिय असून त्यांच्या वर्गणीदारांची संख्या २०-२५ हजारांपर्यंत गेली होती किंवा हल्लीं असेलहि. पण अलीकडे राजकीय चळवळींत सर्व हिंदुस्थान हा एकजीव झाल्या कारणानें, इंग्रजी भाषेंत चाललेल्या बंगाली वर्तमानपत्रांनीं जसें चांगलें नांव कमावलें, तसें निव्वळ बंगाली भाषेंतील पत्रांनीं मिळविलें नाहीं. जमीनदारांच्या मदतीनें चाललेला व युक्तिवादशूर असा ख्रिस्तोदास पाल यांचा 'हिंदू पेट्रियट', त्यानंतरचा विचारांनीं नेमस्त पण राष्ट्रीय भावनेच्या तीव्र भाषेचें तीक्ष्ण पाणी दिलेला सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा 'बंगाली', व त्या मागून ज्वलज्जहाल स्वरूपाचा आणि काव्य व तत्त्वज्ञान यांच्या भाषा-सरणीनें पूर्ण नटलेला अरविंद घोष यांचा 'वंदे मातरम्' ही बंगाल्यांतील इंग्रजी वर्तमानपत्रांची चढती भांजणी होय. त्यानंतर अलीकडे 'फॉरवर्ड' वगैरे पत्रें राष्ट्रीय चळवळीला वाहिलेलीं अशीं निघालीं. परंतु त्यांना 'वंदे मातरम्' पत्राची सर आली नाहीं. बंगाली भाषेंतील वर्तमानपत्रांत राष्ट्रीय भावना होती. पण 'बंगाली'

' वंदे मातरम् ' अशा पत्रांत जी सभ्यता व जे उच्च वातावरण आढळून येई तें या देशी भाषेंतील पत्रांतून येत नसे. कदाचित् परक्या भाषेंत लिहूं म्हटलें तरी ग्राम्य लिहितां येत नाहीं हेंहि कारण असेल, पण बंगाली भाषेंतील पत्रांत कुत्सितपणा, कुटाळक्या, व्यक्तिनिंदा, उखाळ्यापाखाळ्या या गोष्टी विशेष असत.

✕ ✕ ✕

# इकडील वर्तमानपत्रें

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील कांहीं महत्त्वाच्या पत्रांचा उल्लेख मागें केलाच आहे. वर्तमानपत्राचें महत्त्व लक्षांत घेतल्यावर त्यांचा व्याप व विस्तार निरनिराळ्या अंगांनीं कसा होतो हें लक्षांत येतें. अलीकडे वेगवेगळ्या धंद्यांसाठीं व विवक्षित समाजाच्या उन्नतीसाठीं अशींहि कांहीं साप्ताहिकें, पाक्षिकें, मासिकें निघालीं आहेत. अशा प्रकारचीं नियतकालिकें म्हणजे सहकारी वृत्त, किर्लोस्कर खबर, उद्यम, दूत, कीर्तन मासिक, रामदास-रामदासी वगैरे. वृत्तपत्रांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, व्यायाम-विषयक, शैक्षणिक असेहि पोटभेद पडतात.

वर्तमानपत्राचें मुख्य कार्य म्हणजे लोकपक्षाची वकिली कुशलतेनें करून समाजाचा उत्कर्ष जेणेंकरून होईल असें शिक्षण आपल्या पत्रद्वारें लोकांस देणें. जिल्हानिहाय प्रसिद्ध होत असलेल्या वर्तमानपत्रांचें कार्य मर्यादित असतें व त्यांना एक प्रकारचें स्थानिक महत्त्वच अधिक प्राप्त होत असतें. महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत या तीन मराठी प्रांतांत जिल्हानिहाय दोन-तीन साप्ताहिकें आतां प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत. या पत्रांत जिल्ह्याचें राजकारण व स्थानिक महत्त्वाच्या बाबींचाच उल्लेख अधिक असतो. अशा साप्ताहिकां-पैकीं महत्त्वाचीं साप्ताहिकें म्हणजे सोलापूरचा कर्मयोगी, धुळ्याचा प्रबोध, जळगांवचा प्रागतिक, पुण्याचा भाला, नाशिकचें स्वातंत्र्य व लोकसत्ता, ठाण्याचा प्रतियोगी, रत्नागिरीचा बलवंत, गोव्याचा हिंदु व कुलाब्याचा कुलाबासमाचार, सावंतवाडीचा वैनतेय, सातारचा प्रकाश, समर्थ व ऐक्य; यवतमाळचें लोकमत, अकोल्याचा प्रजापक्ष, उमरावतीचा उदय व स्वतंत्र हिंदुस्थान इत्यादि. तसेंच विजयी मराठा, दीनमित्र, सुबोध-पत्रिका, टणत्कार, तरुण भारत, वीरशैव केसरी यांचाहि उल्लेख केला पाहिजे. नागपुरास रा. गोपाळराव ओगले यांनीं चालविलेल्या ' महाराष्ट्रा 'चें महत्त्व प्रांतिक तर आहेच आहे, पण देशी भाषांतून चालविलेल्या वर्तमानपत्रांत त्यांचा नंबर फारच वरचा लागेल यांत शंका नाहीं. वऱ्हाड-मध्यप्रांताकडील राष्ट्रीय पक्षाचें तें मुखपत्र होय.

मुंबई–पुण्याकडील साप्ताहिकें म्हटलीं कीं, त्यांचें महत्त्व संपादकीय विचारावरच असतें. मुंबईतील श्रद्धानंद, प्रताप, प्रगति ह्या साप्ताहिकांचें वैशिष्ट्य वेगवेगळें असल्यामुळेंच त्यांचा प्रसार होऊन तीं लोकप्रिय ठरलीं. भाषाशुद्धि, हिंदुसभेच्या कार्याचा प्रचार, शुद्धि–संघटन यांच्यावर श्रद्धानंदाचा भर असे. रा. नवरे यांनीं चालविलेल्या ( प्रेस ऑर्डिनन्समुळें बंद पडलें ) प्रताप पत्राचें वैशिष्ट्य म्हणजे क्रांतिकारकांचे खटले व त्यांचीं चरित्रें देणें व हिंदुसभेचा प्रचार करणें हें होय. ‘ प्रगति ’ पत्राचा हेतु प्रचलित विषयांवर भारदस्त व वरच्या वर्गाच्या सुशिक्षित वाचकवर्गास रुचतील व पटतील अशा विचारांचे लेख प्रसिद्ध करणें हा दिसतो. याशिवाय मौज, विविधवृत्त, सिनेमा-समाचार, वगैरे निरनिराळ्या समाजांत खपणारीं साप्ताहिकें आहेतच.

उदय, बलवंत, कर्मयोगी यांना जिल्ह्यापलीकडे महाराष्ट्रांतहि महत्त्व प्राप्त झालें आहे. सोलापूरच्या कर्मयोगीनें गेल्या मे महिन्यांत सोलापुरास घडलेल्या लष्करी व पोलिसांच्या अत्याचारांची खात्रीलायक माहिती महाराष्ट्राला देण्याचें श्रेय आपल्या पदरीं जोडलें यांत शंका नाहीं. कर्मयोगीचे संपादक रा. रामभाऊ राजवाडे यांनीं धैर्यानें ही हकीकत प्रसिद्ध केली याबद्दल त्यांचेवर लष्करी अंमलदारांचा रोष होऊन त्यांना लष्करी कायद्याखालीं ७ वर्षांची शिक्षाहि झाली ! तसेंच हल्लींच्या सत्याग्रहाचे चळवळींत ‘ उदय ’चे संपादक रा. नारायणराव बामणगांवकर व ‘ बलवंत ’चे संपादक रा. ग. वि. पटवर्धन, ‘ कुलाबा-समाचार ’चे संपादक रामभाऊ मंडलीक, ‘ नौबत ’चे संपादक रा. लालजी पेंडसे, यांनीं प्रत्यक्ष भाग घेऊन देहदंडहि दिला. हिंदुधर्माची कड घेऊन भांडणारें ‘ संग्राम ’ नांवाचें पत्र पुण्यास निघत असे. त्याचे संपादक श्री. ग. म. नलावडे यांनीं हिंदू हितरक्षणार्थ कारागृहवासहि सोसला.

संस्थानांतील नियतकालिकांत सावंतवाडीचा वैनतेय, कोल्हापूरचा विद्याविलास, हैद्राबादचा ( दक्षिण ) नागरिक व निजाम-विजय यांचा निर्देश व्हावयास पाहिजे. सांगलीसहि दोन नवीन साप्ताहिकें अलीकडे सुरू झालीं आहेत. पण संस्थानी प्रजेचें हित पाहणारें व संस्थानच्या प्रगतीकडे लक्ष देणारें पत्र म्हणजे पुण्यास निघणारें “ संस्थानी स्वराज्य ” फक्त संस्थानी विषयाला वाहून घेतलेलें असें हें एकच पत्र.

मराठी दैनिकांचें दालन कांहीं वर्षे अगदीं लहान होतें. मुंबईस कांहीं वर्षे इंदुप्रकाश, राष्ट्रमत, संदेश, लोकमान्य, राष्ट्रसेवक हीं पत्रें चालू होतीं. 'संदेश'चें महत्त्व होमरूल लीगच्या चळवळीचे वेळीं विशेष होतें. असहकारितेच्या वेळीं 'लोकमान्य' पत्राचा जन्म झाला. पण चळवळीची लाट ओसरली व एकाच शहरांत 'नवाकाळ' व 'लोकमान्य' हीं दोन मराठी दैनिकें प्रसिद्ध होऊं लागलीं. 'लोकमान्य' हें कंपनीचे ताब्यांत असल्यामुळें लवकरच बंद करणें भाग पडलें. पण अलीकडे 'नवाकाळ', 'लोकहित' यांशिवाय ज्ञानप्रकाश (सकाळचा व संध्याकाळचा), प्रभात, श्रीलोकमान्य, ताजी बातमी, वगैरे नवीन नवीन दैनिकें सुरू झालीं आहेत. ताजी बातमी वाचण्याची लोकांत उत्पन्न झालेली आवड हीच या दैनिकांची जन्मदात्री समजावी लागेल. पुण्यांतील दैनिकें म्हणजे ज्ञानप्रकाश, लोकसंग्रह, व पुणें-समाचार. 'ज्ञानप्रकाश' हें प्रागतिकांचें मुखपत्र. 'लोकसंग्रह' हें पत्र १९१८ सालीं निघालें. सुमारें तीन वर्षे तें चाललें. त्याचें संपादकत्व पंत पराडकर, ल. ब. भोपटकर, शंकर गणेश लवाटे यांचेकडे कांहीं दिवस होतें. सुमारें चार वर्षांपूर्वीं डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं 'पुणें-समाचार' हें दैनिक सुरू केलें. ज्ञानकोश कचेरींतील मंडळीच हें पत्र चालवीत. पण थोडेच दिवसांत हें पत्र बंद पडलें. जगांतील तात्पुरत्या महत्त्वाच्या व विस्मयपूर्ण घडामोडी, कौतुकास्पद बातम्या व चित्तवृत्ति थरारून जाईल अशीं वर्णनें यांनाच अशा दैनिक वृत्तपत्रांत प्राधान्य दिलें जातें.

पण अलीकडे मुंबईच्या मजूरवर्गाच्या हिताकडे लक्ष देणारींहि कांहीं वृत्तपत्रें निघालीं आहेत. तीं म्हणजे धूमधडाका, मजूर, लालबावटा, क्रांति हीं होत. क्रांति हें पत्र हल्लीं मिरत खटल्यांत सांपडलेले रा. डांगे यांनीं चालविलें होतें. हेच त्या पत्राचे जनक व या पत्रांत जगांतील मजूरवर्गाच्या चळवळी, बोल्शेव्हिझम्, कम्यूनिझम् या विषयांवर अभ्यास करून लिहिलेले लेख येत असत.

याशिवाय अलीकडे सरकारच्या दडपशाहीमुळें व मुद्रणस्वातंत्र्यावर सरकारनें ऑर्डिनन्स काढून चढविलेल्या हल्ल्यामुळें, सत्याग्रह पत्रिका, कॉंग्रेस पत्रिका, कॉंग्रेस बुलेटिन्स यांसारखीं बातम्या पुरविणारीं बुलेटिन्स लोकप्रिय

झालीं आहेत. सरकारनें बुलेटिन्सवरहि गदा आणली व लोकांना बातमी देणेंच कठीण झालें तेव्हां रस्तोरस्तीं भुईपत्रिकाहि निघूं लागल्या! हा एक वृत्तपत्राचा गमतीचा नवीन प्रकार निघाला.

दैनिकांचा व साप्ताहिकांचा प्रांत सोडून दिला तर पाक्षिकें व मासिकें यांत अधिकच विविधता आढळते. सर्वसाधारणपणें मनाचें रंजन करणारें मनोरंजन, मॉडर्न रिव्ह्यूच्या धर्तीवर निघालेलें रत्नाकर, विविधज्ञानविस्तार, यशवंत, पुरुषार्थ, मधुकर, स्फूर्ति, चित्रमय जगत्, लोकशिक्षण हीं मासिकें प्रमुखपणें डोळ्यापुढें दिसतात. याशिवाय व्यायामाची काळजी घेणारें व्यायाम, लहान मुलांना आनंद देणारा 'आनंद' व मुलांचा खेळगडी, महिलांच्या सुखसोयीकडे व स्त्रीशिक्षणाकडे लक्ष देणारीं स्त्री, मनोरमा, गृहलक्ष्मी; सर्व लोकांचा स्नेही असें लोकमित्र हीं मासिकें प्रमुख होत. उद्यम, प्रावीण्य, दूत, किर्लोस्कर खबर हीं विशेषेंकरून व्यापारी विषयाला वाहून घेतलेलीं मासिकें होत. याशिवाय मुमुक्षु, स्वाध्याय, वैदिक कर्मयोग, काव्यरत्नावली, समाजस्वास्थ्य, गोरक्षण, रामदास–रामदासी हीं विवक्षित कार्याकरितां वाहून घेतलेलीं मासिकें आहेत. दैवज्ञ मासिक, तेलगूसमाचार, भंडारीविजय, ब्राह्मणपत्रिका, यंग मुस्लिम (साप्ताहिक) यांसारखीं समाज व ज्ञातिविशिष्ट नियतकालिकेंहि पुष्कळ आहेत.

मुंबई इलाख्यांतील इतर वर्तमानपत्रें पाहिलीं तर सर फेरोझशहा मेथा यांनीं स्थापन केलेला क्रॉनिकल, मरहूम वाच्छा गांधी यांचें सांजवर्तमान, बॉंबेसमाजार, मुंबईचे नवे शेरीफ मर्झबान यांचा जामेजमशेत, फ्री प्रेस जर्नल या मुंबईच्या पत्रांना अग्रेसरत्व द्यावें लागतें. मुंबईसमाचार, गुजराथी समाचार, सांज वर्तमान, जामेजमशेत हीं गुजराथींत निघतात. फ्री प्रेस जर्नल अगदीं अलीकडले म्हणजे ४–६ महिन्यांतलेंच आहे. पण त्या पत्रानें अग्रलेख, स्फुटें न लिहितांहि हल्लींच्या चळवळींत प्रचाराचें कार्य बरेंच केलें आहे. युद्धपूर्वकालांत जर्मनींत कांहीं पत्रें असेंच करीत. छोट्या छोट्या बातम्यांचे छेदक देऊन त्यांतच टीकात्मक मेख असावयाची. तेंच धोरण फ्री प्रेस जर्नलनें ठेवलें आहे. अहमदाबादचीं पत्रेंहि बरींच लोकप्रिय आहेत. त्यांपैकीं प्रजाबंधु, गुजराथी पंच यांखेरीज म. गांधींचीं यंग इंडिया,

गुजराथी व हिंदी नवजीवन हीं विशेष महत्त्वाचीं होत. कर्नाटकांत कन्नडिग, जय कर्नाटक, कर्मवीर, कर्नाटकवैभव, धारवाडवार्ता, राजहंस इत्यादिकांचीं नांवें प्रसिद्ध आहेत.

याप्रसंगानें पूर्वीं चालत असलेल्या पण हल्लीं बंद पडलेल्या केसरीच्या कांहीं व्यवसायबंधूंचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

मोदवृत्त—वाई ; धर्म – वाई ; स्वराज्य – सोलापूर ; विहारी – मुंबई ; हरिकिशोर – यवतमाळ ; देशसेवक – नागपूर ; जगद्धितेच्छु, राष्ट्रहितैषि, काळ व स्वराज्य – पुणें हीं पत्रें बंद झालीं याबद्दल आम्हांला फार वाईट वाटतें.

अखिल हिंदुस्थानांत वर्तमानपत्र हा स्वतःचा धंदा करून किंवा मत-प्रसाराच्या हौसेनें ज्यांनीं आजवर वर्तमानपत्रांत लेख लिहून, आपल्या बुद्धीचा किंवा भावनेचा फायदा राष्ट्राला दिला अशांपैकीं कांहीं प्रमुख लोकांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

( १ ) राजा राममोहन रॉय, ( २ ) हरिश्चंद्र मुखर्जी, ( ३ ) ख्रिस्तोदास पाल, ( ४ ) राजकुमार सर्वाधिकारी, ( ५ ) कृष्णकमल भट्टाचार्य, ( ६ ) शंभुचंद्र मुखर्जी, ( ७ ) शिशिरकुमार घोष, ( ८ ) मोतीलाल घोष, ( ९ ) पादशहा, (१०) नरेंद्रनाथ घोष, (११) सुरेंद्रनाथ बानर्जी, (१२) अरविंद घोष, (१३) शामसुंदर चक्रवर्ती, (१४) रामानंद चतर्जी, (१५) जी. सुब्रह्मण्य अय्यर, (१६) वीर राघवाचारीयर, (१७) शंकरन् नायर, (१८) के. नटराजन् करुणाकर मेनन, (१९) परमेश्वरं पिल्ले, (२०) ए. रंगस्वामी अयंगार. (२१) पट्टाभी सीताराम अय्यर, (२२) राजगोपालाचारी, (२३) जी. ए. नटेसन् , (२४) श्रीनिवासशास्त्री, (२५) श्रीनिवासन्, (२६) गुप्त, (२७) बिशन नारायण धार, (२८) गंगा-प्रसाद वर्मा, (२९) सी. वाय्. चिंतामणी, (३०) सच्चिदानंद सिंह, (३१) सी. रंगा अय्यर, (३२) पं. जगत् नारायण लाल, (३३) कृष्णकांत मालवीय, (३४) गणेश शंकर विद्यार्थी, (३५) पराडकर, (३६) गणेश सखाराम देऊसकर, (३७) दुरवेकर, (३८) सहाणी, (३९) पं. जयरामदास दौलतराम, (४०) डॉ. चोइतराम, (४१) के. के. आठवले, (४२) लाला

लजपतराय, (४३) पंडित (नागपूर), (४४) दादाभाई नौरोजी, (४५) महादेव गोविंद रानडे, (४६) विश्वनाथ नारायण मंडलीक, (४७) जनार्दन सखाराम गाडगीळ, (४८) परमानंद, (४९) मलबारी, (५०) नारायणराव चंदावरकर, (५१) दिनशा वाच्छा, (५२) भाटवडेकर, (५३) दाजी आबाजी खरे, (५४) नारायण विष्णु गोखले, (५५) दामोदर गणेश पाध्ये, (५६) नारायणराव समर्थ, (५७) देसाई, (५८) चिं. ग. भानु, (५९) कृष्णशास्त्री चिपळूणकर, (६०) गोपाळराव गोखले, (६१) सिताराम हरी चिपळूणकर, (६२) अच्युत बलवंत कोल्हटकर, (६३) वीर वामनराव जोशी, (६४) भोपटकर बंधु, (६५) नारायण लक्ष्मण फडके.

# प्रेस ॲक्टाची कामगिरी !

प्रेस ॲक्टाचा जन्म १९१० सालीं झाला. त्या वेळच्या चळवळींत बहुतेक सर्व राष्ट्रीय पत्रांना प्रेस ॲक्टाचा फटका बसला होता. पुढें १९२१ सालीं सरकारनेंच एक कमिटी नेमली होती. तिच्या शिफारसीवरून तो रद्द करण्यांत आला होता. पण गेल्या एप्रिलांतच पुनः ऑर्डिनन्सनें प्रेस ॲक्टाचें मढें वर उकरून काढलें ! व हिंदुस्थानांतील सुमारें २०० पत्रांना त्यांची भूतबाधा लागली. सर्व प्रांतांपेक्षां पंजाब व मुंबई प्रांतांतच या प्रेस ॲक्टाला वर्तमानपत्रें अधिक बळी पडलीं. व सरकारनें जामिनकीच्या रूपानें सुमारें २–२॥ लाख रुपये वसूल केले. प्रांतवार सर्वच पत्रांचीं नांवें देत बसल्यास विस्तार फार होईल. याकरितां प्रत्येक प्रांतांतून किती जामिनकी भरली गेली व किती महत्त्वाचीं पत्रें बंद पडलीं याची माहिती अदमासानें खालीं दिली आहे.

ज्यांनीं प्रेस ॲक्टाखालीं काढलेलीं जामिनकीची नोटीस मानली नाहीं अशीं वृत्तपत्रें म्हणजे मुंबईचे ‘ डेली हिलाल ’, ‘ वर्कर्स विकली ’, महात्मा गांधींचें ‘ नवजीवन ’, ‘ यंग इंडिया ’ मावळणकर यांचें ‘ शक्ति ’ कानपूरचें ‘ वर्तमान ’ हीं होत. यांपैकीं नवजीवन व शक्ति या पत्रांचा छापखानाहि सरकारनें जप्त केला !

वर्तमानपत्रांना स्वतंत्र राष्ट्रांत जें स्थान व महत्त्व असतें तें आपल्या इकडील वृत्तपत्रांना नाहीं हें खरें. तथापि, परकी सरकार वर्तमानपत्रांवर वरंवटा फिरवीत असतां वर्तमानपत्रें वाढत आहेत हें पाहून समाधान मानण्यास थोडीशी जागा आहे. हल्लींच्या चळवळींत बुलेटिन्सना आलेलें महत्त्व लक्षांत घेतां वर्तमानपत्रें स्वतंत्र देशांत काय कार्य करूं शकतात याची कल्पना येते.

| प्रांत | मागितलेली जामिनकीची रक्कम | वृत्तपत्रें बंद झालीं | जामिनकीची रक्कम भरून चालू राहिलीं |
|---|---|---|---|
| मद्रास | २५,०९० रु. | १२ | ३ ( स्वदेशमित्रन्, तामिलनायडू, आंध्र-पत्रिका ) |
| मुंबई | ६०,००० रु. | १५ | ५ (नवाकाळ, केसरी, मराठा, फ्री प्रेस जर्नल, हिंदुस्थान, प्रजामित्र, धि वीक, सिंध न्यूज पेपर. ) |
| यु. पी. | २४,००० रु. | १२ | २ ( शक्ति, प्रताप ) |
| पंजाब | ६०,००० रु. | २० | ४ ( जमीनदार, वंदे मातरम्, वीर भारत, मिलाप ) |
| बर्मा | ९,००० रु. | ५ | ... |
| बिहार–ओरिसा | ५,००० रु. | २ | ... |
| वऱ्हाड–मध्यप्रांत | १,५०० रु. | २ | ... |
| आसाम | ५,५०० रु. | ४ | ... |
| वायव्य प्रांत | ६,००० रु. | ३ | ... |
| दिल्ली | ५५,००० रु. | ४ | ३ ( शुद्धि समाचार, रियासत, हिंदुस्थान टाईम्स ) |

# वर्तमानपत्रांना लागणारा कागद

जगांत हल्लीं वर्तमानपत्रांना उपयोगी असा कागद एकंदर सुमारें ६५ लक्ष टन तयार होतो. त्यांपैकीं निम्याहून अधिक अमेरिका व कॅनडा या देशांत होतो, व त्यांतल्या त्यांत एकट्या कॅनडांत ½ होतो. साधारणपणें निरनिराळ्या देशांत अशा प्रकारचा म्हणजे वर्तमानपत्रोपयोगी कागद किती तयार होतो याचे आंकडे खालीं दिले आहेत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कॅनडा | २३ | लक्ष | टन | बेल्जम | ५० | हजार | टन |
| अमेरिका | १५ | ,, | ,, | ऑस्ट्रिया | ५५ | ,, | ,, |
| इंग्लंड | ७ | ,, | ,, | स्लोव्हेकिया | ४५ | ,, | ,, |
| जर्मनी | ५॥ | ,, | ,, | इटाली | ४२ | ,, | ,, |
| स्वीडन | २। | ,, | ,, | स्पेन | २५ | ,, | ,, |
| न्यू फौंडलंड | २ | ,, | ,, | एस्टोनिया | २१ | ,, | ,, |
| फिनलंड | २ | ,, | ,, | डेन्मार्क | १६ | ,, | ,, |
| नॉर्वे | २ | ,, | ,, | पोलंड | १७ | ,, | ,, |
| फ्रान्स | १। | ,, | ,, | मेक्सिको | १५ | ,, | ,, |
| | | | | लटेव्हिया | ३ | ,, | ,, |

हिंदुस्थानांत वर्तमानपत्रोपयोगी असा कागद मुळींच तयार होत नाहीं. पूर्वीं जुन्नरी, एरंडोली वगैरे प्रकारचा हातकागद तयार होत असे. पण तो इतका कीं, दुकानी हिशेबाच्या लांबलचक वह्या घालण्यालाच तो उपयोगी. त्यावर साधें पत्र लिहिलें तरी तें दुप्पट हंशील खाऊन जावयाचें. अर्थात् हा कागद वर्तमानपत्रांना निरुपयोगी. तसेंच हिंदुस्थानांतील पांच-चार मोठ्या कागदांच्या गिरण्यांत कागद तयार होतो. पण तो चिंध्यांचा. यामुळे तो पुस्तकांच्याच उपयोगी असतो. अर्थात् पांढरा व सफाईदार परंतु किंमतीला महाग. वर्तमानपत्री कागदाच्या निदान दुपटीनें त्याची किंमत असते. म्हणून तो कोणी वापरूं शकत नाहीं. वर्तमानपत्रांना उपयोगी पडणारा कागद मुख्यतः गवतापासून होतो. किंवा बांबू अथवा इतर

लांकडाच्या सालीचा पातळ भुस्सा कुटून त्यापासून तो तयार करतात. पण ती विद्या अद्यापि हिंदुस्थानांत साधलेली नाहीं. पुणें पेपर मिलच्या चालकांनीं मुद्दाम विशिष्ट प्रकारचें गवत लावून पाहिलें, पण जमलें नाहीं. यावरून हें दिसून येईल कीं, वर्तमानपत्राला कागद देशी वापरावा अशी कोणाची इच्छा असली तरी भारी किंमतीमुळें ती सफळ होत नाहीं. देशीच कागद वापरावयाचा म्हटला तर तो किंमतीनें परवडणार नाहीं, व हवा तितका मिळणारहि नाहीं. ज्याचा खप कमी अशा वर्तमानपत्रांनाच देशी कागद वापरणें शक्य असते, व मराठा पत्राला पुण्याच्या पेपर मिलचाच कागद वापरण्यांत येतो. पण केसरीला तो वापरणें शक्य नाहीं. कारण तो हवा तितका हुकमी मिळणार नाहीं, वर्गणी दुप्पट करावी लागेल, व ती वाचकांना परवडणार नाहीं.

[ वृत्तपत्रांना हवा तितका कागद देशांत निर्माण होत नाहीं आणि परदेशांतून आणविण्याला सरकार हुंडणावळीची सबब सांगते ! तात्पर्य, कागदाबाबत परावलंबित्वाची रड आजहि संपली नाहीं. 'दैनिक सकाळ' पत्राच्या ३३ वें वाढदिवसानिमित्त भाषण करितांना डॉ. ना. भि. परुळेकर म्हणाले—"काल आम्ही पंतप्रधानांकडे वृत्तपत्रांना अधिक कागद मिळावा म्हणून शिष्टमंडळ नेले होते. त्यांनी परदेशी हुंडणावळीची अडचण सांगितली. ही अडचण २० वर्षें संपणार नाहीं. वृत्तपत्रांना जर कागद पुरवितां येत नसेल तर ती नामुष्कीची गोष्ट आहे. सध्यापेक्षां आपण मागें गेलों आहोंत. १९३६ सालीं आम्ही 'सकाळ' ८ पानी देत होतों, आतां ६ पानी देतों. आम्हांला जास्त मजकूर देतां येत नाहीं. सरकारनें कागद कमी करून ज्ञान कमी केलें आहे. वृत्तपत्र-व्यवसायाचा हा चाललेला कोंडमारा बरोबर नाहीं. दिवसेंदिवस हा व्यवसाय अवघड होत आहे."

—संपादक ]

☒ ☒ ☒

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७६९ वि: निबंध
क्रमांक ९५७८ नों. दि. ३।४।५५

# दीर्घायुषी वर्तमानपत्रें

दीर्घायुष्य हा शब्द अर्थानें सापेक्ष आहे. म्हणून केसरीला ५०–७५ वर्षें आयुष्य लाभणें हें इकडच्या मानानें बरेंच असलें तरी त्याहीपेक्षां अधिक आयुष्य लाभलेलीं कित्येक वर्तमानपत्रें हिंदुस्थानांत किंबहुना महाराष्ट्रांतहि आहेत. उदाहरणार्थ, ज्ञानोदयाचें वय ८९ वर्षांचें आहे. पुण्याच्या ज्ञानप्रकाशाचें वय हल्लीं ८१ आहे. सातारचा शुभसूचक ७२ वर्षांचा आहे. त्याचप्रमाणें बेळगांव समाचार ६७, कल्पतरु–आनंदवृत्त ( सोलापूर ) ६३, सत्यशोधक ( रत्नागिरी ) ६३, खानदेश वैभव ( धुळें ) ६३, ज्ञानसागर ( कोल्हापूर ) ६१, सुबोधपत्रिका ( मुंबई ) ५८, सुबोधसिंधु ( खांडवा ) ५०, प्रबोधचंद्रिका ( जळगांव ) ५०, इतकीं जुनीं इतर वर्तमानपत्रें महाराष्ट्रांत आहेत. पण विलायतेंत हें आयुष्यमान फारच अधिक आहे. विलायतेंतल्या संस्थांमध्यें टिकाऊपणा विलक्षण प्रकारचा आढळतो. ऑक्सफर्ड-केंब्रिज विद्यापीठांतील कांहीं कॉलेजें सहा-सातशें वर्षांचीं आहेत. बँक ऑफ इंग्लंड १६९४ मध्यें निघाली ती अजून अखंड चालू आहे. त्याचप्रमाणें कित्येक चिकाटीच्या वर्तमानपत्रांत खळ म्हणून कधीं न पडतां तीं आज शेंकडों वर्षें अव्याहत चालू आहेत. या चिवट वर्तमानपत्रांचा पराक्रम खालील यादीवरून कळून येईल. वूरस्टर जर्नल ( मूळ सुरू झाल्याचें वर्ष ) १६९०, स्टॅफर्ड मर्क्यूरी १६९५, न्यूकॅसल कोरंट १७११, ब्रिस्टल टाइम्स व मिरर १७१३, हरफर्ड जर्नल १७१३, नॉरविच जर्नल १७१४, केंब्रिज गॅझेट १७१७, लीडस मर्क्यूरी १७१८, नॉर्थम्टन मर्क्यूरी १७२०, ग्लॉस्टर जर्नल १८२२, विंचेस्टर जर्नल १७२९, चेस्टर कोरंट १७३०, डार्बी मर्क्यूरी १७३२, वेस्टर्न गॅझेट १७३७, बेलफास्ट न्यूज लेटर १७३७, बर्मिंगहॅम गॅझेट १७४१, कॉव्हेनट्री स्टँडर्ड १७४१, बाथ जर्नल १७४२, केंब्रिज क्रॉनिकल १७४४, अबर्डीन जर्नल १७४८, लीस्टर जर्नल १७५३, ऑक्सफर्ड जर्नल १७५३, यॉर्कशायर पोस्ट १७५४, बाथ क्रॉनिकल १७५७, नॉरफक क्रॉनिकल १७६१, फ्रीमन्स जर्नल १७६३, न्यूकॅसल १७६४, एसेक्स क्रॉनिकल १७६४, लिमरिक क्रॉनिकल १७६४, मॉर्निंग पोस्ट

१७७२, डेरी जर्नल १७७२, यॉर्कशायर गॅझेट १७७२, हॅम्पशायर क्रॉनिकल १७७२, कंबरलंड पॅकेट १७७४, आणि लंडन टाइम्स १७८५.

यावरून १४५ पासून २४० वर्षांइतकीं व सतत चालू राहिलेलीं वर्तमानपत्रें इंग्लंडांत आज आहेत हें पाहून कोणाला कौतुक वाटणार नाहीं ? नॉर्थम्टन मर्क्यूरी पत्राचीं १७२० सालापासूनचीं बांधलेलीं सगळी फाईलस् ( बुकें ) जशीच्या तशी आज या वर्तमानपत्राच्या कचेरींत शाबूत आहेत म्हणतात !

विलायतेंतील वरील पत्रांइतकें दीर्घायुष्य आमच्या इकडील पत्रांना लाभलें म्हणण्याला अजून १४०–१५० वर्षें अवकाश आहे. तथापि आज लाभलें इतक्याचाहि आनंद मानणें अनुचित होणार नाहीं.

# केसरी–मराठा यांची उत्पत्ति व वाढ

कै. चिपळूणकर, टिळक यांनीं न्यू इंग्लिश स्कूल स्थापून एक वर्ष होण्याच्या आंतच या संस्थेला दोन शाखा फोडण्याची कल्पना तिच्या चालकांच्या मनांत उत्पन्न झाली. पैकीं एक शाखा सरळ वर फुटणारी व एक बाजूस फुटणारी अशी होती. सरळ फुटणारी शाखा अर्थात् शाळेचें कॉलेज होणें ही होय; व तेढी शाखा म्हणजे छापखाना व वर्तमानपत्रें ही होय. पैकीं पहिली कल्पना नैसर्गिक असली तरी तिला दृश्य स्वरूप येणें हें बऱ्याच अंशीं परावलंबी होतें. विद्यार्थी, शिक्षक, जागा यांपैकीं पुण्यांस कोणत्याच गोष्टीची वाण पडण्याचें कारण नव्हतें. परंतु 'शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं' म्हणतात त्याप्रमाणें, कॉलेज काढणारे व त्यांत शिकणारे दोघेही तयार झाले तरी त्यांना परवानगी देणें हें युनिव्हर्सिटीच्या हातीं होतें. ती पुढें १८८४ सालीं मिळाली. दुसऱ्या कल्पनेच्या बाबतींत मात्र न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण चालकांना स्वतःच्या पायावर हवें तेव्हां उभें राहतां येण्यासारखें होतें. छापखाना किंवा वर्तमानपत्र या दोनहि गोष्टी त्या वेळीं महाराष्ट्रास अपरिचित नव्हत्या. खुद्द पुण्यास ज्ञानप्रकाश, किरण, शिवाजी वगैरे छापखाने असून वरीलपैकींच दोन-तीन नांवांचीं व शिवाय ज्ञानचक्षु वगैरे इतर कांहीं वर्तमानपत्रें चालू होतीं. मुंबईसहि छापखाने वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें सुरूच होतीं. लिहिण्याची संवय व हौस यांच्या दृष्टीनें न्यू स्कूलच्या मंडळींत कमतरता नव्हती.

स्वतः विष्णुशास्त्री हे यापूर्वीं सहा वर्षें 'निबंधमाला' मासिक पुस्तक काढीत असून, उत्कृष्ट वाङ्मयलेखक व मार्मिक टीकाकार या नात्यानें त्यांची कीर्ति कायमची प्रस्थापित होऊन राहिली होती. दुसरे नामजोशी, हे तर हौशी संपादक म्हणून यापूर्वीं प्रसिद्धीस आल्यामुळेंच त्यांना या शाळेच्या संस्थेंत घेण्यांत आलें होतें. नामजोशी यांची हौस इतकी कीं, स्वतः ते आपलें वर्तमानपत्र तर लिहीतच, पण जरूर पडल्यास मजकूर कंपोज करून स्वतः वर्तमानपत्राच्या घड्या घालूनहि तयार करीत. कोणी असेंहि सांगतात कीं, अंक वांटण्यास मनुष्य न मिळाल्यास स्वतःच कित्येक वेळां पहाटें उठून

पुण्यांतील वर्गणीदारांचे घरीं अंक टाकून सकाळीं उघडपणें मित्रमंडळींच्या घरीं जाऊन " का आजचा अंक वाचलात कीं नाहीं ? " असें म्हणण्यापर्यंत त्यांची तयारी होती. पण ही प्रायः अतिशयोक्ति असावी. आगरकरांना लहानपणापासूनच लिहिण्याचा नाद असे. अगदीं लहानपणीं ते कऱ्हाडास असतां तेथील मुन्सफ अमृत श्रीपत नागपूरकर, हे आपले घरीं रविवारच्या सभा भरवीत. त्यांत आगरकरांनीं एक दोन वेळ इतके चांगले निबंध वाचले होते कीं, ते या लहान मुलानें लिहिलेले असणें शक्य नाहीं, ते त्याला दुसऱ्या कोणा तरी प्रौढ विद्वानानें लिहून दिले असले पाहिजेत, अशी त्यांवर श्रोत्यांची टीका झाली म्हणतात. डेक्कन कॉलेजांत असतांना त्यांनीं मराठींत निबंध लिहून बक्षिसेंहि मिळविलीं होतीं. किंबहुना लिहिणें व शिकविणें या दोन व्यवसायांपैकीं लिहिण्याचा व्यवसाय त्यांना अधिक प्रिय होता असें म्हटलें तरी चालेल. पुढें वामनराव आपटे येऊन संस्थेस मिळाले. त्यांना पुस्तकें लिहिण्याची हौस असल्यामुळें निदान छापखान्याच्या कल्पनेला तरी त्यांच्याकडून पूर्ण पाठिंबा मिळण्यासारखा होता. ते विद्वान् असल्या-कारणानें वर्तमानपत्रें निघाल्यास त्यांत लिहिण्याची त्यांचे अंगीं पात्रता अर्थातच होती; आणि केसरी व मराठा सुरू झाल्याबरोबर मराठा पत्रांत लेख लिहिण्यास त्यांनीं सुरुवातहि केली. नाहीं म्हणावयास मांडी मोडून बसून हातांत लेखणी घेऊन लिहिण्याची मनांतून विशेष हौस नाहीं असें काय ते टिळकच. यामुळें छापखाना व वर्तमानपत्रें यांच्या कल्पनेचा उगम मूळ टिळकांच्या मनांत न होतां खरोखर तो नामजोशी व शास्त्रीबोवा यांच्या मनांतच झाला, व टिळकांनीं त्या कल्पनेला मागाहून संमति दिली हीच गोष्ट खरी आहे.

वामनराव आपटे शाळेत येऊन मिळाल्यानंतर दोन-तीन महिन्यांनीं एक दिवस त्यांचे घरीं श्राद्धानिमित्त टिळक-आगरकर वगैरे सर्व मंडळी भोजनास जमली असतां, त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत बराच खल होऊन केसरी व मराठा या नांवाचीं वर्तमानपत्रें जानेवारी १८८१ पासून काढण्याचें मुक्रर झालें. पण हीं दोन पत्रें नेहमीं कोणा दुसऱ्याच्या छापखान्यांत छापून काढणें शक्य नव्हतें. ज्यांचीं वर्तमानपत्रें त्यांचाच छापखाना असणें अधिक इष्ट, असा विचार ठरून ही मंडळी प्रथम छापखाना उभारण्याच्या प्रयत्नास

लागली. छापखाना काढावयाचा म्हणजे भांडवल पाहिजे. पण याहि बाबतींत नामजोशांच्या कल्पनेचा धागाच उपयोगी पडला. तो असा : नामजोशांचें स्वतःचें वर्तमानपत्र ज्या ‘ किरण ’ छापखान्यांत निघत होतें, तो केशव बल्लाळ साठे नांवाच्या एका गृहस्थाकडे गहाण पडला होता. साठे यांनीं, त्यांच्या कबजांत आलेल्या व त्यांना निरुपयोगी अशा, या छापखान्याची सर्व अडगळ शनिवार पेठेंतील आप्पासाहेब मांडे यांच्या शिवाजी छापखान्यांत आणून टाकली होती. ही माहिती असल्यामुळें तेंच सामान विकत घ्यावें असें नामजोशी यांनीं सुचविलें व मंडळींतर्फे साठे यांच्याशीं बोलणें सुरू केलें. साठे यांचें चोवीसशें रुपये कर्ज देण्यास या तरुण मंडळीपैकीं कोणाजवळहि तेव्हां सामर्थ्य नव्हतें. पण उलट साठे हेहि धंदेवाईक छापखानेवाले नसल्यामुळें त्यांना देखील आपणाजवळ गहाण पडलेल्या लोखंडाचें ओझें जडच झालें होतें; व आपण परक्याच्या घरीं ठेविलेल्या छापखान्याच्या सामानाला हळूहळू पाय फुटूं लागले अशीहि शंका त्यांना आली होती. यामुळें हप्तेबंदीनें किंमतीची फेड पत्करून, साठे यांनीं तो छापखाना मंडळीकडून समाईक कर्जरोखा लिहून घेऊन त्यांना देऊं केला. हा सौदा ठरतांच मंडळीस मोठा आनंद झाला; व ही बातमी प्रसिद्ध होण्यापूर्वींच छापखान्याचें सामान एकदम त्याच्या नियोजित जागेंत म्हणजे मोरोबादादांचे वाड्यात नेणें जरूर वाटल्यावरून, ही सर्व उलाढाल एका रात्रींत घडवून आणली गेली. या प्रसंगास उद्देशूनच लोकमान्य केव्हां मौजेनें व अभिमानानें असें सांगत कीं, “ मी या खांद्यावरून आर्यभूषण प्रेसच्या टाईपांच्या पेट्या वाहून नेल्या आहेत ! ” आणि कारण पडलें असतां पुढेंहि स्वतः पायावर उभें राहून छापखान्यांतील यंत्र मोडण्याचें जोडण्याचें काम टिळक स्वतः करीत हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना वरील विधानांत अतिशयोक्ति असेल असा संशयहि येणार नाहीं.

अशा रीतीनें शाळेचें हें धाकटें पण अधिक प्रतापी भावंड, म्हणजे ‘ छापखाना ’ तिच्याच जोडीला मोरोबादादांचे वाड्यांत येऊन बसला, व ‘ आर्यभूषण ’ या नांवानें त्याचें डिक्लेरेशन गणेश मोरेश्वर सोहोनी या गृहस्थाकडून करविण्यांत आलें. सोहोनी यांस मुंबईच्या जगदीश्वर छापखान्यांत

असल्या कामाचा थोडाबहुत अनुभव आलेला होता व ते नामजोशांच्या पूर्वपरिचयाचेहि होते. म्हणून छापखान्याचे व्यवस्थापक या नात्यानें त्यांची नेमणूक करण्यांत आली. छापखान्यास पहिलेंच काम शास्त्रीबोवांच्या ' निबंधमाले 'चें मिळालें. मालेचा सासष्टावा अंक हाच या छापखान्यांत छापलेला असा तिचा पहिला अंक असून, त्यांत केसरीचें उद्देश्य–पत्रक प्रसिद्ध झालें आहे.

## केसरी

स्थितिं नो रे दध्याःक्षणमपि मदांधेक्षण सखे ।
गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभुवि ॥
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा ।
गुरुग्रावग्रामःस्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥

—जगन्नाथराय

" वरील केसरी नांवाचें वर्तमानपत्र निव्वळ महाराष्ट्र भाषेंत येत्या १८८१ सालाच्या आरंभापासून दर मंगळवारीं काढण्याचा विचार खालील मंडळीनें केला आहे. या पत्रांत एरवींच्या वर्तमानपत्राप्रमाणें बातम्या, राजकीय प्रकरणें, व्यापारासंबंधीं माहिती वगैरे नेहमींचे विषय तर येतीलच, पण याखेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका वगैरे विषयांचाहि त्यांत समावेश केला जाईल. तसेंच विलायतेंत ज्या राज्य-प्रकरणांची घाटाघाट होते ती इकडील लोकांस समजणें अवश्य असल्यामुळें त्यांचाहि सारांश-रूपानें यांत संग्रह करण्याचा बेत केला आहे. आजपर्यंत वरील तीन विषयांवर म्हणजे देशस्थिति, देशभाषेंतील राजकारण, या विषयांच्यासंबंधानें जसें यथास्थित उद्घाटन व्हावयास पाहिजे होतें, तसें कोणत्याहि वर्तमानपत्रांतून झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तर ही मोठी उणीव नाहींशी करून टाकण्याचें आम्ही मनांत आणलें आहे.

वरील वर्तमानपत्रांत प्रत्येक विषयाचें **विवेचन जें करावयाचें, तें केवळ निःपक्षपातबुद्धीनें व आम्हांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून**

**करावयाचें, असा आमचा कृतसंकल्प आहे.** अलीकडे बादशाही अमलाच्या सुरुवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होय, हें कोणीहि प्रांजल मनुष्य कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास ठेविल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.

या पत्राचा सांचा ' सुबोध पत्रिके ' सारखा धरण्यांत येईल. किंमतहि त्याच मानानें अगदीं थोडी ठेविली आहे. ती सालीना आगाऊ एक रुपया दहा आणे इतकी आहे. मागाहूनचा दर मुदलीच ठेवला नाहीं. सरतेशेवटीं आमच्या आर्य बंधूंस एवढीच विज्ञापना करण्यांत येते कीं, त्यांनीं या लोकहिताच्या नवीन कृत्यास आपला उदार आश्रय द्यावा. तो जसजसा मिळेल तसतशी आम्हांस उमेद येऊन, हें पत्करलेलें काम यथाशक्ति तडीस नेण्यास आम्हाकडून बिलकुल कसूर होणार नाहीं.

विष्णु कृष्ण चिपळुणकर, बी. ए.
बाळ गंगाधर टिळक, बी. ए., एल्‌एल्. बी.
वामन शिवराम आपटे, एम्. ए.
गणेश कृष्ण गर्दे, एल्. एम्. अँड्. एस्.
गोपाळ गणेश आगरकर, बी. ए.
महादेव बल्लाळ नामजोशी.

पहिल्या वर्षाच्या केसरीच्या अंकांत शास्त्रीबोवा, आगरकर व टिळक यांचे लेख सरमिसळ येत असत. वाङ्मयविषयक लेख चिपळूणकर लिहीत असत. इतिहास, अर्थशास्त्र व निवळ सामाजिक असल्या विषयांवरचे लेख आगरकर लिहीत. धर्मशास्त्र व कायदा या संबंधाचे लेख टिळकांचे असत. एखाद्या अग्रलेखाखेरीज शास्त्रीबोवा, व मुद्दाम आपणांकडे नेमून घेतलेल्या विषयाशिवाय टिळक, हे वर्तमानपत्राच्या इतर गोष्टींत फारसें मन घालीत नसत. किरकोळ लिहिणें आगरकरांकडे असावें असें दिसतें. कारण त्यांत त्यांचा विनोद, बिनमुर्वतखोरपणा व रोमँटिकपणाची लकेर हीं दिसून येतात. नवनीतासंबंधांच्या लेखांत खालीलप्रमाणें वाक्य वाचलें कीं तो लेख शास्त्रीबोवांच्या हातचा हें कोणीहि सांगू शकेल. उदाहरण, " ज्या बिचाऱ्या

घोंगड्या कवीनें (तुकाराम) शिवाजीमहाराजांचा आदरसत्कार नाकारला त्याच्या कपाळीं दोन शतकांनंतर तीच संभावना द्वीपांतरवासी प्रभूच्या हस्तें येऊन त्याच्या जयन्तीच्याप्रीत्यर्थ २४ तोडे मोकळे करण्याचा संकल्प सुटला ही गोष्ट मनांत आली असतां, भर इंग्रजी राज्यांत किती मोंगलाई आहे, हें कोणाच्या मनांत बिंबल्यावांचून राहणार नाहीं."

केसरीच्या सातव्याच अंकांत 'बहिष्कार' या विषयावर लेख आलेला आहे. त्याच्या पांचपंचवीस ओळी वाचतांच तो लेख टिळकांचा असावा याविषयीं कोणाचीहि खात्री पटते. "'बहिष्कार' ही आपल्या शास्त्रकर्त्यांनीं कित्येक पातकांस शिक्षा म्हणून सांगितली असून, इंग्लिश ग्रंथकारांनीं शिक्षेचे जे दैविक, लौकिक व राजकीय असे त्रिविध भेद सांगितले आहेत त्यांतील मधल्यांत त्याचा अंतर्भाव होतो. त्यास जें धर्माचें स्वरूप आलें आहे तें केवळ आनुषंगिक होय, व आपल्यांत धर्म व कायदा यांचें धर्म-ग्रंथांतून एकाच ठिकाणीं विवेचन झाल्याकारणानें आपली अशी समजूत झाली आहे." असा हा आर्य व आंग्ल धर्मांचा आणि कायद्यांचा मेळ घातलेला पाहिला किंवा, "राजा कालस्य कारणम्", "स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः" असलीं संस्कृत वचनें आढळलीं किंवा "पूर्वींच्या राजनीतींतहि फेरफार झाला पाहिजे", "भांडून घेतल्याखेरीज आतां कांहीं एक मिळणार नाहीं", "राजकीय शिक्षा लोकमतावरच अवलंबून असते", "राजाज्ञेचा प्रभाव लोकमतावर कधीच पडत नाहीं"—असलीं तुटक व ठासलेलीं विधानें दृष्टीस पडलीं म्हणजे तो लेख टिळकांचा असें कोण म्हणणार नाहीं? "इंग्रजी पोप कवीनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'कवितेचा ध्वनि कवितेच्या अर्थाचा प्रतिध्वनि असावा' म्हणजे अर्थाप्रमाणें भाषा चढत उतरत जावी,"—असला इंग्रजी कवितेचा हवाला लेखांत आला कीं, हे टिळक खास नव्हेत, आगरकरच हें कोणीहि ओळखावें. "कुटुंबांत एकत्र राहणें चांगलें नाहीं" हा विचार शुद्ध आगरकरी. किंवा "पंधरा वर्षांपासून पोरें उत्पन्न करण्याचें काम सुरू होऊन चाळिसाव्या वर्षीं देखील थांबेनासें झाल्यामुळें लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं, एखाद्या पावसाळ्यांत वरुणमहाराजांनीं किंचित् करडी नजर केली कीं गरीब लोकांस पोटचीं पोरें किंवा आपलेच हातपाय चावून खाण्याचा प्रसंग

येऊन ठेपतो, अशा वेळीं एकानें मर मर मरावें आणि बाकीच्यांनीं गलेलठ्ठाप्रमाणें बसून खावें हें ठीक दिसत नाहीं."–यांतील ग्राम्य शब्दरचना विष्णुशास्त्री किंवा टिळक यांचे लेखणींतून कधींहि निघणार नाहीं, तो विनोदी स्पष्टवक्तेपणा आगरकरांचाच असणार याविषयीं शंका कशाला ?

याशिवाय वर्तमानसाराच्या सदराखालीं चमत्कारिक मथळे घालून अद्‌भुत किंवा शुष्क बातम्या दिल्या जात व त्यांत ग्राम्यपणाहि असे. यावरून मॅनेजर किंवा इतर कोणी अलवते–गलबते यांचाहि हात प्रारंभीं केसरींत शिरत असे असें दिसतें. "शाबास रामभटजी", "जर्मनींत रामभटजीबोवांचें उड्डाण", "हिंदुस्थानांत इंग्रजांची काय फें फें उडून गेली आहे", "एका माकडाच्या विलक्षण प्रेमाची गोष्ट" असले चुटके वाचून दुसरें अनुमानच निघत नाहीं. माधवराव नामजोशी हेहि "पुणें म्युनिसिपालिटी", "जकातीच्या तक्रारी" वगैरेविषयीं लिहून स्थानिक राजकारण लोकांचे डोळ्यांपुढे ठेवीत असत. केसरीच्या चौथ्या अंकापासून कर्नाटकांतील बातमी-पत्र छापण्यास सुरुवात झाली होती. यावरून न्यू स्कूलच्या कीर्तीच्या डंक्या-वरून भावी केसरी पत्राविषयीं परप्रांतांतीलहि लोक उत्सुक होऊन बसले होते असें दिसतें. 'पत्रें पाठविणारांस सूचना' या सदराखालीं, मांत्रिकानें भुताशीं बोलावें त्याप्रमाणें संपादक अदृश्य बातमीदाराशीं मनोरंजक संवाद करीत असल्याचेंहि मधून मधून आढळतें. नाट्य, ललित वगैरे विषयांवर फार्सवजा संवाद एखादा दिसून येतो. हल्लीं टीचभर वाटणाऱ्या क्रीडाभुवनांतील क्लबाविषयीं तेव्हां उत्तर–प्रत्युत्तर मोठ्या गंभीरपणानें चाललेलें पाहून मौज वाटते. नाटक विषयाला मज्जाव मुळींच नव्हता ! उलट, 'आर्योद्धारक मंडळी'च्या नाट्यप्रयोगाविषयीं स्तुतिपर लेख आढळतात. या कंपनीच्या विरुद्ध तसेंच शाळेंत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाटक-प्रयोगाविरुद्ध असणाऱ्या लेखांस "लिहून आलेला मजकूर" याहून अधिक मान्यतेची जागा दिलेली दिसत नाहीं. उलट प्रो. केरूनाना छत्रे, बाबा गोखले, दामोदर विद्याधर गोखले, शिवराम हरि साठे असल्या पुढारी लोकांच्या सहीवर आर्योद्धारक नाटक मंडळीचा अथेल्लोचा नाटकप्रयोग 'पुनः एकवार', (हें थिएटर-बाहेरील वन्स् मोअरच होय !) होण्याविषयीं विनंतिपत्र पांचव्या पानावर केसरीच्या मथळ्याखालीं छापलेलें आढळतें. याच्या उलट आयर्लंडाची

स्थिति वर्णन करतांना, " स्वातंत्र्यरूपी अमोलिक दक्षणा मिळाल्यास नरमेध-यज्ञाशिवाय इतर लौकिक साधनें व्यर्थ होत, हा जो ऐतिहासिक सिद्धान्त त्यास बाध कोणी आणावा " असे स्पष्टोद्गार संपादकीय लेखांत आढळतात; त्यावरून या संपादक-मंडळाचें मन ललितविषयाप्रमाणें गंभीर विचारांच्या विषयांतहि अनिरुद्धपणें वावरत होतें असें उघड दिसतें.

अशा प्रकारची ' संपादित ' विषयांची, लेखनपद्धतीची व लेखक–स्वभावांची खिचडी या पहिल्या वर्षाच्या केसरींत दिसून येत असल्यामुळें, त्यावर निर्णायक असा कोणत्याहि विशिष्ट मताचा छाप अद्याप पडलेला नव्हता, व संपादकीय धोरणांत तर ती एक संयुक्त भांडवलाची कंपनी होती असेंच म्हणावें लागतें. अशा उद्योगांत प्रारंभीं असें होणारच. पण दुसऱ्या–तिसऱ्या वर्षापासून हा प्रकार हळूहळू कमी होऊं लागला. १८८१ अखेर कोल्हापूरप्रकरणीं केसरींतून लेख येण्यास सुरुवात झाली होती व १८८२ च्या प्रारंभीं अब्रूनुकसानीचें प्रकरण कोर्टांतहि गेलें होतें. या प्रकरणीं टिळक व आगरकर यांजवर खटला झाल्यानें ते लेखकवर्गांतून कांहीं वेळ गळले. आपटे हे मराठ्यांतील अब्रूनुकसानकारक लेखांचे लेखक; पण टिळकांच्या डिक्लेरेशनमुळें ते निभावले. फक्त त्यांना अधिक लेख लिहून वरील दोघांची उणीव भरून काढावी लागली. खटला चालू असतां १८८२ च्या मार्चमध्यें विष्णुशास्त्रीहि वारले. यामुळें नामजोशी यांना केसरींत लिहिण्याचें काम अधिक पडूं लागलें.

कोल्हापूरप्रकरणांतील खटल्यामुळें जास्त कमी खर्च येऊन कर्ज झालें व साठे यांच्या छापखान्यावरील कर्जाचे हप्ते बरेचसे थकत असत. शिवाय सोहोनी यांची व्यवस्था असावी तितकी काटकसरीची नव्हती. यामुळें टिळक–आगरकर हे डोंगरी तुरुंगांतून १०१ दिवस कैद भोगून परत येऊन पाहतात तों, छापखाना व वर्तमानपत्रें यांचा कर्जबाजारीपणा हें एक नवीनच संकट त्यांच्यापुढें वाढून ठेवलेलें दिसलें. या संकटानें व कांहीं अंशीं खटल्याच्याहि दहशतीनें आपटे यांनीं आपण होऊन वर्तमानपत्रांचा संबंध सोडला. ' तीं तुमचीं तुम्हीच सांभाळा ', असें टिळकांना तुरुंगांतून येतांच पहिल्याच भेटींत त्यांनीं सांगितलें; व पुढें न्यू इंग्लिश स्कुलांतील भांडणांत

वर्तमानपत्रांचा संबंध येई तेव्हां, टिळक, नामजोशी व केळकर यांविरुद्ध ते आगरकरांची बाजू घेत. तुरुंगांतून आल्यापासून टिळकांचें वर्तमानपत्रांतील लिहिणें होतें त्याहूनहि कमी झालें. त्यांच्या ऐवजीं वासुदेवराव केळकर लिहूं लागले; मराठ्यांत लिहिण्याचें काम नामजोशी यांनीं आपल्या हौसेनें आपणाकडे हळूहळू अधिकाधिक घेतलें; व आगरकरांचें केसरींतील लिहिणें अधिकाधिक फैलावल्यानें मुख्य संपादक तेच ठरले.

ता. २५ ऑक्टोबर १८८७ रोजीं टिळक हे आगरकरांऐवजीं केसरीचे प्रकाशक म्हणून जाहीर झाले. आगरकरांनीं केसरीचें प्रकाशकत्व सोडून दिलें तरी स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याचा त्यांचा विचार एकदम ठरला नाहीं. पुढें कांहीं दिवस आगरकर हे 'लिहून आलेला मजकूर' या सोयीच्या सदरांत केसरींत लेख लिहीत. अशा प्रकारची स्वतंत्रता लाभल्यावर त्यांच्या लेखांत निर्भीडपणा पूर्वींहूनहि अधिक विनटला यांत आश्चर्य नाहीं. पुढच्याच म्हणजे त्रेचाळिसाव्या अंकांत 'लिहून आलेला मजकूर' म्हणून "फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम" या मथळ्याखालीं केसरीच्या अग्रलेखाहूनहि मोठा असा आगरकरांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सदर हायस्कुलांतील शिक्षणक्रमावर पूर्वीं केसरींत ओळीनें जे चार टीकात्मक अग्रलेख आले होते, त्याला मोठें वक्तृत्वपूर्ण असें उत्तर दिलें आहे. या लेखांतील चारदोन वाक्यें कोठेंहि पाहिलीं कीं, 'अरे, नांव नसलें तरी ही आगरकरांची लेखणी' असें कोणीहि एकदम उद्गारल्यावांचून राहणार नाहीं. पुढील वर्षांत आगरकर यांनीं स्वतंत्रपणें 'सुधारक' हें वर्तमानपत्र काढलें. यापुढील त्यांचे वाद सुधारक व केसरी यांतून सुरू झाले.

१८८७ सालीं टिळक हे केसरीचे कायदेशीर संपादक झाले तरी १८९१ पर्यंत केसरी त्यांच्या मालकीचा पूर्णपणें झाला नव्हता. आगरकर केसरींतून निघाल्यानंतर आर्यभूषण छापखाना आणि केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें मिळून संयुक्त कारखाना मानला जात असून वासुदेवराव केळकर, हरि नारायण गोखले, व स्वतः टिळक असे तीन संयुक्त भागीदार त्यांत होते. १८८८ च्या सुमारास केसरीचे वर्गणीदार सुमारें पांच हजारांपर्यंत वाढले होते; व नुसत्या केसरीची प्राप्ति बरी होती. पण इंग्रजी पत्र मराठा

हें प्रथमपासूनच आंतबट्ट्याचें मूळ होतें. शिवाय, छापखान्याचे टाईप व इतर सामान वरचेवर बाहेरून विकत आणण्यास खर्च पडे. याकरितां केसरीला स्वतःचें एक मशिन असावें, व स्वतःचे मालकीची टाईप फाउण्डरीहि असावी असें वाटूं लागलें. अर्थात् अधिक भांडवल म्हणजे अधिक कर्जाचा बोजा. शिवाय पूर्वीं टिळक व वासुदेवराव केळकर यांचीं मतें जरी एक होतीं तरी १८९१ मध्यें 'रमाबाई' प्रकरणानें व इतर अनेक गोष्टींनीं उभयतांचीं मतें तंतोतंत जुळेनाशीं झालीं. आणि केसरींत मुख्यत्वेंकरून लिहिणार टिळक व मराठ्यांत मुख्यत्वेंकरून लिहिणार वासुदेवराव केळकर असें असल्यामुळें, एकाच विषयावर केसरी व मराठा पत्रांत परस्पर विरुद्ध असेहि लेख मधून मधून येत असत. यामुळें हीं दोन पत्रें कोणाच्या तरी एकाच्याच मालकीचीं केलीं पाहिजेत हें उघड दिसून येऊं लागलें. इकडे हरिपंत गोखले हे निवळ छापखान्याच्या दृष्टीनें कारखान्याकडे पाहणारे. त्यांना मराठ्याच्या बुडित खात्याचें वैषम्य वाटूं लागलें. मिळून दोन्ही वर्तमानपत्रें कोणीं तरी एकानें घ्यावीं व छापखाना एकानें किंवा इतर दोघांनीं मिळून घ्यावा असें ठरलें. गोखले वर्तमानपत्रें घेऊं शकतच नव्हते; व तो त्यांना छापखान्यावर बोजाच वाटे. तेव्हां ते छापखाना घेणार हें ठरलेंच. पण त्यांच्या जोडीला टिळक येणार किंवा प्रोफेसर केळकर येणार ही गोष्ट अद्यापि ठरावयाची होती. टिळकांप्रमाणेंच प्रो. केळकर हेहि सव्यसाची म्हणजे इंग्रजी व मराठी दोन्ही भाषा लिहिण्यांत वाकबगार आणि संपादकीय कामांत दर्दी व हौशी; यामुळें दोन्ही पत्रें घ्यावयाचीं तर टिळक व प्रो. केळकर हे दोघेहि तीं घेण्याला आपापल्या परीनें पुरे लायक! पण हाहि लढा सुटण्यास दोन कारणें होतीं. एक असें कीं, केळकर हे अद्यापि कॉलेजांत प्रोफेसरीचें काम करीत असून त्यांच्या संसारापुरता त्यांना पगार तिकडून मिळत होता. शिवाय कारखान्याचें घडेवांटप करण्यांत आलें तेव्हां, फायदेशीर पण भांडवल वरचेवर थोडथोडें नवें घालावें लागणारा छापखाना एका बाजूस, व आढाव्यांत निघालेलें एकंदर तिसऱ्या हिश्शाचें सात हजार कर्ज व दोनहि पत्रें मिळून दुसऱ्या बाजूस, अशी वांटणी झाली. शिवाय स्वमतप्रसाराची हौस ही जर स्वतंत्र गोष्ट म्हणून विचारांत घेतली तर वासुदेवराव केळकर ह्यांच्यापेक्षां टिळकांच्या अंगीं ती अधिक होती ही

गोष्ट निर्विवाद होय. तात्पर्य, वांटणी उचलतांना कर्जासह वर्तमानपत्रें उचलण्यास टिळकच पुढें आले; व १८९१ पासून तीं त्यांनीं आपल्या मालकीचीं केलीं.

१८९१ पासून १८९७ पर्यंत केसरी ऑफिस आर्यभूषण छापखान्यांतच असल्यामुळें टिळकांचे घरीं कारखाना असा कांहीं नव्हता. खटल्यानंतर केसरीचें ऑफिस स्वतंत्रपणें धोंडोपंत विद्वांस यांनीं प्रथम राहत्या घरीं म्हणजे विंचुरकरांच्या वाड्यांत सुरू केलें. पण बिऱ्हाडांतील जागा या कामास अपुरी असल्यामुळें पुढें गायकवाडवाडा खरेदी होईपर्यंत सदाशिव पेठच्या हौदानजिक कोपऱ्यावरील राहत्या घरीं केसरीचें ऑफिस ठेवण्यांत आलें होतें. पण खुद्द केसरी छापण्याचें काम हातानेंच होत असल्यामुळें केसरीची कचेरी लहानच होती. संपादकमंडळापैकीं केळकर, खाडिलकर, मुख्य व्यवस्थापक धोंडोपंत विद्वांस व दोनतीन कारकून अशी लहानशीच ही कचेरी होती. कारणपरत्वें टिळक येथेंच येऊन केसरीचा मजकूर वगैरे सांगून लिहीत. पैशाअडक्याची व्यवस्था या वेळीं करण्यासारखी अशी फारशी नव्हती. यापूर्वीं चित्रशाळा हीच टिळकांच्या बँकेचें म्हणजे बहुतेक सर्व देवघेवीचें काम करी. पण स्वतंत्र कचेरी व स्वतंत्र ऑफिस केल्यापासून हा व्यवहार इकडे सुरू झाला.

खटल्याचे वेळीं केसरीचे वर्गणीदार सुमारें सात हजार होते, ते खटल्यापासून वाढण्यास सुरुवात झाली, व १८९९ अखेर हा आंकडा दहा-अकरा हजारांपर्यंत गेला होता. मराठ्याचे वर्गणीदार एक हजाराच्या आंतबाहेर प्रथमपासूनच असत. ते कधीं फार वाढले नाहींत व कधीं फार कमीहि झाले नाहींत. केसरीची वर्गणी एक रुपया होती. मराठ्याची वर्गणी टपालहंशिलासह बाहेरगांवीं सवासात, शहरांत सहा रुपये सहा आणे व फुटकळ अंकास चार आणे अशी असल्यामुळें, आणि पत्र इंग्रजी असल्यामुळें, त्याचा प्रसार अर्थातच पुष्कळ कमी होता. पण केसरीचीं मतें परप्रांतांतून फैलावण्याकरितां केसरीचेंच एक बुडितखातें म्हणून टिळकांनीं केसरीला कर्ज असतांहि हें पत्र चालू ठेविलें होतें, हें पूर्वीं एका ठिकाणीं सांगितलेंच आहे. टिळकांच्या गैरहजेरींत केळकर यांनीं मराठा, व केळकर आणि

खाडिलकर यांनीं केसरी चालविला, टिकविला, व त्यांच्या लोकप्रियतेंत कमीपणा येऊं दिला नाहीं. यामुळें हे दोघेहि कायमचे मदतनीस म्हणून टिळकांनीं यापुढेंहि योजले. स्वतः टिळक व हे दोन मदतनीस एवढ्यांत मिळून हीं दोन्ही पत्रें चालण्यासारखीं होतीं. १८९६ पासून १८९९ पर्यंत टिळकांना लॉ क्लासांत केळकर हे जोडीदार असत. पण १८९९ पासून पुढें लॉ क्लास प्लेगामुळें बंद झाला. तो फिरून उघडावयाचा नाहीं असें टिळकांनीं ठरविलें. नित्य नियमानें केसरीचें एखादें आर्टिकल लिहिणें व जरूरीप्रमाणें मराठ्यांतहि एखादें आर्टिकल लिहिणें या गोष्टीला टिळकांना विशेष वेळ लागत नसे. त्यांचा अवांतर कामांतच यापेक्षां अधिक वेळ पुढें जाऊं लागला.

ता. ४ जुलै १८९९ पासून टिळकांनीं केसरी पुनः हातीं घेतला. १८९७ च्या सदतिसाव्या अंकापर्यंत केसरी टिळकांच्या नांवानें निघत होता. अडतिसाव्या अंकापासून टिळक यांचें नांव त्यांच्या शिक्षेमुळें केसरी-वरून निघालें होतें, तें १८९९ च्या सत्ताविसाव्या अंकावर फिरून केसरीवर दिसूं लागलें. दरम्यानचे केसरीचे ९१ अंक टिळकांच्या नांवाला अंतरले होते.

तारीख ७ जानेवारी १९०२ च्या केसरींत केसरीपत्राच्या स्वरूपांत घडणाऱ्या क्रांतीची सूचना टिळकांनीं दिली होती. ही क्रांति म्हणजे केसरीचा आकार तोच ठेवावयाचा पण पानें दुप्पट करावयाचीं ही होय. या सालच्या पहिल्याच अंकापासून केसरी नव्या स्वरूपांत निघणार होता. परंतु छापखान्याच्या अडचणीमुळें ती गोष्ट घडूं शकली नाहीं. नवा केसरी प्रथम ता. ४ फेब्रुवारी रोजीं निघाला. आणि ११ फेब्रुवारीच्या अंकांत या क्रांतीला उद्देशून टिळकांनीं एक मोठा अग्रलेख लिहिला. त्यांत ते म्हणतातः—“ एकवीस वर्षांपूर्वीं आम्हीं दहा पाच मंडळी मिळून केसरीपत्र काढण्याचें ठरविलें. तेव्हांच्या व आतांच्या स्थितींत पुष्कळ फरक पडला आहे. एकविसाव्या वाढदिवसाच्या प्रसंगीं आनंदापेक्षांहि जबाबदारीची जाणीवच अधिक होते. केसरी सुरू करण्याच्या वेळची सर्व सहकारी मंडळी नामशेष झाली. निवळ मराठी पत्र यशस्वी होईल कीं नाहीं याची १८८० च्या

सुमारास लोकांना शंका वाटत असे. आणि दोन भाषेंत काढलेल्या पत्रांतील इंग्रजी मजकुराला लोक अधिक मान देत. वर्तमानपत्राची वर्गणीहि तेव्हां जास्त होती. केवळ मराठींतून पत्र चालविण्याचा प्रयत्नच तेव्हां व्हावा तितका झाला नव्हता. विष्णुशास्त्री यांनीं भाषेला विलक्षण तेज आणलें होतें. परंतु ते अद्याप मासिक पुस्तकच होतें. गेल्या वीस वर्षांत शिक्षण सर्वच बाजूंनीं वाढलें आहे. केसरीला प्रारंभीं ७०० पासून हजार वर्गणीदार होते. पुढच्या सालीं टपाल हंशील कमी झाल्यामुळें ती संख्या एकदम दुप्पट झाली. व १८८४ सालीं ही संख्या बेचाळीसशेंवर येऊन ठेपली. यापुढे झालेल्या चळवळीमुळें १९०२ सालीं वर्गणीदारांची संख्या तेरा हजार झाली व वाचकांची संख्या सुमारें पाऊण लाखापर्यंत गेली. या काळांत केसरीबरोबर इतर कांहीं वर्तमानत्रेंहि उदयाला आलीं. यावरून केसरीनें स्वतःची अभिवृद्धि केली इतकेंच नव्हे तर एकंदरीनें मराठी वर्तमानपत्राच्या अभिवृद्धीला तो कारणीभूत झाला. वाचनाच्या अभिरुचीचा जो वृक्ष केसरीने लावला त्याला अनेक फळें यावीं हें स्वाभाविक होतें. एकाच बागेंत निरनिराळीं फळझाडें व फुलझाडें होतात त्याचप्रमाणें ही गोष्ट आहे.

१८९८ सालीं तुरुंगातून सुटून आल्यावर थोडी विश्रांति घेऊन ता. ३ जुलै १८९९ रोजीं टिळकांनीं केसरी आपल्या नांवानें हातीं घेतला. तो १९०८ सालीं त्यांना शिक्षा होईपर्यंत म्हणजे ता. २२ जुलै १९०८ पर्यंत त्यांचेच नांवावर सतत होता. ता. २८ जुलै १९०८ पासून केसरीवर संपादक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचें नांव दाखल झालें. तें ता. ४ जानेवारी १९१० पर्यंत होतें. पुढील अंकापासून न. चिं. केळकर हे केसरीचे संपादक झाले. ते ता. १२ मार्च १९१८ पर्यंत संपादक होते. या सुमारास स्वराज्य—संघातर्फे शिष्टमंडळ विलायतेस जाण्याकरितां कोलंबोस निघालें तेव्हां ता. १९ मार्च १९१८ रोजीं फिरून केसरीचे संपादक म्हणून खाडिलकर यांचें नांव दाखल करण्यांत आलें. विलायतेची ही सफर पासपोर्ट न मिळाल्यामुळें कोलंबोहून परत फिरली व त्यानंतर केळकर १९१९ च्या एप्रिलअखेर विलायतेस जाईपर्यंत पुण्यासच होते. तथापि ते पुन्हा विलायतेस जाण्याकरितां निघण्याचा संभव होता, यामुळें

खाडिलकर यांचेच हातीं केसरीचें संपादकत्व ठेवण्यांत आलें होतें. पण टिळक व केळकर हे विलायतेहून परत आल्यावर फिरून पूर्वीप्रमाणें तारीख २२ जून १९२० पासून केसरीचें संपादकत्व केळकरांकडे देण्यांत आलें. तात्पर्य, १९०८ साली टिळकांचें नांव केसरीवरून संपादक या नात्यानें निघालें तें कायमचेंच निघालें. तथापि, पुढें अखेरपर्यंत टिळक केसरीवर देखरेख ठेवीत, इतकेंच नव्हे तर एखादे वेळीं केसरीकरितां लिहिलेले लेख तपासून देत, व त्यांनीं स्वतःहि वेळोवेळीं अनेक लेख केसरींत लिहिले आहेत.

१८९१ च्या पूर्वीं कांहीं वर्षें केसरीवर टिळकांचें नांव असलें तरी प्रत्यक्ष त्या पत्राची मालकी किंवा देखरेखहि त्यांच्याकडे नसे. पण १८९१ पासून १९२० पर्यंत, म्हणजे सुमारें २९ वर्षें, टिळकांचा केसरीशीं प्रत्यक्ष किंवा जिव्हाळ्याचा किंवा कूर्मदृष्टीचा संबंध होता. या मुदतींत केसरीच्या स्वरूपांत अनेक स्थित्यंतरें झालीं. तशीच वर्गणी वगैरे इतर बाबतींतहि झाली. १९०२ सालापासून टिळकांनीं केसरीचा आकार तोच ठेवून पानें दुप्पट केलीं. ही क्रांति पूर्वीच्या क्रांतीनंतर ११ वर्षांनीं घडून आली. १८९१ सालीं क्रांति झाली होती ती इतकीच कीं (वर्गणी तीच म्हणजे १ रु. १३ आ. ठेवून व पृष्ठसंख्या तीच म्हणजे बाहेरील दोन व आंतील दोन मिळून चार पानें इतकीच ठेवून) मोठ्या ऐवजीं लहान टाइप घातला, म्हणजे मजकूर वाढविला. पण १९०२ सालीं ही सुधारणाहि अपुरी ठरल्यानें, आकार व टाईप तोच ठेवून पानें दुप्पट वाढविलीं. त्यामुळें संपादकीय लेखाप्रमाणेंच लिहून आलेले लेख, पत्रव्यवहार, बातम्या, बिन-संपादकीय लेख जाहिराती वगैरेंची पुष्कळच अधिक सोय झाली. पण इतका मजकूर वाढविल्यावर छपाईच्या व इतर खर्चाच्या दृष्टीनें वर्गणी वाढविणेंहि अवश्य होतें; म्हणून पूर्वीची वर्गणी १ रु. १३ आणे होती ती २ रु. ५ आ. करण्यात आली. १९०२ सालीं जो आकार व मजकुराची जी बांधणी टिळकांनीं निश्चित केली ती १९१५ पर्यंत तशीच चालू होती. या सुमारास प्रथम केळकर यांनीं केसरींत वाढत्या मजकुराच्या सोयीकरितां पुरवणी घालण्याला सुरुवात केली; व कर्मधर्मसंयोगानें ज्या वर्षीं प्रेस ॲक्ट अमलांत आला त्याच वर्षीं या पुरवणीलाहि सुरुवात झाली. मात्र ही

पुरवणी कायमची किंवा वर्गणीदारांच्या हक्काची अशी समजली जात नसे. संपादकाच्या इच्छेप्रमाणें, म्हणजे मजकूर अधिक नसेल त्याप्रमाणें पुरवणी घालावी न घालावी असा क्रम सुरू होता. पण त्यांतल्या त्यांत पुरवणी न घालणें हा अपवाद होऊन बसला !

१९०२ सालीं केसरीचा आकार वाढविला त्यापूर्वीच टिळकांनीं मोरोबा फडणिसांच्या वाड्यांत, आर्यभूषण प्रेसला लागून स्वतंत्र इमारत बांधून नवें मोठें छापण्याचें यंत्र बसविलें होतें. पुढें १९०४ सालीं टिळकांनीं गायकवाड-सरकाराकडून त्यांचा पुण्यांतील वाडा विकत घेतला. व १९०६ पासून छापखान्याचें काम, टाईप जुळविण्याचें काम, आणि केसरी-मराठ्याचे संपादक व व्यवस्थापक यांच्या कचेरीचें काम तेथें सर्व एकत्र चालूं लागलें. टिळकांच्या हयातींत महायुद्धापासून केसरीच्या वर्गणीदारांची संख्या विशेष वाढूं लागली तेव्हां हें नवें यंत्रहि अपुरे पडूं लागलें. टिळक मंडालेहून परत आल्यापासूनच छापखान्याची अंतर्बाह्य सुधारणा करण्याचा विचार त्यांचे डोक्यांत एकसारखा घोळत होता. १९१४ च्या पत्रव्यवहारावरून असें दिसतें कीं, या सालीं विलायतेंतील वॉकर कंपनीशीं पत्रव्यवहार करून टिळकांनीं आपल्या नव्या छापखान्याकरितां विजेचे दिवे लावण्याची योजना केली होती, व त्याकरितां मोटार डायनेमो बॅटरी ॲक्युम्युलेटर दिवे, तारा, लहानसे पंखे वगैरे सर्व आणविण्याचा बेत केला होता. फक्त इंजिन मात्र नवें न घेतां जुन्यावरच भागविण्याचा त्यांचा विचार होता. या सर्वाला सुमारें १५०० रुपये खर्च येणार होता. परंतु जुन्या इंजिननें काम पुरे पडणार नाहीं, आणि या कारणाकरितां जुने काढून टाकून नवें मोठें घ्यावयाचें तर आवांक्याबाहेर खर्च जाणार, असा एकंदर अंदाज झाल्यामुळें त्यावेळीं गायकवाडवाड्यांत व कारखान्यांत विजेचे दिवे लावण्याचा बेत रहित करण्यात आला. यानंतर चिरोल केसचा खर्च व वेळ खाणारे अनेक इतर उद्योग निघाल्यामुळें नवीन छपाईचें यंत्र घेऊन बसविण्याची टिळकांची कल्पना तशीच राहिली. पण टिळक विलायतेस गेल्यावर अनायासेंच ती त्यांना फलद्रूप करतां आली. त्याप्रमाणें तेथें समक्ष पाहून त्यांनी नव्या प्रकारचें एक छपाईचें यंत्र सुमारें २०,००० रु. किंमतीचें विकत घेतलें.

या यंत्राचें वर्णन टिळकांनीं स्वदस्तुरचें पत्र धोंडोपंत विद्वांस यांना लिहून त्यांत दिलें आहे तें खालीलप्रमाणें :

" आतां जें मशीन घेणार तें सुटे कागद छापखाण्याचें नाहीं. कागदाची वाटोळी जुडकी ( रीळ ) लावून दर तासास ६००० कॉपी ( ८ पानें एकदम ) छापून व घड्या पाडून तयार होतील असें मशीन आहे. तसेंच सुट्या टाइपाचा उपयोग न करता स्टिरिओ दर पेजास एक याप्रमाणें तयार करून, आठ स्टिरिओ करून छापावे लागेल. स्टिरिओची मशीनरी मशीन-बरोबर विकत घेतलेली आहे. मशीन रवाना झालें म्हणजे कागदाचे रोलरना ऑर्डर देतों. मशीन सेकंडहँड आहे. पण अगदीं नव्यासारखें असून ज्या कंपनीनें मशीन तयार केलें त्याच कंपनीनें तें सर्व तपासून नीट केलें आहे, करितां काळजी नाहीं.

" हल्लीं केसरीचा आकार ४५–३० आहे. पण या मशीनवर ४०–३० पासून ४०–६० पर्यंत ( म्हणजे क्रॉड सब–रॉयल किंवा क्रॉड रॉयल ) कागद छापला जाईल.

" मशीन सुमारें १२ फूट लांब ९ फूट रुंद व फक्त ६ फूट उंच आहे म्हणजे आटोपशीर आहे. खालीं खड्डा खणण्याची जरूर नाहीं.

" हें मशीन चालविण्यास ऑईल इंजिन दहा हॉर्स पॉवरचें लागेल. सध्यांचें चालणार नाहीं. नवें घेतलें पाहिजे. रा. पारधी यास विचारून तिकडें दहा हॉर्स पॉवरचें इंजिन मिळेल का नाहीं व केवढ्यास मिळेल तें उत्तरीं कळवावें. नसल्यास येथें विकत घेऊं.

" आतां फक्त एक लहान मशीन मराठ्याकरितां व लिनो अगर मोनो-टाइप घेणें आहे. चौकशींत आहे. "

" १९०१ झालीं टू-फीडर घेऊन त्याप्रमाणें आज १८-१९ वर्षे काम चाललें तद्वतच यापुढें वीस-पंचवीस वर्षें पूर्ण उपयोगाला येईल असें हल्लींचें मशीन आहे. आठी पेज एकदम छापून व घड्या पाडून तासास ६ हजार प्रती डझनावर मोजून बाहेर पडतील. पुढें केसरी आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां निघाला तरी दुसरें मशीन घ्यावयास नको. हल्लींचा केसरी म्हणजे ३२००० प्रती ६ तासांत सर्व छापून होतील. रात्रीं बारा वाजतां सुरू केलें कीं, दोन्ही फर्मे एकदम छापून व घड्या पडून सकाळला तयार ! "

या पत्रांत उल्लेखिल्याप्रमाणें मराठ्याकरितां स्वतंत्र लहानसें छपाईचें यंत्र १९१९ सालीं घेण्यांत आलें व हल्लीं मराठा त्यावरच छापण्यांत येतो. १९१४ च्या संकल्पाप्रमाणें केसरी छापखाना व केसरी यांच्याकरितां ऑईल-इंजिनला डायनेमो जोडून विजेचे दिवे लावण्याची व्यवस्था १९२२ पासून करण्यांत आलेली आहे. लायनो टाइपवर केसरीचे टाइप जुळविण्याची व्यवस्था ही मात्र परतंत्र असल्यामुळें ती टिळकांना आपल्या हयातींत अमलांत आणतां आली नाहीं. व त्यापुढेंहि ती आजवर अमलांत आलेली नाही. तथापि लायनो टाइपवर केसरी निघावयाचा तर त्याला आधीं त्या यंत्रावर बसवितां येतील असें अखंड टाइप बनवावे लागणार; व असे टाइप आपण करून दिले तरच विलायतचे कारखानदार ते स्वीकारून लायनो टाइप बनवून देणार, म्हणून टिळकांनींच आपल्या कारखान्यांत हे अखंड टाइप तयार केले. ही योजना टिळकांच्या मनांत १९०६ सालापासून घोळत होती व त्यांच्या अखंड टाइपांचा एक संपूर्ण संच त्याच सालीं तयार झाला. फिरून त्याची सुधारणा १९१४ सालीं त्यांच्याच देखरेखीखालीं झाली. आणि त्यानंतर त्यांत आणखी सुधारणा १९२६ पासून सुरू आहे. या अखंड टाइपांत कंपोज केलेला मजकूर केसरींत वेळोवेळीं देण्यांत येत असतो ही गोष्ट त्या टाइपांचें वळण व इतर टाइपांचें वळण यांतील फरकावरून वाचकांच्या लक्षांत आलीच आहे. या टाइपांतील सुधारणा पूर्ण झाली म्हणजे पुढेंमागें कदाचित् तोच टाईप सबंध केसरीकरितां वापरण्याचा विचार आहे. आणि वाचकांच्या दृष्टीनें तो रूढ झाला म्हणजे तोच लायनो टाइप यंत्रावर बसवून घेण्याची योजना होईल. वर दिलेल्या टिळकांच्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, " पुढें केसरी आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां निघाला तरी दुसरें मशीन घ्यावयास नको. " वरील शब्दांत जी सुधारणा सुचविली आहे तिजपैकीं केसरी आठवड्यांतून दोनदां काढण्याची योजना फलद्रूप झालीच आहे.

[ यानंतर साप्ताहिक रविवारचाहि केसरी निघून हल्लीं त्याचें दैनिकांत रूपांतर झालें आहे हेंहि सर्वांना माहीत आहेच. —**संपादक** ]

# केसरी-मराठ्यावरील आपत्तींचे प्रसंग

मनुष्यव्यक्तीचे काय किंवा संस्थेचें काय, पन्नास वर्षांचें आयुष्य बिलकुल अपघाताशिवाय पार पडण्याची अपेक्षा करणें हें गैरच होय. मनुष्याला आजार अपघात होतो तसें संस्थेलाहि घडतें. त्याप्रमाणें केसरी–मराठ्यावर पन्नास वर्षांत आपत्ति आल्या त्या कांहीं अस्मानी व कांहीं सुलतानी होत्या. पैकीं अस्मानी आपत्ति आल्या त्या अशा. प्रथम केसरीशीं संबंध ठेवणें धोक्याचें असें वाटून आर्यभूषण छापखान्याचे मालक व मॅनेजर कै० हरि नारायण गोखले यांनीं आपल्या छापखान्यांत केसरी छापण्यास हरकत सांगितली त्यामुळें केसरी तेथून बाहेर काढून न्यावा लागला. तो कांहीं दिवस विठ्ठल प्रेसमध्यें छापला जात असे. सदरहू छापखाना रविवार पेठेंतील फडके यांचे वाड्यांत होता. त्याला ता. १४ मार्च १८९८ रोजीं अकस्मात् आग लागली, त्यामुळें केसरीचें थोडें नुकसान झालें. आगींतून निम्मा केसरीचा कंपोज झालेला टाईप बचावला; परंतु दुसरेच दिवशीं मंगळवार असल्यामुळें तो निम्मा केसरीच कसा तरी छापून घेऊन वांटावा लागला. केसरीच्या या पन्नास वर्षांत असला अपघात हा एकच घडला म्हणजे निम्मा केसरी वांटला गेला. हा पन्नास वर्षांत एकच प्रसंग. तथापि, सांगण्यासारखी अभिमानाची गोष्ट अशी कीं, त्याहि अपघातांत मंगळवारीं केसरी प्रसिद्ध होण्याचा राहिला नाहीं.

दुसरी अशा प्रकारची अस्मानी आपत्ति म्हणजे केसरीच्या कागदांच्या गोदामाला लागलेली किंवा कोणी लावलेली आग. ही ता. १० मे १९२१ रोजीं अकस्मात् लागली. तींत केसरीच्या नव्या इमारतीचा कांहीं भाग व बहुतेक सर्व शिलकी कागद जळून गेला. कागदाचा विमा उतरलेला होता. तथापि विमा कंपनीकडून मिळालेल्या रकमेनें सर्व नुकसान भरून आलें नाहीं.

व्यक्तिशः अपघात असा एकच झाला. तो असा कीं, एकदां छापण्याचें यंत्र चालू असतां एका कामगाराचा पाय पट्ट्यांत सापडून तो मरावयाचाच पण थोडक्यावर निभावून पायमोडीवर मरण गेलें. त्याची सर्व प्रकारची

निगा केसरीनें केली व सुदैवानें हा कामगार बरा होऊन हल्लीं तो मुख्य प्रिंटरचें काम करीत आहे.

तसेंच एका गणपति-उत्सवांत एके रात्रीं मेळे आले असतां पुष्कळ लोक केसरीच्या आवारांतील एका इमारतीच्या पत्र्याच्या छपरावर मेळ्यांची गाणीं ऐकत व रोषनाई पहात असतां तें छप्पर एकदम कोसळून पडलें. त्यांत लहान-मोठीं बरींच माणसें खालीं पडून दुखावलीं. पण सुदैवानें कोणीहि दगावलें नाहीं.

अशा रीतीच्या अस्मानी आपत्ती केसरीवर फार थोड्या आल्या. पण सुलतानी आपत्तीमात्र बऱ्याच आल्या. पैकीं पहिली म्हटली म्हणजे सन १८८२ झालीं झालेला अब्रूनुकसानीचा खटला. त्या खटल्याची सविस्तर हकीकत लो. टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडाच्या ६ व्या भागांत वाचकांना वाचावयास मिळेल. त्याची थोडक्यांत हकीकत अशी कीं, " कोल्हापूरचे कै. शिवाजी महाराज यांना संस्थानचे दिवाण कै. माधवराव बरवे यांनीं निष्ठुरपणानें वागविलें व त्यांत त्यांना महाराजांच्या सावत्र आईची फूस होती, " अशा अर्थाचे लेख केसरींत व मराठ्यांत प्रसिद्ध झाले. त्यावरून कै. बरवे यांनीं मुंबईस प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें दोन्ही पत्रांच्या संपादकांवर फौजदारी फिर्याद केली. केसरीचें डिक्लेरेशन आगरकर यांचें होतें म्हणून त्यांच्यावर व मराठ्याचें डिक्लेरेशन टिळकांचें होतें म्हणून त्यांच्यावर फिर्यादी झाल्या. मॅजिस्ट्रेटकडून खटला हायकोर्टांत सेशन कमिट झाला व अखेर उभयतांना चार महिन्यांची साधी कैद झाली. हे कैदेचे दिवस त्यांनी मुंबई येथील डोंगरीच्या तुरुंगांत काढले. एकंदर शिक्षा १२० दिवसांची; तथापि चांगल्या वर्तणुकीमुळें १९ दिवसांची सूट मिळून त्यांची बंधमुक्तता १०१ दिवसांनींच झाली. या मुदतींत टिळकांचें २४ पौंड व आगरकरांचें १६ पौंड वजन कमी झालें !

यानंतरचा दुसरा सुलतानी आघात म्हणजे १८९७ च्या केसरीवरील खटल्याचा. या खटल्याचा निकाल लो. टिळकांच्याविरुद्ध होऊन त्यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्या निकालावर प्रीव्ही कौन्सिलकडे अपील करण्यांत आलें होतें. पण त्यांत यश आलें नाहीं. तथापि विलायतें-

तील प्रो. मॅक्समुलर वगैरेंनीं खुद्द राणीसरकारकडे अर्ज केल्यामुळें टिळकांची ५१ आठवड्यांनंतर सुटका झाली.

यानंतर ताईमहाराज प्रकरणांत टिळकांना पुन्हां दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व दंड झाला. परंतु हायकोर्टानें अखेर त्यांना दोषमुक्त करून सोडून दिलें. हा खटला व्यक्तिशः टिळकांवर होता. केसरी पत्रावर नव्हता. केसरी पत्राचे संपादक या नात्यानें टिळकांचें धोरण सरकारला अप्रिय होतें व त्यांच्या सार्वजनिक चारित्र्याला कमीपणा यावा अशा हेतूनें या खटल्यांत कांहीं कारवाई झाली. तथापि, प्रत्यक्ष केसरीशीं त्याचा कांहीं संबंध नव्हता. मात्र इतर रीतीनें व अप्रत्यक्ष रीतीनें हा फौजदारी खटला व एकंदरीनें हें ताईमहाराज प्रकरण केसरीला अनेक रीतींनीं भोवलेंच. त्याचा एक प्रकार असा कीं, या खटल्यांतील कामकाज चालू असतांना टिळकांना तितक्यापुरतें केसरीकडे दुर्लक्ष करावें लागलें; व दुसरा प्रकार असा कीं, केसरीच्या उत्पन्नांतून हजारों रुपये जे केसरीच्या सुधारणेकडे व अभिवृद्धीकडे किंवा सार्वजनिक चळवळीकडे टिळकांना तेव्हांच खर्च करितां आले असते ते फौजदारी खटल्यातील स्वतःचा बचाव व दिवाणी मुकादम्याचे अखेर प्रीव्ही कौन्सिलपर्यंतचें काम चालविण्याकडे त्यांना खर्च करावे लागले. सुदैवानें हें पैसे पुढें परत मिळाले ही गोष्ट वेगळी. परंतु केसरीला ते पैसे पुष्कळ वर्षें खर्चीं घालून बसावें लागलें.

यानंतरचा केसरीवरील सुलतानी आघात सन १९०८ सालच्या खटल्याचा. या खटल्याची हकीकतहि लोकांना चांगली माहीत आहे. यामुळें ती विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. या खटल्यात तर लो. टिळकांना ६ वर्षें काळेपाण्याची म्हणजे हद्दपारीची शिक्षा व एक हजार रुपये दंड झाला. पैकीं दंड मात्र बेकायदेशीर ठरल्यामुळें परत मिळाला. परंतु टिळकांना सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा बहुतेक सर्व भरून द्यावी लागली. ही शिक्षा टिळकांनीं व्यक्तिशः भोगली असली तरी ती एक प्रकारें प्रत्यक्ष केसरीलाच शिक्षा झाली. कारण टिकळांसारख्या संपादकाचा संबंध सहा वर्षें तुटणें ही केसरीसारख्या वर्तमानपत्राला किती मोठी आपत्ति होय, याचें वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. यानंतर १९१७ सालीं टिळकांवर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
3८९१ वि: निबंध
२५७५ नों वि: ३।६।१९५४

राजद्रोहाच्या कलमाखालीं पुनः खटला झाला. मात्र तो फक्त जामीन घेण्यापुरता होता. याही खटल्याचा ताईमहाराज खटल्याप्रमाणें केसरीशीं प्रत्यक्ष संबंध नव्हता. म्हणजे खटला केसरींतील लेखामुळें झाला नव्हता. परंतु होमरूल लीगच्या चळवळीकरितां लो. टिळकांना केसरीद्वारा मिळणारा पाठिंबा हें एक कारण होतेंच; शिवाय खटल्यांतील बचावाकरितां खर्च झाला तो केसरीच्या उत्पन्नांतून करावा लागला. त्याकरितां वेगळी तजवीज झालेली नव्हती.

यानंतर फिरून १९२४ सालीं केसरीवर हायकोर्टाची बेअदबी करण्याचा खटला झाला. तो प्रत्यक्ष केसरींतील लेखाकरितांच होता. व त्यांत संपादक न. चिं. केळकर यांना पांच हजार रुपये दंड व बाराशें रुपये कोर्ट-खर्च मिळून ६२०० रुपये दंड झाला. तो अर्थातच केसरीला झाला. तसेंच १९०८ सालींहि टिळकांच्या खटल्यानंतर मराठा पत्रांत आलेल्या मजकुरावरून श्री. न. चिं. केळकर यांजवर असाच हायकोर्टाचा बेअदबीचा खटला झाला होता. व त्यांत त्यांना १४ दिवस साधी कैद व १२०० रुपये दंड झाला होता. हा दंड अर्थात् केसरी-संस्थेनेंच भरला. याशिवाय सुलतानी आपत्ति म्हटली म्हणजे १९१० च्या प्रेस ॲक्टानंतर केसरीकडून सरकारनें घेतलेली ५००० व मराठ्याकडून घेतलेली १००० रुपयांची जामिनकी ही होय. पण सुदैवानें ही जामिनकीची रक्कम सरकारजमा होण्याचा प्रसंग आला नाहीं. १९२२ सालच्या कमिटीच्या शिफारशींनंतर प्रेस ॲक्ट रद्द झाल्यावर दोन्हींहि पत्रांच्या जामिनकीची रक्कम संस्थेला परत मिळाली. त्याचप्रमाणें १९३० सालीं प्रेस ऑर्डिनन्स निघाल्यावर केसरीकडून पत्र व छापखाना मिळून ३५०० रुपयांची व मराठ्याकडून २००० रुपयांची जामिनकी घेण्यांत आली. तीहि परत मिळाली आहे.

अशा निरनिराळ्या प्रकारच्या आपत्तींतून पार पडून केसरी–मराठा हे आजचा आनंदाचा दिवस पाहत आहेत. केसरीचा आजचा हा एक्कावन्नावा वाढदिवस टिळकांच्या हयातींत पडता तर त्याबद्दल त्यांनाच काय, पण केसरीशीं संबंध असलेल्या सर्वांना किती तरी आनंद झाला असता.

कारण टिळकांचें सर्वच आयुष्य केसरीचें संगोपन व संवर्धन करण्याकडे गेलें. स्वराज्यसंपादन हें टिळकांचें साध्य होतें. आणि जसें ज्यांचें साध्य त्या मानानें त्यांचें साधनहि असावें लागतें. म्हणूनच टिळकांनीं केसरी पत्र हातीं घेऊन त्याची कार्यक्षमता निरनिराळ्या रीतींनी वाढविली. त्यांनीं त्याचा आकार वाढला, पानें वाढविलीं, थोड्या वेळांत पुष्कळ प्रती निघाव्या म्हणून अवश्य ती यंत्रसामुग्री जुळविली, सोयीच्या इमारती बांधल्या, नवीन माणसें हाताशीं घेतलीं. तात्पर्य, केसरीचा वाचकवर्ग व त्याद्वारें पत्राचा लोकोपयोग वाढावा म्हणून जो जो प्रयत्न अवश्य तो तो सर्व त्यांनीं केला.

कोणत्याहि कारागिरीसंबंधानें इंग्रजींत ज्या दोन अर्थपूर्ण म्हणी प्रसिद्ध आहेत त्या टिळकांनीं स्वतःसंबंधानें खऱ्या करून दाखविल्या होत्या. Only a bad workman quarrels with his tools. याला मराठींतील " नाचायला येईना तर म्हणे अंगण वांकडें " ही म्हण बरीच जवळ येते. नाचणारा कुशल असेल तर तो अंगणाचा वांकडेपणा किंवा कोस आपल्या कौशल्यानें काढून टाकतो. त्याप्रमाणे टिळकांनीं कोणत्याहि स्थितींत साधनांच्या कमतरतेबद्दल रडगाणें गाइलें नाहीं, तर आपल्या गुणांनीं त्यांजकडून त्यांच्या मगदुराबाहेर काम करून घेतले. स्पार्टन इतिहासांत अशी गोष्ट आहे कीं, एकदा रणांगणावर निघतांना सेनापतीनें सैनिकांना जवळ बोलावून त्यांना आपल्या हातानें तलवारींची वांटणी करून दिली. पैकीं एकाच्या हातीं तलवार गेली ती दोन अंगुळें आंखूड होती. हें पाहून " मला तलवार आंखूड मिळाली " अशी तक्रार त्यानें केली. तेव्हां सेनापति हंसून म्हणाला, " गड्या, तलवार दोन अंगुळें आंखूड असली म्हणून काय बिघडेल ? तूं इतरांपेक्षां केवळ एकच पाऊल पुढें अधिक उचलून टाक, म्हणजे पाहा तुझी हीच तलवार इतरांच्या बरोबरीची किंबहुना त्यांच्याहून थोडी लांबच होईल ! "

अशाच रीतीनें टिळकांनीं साधनांचा उणेपणा आपल्या कौशल्यानें भरून काढला. कारकीर्दीच्या प्रारंभीं टिळकांची गरिबी होती. तेव्हां 'एडिटरी'चा थाट तर कोठला, पण स्वतंत्र टेबलखुर्चीहि नव्हती ! अशा वेळीं

दा. क्र.

अंथरुणाच्या वळकटीचेंच टेबल करून त्यांनीं केसरीकरितां लेख लिहिले. पण पुढें टेबलावर लिहिलेल्या लेखांपेक्षां ते खचित कमी प्रतीचे नव्हते. पदरीं कारकून नव्हता तेव्हां टिळकांनीं, कंटाळा करीत करीत का होईना, स्वतः हातानें लेख लिहिले. पण पुढें कारकुनाकडून, किंवा एखादे वेळीं तावडींत सांपडल्यास एम्. ए. किंवा एलएल्. बी. अशा श्रेष्ठ पदवीधरांकडून, स्वतः तोंडानें सांगून लिहवून घेतलेल्या लेखांपेक्षां ते पूर्वीचे लेख खचित कमी सरस नव्हते. कारकीर्दीच्या सुरुवातीला केसरी अवघ्या चार पानांचा होता म्हणून कांहीं तेव्हांचे लेख, पुढें तो ८ किंवा १२ पानांचा झाला तेव्हांच्या लेखांपेक्षां कमी परिणामकारक होते असें नाहीं. केसरी किंवा तदनुषंगिक इतर साधनें आपल्या कार्याला केव्हां केव्हां अपुरीं पडतात असें मनांत वाटत असलें तरी त्यांना टिळकांनीं केव्हांहि उघडपणें नांवें ठेविलीं नाहींत. त्यांची सेवा घ्यावी, त्यांचा उपयोग करून घ्यावा, व वरती त्यांची निंदा करावी असला कृतघ्नपणा टिळकांनीं केव्हांहि केला नाहीं.

हें सर्व एका म्हणीसंबंधानें झालें. पण दुसरी जी एक इंग्रजी म्हण आहे तीहि टिळकांना लागू पडते. ती अशी—A Good workman makes his own tools. "तोच खरा चांगला कारागीर कीं जो आपलीं हत्यारें आपणच तयार करतो." आतां एकेकल्या धंद्याला दहावीस यंत्रें लागावीं, आणि एकेकल्या यंत्राचे पांचपन्नास भाग वेगवेगळे तयार करावे लागावे, अशा हल्लीच्या काळीं वरील म्हण अर्थातच अक्षरशः लागू होणार नाहीं. कारण हेन्री फोर्डसारख्या स्वावलंबी व सर्वसंपन्न कारखानदारालाहि अजून कांहीं कांहीं वस्तूंकरितां परक्यावर अवलंबून राहावें लागतें. श्रमविभाग आणि विशेषीकरण हा आधुनिक अर्थशास्त्रांतला एक नियमच होऊन राहिला आहे. तथापि, हल्लीच्या काळांतसुद्धां कांहीं मर्यादेपर्यंत प्रत्येक धंदेवाला आपलीं हत्यारें व साधनें आपणच तयार करतो. आपण सुताराचेंच उदाहरण घेऊं. त्याच्या धंद्याला लागणारीं लोखंडी हत्यारें हीं कांहीं तो स्वतः बनवीत नाहीं. पण या हत्यारांच्या मुठी, रंध्याची चौकट, फूटपट्टी असले जिन्नस तो स्वतःचे स्वतः बनवितो. आपलीं हत्यारें सोयीप्रमाणें शक्य तितकीं ज्याचीं त्यानेंच बनवावीं लागतात, व सुतारापासून घड्याळजीपर्यंत पुष्कळसे देशी धंदेवाले तीं आज तयार करतातहि. टिळकांनीं आपल्या

चळवळीचीं साधनें पुष्कळशीं आपणच निर्माण केलीं व त्यांत केसरी वर्तमानपत्र हें मुख्य होय.

साध्य किंवा ध्येय हें मात्र आपलें, आणि तें साधण्याला लागणारीं साधनें मात्र दुसऱ्याचीं, अशा स्थितींत कोणाचाहि उद्योग यशस्वी होऊं शकत नाहीं. आणि हा अनुभव टिळकांना प्रारंभापासूनच आला. डे. एज्यु. सोसायटी कायमची सोडून देऊन सार्वजनिक चळवळींत पडावयाचें व स्वमतप्रसार करावयाचा हें टिळकांनीं निश्चित केल्याबरोबर, त्यांनीं पहिली गोष्ट केली ती ही कीं, छापखाना व वर्तमानपत्रें यांच्या वांटणींत कर्जासकट वर्तमानपत्रें आपल्या वांटणीला घेतलीं, छापखाना दुसऱ्या भागीदाराला दिला, व स्वतः जबाबदार संपादक होऊन अखत्यारीनें मतप्रसार सुरू केला. यानंतर १८९७ सालीं आर्यभूषण छापखान्यानें, टिळक तुरुंगांत असतां, केसरी छापीत नाहीं असें म्हणून दगा दिला, तेव्हां टिळकांना स्वतःचा छापखाना काढण्याची सहजच इच्छा झाली.

प्रथम केसरीच्या बटवड्याची व जमाखर्चाची व्यवस्थाहि आर्यभूषणाकडेच होती. पण उभयतांतील हितविरोधाचा परिणाम केसरीच्या उपयुक्ततेवर होतो असें दिसून येतांच त्यांनीं आपली स्वतंत्र कचेरी स्थापिली. केसरीच्या पुष्कळ प्रती काढाव्या लागूं लागल्या, तेव्हां छपाईचें मोठें यंत्र त्यांनीं आणिलें. आणि असलें धूड चालावयाचें म्हणून त्याला ऑईल इंजिनाची जोड द्यावी लागली. पुष्कळ प्रती निघावयाच्या म्हणजे अर्थात् टाईप वरचेवर झिजावयाचा, म्हणून टिळकांनीं स्वतःची टाईप फाउंडरी काढली. आणि पुढें त्यांनीं अखंड टाईपाची योजना केली तेव्हां तर घरची स्वतंत्र फाउंडरी असणें आवश्यकच झालें. महायुद्धानंतर स्वराज्याच्या चळवळींत केसरीची लोकप्रियता इतकी वाढली कीं, त्यांना पूर्वीचें ' डबल ' फीडर यंत्रहि पुरेना. म्हणून तासाला सात—आठ हजार प्रती घड्या घालून देईल असलें मोठें यंत्र आणावें लागलें. व या नव्या यंत्रावर चौकोनी रिमाचे कागद निरुपयोगी म्हणून वाटोळे रिळाचे कागद आणावे लागले. आणि छपाईचें यंत्र ' रोटरी ' पद्धतीचें म्हणून ' स्टीरिओ ' करण्याचें यंत्र जोडावें लागलें.

पण याबरोबर सांगण्याची मुद्दयाची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें टिळक छापखान्याच्या उपद्व्यापांत क्रमानें पायरीपायरीनें गुंतत गेले तरी, अखेरपर्यंत ते छापखानेवाले असे केव्हांहि बनले नाहींत. आणि केवळ चळवळीकरितां वर्तमानपत्र व वर्तमानपत्राकरितांच छापखाना, ही विचारसरणी त्यांची केव्हांहि नाहींशी झाली नाहीं. एका संन्याशाची गोष्ट सांगतात कीं, उंदीर आपली वाळत घातलेली लंगोटी खातो म्हणून त्यानें मांजर पाळलें, मांजराला दूध पाहिजे म्हणून गाय ठेवली, गाईला चारा पाहिजे म्हणून शेत घेतलें, शेताला रखवाली पाहिजे म्हणून एक मुलगी नोकरीला ठेवली, आणि शेवटीं त्या मुलीच्या गुणांवर मोहून त्यानें तिच्याशीं लग्न केलें व आश्रमधर्म दूषित केला. पण याच्या उलट टिळकांनीं घरचा छापखाना मोठा व समृद्ध केला तरी वर्तमानपत्राव्यतिरिक्त त्याचा कांहीं उपयोग कधींच केला नाहीं, व केसरी फाउंडरीचा साधा टाईपहि त्यांनीं कधींच विकावयास ठेवला नाहीं. त्यांच्या घरच्या लग्न–मुंजीच्या चिठ्याहि ते दुसऱ्या छापखान्यांतून छापवून आणीत. कारण या खासगी उपयोगाला लागणारें सामान वास्तविक अगदीं थोडी किंमत पडणारें होतें तरी त्यांनीं छापखान्यांत कधीं ठेवलेंच नाही. वर्तमानपत्राबरोबरच ते चार माणसें अधिक ठेवून छापखान्याचा धंदा करते तर तो अगदीं सहज होण्यासारखा होता. पण चळवळ हें ध्येय व वर्तमानपत्र हें जसें त्याचें साधन, त्याचप्रमाणें या साधनरूपी वर्तमानपत्राचें उपसाधन छापखाना इतकीच त्यांची दृष्टि होती. एरवीं छापखान्याचा दुय्यम धंदा करण्याला काय कमी होतें ?

असो. या नव्या मनूंत मतप्रसाराच्या दृष्टीनें पाहतां, स्वतंत्र वर्तमानपत्रासारखें दुसरें परिणामकारक साधन नाहीं ही गोष्ट सामान्य माणसालाहि जर कळते, तर ती टिळकांना उमगली नाहीं हें कसें होईल ? ती त्यांना तेव्हांच उमगली. आणि म्हणून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें त्यांनीं केसरी पत्र घेऊनच सार्वजनिक कार्यांत प्रवेश केला. केसरीची लोकप्रियता यापूर्वींच सिद्ध झाली होती. पण त्यांनीं तें पत्र हातीं घेतल्यापासून ती श्रेढीनें एकसारखी वाढतच गेली. केसरीच्या या लोकप्रियतेत टिळकांच्या चळवळीची लोकप्रियता व उपयुक्तता पूर्णपणें प्रतिबिंबित झाली होती.

इतर देशांची गोष्ट कशाला? पण हिंदुस्थानांतहि नांव घेण्यासारख्या चळवळ्या, म्हणजे मतप्रसाराची आस्था बाळगणाऱ्या, प्रत्येक प्रसिद्ध पुढाऱ्यानें आजवर या दृष्टीनेंच वर्तमानपत्राचा अभिलाष केला होता. मत-प्रसार धावावयाचा तर त्याला स्वार होण्याला हा कागदी घोडा अवश्य असतो. व ज्यांना हा पदरीं बाळगतां येत नाहीं ते निदान मधून मधून तो दुसऱ्याचा मागून घेतात. म्हणजे दुसऱ्याच्या वर्तमानपत्राचा आश्रय करून मतप्रसार करतात. मनुष्य कितीहि उद्योगी, चपळ, बोलतांना न दमणारा व मोठ्या आवाजाचा असला, तरी व्याख्यानें प्रवचनें देऊन किंवा शाळा काढून शिष्य पढवून तो किती लोकांना शिकविणार? तेंच केसरी-सारखें वर्तमानपत्र हातीं असल्यास, दर आठवड्यास हजारों लाखों लोकांशीं मनमुराद अनेक विषयांवर बोलतां येतें. या गोष्टीचें स्वारस्य टिळकांनीं ओळखलें असल्यामुळें सर्व चळवळीकरतां त्यांनीं केसरीच्या संगोपनाकडचें लक्ष कधींहि ढळूं दिलें नाहीं.

आम्ही केसरी आठवड्यांतून दोन वेळां काढण्याचें ठरविल्यामुळें व केसरीचा हा एकावन्नावा वाढदिवस उजाडलेला पाहून ज्यांना विषाद वाटेल असे कित्येक लोक आहेत हें जाणून आहों. कारण टिळक निवर्तल्यापासून त्यांची एकच अपेक्षा होती. ती ही कीं, आतां तरी केसरी बुडावा. टिळकांच्या हयातींत केळकर दहा वर्षें केसरीचे संपादक होते, तथापि त्याला तेव्हां टिळकांचाच आधार होता म्हणून तो चालला व उत्कर्ष पावला हें सरळच आहे. ते निवर्तल्यावरहि कांहीं दिवस लोकांनीं केवळ टिळकांच्या स्मरणार्थ आपला उदार आश्रय चालू ठेवला असेंहि कोणास म्हणतां येण्यासारखें होतें. कारण आकाशांतून तारका मूळ स्थानापासून भ्रष्ट व नष्ट झाल्या तरी त्यांचा पृथ्वीवरील प्रकाश कांहीं काळ टिकतोच. पण पुढें असहकारितेचा धकाधकीचा मामला सुरू झाला तेव्हां टिळकांचा आधार तुटलेल्या केसरीच्या शत्रूंना सोन्याचीच संधि प्राप्त झाली असें वाटलें, व स्वतः त्यांनींहि त्याचा पाडाव करण्याला शक्य तितका हातभार लाविला. कोणी राजकारणांत केसरी मवाळ बनला असें म्हणून, कोणी त्याला म. गांधींचें शत्रुपद देऊन, कोणी खादीचा विरोधी असें म्हणून, कोणी प्रांतवार किंवा भाषावर विरोधी अभिमान जागृत करून, कोणी तो ब्राह्मणपक्षाचा असें ठरवून, तर

कोणी उलटपक्षीं तो सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करतो म्हणून—तात्पर्य ज्याला जें कारण सुचलें तें त्यानें पुढें करून केसरीचा पाडाव करण्याचा प्रयत्न शिकस्तीनें केला. पण या खुळ्यांना हें कळेना कीं, एक अकालीं मेला तरी त्याचें उरलें आयुष्य दुसऱ्याला मिळत नाहीं ! मग केसरी जाग्यावर जिवंत आहे तोंपर्यंत त्याचें आयुष्य इतर कोणाच्या भरतींत कसें पडणार ? ज्याला त्याला आपल्या स्वतःच्या गुणाप्रमाणेंच या जगांत स्थान मिळतें. यामुळें केसरीची निंदा करकरून शिणून भागून ही मंडळी आतां हताश होऊन बसली आहेत !

याच न्यायानें गेल्या दहा वर्षांत अनेक अडचणींना, विरोधांना व उच्छेदक प्रयत्नांनाहि न जुमानतां केसरीची उन्नतीच होत गेली. आणि लो. टिळकांच्या संकल्पाप्रमाणें केसरी आठवड्यांतून दोनदां वाचकांच्या भेटीला जाण्याचा योग आला ही आम्ही टिळकांची पुण्याईच का मानूं नये ? महात्मा गांधींसारखा पुरुष अगदीं तावूनसुलाखून योग्यता पाहून माणसांचा संग्रह करणारा; पण तो तुरुंगांत गेला असतां तेवढ्या अवधींत त्यांच्या वर्तमानपत्राचे तीन संपादक झाले, व त्यांचा खप पंचवीस हजारांच्याहि वर होता तो तीन हजारांवर आला, हें स्वतः म. गांधींनींच एकदां जाहीर केलें होतें ! हा तुलनात्मक विचार मांडण्याचें कारण हेंच कीं, टिळकांची पुण्याई आम्हीं कां व कोणत्या दृष्टीनें म्हणतों हें ध्यानांत यावें. आणि टिळकांचें स्मरण ठेवून, प्रामाणिक तत्त्वनिष्ठेनें, आपल्यांत असेल ती शक्ति व कर्तृत्व या कामांत वेचून, टिळकांनीं निर्माण केलेल्या या ‘ केसरी ’-पत्राला व ‘ केसरी ’ संस्थेला चिरस्थायी उपयुक्त व संग्राहक स्वरूप देण्याचा जसा आमचेकडून प्रयत्न होत आला आहे, तसाच तो पुढेंहि चालू राहील.

# केसरीची मालकी व संपादकीय धोरण

१८९१ सालीं टिळक हे केसरी व मराठा पत्रांचे एकटे एक मालक होईपर्यंत तीं समाईक भांडवल कंपनीच्या मालकीचीं होतीं. ही कंपनी प्रत्यक्ष रजिस्टर झाली नव्हती. खासगी भागीदारीची होती. पण आर्थिक भांडवलाप्रमाणें बुद्धीचें भांडवलहि समाईक होतें, यामुळें या वर्तमानपत्रांच्या कामांत भांडणें झालीं. या भांडणांत राजकारणांतील मतभेद हे मुख्य नसून खरें भांडण सामाजिक सुधारणेच्या तत्त्वांविषयीं होतें. या मतभेदाचा इतिहास व त्यापासून मिळणारा बोध हें महत्त्वाचें असल्यामुळें त्याची हकीकत प्रथम देतों, व नंतर त्यापासून मिळणाऱ्या बोधाविषयीं लिहितों.

टिळक-आगरकर हे न्यू इंग्लिश स्कूलांत आले ते येतांना सामाजिक बाबतींतला आपला मतभेद आपल्याबरोबरच घेऊन आले. प्रथम हे मतभेद विकोपास गेले नाहींत. ‘ केसरी ’ हें एकच पत्र असलें तरी त्यांत लिहिणारे लोक अनेक आहेत हें सर्वांना कळून चुकलें होतें. वाचकवर्गाप्रमाणें लेखकवर्गहि सहिष्णु असून परस्परांच्या मताविरुद्ध कांहीं लेख केसरी–मराठ्यांत आल्यास त्याबद्दल त्यांना कागाळी करतां येत नसे, व ते करीतहि नसत. या सहिष्णुतेस एका शहाणपणाच्या योजनेनें चांगला वाव मिळाला होता. ती योजना अशी कीं, एखाद्या लेखकास एखाद्या विषयावर सर्वसामान्य अशा मतास सोडून जाणारे, किंवा अत्युत्कट, विचार व्यक्त करावयाचे असल्यास त्यानें ते आपल्या सहीवर लिहावे. किंवा सही न घातल्यास ‘ लिहून आलेला मजकूर ’ या व्यापक सदराखालीं ते छापावे. म्हणजे भाषा विचारसरणी यावरून लेख कोणाचा हें प्रायः वाचकांस उमजून येऊन स्वमतप्रकाशनाचें श्रेय व्यक्तिमात्रास मिळेल. शिवाय संपादकीय धोरणाला चित्रविचित्रत्वाचें किंवा चंचलतेचें दूषण लागणार नाहीं. माधवराव गोळे वगैरे गृहस्थ असे प्रच्छन्न लेख मोठ्या आवडीनें लिहीत. प्रायः केसरीशीं त्यांचीं मतें जुळणारीं होतीं व न जुळत तेव्हां ते उपरिनिर्दिष्ट सवलतीचा फायदा घेत. पण गोळे हे केसरीचे संपादक केव्हांहि नसल्यानें त्यांना आपल्या मताचा हेका चालविण्याचा हक्कहि नव्हता.

पण आगरकरांची गोष्ट वेगळी होती. ते स्वतः संपादक असल्यामुळें, मतभेदाची अडचण त्यांना फार भासली. आपलीं मतें लिहावीं तर न्यू स्कूलांतील आपले समान अधिकारी लोक नाखुष होणार. त्यांचीं मतें लिहावीं तर ती गोष्ट स्वतःच्या विवेकबुद्धीला नापसंत. 'लिहून आलेला मजकूर' म्हणून आपला लेख घालावा तर आपल्याच घरांत हवें तसें बसण्या-उठण्याच्या चोरीची लाज वाटावी. आणि स्वतःच्या सहीवर लेख प्रसिद्ध करावा तर स्वतः घरधनी असतां आपण आपल्यालाच भाडेकऱ्याप्रमाणें भाडेचिठी लिहून देण्याचा प्रसंग ! न्यू स्कूलच्या मंडळींत सामाजिक बाबतींत प्रायः टिळकांच्याच बाजूचें बहुमत असे, आणि आगरकर हे केसरीचे संपादक होते तरी त्यांच्या एकटल्ठी विचारांचा जाच इतरांना दुःसह असे, यामुळें आगरकरांना लवकरच पडतें घ्यावें लागलें.

सामाजिक मतभेदामुळें प्रथम आगरकर हे केसरी सोडून गेले तसेच पुढें प्रो० वासुदेवराव केळकर हे मराठा सोडून गेले. रमाबाईसंबंधाचा वाद १८९१ जून महिन्यामध्यें जाहीर रीतीनें सुरू झाला व या विषयावर टिळकांनीं केसरींत पांचचार झणझणीत लेख लिहिले. सुधारक, सुबोध-पत्रिका वगैरे पत्रें सहजच पंडिता रमाबाईच्या बाजूचीं, किंवा विशेष सूक्ष्म रीतीनें बोलावयाचें तर रमाबाईशीं सहानुभूति दाखविणाऱ्या भांडारकर, रानडेप्रभृतींच्या बाजूचीं होतीं. पण त्यांत अकस्मात् 'मराठा' पत्राचीहि भर पडली. सरकार व सामाजिक सुधारणा यांच्यासंबंधापुरतें वासुदेवराव केळकर हे टिळकांच्याच मताचे होते; पण निवळ भांडारकर-रानडे यांच्या-पुरता वाद उत्पन्न झाला तेव्हां, वासुदेवराव केळकर यांची सहानुभूति त्यांच्याकडे वळली, व मराठ्यांतून केसरीच्या धोरणाविरुद्ध लेख येऊं लागले. याचा फायदा प्रतिपक्षीयांनीं सहजच घेतला. ते म्हणूं लागले कीं, 'पहा, मराठेकर्ते देखील केसरीकारांविरुद्ध !' या मुद्द्यावर टिळकांनीं केसरींत खालीलप्रमाणें उत्तर दिलें, "आमच्या लिहिण्यावर पहिला आक्षेप असा आहे कीं, आमचीं मतें आमचे मित्र व बंधु यांच्याहून भिन्न आहेत. जणूं काय सर्व बंधूंचीं व मित्रांचीं मतें एक असावींत असा ईश्वरी संकेतच आहे ! आमच्या बंधूचें मत निराळें होऊं नये अगर त्यांस कोणी गणेशटोपी घालूं नये याचा आम्ही कधींहि जिम्मा घेतला नाहीं. अमुक एका मनुष्याचें

मत भिन्न असलें म्हणजे तो आपला मित्र किंवा बंधु होत नाहीं अशी ज्यांची कल्पना असेल त्यांनीं या गोष्टीस पाहिजे तितकें महत्त्व द्यावें. आमचें कुलव्रतच असें आहे कीं, हायकोर्टाच्या जज्जापासून तों ( सुबोध ) पत्रिकेच्या एडिटरांपर्यंत कोणाचीहि भीडमुर्वत न धरितां किंवा माझा बाप, काका, मामा, भाऊ, बायको, मुलगे यांचें अमुक मत आहे याचा विचार न करितां जें आपणांस खरें दिसेल तें सकारण लोकांपुढें मांडावें. आणि ईश्वराच्या कृपेनें केसरीकारांची प्रस्तुत अशी स्थिति आहे कीं, त्यास कोणाहि राव-बहादुराची पर्वा न ठेवितां किंवा त्यापासून आपल्या अमुक एक संस्थेचें नुकसान होईल ही गोष्ट मनांत न अणतां लिहिण्यास मोकळीक आहे. अशा स्थितींत आम्ही आमच्या बंधूंप्रमाणें या विषयाचें गुळखोवरें केलें नाहीं हें साहजिक आहे. ”

मतभेदाची कड इतकी पोचल्यावर कोणी तरी एकजण दोन्ही पत्रांचा मालक निदान संचालक व्हावा ही गोष्ट आवश्यकच झाली. केसरीच्या संपादक मंडळांपैकीं क्रमानें टिळक व आगरकर व नंतर टिळक व वासुदेवराव केळकर यांच्यामध्यें तीव्र मतभेद कसे झाले, आणि केसरी-मराठा पत्रें आणि आर्यभूषण छापखाना यांची फारकत कशी झाली हें इतक्या विस्तारानें सांगण्यांत आमचा मुख्य हेतु एकच आहे. तो हा कीं, संयुक्त भांडवलाची पद्धति व्यापार व उद्योगधंदे यांना जशी अवश्य किंवा उपयोगी आहे, तशीच वर्तमानपत्रांच्या बाबतींतहि ती आवश्यक व उपयोगी ठरते. पण आवश्यकता व उपयोग कितीहि असला तरी ती हटकून यशस्वी होतेच असें मात्र नाहीं. जॉइंट स्टॉक कंपन्यांचा इतिहास लोकांना आतां विदितच आहे. तो थोडक्यांत असा. कोणी तरी एक कल्पक मनुष्य एखादी फायदेशीर व्यापाराची किंवा उद्योगधंद्याची कल्पना मनांत घेऊन निघतो, व प्रथम समान उत्साही अशा मित्रांची मदत घेतो. हें सर्व स्वतःचें थोड-थोडें भांडवल घालतात. मग आपण हातीं घेतलेला उद्योग कल्पनेबाहेर फायदेशीर आहे असें लोकांना भासवून त्यांचें भांडवल ओढतात. पण लाभाच्या मोहाला बळी पडलेले हे इतर लोक मूळ कराराचे कागदपत्र वगैरे नीट पाहात नाहींत. मग कल्पनेप्रमाणें नफा न झाला म्हणजे भागांची किंमत कमी होते. बुडत्या जहाजांतून उंदरांनीं तोंडांत सांपडतील ते चार

दाणे घेऊन पळून जावें त्याप्रमाणें, आपले भाग मिळेल त्या किंमतीला विकून कांहींजण मोकळे होतात व उरलेले म्हणजे आळशी किंवा हताश झालेले उंदीर भागीदार जहाजाबरोबर समुद्राच्या तळाशीं जातात. मात्र जहाजांत कोठें काय सांठविलें आहे याची माहिती असणारे व पोहतां येणारे खलाशी हातीं लागेल तें घेऊन एखाद्या होडीवर चढून किनारा गांठतात त्याप्रमाणें जॉइंट स्टॉक कंपन्यांचे उत्पादक किंवा व्यवस्थापक हेच तेवढे अखेर बचावले जातात. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, भांडवलाचा संयुक्तपणा प्रारंभीं असतो तसा पुढें टिकत नाहीं. तीच गोष्ट संयुक्त बुद्धि-भांडवलानें उभारलेल्या वर्तमानपत्रांची होय. विलायतेंत संयुक्त भांडवलाची पद्धति अधिक परिचित म्हणून तिकडे कदाचित् आपल्याइतके तंटे होत नसतील. याचें कारण, भांडवल संयुक्त असलें तरी कारभार एकतंत्री एका हातीं राहावा यांत कारखान्याचें यश सांठविलेलें असतें ही गोष्ट त्यांना पुरी माहीत असते. पण हें ज्ञान जेथें कमी पडलें तेथें वर्तमानपत्रांचे कारखाने नीट चालले नाहींत.

या सर्व भानगडीपासून बोध काय घ्यावयाचा हें सामान्य वाचकालाहि सुचेल. मग तो टिळकांसारख्या गृहस्थाला सुचला यांत नवल नाहीं. म्हणून त्यांनीं मतभेद होऊं लागतांच केसरी–मराठा पत्रें एका कोणाचीं तरी व्हावीं असें ठरविलें, व इतरांपेक्षां मतप्रसाराची हौस अधिक म्हणून टिळकांनींच तीं आपल्या मालकीचीं करून घेतलीं. परंतु मालक असला नसला तरी संपादकाला ‘ सल्लागार मंडळ ’ नेमून देणें व त्याच्या सल्ल्यानें वर्तमानपत्र चालविणें ही गोष्ट शक्य नाहीं हें अजून टिळकांच्या अनुभवाला आलें नव्हतें. म्हणून त्यांनीं १९०९ सालच्या ब्रह्मदेशांत केलेल्या मृत्युपत्रांत, आपल्या गैरहजेरींत केसरी–मराठा पत्रांचें धोरण सुरळीत राहण्याकरितां म्हणून एक पांच-सहा गृहस्थांचें सल्लागार मंडळ नेमून दिलें होतें ही गोष्ट तें मृत्युपत्र वाचणारांच्या लक्षांत येईलच. पण याहि गोष्टीचें वैय्यर्थ्य पुढें त्यांच्या लक्षांत आलें. तुरुंगांतून सुटून आपण परत जाऊं, व तोंपर्यंत वरील व्यवस्थेनें कांहीं घोटाळा झाला तर तो आपण यथावकाश दुरुस्त करूं असें टिळकांना कदाचित् वाटलें असावें. परंतु ते तुरुंगांतून परत

आल्यावर या बाबतींत त्यांच्या मनानें सर्वस्वीं उलट खाल्ली. ती अशी कीं, संपादकाला सल्लागार मंडळ नेमून देणें व त्यांचा सल्ला ऐकण्याचें बंधन त्याजवर घालणें ही सर्वस्वीं चूक होय, ही गोष्ट त्यांनीं प्रस्तुत लेखकाजवळ एकदां स्पष्टच कबूल केली. ते म्हणाले, ' जहाजाच्या सुकाणूप्रमाणें वर्तमान-पत्रांचें धोरण कोणा तरी व्यक्तीच्या हातीं जबाबदारीनें ठेवलें पाहिजे. मग तो तारो मारो बुडवो कांहींहि करो. तशी भीति दिसूं लागली तर लगेच मालकानें त्या संपादकाच्या हातून वर्तमानपत्र काढून घ्यावें, व आपल्याला योग्य वाटेल तो दुसरा कोणी संपादक नेमावा. पण जबाबदार संपादक एक आणि बेजबाबदार सल्लागार मंडळ दुसरें, अशी पायांत पाय घालण्याची योजना झाल्यास वर्तमानपत्र हटकून बुडालेंच पाहिजे, आणि या बदललेल्या मताचा पुरावा, विलायतेहून परत आल्यावर केसरी—मराठा पत्रांची जी व्यवस्था टिळकांनीं केली तींत दिसून येतो. ब्रह्मदेशाहून परत आल्यावर त्यांनीं केसरीचें डिक्लेरेशन पुन्हां स्वतः केलें नाहींच, पण विलायतेहून परत आल्यावर केसरीसंबंधीं इतर जबाबदारीची व्यवस्था त्यांनीं सर्वस्वीं प्रस्तुत लेखकावर सोंपविली. कोणतीहि महत्त्वाची गोष्ट उपस्थित झाली असतां ते म्हणत कीं, " मला वाटल्यास सल्ला विचारा, सुचेल तो सांगेन. पण यापुढें जी व्यवस्था व्हावयाची ती माझ्या पश्चात् तुम्हांलाच अमलांत आणावयाची म्हणून तुम्हींच काय वाटेल तें जबाबदारीनें व दूरवर विचार करून ठरवा. " म्हणून त्यांनीं केसरीचें डिक्लेरेशन आपल्या हयातींतच समक्ष सांगून प्रस्तुत लेखकाकडून करविलें, व बेजबाबदार सल्लागारांचें कडें त्याच्या गळ्यांत अडकविलें नाहीं. आणि त्याप्रमाणें खुद्द टिळकांच्या हयातींत जे एक-दोन नवीन तरुण उपसंपादक नेमले गेले ते प्रस्तुत लेखकानेंच आपल्या माहितीनें व जबाबदारीवर नेमले. आपल्या मागें आपलीं पत्रें किती दिवस जगतील किंवा चांगलीं चालतील या बाबतींत टिळकांचें मत काय असेल याविषयीं कोणीहि खुशाल आपलें मत हवें तसें चालवावें; परंतु वर्तमानपत्रें आपल्या पश्चात् चालावयाचीं तीं सर्वस्वीं एकाच्याच तंत्रानें चालावीं, मग तीं तो बुडवो किंवा टिकवो. तें पत्रांचें नशीब, हें टिळकांचें मत ठाम निश्चित होतें येवढें आम्ही सांगूं शकतों.

सन १९०२ नंतर टिळकांनीं केसरीच्या धोरणासंबंधानें जाहीर विवेचन

केसरींतून फारसें केलेलें आढळत नाहीं. कारण १९०२ नंतर तसा प्रसंग कधीं आला नाहीं, व १९०८ पासून पुढें ते केसरीचे जबाबदार संपादक नव्हतेच. पण १९०२ सालीं केसरीच्या चार पानांचीं आठ पानें झालीं त्या महत्त्वाच्या प्रसंगीं टिळकांनीं केसरीच्या धोरणाचा कांहीं खुलासा केला होता त्यांतील उतारा मुद्दाम खालीं दिला आहे. एकतंत्री व्यवस्था व निश्चित धोरण यांचा लाभ केसरीला झाला व या दोन गोष्टींमुळें ( अर्थात् इतर कारणेंहि होतींच ) केसरीच्या प्रगतीला फार मदत झाली.

" केसरीनें मराठी वर्तमानपत्रांच्या व वाचकांच्या अभिरुचीला वेगळी दिशा लावली. ही दिशा कोणती याबद्दल थोडेंसें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. २० वर्षांपूर्वीं इंग्रजी शिकलेल्या लोकांस वर्तमानपत्रांत एखादा लेख लिहिणें असल्यास तो इंग्रजींतच लिहावा वाटत असे. कोठेंहि उत्कृष्ट इंग्रजी लेख आले म्हणजे त्याचें मराठींत भाषांतर करावें अशी त्या वेळची पद्धति होती. इंग्रजींतील लेख प्रधान व मराठींतील गौण अशी स्थिति असल्यावर सदर लेखांच्या वाचकवर्गाची व्याप्तीहि इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या पलीकडे फारशी गेली नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. त्या वेळच्या व हल्लींच्या काळांत मोठा फरक म्हटला म्हणजे हा कीं, वीस वर्षांपूर्वीं मराठी वर्तमानपत्रांतून लेख लिहिणारे प्रसिद्ध गृहस्थ आपले लेख मुख्यत्वेंकरून इंग्रजी शिकलेल्या लोकांकरिताच आहेत असें समजत. आणि त्या वर्गास ते पसंत पडले म्हणजे आपलें काम झालें असें मानीत. पण त्याखेरीज त्या वर्गापलीकडेहि निवळ मराठी लिहितां वाचतां येणारांचा एक मोठा वर्ग आहे, व त्यांच्या हिताहिताची चर्चा आपणांस कर्तव्य आहे असा अलीकडे लेखकांच्या समजुतीत स्पष्ट बदल होत चालला. नुसत्या इंग्रजी शिक्षणानें हरएक बाबतींत एक प्रकारचा पूर्वापार परिस्थितीशीं विसंगत असा परकेपणा उत्पन्न होऊन इंग्रजी शिकलेल्या लोकांस त्याबद्दल थोडा अभिमानहि वाटत असतो. पण हा अभिमान पुष्कळ वेळां, इंग्रजी न शिकलेले पण समजूतदार असे लोक असतात त्यांच्यामध्यें व इंग्रजी शिकलेल्या लोकांमध्यें पूर्ण ऐक्य होण्यास आड येतो. ह्या अडचणी काढून टाकून पूर्ण इंग्रजी शिकलेल्या लोकांखेरीज इतर वर्गाचें म्हणणें काय आहे, त्यांचे कांहीं आक्षेप असल्यास ते सयुक्तिक

आहेत कीं नाहींत, हें त्यांच्यापैकीं एक आपण आहोंत व आपणांस जो कांहीं उद्योग करावयाचा आहे तो त्यांच्या हिताकरितांच आहे आणि तो त्यांस बरोबर घेऊनच केला पाहिजे, अशा समजुतीनें पाहण्याची किंवा त्याबद्दल चर्चा करण्याची केसरीनें सुरुवात केली. निदान तसाच सर्रास प्रघात पाडला असें म्हणण्याला हरकत नाहीं.

" नवे विचार आणि नव्या गोष्टी लोकांस सांगतांना, त्यांना केवळ मूर्ख न मानतां युक्तीनें व धोरणानें नव्या-जुन्याचा मेळ घातला पाहिजे, असेंच केसरीकारांचें स्पष्ट मत आहे. केवळ इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या विचारावर भिस्त न ठेवतां, समाजाचें हिताहित ठरवितांना मोठ्या वाचक वर्गाच्याहि समजुती जमेस धरल्या पाहिजेत. इतकेंच नव्हे तर योग्य असतील त्यांचें समर्थन केलें पाहिजे. अशा रीतीनें वागण्याचा केसरीकारांचा संकल्प आहे. मग कोणी निंदा करो कीं स्तुति करो ! "

राजकीय बाबतींत केसरीच्या धोरणासंबंधानें लिहितांना टिळकांनीं असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, " आम्हांस कोणाचें राज्य घ्यावयाचें नाहीं. तर आमच्या लोकांची स्थिति सुधारण्याकरितां हल्लींच्या राज्यछत्राखालींच त्यांना तयार करावयाचें आहे; व हा जोंपर्यंत आमचा हेतु आहे तोंपर्यंत आम्हांस कोणासहि भिण्याचें कारण नाहीं. केसरीचा जन्म झाला तो लिटनसाहेबांच्या कारकीर्दींत मुद्रणस्वातंत्र्याचा कायदा झाला त्या वेळीं. राज्यकर्त्यांस गोड गोड न वाटली तरी कडू न वाटेल अशा तऱ्हेनें लेख लिहिण्याची पूर्वीं पद्धति होती. पण तिची वेळ आतां गेली. लोकांत जागृति, खळबळ व संघशक्ति उत्पन्न करणें हेंच वर्तमानपत्रकार या दृष्टीनें आमचें मुख्य कर्तव्य आम्ही समजतों. आम्ही केसरींत जे लेख लिहितों ते केवळ राज्यकर्त्यांकरितां नसून आमच्या मनांतले विचार, आमच्या मनांतील तळमळ किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनांत उतरावी येवढ्याकरितांच आहे; व आमच्या लेखांचा जर असा परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असें आम्ही समजूं, " किं कवेस्तेन काव्येन किं कांडेन धनुष्मतः । परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः ॥ " अशी जी एक संस्कृत उक्ति आहे तीच वर्तमानपत्रासहि लागूं आहे."

ж ж ж

# केसरीचा व तुरुंगाचा ऋणानुबंध

केसरी-मराठा पत्रांशीं निरनिराळ्या वेळीं कमी-अधिक संबंध आलेल्या लोकांपैकीं बहुतेकांस राजकीय गुन्हेगार म्हणून तुरुंगवास घडलेला आहे. किंवा त्यांजवर खटले झालेले आहेत. ते कसे हें खालील यादीवरून दिसून येईल.

१. लो. टिळक-१८८२, चार महिने कैद. १८९७, दीड वर्ष सक्तमजुरी. १९०८, सहा वर्षें काळेपाणी.

२. प्रो. आगरकर-१८८२, चार महिने कैद.

३. न. चिं. केळकर-१९०८, चौदा दिवस कैद व १२०० रु. दंड. १९२५, बासष्टशें रुपये दंड.

४. कृ. प्र. खाडिलकर-१९२८, तीन हजार रु. दंड. १९२९, एक वर्ष कैद.

५. ज. स. करंदीकर-१९२२, तीन महिने सक्तमजुरी.

६. दा. वि. गोखले-१९३०, आठ महिने कैद.

७. ग. वि. केतकर-१९३०, नऊ महिने कैद.

८. वा. कृ. भावे-१९०८, एकशेपस्तीस रुपये दंड.

९. वामन मल्हार जोशी-१९०९, तीन वर्षें सक्तमजुरी.

१०. पांडुरंग महादेव बापट-१९२३, सात वर्षें सक्तमजुरी.

११. डॉ. वि. म. भट-१९१०, पांच वर्षें सक्तमजुरी.

या बाबतींत लो. टिळकांच्या मनाच्या मोठेपणाची म्हणून एक गोष्ट सांगण्याची ती अशी कीं, पूर्वीं तुरुंगांतून सुटका होऊन बाहेर आलेल्या मनुष्यांचा म्हणजे राजकीय गुन्हेगारांचा, छळ सरकार फार करीत असे. त्याचा प्रकार असा कीं, त्यांच्यामागें पोलिसांचा ससेमिरा लावून द्यावयाचा. यामुळें कोणास त्यांना मनांतून थारा द्यावासा वाटला तरी तसें करण्यास ते सहजच भीत. या कारणानें आधींच तुरुंगवासांतून यावें. व नंतर बेकार व्हावें,

अशी आपत्ति पुष्कळांवर तेव्हां येई. म्हणून टिळकांनीं साधारणपणें असा क्रम ठेवला होता कीं, राजकारणाच्या चळवळींत शिक्षा भोगून आलेला मनुष्य आपल्या साहाय्यक उपसंपादक मंडळांत घेऊन, त्याला कांहीं तरी कायमचा असा इतर उद्योग लागेपर्यंत त्याचा चरितार्थ चालवावयाचा. डॉ. भट, पांडुरंग महादेव बापट, वामन मल्हार जोशी हे गृहस्थ वरील प्रकाराचीं उदाहरणें होत.

# केसरी संस्थेची सांपत्तिक स्थिति

[ वर्तमानपत्रासारखी कोणतीहि संस्था नीटपणें चालण्यास तिची सांपत्तिक स्थिति सुस्थिर पायावर अधिष्ठित पाहिजे हें उघड आहे. तशी स्थिति लो. टिळकांच्या हयातींत होती असें पूर्वी दिलेल्या इतिहासावरून म्हणता येणार नाहीं. १८९१ साली टिळकांनीं केसरी घेतला तोच मुळीं सात हजारांच्या कर्जाच्या बोजानिशी. पुढें १८९७ सालीं राजद्रोहाचा खटला होऊन टिळक जामिनावर परत आले, तेव्हां मृत्युपत्र लिहिण्याचें कल्पनेनें टिळकांच्या डोळ्यांना पाणी आलें; कारण मृत्युपत्र करण्याला मिळकतच कांहीं नव्हती ! पुढें १९०४ सालापर्यंत ताईमहाराज प्रकरण निघालें. त्या दत्तक प्रकरणामुळें टिळकांना हजारों रुपये स्वतःचे खर्च करावे लागले. पुढें १९०८ चा खटला निघाला. त्यानंतरचीं सहा वर्षे केसरीला विवंचनेचीं होतीं. पहिल्या महायुद्धाच्या काळांत केसरीची सांपत्तिक स्थिति सुधारली, पण पुढें चिरोल केसचा निकाल उलट झाल्यामुळें सर्व पारडें फिरलें. आणि जर लोकांनीं पर्स फंड जमवून चिरोल केसच्या खर्चाचे तीन लक्ष रुपये टिळकांना दिले नसते तर केसरी आकंठ कर्जांत बुडाला असता; आणि दरसाल व्याजाचे हप्ते भरतांनाच केसरी संस्थेचीं कित्येक वर्षे जाती; आणि स्वतः टिळकांच्या चिरंजीवांना खासगी मिळकत कांहींहि शिल्लक न राहती ! १९१८ सालीं कोलंबोस जातांना टिळकांनीं मृत्युपत्र केलें. सुदैवानें तें शिल्लक होतें, व चिरंजीवांनाहि तें नाकारतां येण्यासारखें नव्हतें. त्याच्याच आधारावर लो. टिळकांच्या इच्छेनुसार केसरी संस्थेचें ट्रस्टमध्यें रूपांतर झालेलें आहे, टिळकांच्या हयातींत केसरी-मराठा पत्रें त्यांच्या खासगी मालकीचीं असल्यामुळें कामगारांसंबंधीं नियम, बोनस, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी वगैरे कांहीं नव्हतेंच; आणि १८९६ पासून १९१९ सालीं श्री. केळकर विलायतेस जाईपर्यंत त्यांना अवघा शंभर रुपये पगार होता ! मग इतर सर्व उपसंपादकांचे पगार त्याखालीं असतील हें सांगण्याचें कारणच नाहीं ! केसरी संस्थेला संस्थेचें असें व्यवस्थित स्वरूप प्रथम न. चिं. केळकर यांनींच दिलें. कामगारांचे पगार, नियम, बोनस, प्रॉव्हिडंट फंड वगैरे सर्व

व्यवस्था त्यांनीं उत्तम लावली व पुढील दहा वर्षांत केसरीचा इतका उत्कर्ष केला की, केसरीच्या शिलकेंतून तीन लक्ष रुपये बाजूला काढून व त्याचा ट्रस्ट करुन, चिरोल केसच्या वेळीं लोकांनीं जे तीन लक्ष रुपये पर्स म्हणून टिळकांना दिले होते तें त्यांनीं लोकांना परत दिले. लो. टिळकांच्या वारसांनीं त्याच्याकरितां काय केलें असेल तें असो, पण त्यांच्या राजकीय वारसांनीं म्हणजे केसरीच्या पहिल्या ट्रस्टींनीं टिळकांना अनृणी केलें हें पाहून टिळकांच्या आत्म्यानें स्वर्गांत खचित आनंदाश्रु ढाळले असतील ! १९३० सालीं केसरीच्या सुवर्ण ज्युबिलीनिमित्त केसरीनें जो खास विस्तृत अंक काढला त्यांत केसरीचे ट्रस्ट डीड, टिळकांच्या वारसांची सांपत्तिक स्थिति वगैरे हकीगत तपशीलवार दिलेली असलीं तरी, स्वतःबद्दल कांहींहि लिहिण्याला सदभिरुचीची ती एक मर्यादाच होती. तथापि, ही गोष्ट वगळून, केसरीच्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें त्यांनीं ज्या इतर गोष्टी लिहिल्या त्याहि वृत्तपत्राच्या इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असल्यामुळें पुढें दिल्या आहेत.

—संपादक ]

लो. टिळकांच्या मृत्यूपर्यंत त्यांची केसरी—मराठा ही मिळकत सर्वस्वीं खासगी स्वरूपाची होती; तथापि तिलाहि एक प्रकारें निमसार्वजनिक स्वरूप आहे असेंच ते मनानें मानीत व तें त्यांच्या कृतीवरूनहि दिसून येई. १९०८ च्या खटल्यापासून, किंवा १९०९ सालीं ब्रह्मदेशांत केलेल्या मृत्युपत्रापासून आपल्या या विशिष्ट मिळकतीचें स्वरूप टिळकांनीं एखाद्या ट्रस्टप्रमाणें मानलें होतें. म्हणजे त्या मिळकतीच्या उत्पन्नाच्या कांहीं भागावर मनानें त्यांनीं स्वत्वनिवृत्ति केल्यासारखी होती. अर्थात् ते मालक असल्यामुळें जो कांहीं सार्वजनिक खर्च करणें तो ते आपल्या एकट्याच्या इच्छेनें व अखत्यारीनेंच करीत. पण प्रवास, देणगी, धर्मादाय, मतप्रसार, सत्कार्योत्तेजन व राजकीय चळवळी इत्यादिकांवर जो खर्च ते करीत त्यावरून त्यांनीं आपल्या मिळकतीच्या साधनाचें, म्हणजे केसरीपत्राचें उत्पन्न हें कसें व किती सार्वजनिक स्वरूपाचें मानिलें होतें हें दिसून येतें.

केसरी संस्थेच्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें प्रारंभींच एक-दोन गोष्टी

समजुतीकरितां स्पष्ट केल्या पाहिजेत. १९१६ सालाचा 'ज्युबिली फंड' केसरी ट्रस्टपासून अगदीं स्वतंत्र आहे व तो सर्वच्या सर्व शिल्लकहि आहे. होमरूल-लीग फंडापैकीं खर्च झाला तो कांहीं दहा वर्षांपूर्वीं सर्वस्वीं त्याच कार्याला झाला, व उरलेल्या शिलकेचा ट्रस्ट करण्यांत आला असून तोहि स्वतंत्र आहे. केसरी संस्थेशीं त्याचाहि संबंध कांहीं नाहीं. नैमित्तिक प्रसंगीं, म्हणजे टिळकांवरील खटले वगैरे झाले त्या वेळीं वर्गण्या झाल्या त्यांचा खर्च त्याच विशिष्ट कामांवर झाला. आणि १९१९ सालीं चिरोल केसकरितां सुमारें तीन लक्षांचा जो फंड लोकांनीं टिळकांसाठीं उभारला त्याची परतफेड गेल्या ता. १ ऑगस्ट सन १९३० रोजीं स्वतंत्र ट्रस्ट डीडनें करण्यांत आलेलीच आहे. म्हणजे त्या ट्रस्ट फंडाच्या रकमेचाहि आतां केसरी संस्थेशीं कांहीं संबंध उरलेला नाहीं. अशा रीतीनें टिळकांच्या हयातींत त्यांना उद्देशून किंवा त्यांच्या मदतीनें, उत्तेजनानें उभारलेल्या फंडांचा परस्पर विनियोग झालेला असून, त्यांतील एक पै देखील स्वतः टिळकांच्या किंवा केसरी–मराठा पत्रांच्या खास उपयोगाकडे केव्हांहि खर्च झालेली नाहीं.

ता. १ ऑगस्ट सन १९३० रोजीं ट्रस्ट करून बाजूला काढून ठेवलेल्या तीन लक्ष रुपयांशिवाय, गेल्या दहा वर्षांत केसरी ट्रस्ट संस्थेनें सार्वजनिक स्वरूपाचा असाहि बराच खर्च केला आहे. म्हणजे मतप्रसारार्थ इतर विशिष्ट प्रकारच्या वर्तमानपत्रांना व छापखान्यांना मदत दिली. मतप्रसारार्थ व्याख्याते बाहेर पाठविले. प्रचारकांना प्रवासखर्च वगैरेची मदत केली. लेखकांना मोबदला किंवा मेहनताना म्हणून मदत केली. राष्ट्रीय पक्षातर्फे निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारांना द्रव्यसहाय्य केलें. तसेंच शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, व्यायामविषयक, धर्मविषयक वगैरे संस्थांना व कार्यांना निर-निराळ्या वेळीं देणग्या देऊन उत्तेजन दिलें.

केसरीच्या गुणदोषांची चर्चा अर्थातच तिऱ्हाइताकडून होणें योग्य. तथापि एक गोष्ट अशी आहे कीं, तिची माहिती बाहेरच्या लोकांना फारशी असण्याचा संभव नसतो. आणि तिच्याविषयीं काढलेल्या यथार्थ उद्गारांत जर आत्मस्तुति किंवा प्रौढी यांची थोडीशी झांक उमटली तर ती क्षम्य मानतां येईल. ही गोष्ट म्हटली म्हणजे केसरी–मराठा संस्थेची निरपेक्षता.

सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनीं आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकांत टिळक व केसरी यांच्यासंबंधानें पुष्कळ खोटीं विधानें केलीं आहेत. पण त्यांतल्यात्यांत खोटेपणांत व खोडसाळपणांत पहिला नंबर पटकावणारें जर एखादें विधान असेल तर तें लोकांकडून धाक दाखवून पैसे व वर्गण्या काढण्यासंबंधाचें होय. चिरोलसाहेबांना आपल्या देशांतील पुष्कळ वर्तमानपत्रांचा व हिंदुस्थानांतील कांहीं वर्तमानपत्रांचा अनुभव असेल. त्यावरून त्यांनीं हें विधान अनुमान-धपक्यानें केलें असलें पाहिजे हें उघड आहे. केसरी-मराठा संस्थेचा निकट परिचय असणारा कोणताहि मनुष्य वरील आरोप खोटा असल्याचें कबूल करीलच करील.

हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रें सामान्यतः द्रव्यवश नसतात ही गोष्ट प्रसिद्ध व मान्य आहे. तथापि, विलायतेप्रमाणें इकडेहि थोडथोडे अनुभव येतात, नाहीं असें नाहीं. कित्येक वर्तमानपत्रकार प्रत्यक्ष पैसा घेत नसतील. परंतु त्या पत्राच्या प्रती पुष्कळशा विनाकारण विकत घेणें व आपल्या कचेऱ्यांतून लोकांना फुकट वाचावयास देणें, त्यांच्याशीं संलग्न असलेल्या छापखान्याचीं बेसुमार बिलें भरून आपले रिपोर्ट वगैरे छापवून घेणें, व रिपोर्टांचें समालोचन वगैरे लिहविण्याकरितां दरबारखर्च करणें अशा निरनिराळ्या प्रकारांनीं कांहीं दरबारांतून कांहीं अँग्लो-इंडियन पत्रांना मदत होत असते असें लोक बोलतात. शिवाय हॉर्निमनसाहेबांचा डेली हेरल्ड व नाभाचे पदच्युत महाराज यांच्यांतील पैशाच्या देवघेवीचा व मतप्रसाराचा संबंध काय होता हें सुप्रसिद्धच आहे.

याच्या उलट १८८२ च्या कोल्हापूर खटल्यांत करवीरकर छत्रपतींचा पक्ष उचलून धरून त्यांच्याशीं सहानुभूति दाखविली त्याबद्दल केसरी-मराठा पत्रांच्या संपादकांना तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली, माफी मागावी लागली, व खर्चहि सोसावा लागला. या खर्चाला थोडीशी मदत त्या वेळीं लोकांनीं उभारलेल्या डिफेन्स फंडांतून झाली. पण ज्या दरबारी लोकांनीं टिळक-आगरकरांना या प्रकरणाविषयीं वर्तमानपत्रांतून लिहिण्याच्या भरीस घातलें त्यांनीं व्यक्तिशः टिळक-आगरकरांची नुकसानभरपाई कांहीं केली नाहींच, पण त्यांच्या वर्तमानपत्रांना कांहीं थोडेफार द्रव्यसाहाय्य केलें असेल अशी कोणाची समजूत असल्यास तीहि चुकीची आहे. कोणी फार तर इतकें

म्हणावें कीं, “ या खटल्यामुळें, केसरी–मराठ्याची प्रसिद्धि झाली, अब्रू वाढली यामुळें वर्गणीदार वाढले असतील ! ” तर तेवढी मात्र गोष्ट थोडीशी खरी म्हणतां येईल. पण वाढत्या ‘ वर्गणीदारां ’ कडून परस्पर मिळणारा आश्रय हा सर्वस्वीं रीतसर न्याय्य असाच आहे.

संस्थानांपैकीं इंदूरसंबंधानें केसरी–मराठा पत्रांचें धोरण संस्थानिकांना अनुकूल म्हणजे होईल तितकें त्यांच्या हक्कांचें समर्थन करणारें व त्याकरितां सरकारावर टीका करणारें असेंच नेहमीं होतें. कै. सर शिवाजीराव होळकर व विद्यमान सर तुकोजीराव होळकर या दोघांवर पदच्युतीचे प्रसंग आले, त्या वेळीं केसरी-मराठा पत्रांनीं त्यांची बाजू कोणाहि अत्यंत राजनिष्ठ प्रजाजनांइतकी उचलून धरली. परंतु या दरबारापासून या पत्रांनीं कधीं एका पैचाहि अभिलाष केला नाहीं. एवढेंच नव्हे तर हस्तें किंवा परहस्तेंहि एक पैचाहि फायदा या दरबाराकडून केसरी–मराठा पत्रांना झालेला नाहीं. जेथें महाराष्ट्रांतील हरदास, कथेकरी, पुराणिक, ग्रंथप्रकाशक इत्यादिकांना या दरबारांतून हजारों रुपये आपापल्या कामाकरितां मिळवितां आले, तेथें केसरी–मराठा पत्रांच्या चालकांनीं आपल्या संस्थेला कांहीं मदत मिळविण्याची इच्छा धरली असती तर ती निष्फळ झाली असती असें नाहीं. परंतु या संस्थेच्या कोणत्याहि चालकांची आजपर्यंत तशी दृष्टि केव्हांहि नव्हती. केसरी-मराठ्यांच्या चालकांप्रमाणें या संस्थानिकांचाहि गुण घेतला पाहिजे. कारण सुदैवानें या संस्थानांच्या अधिपतींनींहि या चालकांना द्रव्याचें आमिष दाखवून, आपलें काम करून घेण्याची बुद्धि कधीं ठेवली नाहीं हा त्यांचाहि थोरपणाच होय !

केसरी–मराठा पत्रें व ग्वाल्हेर दरबार यांचा कधींच कोणताहि संबंध इंदूरइतकाहि आलेला नाहीं. या दोनहि संस्थानांत केसरी–मराठा पत्रांना एका काळीं बंदी होती. ती कालांतरानें निघाली इतकेंच काय तें ! तशी बंदी इतर पुष्कळ पत्रांचीहि निघाली. त्यांत केसरी–मराठा पत्रांवर कांहीं विशेष कृपा झाली असें नाहीं. कारण देशी संस्थानें झालीं म्हणून त्यांत इकडील वर्तमानपत्रांना बंदी झालीच पाहिजे असा कांहीं नियम नव्हता. फाजील भित्रे किंवा तोंडपुजे अधिकारी संस्थानांत निघाले त्यांनीं बंदी केली व समंजस अधिकारी आले तेव्हां त्यांनीं बंदी खुली केली ! मोंगलाईत या

पत्रांना १९०९ सालीं जी एकदां बंदी झाली ती अजूनहि निघत नाहीं. उलट कित्येक ब्राह्मणेतर पक्षाच्या संस्थानिकांचा या पत्रांशीं पुरा बेबनाव असतांहि त्यांनीं या पत्रांना आपल्या राज्यांत कधींहि बंदी केली नाहीं !

लो. टिळकांकरितां १८९७, १९०८, १९१६ व १९१९ या सालीं जे कांहीं फंड उभारण्यांत आले त्यांची मूळ कल्पना, त्यांचा हेतु त्यांच्या एकूण रकमा, त्यांचा विनियोग व त्यांची हल्लींची स्थिति व हिशेब या सर्व गोष्टी महाराष्ट्रांत लोकांना विदितच आहेत. यांपैकीं कोणत्याहि फंडाचा उपयोग लो. टिळकांनीं व्यक्तिशः खाजगी रीतीनें, किंवा केसरीकडेहि केला नाहीं. १८९७ सालचा फंड त्या वेळच्या खटल्यांत बहुतेक संपून गेला व जो थोडा उरला त्याचा उपयोग केसरी–मराठा संस्थेकडे करण्यांत आला नाहीं. फक्त ‘ पर्स फंडा ’चा उपयोग मात्र लो. टिळकांना व्यक्तिशः व केसरी–मराठा संस्थेलाहि झाला असें म्हणतां येईल. कारण चिरोल केसवर टिळकांचे म्हणजे केसरीचे जे रुपये खर्च झाले होते त्यांची फेड यांतून झाली, व हा फंड जमला नसता तर केसरीला जें कर्जांत राहावें लागलें असतें तें राहावें लागलें नाहीं. अशा रीतीनें या फंडाचा उपयोग टिळकांच्या वारसांना कायमचा झाला व केसरीला सुमारें दहा वर्षें झाला. पण केसरीच्या ट्रस्टींनीं दहा वर्षें आपल्या उपयोगी पडलेली ही रक्कम थोडेंबहुत व्याजहि देऊन सर्वच्या सर्व परत केली, ही गोष्ट ता. २ ऑगस्ट १९३० च्या केसरीच्या अंकांत वाचकांना सविस्तर कळून आलीच आहे. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, केसरी–मराठा संस्था सर्वस्वीं स्वावलंबनाच्याच तत्त्वावर आजपर्यंत उभी आहे व जगली आहे.

केसरी–मराठा व आर्यभूषण छापखाना यांचे उत्पत्तीचे वेळीं लागणारी रक्कम उत्पादकांपैकीं कांहींनीं खासगीच उभारली होती. त्याकरितां सार्वजनिक वर्गणी झाली नव्हती. पुढें १८९७ सालीं छापखाना व वर्तमानपत्रें यांची फारकत होऊन टिळकांनीं फक्त वर्तमानपत्रें आपल्या हिश्शादाखल उचललीं. पण तींही बरोबर सात हजार रुपये कर्ज घेऊन ! [ यासंबंधाची हकीकत लो. टिळक-चरित्रांत ( खंड १ ) कोणासही वाचावयास मिळेल. ] सन १८९७ नंतर टिळकांच्या हयातींत प्रथम प्रथम जें कर्ज काढावें लागलें तें सर्व त्यांचे त्यांनीं केसरीच्या उत्पन्नांतून फेडलें, व आपल्या मृत्युपत्राच्या

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक ३८४८९ वि: निबंध
२५०८ नों दि: ३।४।६५



वेळीं केसरी-मराठा पत्रें मागें निष्काळजी करून ठेविलीं. **देणगीच्या रूपानें केसरी–मराठा संस्थेकडे पन्नास वर्षांत एक पैहि कोणाची आलेली नाहीं असें आम्हांस स्वच्छ म्हणतां येईल.** वर्गणीदार व जाहिरातदार व किरकोळ अंकाचे खरेदीदार यांच्याच आश्रयावर केसरी डोक्यावर कर्ज घेऊन निघाला व त्यानें कर्जफेड केली. कायदेशीर कर्जें तर फेडलींच, पण नैतिक कर्जही फेडलें. व सुमारें एक लक्ष रुपये किंमतीची मिळकत स्वामित्व व गुडवुइल यासुद्धां मिळून आज या संस्थेची म्हणून केसरीला अबाधित राखतां आली आहे. **तात्पर्य, वरील रीतसर उदाराश्रयाशिवाय केसरी कोणाच्या एक पैलाहि ओशाळा झालेला नाहीं.** १९२१ सालीं केसरी-कचेरींतील कागदाच्या गोदामाला आग लागली व कित्येक हजारांचें नुकसान झालें. तेव्हां कित्येक स्नेह्यांनीं मदतीदाखल फंड उभारण्याकरितां, आधीं न विचारतां, मनीऑर्डरी केसरीकडे पाठविल्या; परंतु त्या केसरी ट्रस्टनें साभार परत केल्या. तसेंच १९०८ सालीं व १९२४ सालीं असे केसरीवर कार्टाची बेअदबी केल्याचे दोन खटले होऊन दोनही मिळून दंड व खर्चरूपानें सुमारें पंधरा-वीस हजार रुपये खर्च झाले. ती रक्कमही सर्व केसरीच्या पैशांतूनच खर्चली गेली, त्याकरितां बाहेरून कोणाची एक पैहि घेण्यांत आली नाहीं, व लोकांची मदत करण्याची इच्छा असतां तीहि या वेळीं आभार-पूर्वक नाकारण्यांत आली. केसरीच्या चालकांची अशी मनःस्थिति असल्या-मुळें, चिरोलसाहेबांनीं कितीहि म्हटलें तरी केसरींतून टीकेचे कोरडे ओढून टिळकांनीं पैसे मिळविले या गोष्टीवर या देशांतील एक पोरहि कधीं विश्वास ठेवणार नाहीं; मग जाणत्या लोकांची गोष्टच बोलावयास नको. रायगडस्मारक फंड, पैसाफंड, वगैरे सारख्या अनेक वर्गण्या जमविण्यास केसरीच्या द्वारें पुष्कळच मदत झाली. या वर्गण्यांची पोंच देण्यांत येई व मधूनमधून उत्तेजनपर शब्द वर्गणी देणारे व गोळा करणारे यांना उद्देशून लिहिण्यांत येत. हे लेख अर्थात् सहानुभूतिपर व सर्वस्वीं मित्रभावाचेच होते. पण विशेष सांगण्याची गोष्ट ही कीं, वर्गणी न देणाऱ्या विरोधी कुत्सित किंवा कंजुष लोकांवरहि टीकेचे कोरडे कधींहि ओढण्यांत आले नाहींत. म्हणून या दृष्टीनेंहि चिरोल साहेबांच्या टीकेला कांहीं आधार नाहीं.

ꕥ ꕥ ꕥ

# कांहीं मनोरंजक आठवणी

[ वृत्तपत्रविषयक खालील आठवणी " लो० टिळकांच्या आठवणी व आख्यायिका " या ग्रंथांतून संक्षेपानें घेतल्या आहेत. वृत्तपत्रसृष्टींत पाऊल घातलें म्हणजे शिकाऊ होतकरू लेखकाला स्वच्छ प्रेस-कॉपी लिहिण्यापासून स्वतः संपादक होण्यापर्यंत निरनिराळा अनुभव घ्यावाच लागतो. तथापि, आजवर वृत्तपत्रसृष्टींत ज्यांनीं ज्यांनीं यशस्वी संपादक म्हणून नांव कमाविलें त्यांचेहि अनुभव मार्गदर्शक म्हणून त्याला उपयोगी पडण्यासारखे आहेत. खालील आठवणी याच दृष्टीनें वाचाव्यात. —संपादक ]

## केसरीचा पहिला अंक

( १ ) केसरीच्या जन्माचे पूर्वीं टिळक–पंचायतनाशीं परिचित असलेले रा. बळवंत गणेश दाभोळकर यांजकडे मी परवां गेलों असतां त्यांनीं सांगितलेल्या कांहीं गोष्टी पुढें देत आहे :–रा. दाभोळकर हे केसरी निघण्याचे आधीं कै. विष्णुशास्त्री यांचेकडे नोकर या नात्यानें असून, ते त्यांचीं प्रुफें वगैरे पाहण्याचें काम करीत असत. पुढें केसरी-मराठा काढण्याचें ठरविल्यावर त्यांची त्या कामाकडे योजना करण्यांत आली. रा. दाभोळकर सांगतात—" केसरीचा व मराठ्याचा पहिला अंक पुण्यांतील लोक निजून उठण्याचे आंत वर्गणीदारांचे घरीं जाऊन पडला पाहिजे म्हणून, माधवराव नामजोशी, गणेश मोरेश्वर सोहोनी ( मॅनेजर ), त्र्यंबकराव कुळकर्णी ( न्यू स्कूलचे पहिले कारकून ) मी व स्वतः टिळक यांनीं मोठ्या पाहटे उठून अंकांचें ओझें वागवून, कोणाच्या खिडकींतून तर कोणाचे दरवाज्याच्या फटींतून तो आंत टाकून, सर्व अंक वांटलेले आहेत ! "

## प्रेस कॉपीचा नमुना

( २ ) शास्त्रीबुवा जो मजकूर लिहून छापण्यास देत तो वेलांटी, काना, मात्रा, अनुस्वार, विरामचिन्ह यांतहि बिलकुल खोडाखोड न करतां अगदीं छापील अक्षराप्रमाणें नेहमीं लिहून देत, ही त्यांची शक्ति. अगदीं

याचे उलट आगरकरांची कॉपी आली म्हणजे त्यांत ब्रह्मांड खोडलेलें व सर्व गिचमीड झालेलें असावयाचें. शास्त्रीबुवा व आगरकर या दोन टोकांचा मध्यबिंदु म्हणजे टिळकांच्या लिहिण्याचा मासला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## ज्ञानप्रकाशचे लेखक टिळक !

( ३ ) एकदां दैनिक ज्ञानप्रकाशाचे अगदीं आरंभीं असा एक प्रसंग आला कीं, कांहीं आपत्तीमुळें जागेवर एकहि संपादक उभा नसल्यानें, व मॅनेजर हरिपंत गोखले व लोकमान्य यांचा जुना संबंध असल्यामुळें, ते लोकमान्यांकडे येऊन त्यांस सर्व हकीकत सांगून मजकूर मागूं लागले. योगायोग असा कीं, त्याच वेळीं केसरी-ज्ञानप्रकाशाचा कांहीं एका बाबतींत जोराचा वाद चालू होता. पण अशा वेळीं लोकमान्यांनीं एक पळाचाहि विचार न करतां व पूर्वीं अशाच एका अत्यंत बिकट प्रसंगीं ऐन खिंडींत हरिपंतांनीं लोकमान्यांस दगा दिला असतांहि हें सर्व विसरून ‘ लेख लिहून देतों ’ असें त्यांस सांगितलें, व सर्वांत मोठी मौज ही कीं, प्रत्यक्ष त्या चालू वादावरच व केसरीवरहि हल्ला करून, खुद्द ज्ञानप्रकाशाचा एडिटरहि लिहूं शकणार नाही असा त्यांच्या बाजूनें त्यांनीं एक उत्कृष्ट लेख लिहून दिला !

— **स. वि. बापट**

## विकार-मीमांसा

( ४ ) ग्लासगोहून परत येतांना स्वतःच्या केसरींतील लेखासंबंधानें ते म्हणाले, “ केसरींतील लेख लिहीत असतांना भाषासौंदर्याकडे मी फारसें लक्ष देत नाहीं. माझ्या अंतःकरणांत असलेले विचार जितक्या सोप्या भाषेंत कळवितां येतील तितके कळविण्याचा मी प्रयत्न करीत असतों. अंतःकरणांत घोळत असलेले विचार सहज बाहेर पडलेल्या भाषेनें लोकांच्या समोर ठेवल्यानें त्यांच्या मनावर तात्काळ परिणाम होत असतो. मी जेव्हां कडक टीका करितों, तेव्हां खरोखरीच माझ्यामध्यें रागाचा आवेश आलेला असतो. अशा रीतीनें विषयाशीं तादात्म्य पावल्यानें माझ्या लेखांमध्यें भाषासौष्ठव वगैरे नसतांनाहि माझ्या साध्या भाषेचा परिणाम लोकांवर जास्त होतो. ”

—**डॉ. वेलकर**

## होतकरू संपादकांना टिळकांचा उपदेश

( ५ ) केसरी-कचेरीतील संपादकवर्गांतील गृहस्थानें काम कसें केलें पाहिजे यासंबंधानें, रा. भट यांना संपादक शाखेकडे घेतले त्या वेळीं त्यांना लो. टिळकांनीं संपादकत्वाचें सारसर्वस्व सांगितलें. ते म्हणाले—

" माझा वचक सर्व माणसांवर आहे. तुम्ही नवीन माणसें आतां गोळा होत आहांत. तुम्हांलाहि खुर्च्या, ठेबलें, ऑफिस वगैरे थाट आयता मिळतो. मला ह्यांपैकीं एकहि गोष्ट नव्हती. वळकटीवर पाट टाकला कीं माझें टेबलाचें काम भागे. आतां ऑफिसची सुस्थिति आहे म्हणून तुम्हांलाहि मी माझ्याप्रमाणें दिवस काढा असें म्हणत नाहीं. पण जर तुम्हांस आपल्या कारखान्याचा, पत्राचा व त्यांच्या यच्चयावत् व्यवस्थेचा जिव्हाळा असेल, तर तुम्हांस मी सांगितलेलीं व स्वतः केलेलीं सर्व कामें शिकून घेतलीं पाहिजेत. ह्यासाठीं तुम्हींहि यंत्रांची, टाइप फौंड्रीची वगैरे सर्व माहिती मिळविली पाहिजे. तुम्ही हवें तेव्हां, हवें तसें, हवें इतकें लिहूं शकाल. पण ही अवांतर माहिती तुम्हांला अपरिचित असल्यानें शिकाल तरच मिळेल." नंतर केसरी 'च्या धोरणाबद्दल मला त्यांनीं बऱ्याच गोष्टी सांगितल्या त्यांतील सार हें कीं, ' केसरी ' हा महाराष्ट्रांत वृत्तपत्रांच्या शिरोभागींच चमकला पाहिजे. लोकांना स्वदेशाभिमानाचें, स्वार्थत्यागाचें, स्वातंत्र्याचें शिक्षण देऊन, त्यांना ह्या पारतंत्र्यांतून वर निघण्याकरितां परिस्थित्यनुसार जे जे मार्ग आढळतील किंवा इतिहासाला ज्ञात असतील, ते ते सर्व मार्ग चोखाळण्याला लोकांना ' केसरी 'नें तयार केलें पाहिजे. लोकांना ह्या गोष्टींचें ज्ञान नसतें. इतकेंच नव्हे तर बहुजनसमाज ह्या बाबतींत विचार करून योग्य उपाय शोधून काढण्यास अपात्र असतो. तो ह्या असल्या पुढारी वृत्तपत्रांकडे किंवा पुढाऱ्यांकडेच मार्गदर्शित्वाबद्दल पहात असतो. म्हणून ' केसरी 'नें हें मार्गदर्शित्व पत्करिलें आहे. आणि ते संपादकांनीं सांभाळलें पाहिजे. देशांत निरनिराळे पक्ष असावयाचेच. नसले तरी सरकार तें उत्पन्न करू शकतें. ह्यामुळें ' मतामतांचा गलबला ' होतो. अशा स्थितींत सामान्य जनता गोंधळून जाते. कोणतें खरें, कोणतें खोटें, कोणतें देशहितसाधक आणि कोणतें देशहितनाशक, हें ह्या भांबावलेल्या जनतेला समजत नाहीं. म्हणून

' केसरी 'नें अगदीं स्वच्छपणें, लोकांना कळेल अशा सोप्या शब्दांत, पण ठासून ' हा अमकाच मार्ग खरा ' असें निर्भीडपणें, निर्भयपणें व निःशंकपणें सांगितलें पाहिजे. त्यांत वेळप्रसंगीं कित्येकांचीं मनें दुखवावीं लागतील, सरकारचा रोष होईल, ज्यांचें हित बिघडतें अशांचें वैर साधावें लागेल. पण हें सर्व अंगिकारलेंच पाहिजे. आपणांस देश तयार करावयाचा आहे. आपण टक्केटोणपे खाल्याशिवाय लोकांनाहि स्वार्थत्यागाचें वळण लागत नाहीं. म्हणून लोकांना पचेल व रुचेल अशा रीतीनें, पण शक्य तितकें करून कायद्याच्या मर्यादेंत राहून, लोकांना स्वातंत्र्यप्रीतीचें, देशाभिमानाचें व प्राणत्यागापर्यंत स्वार्थत्यागाचें वळण लाविलें पाहिजे. वेळ प्रसंगीं जरूर पडल्यास कायद्याचीहि फारशी मातब्बरी ठेवून चालत नाहीं. त्या वेळीं तो मोडूनहि लोककार्य पुढें ढकललें पाहिजे; त्याचप्रमाणें अगदीं ध्येयवादी असणेंहि व्यवहारी मनुष्याला राहून चालत नाहीं. लोकांना झेपेल असेंच धोरण ठेवावें लागतें." श्रीसमर्थांच्या ' मुलांच्या चालीनें चालावें ' वगैरे शिकवणीची मला त्या वेळीं आठवण झाली.

## लोकपक्षाचा धीट वकील

( ६ ) आमच्या नाशिकच्या कटाच्या खटल्याचा इतिहास त्यांना अवगत असल्यामुळें ते पुन्हां मला चटकन् म्हणाले कीं, " जीं मतें तुम्हांला ' केसरीं 'तून प्रतिपादितां येणार नाहींत, तीं कोणत्याहि इतर वर्तमानपत्रांतून प्रतिपादितां येणार नाहींत. त्यांना व्यवहाराची गवसणी मलाहि घालावी लागली आहे, व ती तुम्हांलाहि घालावी लागणारच. कांहीं वृत्तपत्रांनीं तसा यत्न केला तर तीं पत्रें क्षणभंगुर राहणार. अशींहि पत्रें हवींत. पण वाच्यार्थानें ह्या गोष्टी सुचविण्यापेक्षां व्यंगार्थानें जर त्याच सुचवितां येतात व कायद्याचें आड राहून दीर्घकालपर्यंत इष्टकार्य करितां येतें तर तें कां करूं नये ? ' केसरी 'नें हाच मार्ग स्वीकारिला आहे, व तोच चालविला पाहिजे. ह्याखेरीज आणखी एक गोष्ट तुम्ही ध्यानांत ठेवा. वर्तमानपत्रकार हा एक लोकपक्षाचा कुशल, धीट, विचारी व तडफदार असा वकील असावा, असें माझें मत आहे. सरकारचा पक्षहि वकिली बाण्यानेंच तुमच्याशीं वागतो. तुम्हीहि तसेंच तोडीला तोड वागलें पाहिजे.

सरकार जशीं आपलीं व्यंगें उघडीं करीत नाहीं तशीं तुम्हीहि लोकपक्षाचीं व्यंगें चवाठ्यावर मांडतां कामा नयेत. प्रत्येक पक्षांत कांहीं तरी खरकटें असावयाचेंच. पण तेंच जर आपण मांडीत बसलों तर लोकांना आत्म-विश्वास राहात नाहीं. लोकपक्षाचे गुणांची महति, पूर्वजांची सादर स्मृति, ध्येयाची शक्यता यावरच जास्त भर द्यावा म्हणजे आत्मविश्वास वाढतो. वेळ प्रसंगीं दोषदर्शनहि करावें लागतें व तें करावेंहि. पण शक्य तोंवर आपली मांडी उघडी करूं नये. उत्कृष्ट वकील या धोरणानेंच काम करतो. आणि हेंच वृत्तपत्रांनीं करावें. साधक-बाधक गोष्टींचा विचार करून, न्याय निवडण्याचें काम वर्तमानपत्रकारांचें नाहीं. कारण त्यांना दोन्ही बाजू कळणेंच शक्य नसतें. तेव्हां नेहमीं अपुऱ्या माहितीनें न्यायाचे तारे तोडण्या-पेक्षां लोकपक्षाची कुशल व तडफदार वकिली करणेंच जास्त हितावह आहे."

—डॉ. वि. म. भट

## डोक्यावरून टाईपांच्या केसी नेल्या

( ७ ) १९१४ सालीं लो. टिळक सुटून आल्यानंतर 'लोकसेवक' पत्रातर्फे पानसुपारी झाली. त्या वेळीं रा. लळीत यांनीं आपल्या अडचणी सांगितल्या, त्या वेळीं टिळकांनीं आपला केसरीसंबंधीं अनुभव सांगितला तो असा—

"तुम्हां तरुण मंडळींना निराश होणेचें कांहींच कारण नाहीं. आम्हांस यापेक्षांहि मोठमोठ्या अडचणींतून जावें लागलें आहे." असें म्हणून त्यांनीं स्वतःच्या तरुणपणची हकीकत सांगितली की, "मला स्वतःला डोकीवरून केसीस वाहून नेणेचे प्रसंग आले. दिवसा तसें केल्यास लोक हंसतील म्हणून रात्रौ काळोख पडेतों थांबून मग वाहून नेत होतों इतकेंच !"

—सि. वि. लळीत

## टिळकांचे गैरहजेरींतील 'केसरी'

( ८ ) लोकमान्य १९१४ सालीं सुटून आल्यावर १०–१२ दिवसांनीं एकदां वर्तमानपत्रांचे खोलींत ते उभे होते. साताराचे एक दोन गृहस्थ

त्यांचेपाशीं बोलत होते. बोलतां बोलतां पूर्वीच्या ४-६ वर्षांतील दडपशाहीचा विषय निघाला. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "या काळांत मी बाहेर असतों तरी मलाहि 'केसरी' टिकविणें अशक्यच झालें असतें. नरसोपंतांचा गोडवा स्वभाव अशा वेळीं राष्ट्राचे व 'केसरी'चे उपयोगी पडला. व म्हणूनच आज आपणास येथें उभें राहावयास जागा राहिली आहे!" या वेळीं लोकमान्य गहिंवरून आलेले दिसले.

—दिनकरशास्त्री कानडे

## 'केसरी' करितां लायख माणसांचा शोध

(९) सर्व्हंट ऑफ इं. सो. प्रमाणें संस्था काढावी असें मी त्यांना विचारलें त्या वेळीं टिळक म्हणाले—"माझ्या आयुष्यांत मी एक मोठी संस्था काढली, ती 'केसरी' ही संस्था होय. मीं 'केसरी' करितां उत्तम उत्तम माणसें मिळविण्यासाठीं पुष्कळ खटपट केली. दरसाल युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांपैकीं पुष्कळांस विचारलें आणि पगारहि चांगला देऊं केला तरीहि मला योग्य व हवीं तशीं माणसें मिळालीं नाहींत. फक्त तात्या मात्र शब्द टाकल्याबरोबर आपणांस येऊन मिळाले." ह्याबद्दल मात्र त्यांस अभिमान वाटला.

—दत्तात्रय र. देव

## केसरी मंगळवारींच निघाला पाहिजे!

(१०) सन १९०२ सालीं प्लेगच्या कहरांत लोकमान्यांचे थोरले चिरंजीव विश्वनाथपंत वारले. त्याच्या तिसरे दिवशीं श्रीयुत बाबा विद्वांस यांचे बंधु रा. नारायणराव प्लेगनें वारल्यामुळें बाबा कोंकणांत गेले. स्वतः लोकमान्यांच्या गुडघ्यास जबर जखम झालेली होती. गांवांत प्लेगचें मान जास्तच वाढूं लागल्यामुळें आर्यभूषण छापखान्यांतील बरेच कंपॉझिटर गैरहजर असत. त्यामुळें कै. हरिपंत गोखले—आर्यभूषणचे मालक,—हे सोमवारीं सकाळचे नऊ वाजतां लोकमान्यांच्या झोपडीवर आले. (झोपडी हल्लींच्या सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या जागीं होती.) व लोकमान्यांस म्हणाले, 'आज बरेच कंपॉझिटर कमी आहेत, तेव्हां कंपोजचें काम आटोपण्यास बराच उशीर होईल व त्यामुळें 'केसरी' छापण्यास बराच

वेळ लागेल. सबब उद्यांचा अंक गांवांत वांटण्यापुरतां रात्रीं छापून काढतों. व बाहेरगांवीं जाणारा ' केसरी ' उद्यां छापून परवां टपाल करीन. त्यावर लोकमान्य रागावून म्हणाले कीं, " तुमचे छापखान्यांतील कंपॉझिटर नाहींत तर दुसरे छापखान्यांतील बोलवा. तुम्ही आर्यभूषणचे मालक व मी ' केसरी 'चा एडिटर दोघेहि वारलों तरी, आमच्या चौदा दिवसपर्यंत केसरी मंगळवारचा मंगळवारींच पोष्टांत पडला पाहिजे ! तुम्हांस कंपॉझिटर मिळत नसतील तर मी आणून देतों. " ह्यावर रा. गोखले म्हणाले, ' मी तपास केला परंतु मला मिळत नाहींत. ' त्यावर त्यांना " तुम्हीं जा, मी कंपॉझिटर आणून देतों " असें सांगून मला बोलावून सांगितलें कीं, " मजबरोबर आतांचे आतां गांवांत चला. आज कंपॉझिटर गोळा करून आणावयाचे आहेत. " मी गांवांत जाऊन टांगा घेऊन येतों म्हणून सांगितलें. त्यावर ते म्हणाले, " आतां दहा वाजण्यास आले आहेत. तुम्ही गांवांत जाऊन टांगा आणून आपण जाईपर्यंत वेळ होणार. छापखान्याच्या मालकांनीं एकदां आपले कंपॉझिटर लोकांना काम नेमून दिलें म्हणजे मग आपणास माणसें मिळणें कठीण पडेल. तेव्हां जेथें टांगा मिळेल तेथें करूं. तेथपर्यंत पायींच जाऊं " असें म्हणून आम्ही निघालों. त्या दिवशीं बुधवार चौकापर्यंत टांगा मिळाला नाहीं. तेथपर्यंत लंगडत लंगडत ते आले ! तेथें टांगा करून आम्ही ४।५ छापखान्यांत जाऊन प्रत्येक ठिकाणाहून एक-दोन अशीं माणसें मागून त्या सर्वांस बारा वाजण्यापूर्वीं हरिपंतांकडे नेऊन कामास लावलें. व त्या दिवशींचा ' केसरी ' वेळेवर काढला. इतकेंच नव्हे तर, मुंबईचें पार्सल सोमवारीं रात्रीं मद्रास मेलनें पाठवून पुण्यास व मुंबईस मंगळवारीं सकाळीं ' केसरी ' लोकांस मिळाला. —**य. ग. कुलकर्णी**

## लेखकाला अंतःकरणाची तळमळ पाहिजे

( ११ ) एका बी. ए. झालेल्या उमरावतीचे शिक्षकानें स्वदेशसेवा कशी करावी यासंबंधानें प्रश्न केला त्या वेळीं लो. टिळक त्यांना म्हणालेः—

" मी आणि गोपाळराव आगरकर शास्त्रीबुवांच्या भेटीस गेलों त्या वेळीं त्यांनीं ' केसरींत व मराठ्यांत लिहीत चला ' असें शास्त्रीबुवांनीं आम्हांला सुचविलें. तेव्हां ' आम्हांला लिहितां येत नाहीं ' असें आम्ही

त्यांना म्हणालों. त्याबरोबर झटक्यासरशीं ' तुमचें अंतःकरण देशाकरितां जळतें आहेना ? ' असा त्यांनीं आम्हांला सवाल केला. आम्ही ' होय ' म्हणतांच, तर मग तुम्हांला लिहितां आलेंच पाहिजे. तळमळींतून शब्द जन्मास येतात. शब्दांपासून तळमळ उत्पन्न होत नाहीं. तुमच्या अंतःकरणांत जर तळमळ आहे तर तुम्हांला वाचा फुटलीच पाहिजे. ' असें शास्त्रीबुवांनीं मोठ्या आवेशानें आम्हांला सांगितलें आणि तेंच मी तुम्हांला सांगतों. "

—वीर वामनराव जोशी

## वार्ताहराच्या धंद्याचें महत्त्व

(१२) वार्ताहराचा पेशा किती श्रेष्ठ प्रकारचा आहे आणि वर्तमानपत्राच्या धंद्यांत त्याचें महत्त्व काय, हें वार्ताहर-संघाच्या एका समारंभ-प्रसंगीं श्री. न. चिं. केळकर यांनीं सांगितलें. ते म्हणाले :

वार्ताहराच्या धंद्याला मान नाहीं, तो कमी प्रतीचा आहे, हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. मी स्वतः तर वार्ताहराच्या पेशाला अधिक मान देणारा आहें. यासंबंधाचीं मी माझीं स्वतःचींच एकदोन उदाहरणें सांगतों म्हणजे मला वार्ताहराचा पेशा किती मानाचा वाटतो याची कल्पना आपणांस येईल. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचा मी सभासद असतां व त्या वेळीं मला व्यासपीठावर बसण्याचा हक्क असतांहि मी बैठकीच्या वेळीं वार्ताहर म्हणून वृत्तपत्राच्या रांगेंत बसून बैठकींतील कामकाजाचे अहवाल लिहिले आहेत. असेंब्लीचा सभासद असतां दिल्ली व सिमला अधिवेशनाचीं माझीं बातमीपत्रें आपणांपैकीं पुष्कळांनीं वाचलींच असतील. याहिपेक्षां दुसरा उल्लेखनीय दाखला म्हणजे, मी माझ्या लेखनाचे जे बारा खंड काढणार आहें त्यांतील शेवटचा खंड मुद्दाम ' वार्ताहर '-खंड या नांवानेंच तयार करणार आहें व त्यांत मी आजवर लिहिलेल्या रिपोर्टांचा समावेश करणार आहे. सारांश, संपादक म्हणवून घेण्यांत मला जितका मान वाटतो तितकाच ' वार्ताहर ' म्हणवून घेण्यांत वाटतो. नुसत्या बातम्या लिहून देण्यापेक्षां त्या आकर्षक रीतीनें लिहून देण्यांत बातमीदाराचें खरें कौशल्य असतें.

बातमीदाराच्या वर्गांतील सर्वांनाच बातमीदार म्हणून ओळखण्यांत येतें; पण त्यामध्येंहि श्रेष्ठ-कनिष्ठ वर्ग असतातच. रावणाची लंका जाळण्याकरितां गेलेले रामदूत हे सर्व वानरजातीचेच होते खरे; पण त्यांतहि लहान वानर आणि हनुमान यांच्या कामगिरींत पडलेली तफावत दिसतेच कीं नाहीं? असाच श्रेष्ठ-कनिष्ठभाव किंवा तफावत पुण्यांतील एखाद्या कोर्टांतली बातमी आणणाऱ्या बातमीदारांत व परराष्ट्रीय राजकारणाच्या खात्याचे डायरेक्टर म्हणून काम करणाऱ्या व हिंदुस्थानांत येऊन येथील पुढाऱ्यांच्या गांठीभेटी घेऊन एकंदर राजकीय परिस्थितीचें बातमीपत्रद्वारें बरोबर चित्र रेखाटणाऱ्या चिरोलसाहेबांच्या कामगिरींत आहे. येथें परवां येऊन गेलेले लॉर्ड लोथियन हेहि वार्ताहरच आहेत. त्यांनीं पाठविलेलीं बातमीपत्रें जर कोणाला वाचावयास मिळतील तर त्याला त्यांत हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीचें चित्र बरोबर उमटलेलें दिसेल.

वार्ताहराचें काम करणारांच्या अंगीं दोनतीन गुण प्रामुख्यानें असावयास पाहिजेत. वार्ताहराला निरीक्षणशक्ति व आकर्षक लेखनशैली हीं असावयास पाहिजेत. पण त्याचबरोबर मनुष्यस्वभावाचें ज्ञानहि त्यास असावयास पाहिजे. सभांतील भाषणांचे रिपोर्ट देण्याचें काम फार कौशल्याचें असतें. वक्त्याचें भाषण देतांना त्यांत वक्त्याचा अभिनिवेश, ठसकेबाजपणा व वेचक शब्द यांचें बरोबर चित्र उमटलें असलें पाहिजे तरच तो रिपोर्ट साधला असें म्हणतां येतें. वार्ताहराचें काम करणाराला लघुलेखनाची जरूरी लागतेच असें नाहीं. उलट, जर एखादा वार्ताहर लघुलिपींत वक्त्याचें सर्व भाषण लिहून देऊं म्हणेल तर त्याला तें शक्य होणार नाहींच, पण त्यानें लिहिलेला रिपोर्ट हा मुद्द्याचे शब्द टिपून घेऊन त्यावरून लिहिलेल्या रिपोर्टांपेक्षां थोडा कमी दर्जाचाच उतरेल. रिपोर्टरच्या धंद्यांतलें चित्ताकर्षक रिपोर्ट लिहिणें हें कौशल्य; पण सत्यकथन हें त्याचें शील आहे. सत्यकथन म्हणजे सत्यान्वेषण खरें; पण त्याचबरोबर कोणत्या गोष्टींना कमी अगर अधिक महत्त्व द्यावयाचें हें ठरविण्याचीहि पात्रता त्याच्या अंगीं अवश्य असावयास पाहिजे. जनता एका टोकाला व वार्ताहर हा दुसऱ्या टोकाला अशी ही एक साखळी आहे. ”

## कर्तबगार मॅनेजर

[ वर्तमानपत्राच्या धंद्याला ध्येयनिष्ठ संपादकाइतकीच कर्तबगार व्यवस्थापकाची जरूरी असते ! केसरीला असे उत्तम व्यवस्थापक कै. धोंडोपंत ऊर्फ बाबा विद्वांस लाभले. व ती जबाबदारी त्यांनीं टिळकांच्या हयातींतच नव्हे तर मरेपर्यंत संभाळली. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर अवघ्या दहा वर्षांत, केसरीच्या शिलकेंतून तीन लक्ष रुपयांचा ट्रस्ट करून चिरोल केस-करितां लोकांनीं टिळकांना दिलेले पैसे केसरीनें फेडले व टिळकांना ऋणमुक्त केलें याचें श्रेय न. चिं. केळकर यांजबरोबर बाबांनाहि द्यावें लागतें. त्यांचें शब्दचित्र केळकर यांनीं सह्याद्रीच्या अंकांत पुढीलप्रमाणें काढलें होतें :

—संपादक ]

( १३ ) सन १८९६ च्या मे महिन्यांत सिंहगडावर माझी व बाबांची भेट प्रथम झाली. मी टिळकांच्या बंगल्यांत पाहुणा होतों. आणि बाबा पाहुण्यांची व्यवस्था किती तत्परतेने ठेवतात हें मला त्याच दिवशीं कळून आलें. ते ह्या वेळीं लातूरहून कापूस-कारखान्यावरून परत आले होते. पण त्यानंतर ते लातूरला परत गेले नाहींत. टिळकांच्या कामाचा व्याप वाढला व बाबांना पुण्यास मामाच्या घरींच कायम राहावें लागलें. मींहि प्रथम कांहीं दिवस वाड्यांतच राहत होतों. पुढें १८९६ च्या अखेरीसच टिळकांच्या राजकीय अंतराळांत ढग जमूं लागले, आणि बाबांची आपल्या मामांविषयींची काळजी दिसून येऊं लागली. पण या काळजींतूनच त्यांची खरी कर्तबगारी दिसून आली. कारण यापुढें टिळकांवर झालेले अनेक खटले लक्षांत घेतले असतां बाबांना किती प्रकारची कशी मेहनत करावी लागली असेल याची कल्पना, ज्यांनीं त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या त्यांनाच येईल. इतरांना येणें शक्य नाहीं. बाबांना स्वतः वकिलीचें ज्ञान नव्हतें. पण अनेक वकिलांचीं सर्व तंत्रें संभाळून, अपमान सोडून, कार्यसाधूपणानें त्यांजकडून काम करून घेण्यांत नुसतें चातुर्यच नव्हे तर सात्त्विक स्वभावाचा उत्कृष्ट मासला बाबांनीं दाखविला. या सर्व खटपटीला पैसा फार लागे व त्याची काळजी टिळकां-पेक्षां बाबांनाच अधिक वाटे. कारण टिळकांनीं पैसा मागितला आणि तो

नाहीं म्हणण्याची वेळ आली म्हणजे बाबांना मरणप्राय दुःख होई, हें खासगी संभाषणांत आम्हांला दिसून येई.

केसरी-कचेरीचा प्रारंभ उघड्या पडवींत दोन देवद्वारी खोक्यावर झाला यांत अक्षराइतकीहि अतिशयोक्ति नाहीं. सरकारी नियम सांभाळून, आठवण ठेवून, टिळकांच्या भेटी तुरुंगांत घेणें इत्यादि कामें ते इतक्या तत्परतेनें करीत कीं, टिपण चुकलें, हुकलें असें त्यांजकडून कधींहि झालें नाहीं. अशा सर्व गोष्टींची माहिती मला असण्याचें कारण हें कीं, बाबांना स्वतः इंग्रजी चांगलें येत नसल्यामुळें, अशा कामांतला सगळा पत्रव्यवहार करणारा त्यांचा ‘ कारकून ’ मी होतों. टिळक मंडालेस असतां दर महिन्यास बाबांच्या नांवें इकडून जें पत्र टिळकांना जाई तें प्रत्येक पत्र माझ्या हातचें आहे.

पोलीस लोकांत ओळखी ठेवणें इत्यादि गोष्टीहि बाबा प्रयत्नानें करीत. उलट टिळकांविषयींच्या आदरबुद्धीनें, विशेष गुप्त नव्हे पण कार्योपयोगी अशी, पुष्कळशी माहिती पोलीस स्नेही बाबांना अन्तस्थपणें देत. टिळकांच्या घराच्या जितक्या झडत्या झाल्या त्यांतील प्रत्येकीची आगाऊ खबर बाबांना व त्यांच्याकडून मला मिळत असे, एवढें म्हटलें म्हणजे पुरे.

घरच्या कामांत सर्वस्वीं दुर्लक्ष करून सर्व लक्ष सार्वजनिक कार्यांत घातलें हें टिळकांचें मोठेपण. पण एका दृष्टीनें पाहतां मी प्रांजलपणें असें म्हणूं शकेन कीं, बाबांचें मोठेपण टिळकांपेक्षांहि अधिक होतें. कारण टिळक स्वतःच्या घरीं कुटुंबांतच राहात. पण बाबांनीं १९१३ पूर्वींचीं पुष्कळशीं वर्षें घरीं मुलें-माणसें नसल्यासारखीं संन्यासी वृत्तीनें काढलीं. त्यांच्या सर्व शक्ति, टिळकांची कार्यसिद्धी हें एकच ध्येय डोळ्यांपुढें ठेवून, त्यावर एकवटून खर्च होत असत. आपल्या मामाशिवाय त्यांना दुसरें कांहींहि जग नव्हतें असें म्हटलें तरी चालेल !

मी व बाबा हे सुमारें ४० वर्षेंपर्यंत केसरी संस्थेविषयींच्या सुखदुःखांत निकट सहभागी होतों. ह्या संबंधांत आम्हांमध्यें वितुष्ट तर नाहींच नाहीं, पण भांडण-अबोला होण्याइतका मतभेदहि कधीं झाला नाहीं. ‘ टिळकांच्या पश्चात् मी केळकरांना टिळकांच्या ठिकाणीं मानीत होतों ’ असे जे त्यांनीं जाहीर उद्‌गार कित्येक प्रसंगीं काढले ते एका अर्थीं खरेच होते. तो अर्थ म्हणजे, ते माझ्या संबंधांत स्वतंत्र बुद्धि अशी चालविण्याचा आग्रह कधींच

धरीत नसत. माझें धोरण त्यांना एकंदरीनें पसंत पडत असेल म्हणा किंवा माझा विश्वास त्यांना वाटत असेल म्हणा; कांही असले तरी मी सांगावें तें त्यांनीं मान्य करावें, फार तर किंचित् मतभेद दर्शवून मान्य करावें, असेंच नेहमीं घडे. माझ्या संपादकीय लेखन-कलेसंबंधीं व धोरणासंबंधीं त्यांना आदरबुद्धि होती, हें मी अभिमानानें सांगूं शकेन. आणि याशिवाय त्यांना हा विश्वास असे कीं, लेखणीचें कोणतेंहि काम निघालें म्हणजे तें त्यांचें काम मी आस्थेनें व जिव्हाळ्यानें करीत असे, यामुळें माझा त्यांना फार आधार वाटे.

१९०९ सालीं रा. खाडिलकर हे केसरीचे संपादक असतां मुंबईस नवीन निघालेल्या ' राष्ट्रमत ' पत्राच्या संपादकत्वाचें काम मला देऊं करून चिंतामणराव वैद्य व नानासाहेब देशमुख यांनीं मला मुंबईस बोलावलें. त्या वेळीं टिळकांच्या पश्चात् केसरीचें डिक्लेरेशन केलें तर तें करण्याचा हक्क माझाच आहे, व तें नाहीं तर मराठ्याचेंहि मी करणार नाहीं, असा हट्ट धरून मी कांही महिने निष्क्रिय बनलों होतों. म्हणून ' राष्ट्रमता 'चा संपादक होण्यास जावें असा माझा कल झुकला. असें पाहातांच बाबांनीं माझ्या घरीं येऊन धरणें धरलें, व माझा हात धरून सांगितलें कीं, काय वाटेल तें झालें तरी मी तुम्हांस मुंबईस जाऊं देणार नाहीं. कारण टिळकांच्या अभावीं मी सर्वस्वीं तुमच्या आधारावर काम करीत आहें.! यामुळें मी पुणें सोडून मुंबईस जाण्याचा विचार टाकून दिला, व यानंतर थोड्याच दिवसांत मी फिरून केसरीचा संपादक झालों. माझ्याकडून मजकूर वेळेवर पुरविण्यांत किंवा प्रुफें तपासून देण्यांत कधींहि खोटी किंवा विलंब होत नाहीं, याविषयीं ते माझ्यावर फार खुष असत. कारण वर्तमानपत्र वेळेवर निघण्यावर त्यांचा फार कटाक्ष असे.

टिळकांच्या संगतींत आनंदाचे व म्हणून थोड्याबहुत खुशालीचे प्रसंगहि कांही येत. त्यांत बाबा फारसे सामील नसत. स्वतः सुख भोगण्यापेक्षां दुसऱ्यांना सुख देणें हेंच त्यांना जन्मभर करावें लागे.

—न. चिं. केळकर

# संपादकीय शिक्षण

१९२१ सालीं असहकारितेची चळवळ सुरू झाली तेव्हां शाळा व कॉलेजें यांतील विद्यार्थ्यांनीं बाहेर पडण्यासंबंधीं कांहीं प्रयत्न झाला. ह्याप्रमाणें बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचा टिळक विद्यालयांतील शिक्षणक्रम संपून त्यांना टिळक विद्यापीठाच्या पदव्या दिल्यावर, त्यांना स्वतंत्र धंद्याचें शिक्षण देण्याकरितां, केसरी-मराठा संस्थेनें गायकवाडवाड्यांत संपादकीय शिक्षणाचा एक वर्ग काढून एक वर्ष चालविला व त्या कामीं पुष्कळ खर्च केला. परंतु असा वर्ग सतत आपल्या खर्चानें चालविणें ही गोष्ट केसरीच्या आवाक्याबाहेरची व तिची आवश्यकताहि तूर्त महाराष्ट्रांत नाहीं म्हणून तो वर्ग पुढें बंद करण्यांत आला. या वर्गांतून शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनीं पुढें वर्तमानपत्राचा धंदा केला व हैदराबाद, सोलापूर, जळगांव सातारा वगैरे ठिकाणीं त्यांनीं वर्तमानपत्रें चालविलीं.

कोणताहि गुण घेतला तरी त्याचें बीज उपजतच मनुष्याच्या अंगीं थोडेंबहुत असावें लागतें. तथापि, पेरलेल्या बियांना जसें बाहेरून मुद्दाम खतपाणी दिल्यास त्याचा वृक्ष लवकर तयार होतो, किंवा त्याची छाटणी-कापणी वेळचे वेळीं केल्यास त्याची वाढ सर्वांगीण होऊन शिवाय त्याला हवा तसा आकार देतां येतो, त्याचप्रमाणें वर्तमानपत्राच्या धंद्यांत लागणाऱ्या गुणांचें आहे. जुन्या काळीं हा धंदा शिकविण्याच्या शाळा नव्हत्या. त्यांत जीं माणसें उदयास आलीं तीं अंगच्या गुणांच्या जोरावरच आलीं. तथापि, युरोप-अमेरिका वगैरे खंडांत लोकशिक्षणावर भर देतात व त्याप्रमाणें वर्तमानपत्रांचा धंदा शिकविण्याच्या शाळा व कॉलेजें निघालेलीं आहेत. लंडन येथें हा धंदा शिकविणारें स्वतंत्र कॉलेज असून तेथें शिक्षणक्रम संपल्यावर परीक्षा घेऊन पदवी किंवा सनद देण्यांत येते. अमेरिकेंत तर या शिक्षणाचीं ३०-३२ कॉलेजें किंवा विद्यापीठेंच आहेत. शिवाय वर्ग अनेक असतात ते वेगळेच. हे वर्ग सगळेच चांगल्या शिक्षकांनीं चालविलेले असतात असें नाहीं; तर त्यांत फसवेगिरी व भोंदूगिरी बरीच असते. बाहेर पाट्यांवर शिक्षणक्रमाचीं भडक वर्णनें असावयाचीं. उदाहरणार्थ, " या, आणि चारच

महिन्यांत संपादक होऊन जा !" "वर्तमानपत्रांत चुरूचुरू लिहा आणि आठवड्याला पांच पौंड मिळवा." इ. या वर्गांतून जाणारे उतावळे विद्यार्थी शेवटीं पैसे गमावून हात हलवीत डोकें खाजवीत बाहेर येतात. पण नामांकित संस्थांतून मिळणारे वर्तमानपत्री धंद्याचें शिक्षण चांगल्या दर्जाचें असतें. कोणचीहि विद्या कितीहि मिळविली तरी तिला अखेर खरा कस अनुभवानेंच येतो ती खरी. पण अनुभव घेतां घेतां बनेल तसें किंवा काम पडेल तसें निरनिराळें साधन हाताळणें यांत पुढें जो वेळ जातो तो या संस्थांतून शिक्षण मिळविलें असतां वांचतो. म्हणजे जे विषय पुढें शिकावयाचे ते आधी स्वस्थपणें व गुरुमुखानें शिकतां येतात. या संस्थांतील शिक्षण अर्थात् तात्त्विक स्वरूपाचें असतें. तथापि व्यावहारिक शिक्षणाचाहि भाग त्यांत थोडाबहुत ठेवलेला असतोच. धंदेशिक्षणाच्या शाळेंत विद्यार्थ्यांनीं शिकतां शिकतां तयार केलेलें जिन्नस बाजारांत विकले जाऊं शकतात व त्याला थोडीबहुत किंमतहि येते. वर्तमानपत्री धंदा शिकविण्याच्या शाळेंतील विद्यार्थ्यांकडून लिहून घेतलेले लेख, अग्रलेख, बातमीपत्रें हीं प्रायः काल्पनिक विषयावरच असावयाचीं. म्हणून भातुकलींत केलेला स्वयंपाक मुलींचा मुलींनाच खाऊन टाकावा लागतो, प्रौढांच्या पंक्तीला तो वाढतां येत नाहीं, त्याचप्रमाणें या शाळेंतील विद्यार्थ्यांनीं लिहिलेले लेख स्वतः त्यांच्या किंवा शिक्षकाच्या करमणुकीनेंच परिसमाप्त होतात. तथापि, हें व्यावहारिक शिक्षण सर्वस्वीं फुकट जात नाहीं. तोंडचे हिशेब शाळेंत शिकतांना त्यावरून सौदे होत नसले तरी, पुढें प्रत्यक्ष बाजारांत त्याच हिशेबांचा उपयोग व्यवहारांत होतो. असो. लंडन येथील विद्यापीठांत वर्तमानपत्री धंदा शिकविण्याची शाखा आहे. तींत मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या १७ वर्षांवरच्या विद्यार्थ्यांना घेतलें जातें. शिक्षणक्रम दोन वर्षांचा असून त्यांत खालील विषय शिकविले जातात :

(अ) निबंधलेखन.

(ब) टीका, तात्त्विक राजकारणाचा इतिहास, शास्त्रीय प्रगतीचा इतिहास.

(क) इंग्रजी वाङ्मय, इतिहास, राजकारणशास्त्र, अर्थशास्त्र, प्रचलित युरोपियन भाषा, पदार्थ-विज्ञानशास्त्र, मानसशास्त्र इ.

याशिवाय तोंडीहि एक परीक्षा असते. शास्त्रीय विषयांत प्रयोग करून दाखवावयाचे असतात. शिक्षण झाल्यावर परीक्षेंत पास होतील त्यांना दाखला किंवा डिप्लोमा देण्यांत येतो. अर्थात् हा स्वतंत्र विशिष्ट प्रकारचा धंदा असल्यामुळें सर्वसामान्य युनिव्हर्सिटीचें शिक्षण घेण्याला जितकीं मुलें जातात तितकीं इकडे येत नाहींत. कारण विद्यापीठांत मिळणारें शिक्षण वृक्षासारखें असून त्याला अनेक शाखा फुटतात व वर्तमानपत्री धंदा ही त्यांतलीच एक शाखा होय. पण दिवसेंदिवस इतर धंदे टाकून या धंद्याकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. गेल्या १०० वर्षांत वर्तमानपत्रांची वाढ विलायतेंत किती झाली हें लक्षांत घेतलें म्हणजे या धंद्याला वाढती बरकत कशी आहे, व त्यामुळें या धंद्याकडे लक्ष घालणाऱ्या तरुण लोकांची संख्या दिवसेंदिवस कशी व कां वाढत आहे हें कळून येईल. सन १७५३ सालीं इंग्लंडमध्यें एकंदर १२ महिन्यांत मिळून एकंदर वर्तमानपत्रांच्या अंकांची संख्या सुमारें ७५ लक्ष होती. पण आज एकटें 'लंडन डेली मेल' हें वर्तमानपत्र सुमारें चार दिवसांत इतके अंक काढून विकतें.

१८५४ सालीं 'लंडन टाईम्स्' या दैनिकाच्या प्रती सुमारें ५० हजार निघत. याहून अधिक नव्हत्या. इतर वर्तमानपत्रांतहि 'मॉर्निंग ॲड्व्हर-टायझर' ८ हजार, 'मॉर्निंग हेरल्ड' ४ हजार, 'मॉर्निंग क्रॉनिकल' ३ हजार इतक्या थोड्या प्रती निघत. १८३६ मध्यें कोणत्याहि एका दैनिक वर्तमानपत्राच्या प्रती ७ हजारांहून अधिक खपत नव्हत्या. व सकाळीं निघणाऱ्या एकंदर आठ वर्तमानपत्रांच्या मिळून २० हजारांवर प्रती निघत नव्हत्या ! तसेंच संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या पांच वर्तमानपत्रांच्या मिळून फार तर १५ हजार प्रती निघत !

१९२१ सालीं इंग्लंड व वेल्स मिळून १४५८, स्कॉटलंड २५४, आयर्लंड १८६ व एकटे लंडन ४५१ इतकीं वर्तमानपत्रें चालू होतीं. म्हणजे विलायतेंत एकंदर वर्तमानपत्रांची संख्या सुमारें २५०० इतकी होती व त्यांत फिरून 'डेली मेल', 'लंडन टाईम्स' अशांसारखीं पत्रें आहेत. यावरून एकंदर वर्तमानपत्रांच्या प्रती किती निघत असतील व वाचकांची केवढी मोठी संख्या ती वाचीत असेल याची कल्पना होईल. राजकारणाला

वाहिलेल्या पत्रांपैकीं सुमारें ८०, स्वतंत्र ६०, कॉंझरव्हेटिव्ह ५० व नॅशनॅलिस्ट ८–१० अशी वर्गवारी पडते. शिवाय विशिष्ट विषयांना वाहिलेल्या वर्तमानपत्रांची संख्या अदमासें खालीलप्रमाणें आहे :

| | |
|---|---|
| धर्मविषयक | १२० |
| वैद्यक | ८४ |
| व्यापारविषयक | ८० |
| अर्थशास्त्रीय | ८० |
| शिक्षणविषयक | ७८ |
| एन्जिनियरिंग | ७४ |
| वाङ्मयात्मक | ७० |
| सैन्य, आरमार मिळून | ६२ |
| संगीत | ६० |
| मद्यपाननिषेध | ६० |
| दर्यावर्दी, व्यापार, वाहतूक | ५७ |
| खेळ व सामने | ५१ |
| कायदा व अदालत | ४६ |
| सामाजिक छानछोकी | ४० |
| मजूरवर्गविषयक | ३९ |
| शेतकी | ३६ |
| वास्तुविज्ञान | ३४ |

यापुढील दहा वर्षांतील आंकडे पुढच्या वर्षीं प्रसिद्ध होतील. पण वरील संख्येंत या अवधींत वाढच झाली असेल असें अनुमान सहजच काढतां येतें.

वर्तमानपत्री शिक्षणाचा रीतसर वर्ग महाराष्ट्रांत कोणी काढला तरी इतके विद्यार्थी फी देणारे मिळणार नाहींत कीं, फींतून वर्गाचा सर्व खर्च भागेल. शिवाय मुख्य मुद्दा हा कीं, हा धंदा वर्गांतून शिकवून कोणाला किती खरोखर येईल याला बरीच मर्यादा आहे. इतर अनेक लोकांप्रमाणें वर्तमानपत्रकर्ता हा पुष्कळ उपजत गुणांचा असतो. शिक्षणानें मदत होत नाहीं असें नाहीं. तसें मी म्हणेन तर कोणत्याच शिक्षणाच्या शाळा नकोत

असें म्हणण्यासारखें होईल. परंतु उपजत गुणाला या विषयांत मीं बारा आणे किंमत देईन, तर शिक्षणाला चार आणे देईन. शिवाय हें शिक्षणहि एखाद्या वर्गांत दिल्यापेक्षां एखाद्या वर्तमानपत्राच्या कचेरींत राहून विद्यार्थ्यानें खालपासून वरपर्यंत जात जात शिकत शिकत मिळविलेलें बरें. याला अप्रेंटिसशिप म्हणतां येईल; व पाश्चात्त्य देशांत औद्योगिक किंवा शास्त्रीय शिक्षण हें शिक्षणाच्या वर्गापेक्षां कारखान्यांतच अधिक मिळतें. फक्त अमेरिकेंतच वर्तमानपत्री शिक्षणाचें विद्यापीठ आहे असें वाटतें. त्या देशांत वर्तमानपत्रांचे प्रकार व तऱ्हा इतक्या आहेत व धंदाहि इतका मोठा चालतो कीं, या शिक्षणाचे वर्ग तेथें चालूं शकतील. पण हिंदुस्थानांत अजून ती वेळ आली नाहीं असें वाटतें.

आजपर्यंत इकडे जितके नामांकित वर्तमानपत्रकार होऊन गेले त्यांपैकीं कोणींहि असें शिक्षण घेतलेलें नव्हतें किंवा आजहि वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यांतून आनुभविक संपादक आपल्या हाताखालच्या लोकांना विद्यार्थ्यांसारखे पढवितात, किंवा शाळेंतील एक्झरसाइज बुकाप्रमाणें त्यांचे लेख तपासून गुणदोषचर्चा करतात असें घडत नाहीं. शिकावयास मिळतें तें इतकेंच कीं नेमून दिलेला विषय लिहावा, किंवा स्वतः घेऊन लिहावा; व तो लेख अखेर प्रसिद्ध होतांना त्यांत कमजास्त काय झालें असेल तें पाहून पुढें सुधारणा करावी. अशा क्रमानें निरनिराळे विषय हातून लिहून होतात. पण एखाद्या गणपति करण्याच्या कारखान्यांत मूर्ति करावयाला शिकवण्याप्रमाणें संपादकीय कचेरींतील शिक्षण असतें. आपल्या हातानें शाडूचा ओला गोळा घ्यावा, कांहीं मनानें व कांहीं समोरच्या मूर्ती पाहून चित्र बनवावें, आणि तें नापसंत ठरल्यास ती मूर्ति मोडून पुनः त्याचा शाडूचा गोळा करावा !

लेखकाचें शिक्षण घेणारानें स्वतः आपल्याच हातानें आपले लेख फाडण्यास शिकलें पाहिजे; किंवा कोणी ते नापसंत करून फाडले तर त्याबद्दल विषाद न मानण्यास तयारी ठेविली पाहिजे. सामान्य चार ओळींची बातमी लिहिण्यापासून अग्रलेख लिहिण्यापर्यंत किती तरी प्रकारचें लेखन वर्तमानपत्रांत असूं शकतें. आणि त्यापैकीं आपण कोणत्या प्रकारचें

लेखन लिहिण्यास पात्र आहों हें, नवीन लेखकाला मजकूर लिहून काढून व फाडूनच अधिक शिकतां येईल. कांहीं गोष्टी शिकवून येतील; पण त्या फार थोड्या. आणि कांहीं तर कधींच शिकवून येणार नाहींत. माझें स्वतःचेंच उदाहरण वाटल्यास सांगतों. तें असें कीं, टिळक काय लिहितात, कसें लिहितात हें मीं त्यांच्या सन्निध राहून पंचवीस वर्षें पाहात होतों. त्यांनीं तोंडानें सांगितलेला मजकूरहि मीं आपल्या हातानें किती तरी लिहिला असेल. परंतु त्यांची भाषाशैली मला कधींच आपलीशी करतां आली नाहीं, तसेंच इतर कित्येकांना त्यांचा मार्मिकपणा ( जज्मेंट ) आपलासा करतां आला नाहीं.

तात्पर्य, आदर्श वर्तमानपत्रकार हा उपजत गुणाचा असतो कीं शिकून तयार होतो हा वाद, आणि इतर कित्येक ठराविक वाद सारखेच आहेत. ईश्वरनियति खरी कीं व्यक्तिस्वातंत्र्य खरें? नशीब खरें कीं उद्योग खरा? आनुवंशिक संस्कार खरे कीं परिस्थिति खरी? या वादांत आपण जशी आणेवारीची वांटणी करतों, तशीच या वादांतहि केली पाहिजे. वर्तमानपत्रांत लिहितां येणार नाहीं असा मनुष्य सहसा मिळणार नाहीं. पण त्यांत विशेष प्रकारची कर्तबगारी सिद्ध होणें हें उपजतगुणांनींच होईल. माझ्या मतें लोकांना लिहिण्याची आस्थाच कमी, पात्रता कमी असें नाहीं. आपलें एखादें मत बनलें तर तें लोकांना सांगावें शिकवावें याची खरी हौस ज्याला असेल, किंवा लेखनकलेंत रंगण्याची हौस ज्याला असेल, तोच चांगला वर्तमानपत्रकार होईल. पण वर्तमानपत्री लिहिण्याला धंद्याचेंहि स्वरूप असत नाहीं असें नाहीं.

वर्तमानपत्रकार म्हटला म्हणजे तो 'देशभक्त' असें समजण्याची खेडे-गांवांत लोकांची रीत आहे. पण केवळ संपादक म्हटला म्हणजे तो देशभक्त किंवा संपादकाबाहेर देशभक्त नाहीं, अशी बुद्धि लोकांची होणें योग्य नाहीं. म्हणून मी कोठेंहि खेडेगावीं गेलों तरी मुद्दाम सांगत असतों कीं देशभक्ति करण्याचा अधिकार सर्व लोकांस सारखाच आहे. जसा आपल्या आईवर प्रेम करण्याचा अधिकार त्या आईच्या सगळ्या मुलांना सारखा असतो. याचाच उलट प्रकार असाहि आढळतो कीं, वर्तमानपत्रें हीं जर देशभक्ती-

करितां चालवावयाचीं तर त्यांनीं वर्गणी घेऊं नये असेंहि म्हणणारे भोळे लोक आढळतात ! “टिळक जर खरे देशभक्त तर त्यांनीं केसरी पत्र वर्गणी न घेतां लोकांना वांटावें !” असें म्हणणारा अवलिया मीं पाहिलेला आहे. पण हें म्हणणेंहि चूक. खरें हेंच कीं, वर्तमानपत्राला जशी देशसेवेची एक बाजू आहे, तशी धंद्याचीहि एक बाजू आहे. म्हणून बाहेर खेडेगांवीं जातों तेव्हां मी होऊन लोकांना सांगतों कीं, देशभक्त हें आडनांव ठीक आहे; पण कोणी संपादकाच्या कामाखेरीज इतर कांहीं खऱ्या देशभक्तीचें काम करीत असेल तरच त्याला देशभक्त म्हणावें. प्रत्येक संपादक लिहितो त्यांतलें कांहीं उपजीविकेचें साधन म्हणून, किंवा पगारी काम म्हणून व कांहीं तो स्वतःच्या हौसेनें लिहितो म्हणजे कलाविलासाकरितां लिहितो; आणि कांहीं लिहितो तें देशहितबुद्धीनें प्रेरित होऊन बोध-सेवा करण्याकरितांच लिहितो.

मामुली काम करण्याला वर्तमानपत्राच्या कचेरींत जितके लोक लागतात तितके सहज मिळतात. वर्तमानपत्राच्या कचेरींतील नोकरीकरितां इतके अर्जदार येतात कीं, त्यांना नकारच द्यावा लागतो. दुसरें कांहीं येत नाहीं तर वैद्यकी कर किंवा मुखत्यावर वकील हो असें पूर्वीं म्हणत, त्याप्रमाणें दुसरें कांहीं येईना तर संपादक हो, अशी म्हण पडण्याची भीति वाटूं लागली आहे. तथापि, ‘नवीन व उत्कृष्ट’ याची जागा कोणत्याहि धंद्यांत नेहमीं रिकामीच असते; त्याप्रमाणें वर्तमानपत्रांच्या कामांतहि आहे. मजकडे नोकरी मागावयास येणाऱ्या सर्वांना मी सांगत असतों कीं, केसरींत काय असतें हें तुम्ही पाहातच आहां. तरी त्यांत जें कांहीं नाहीं असें एखादें नवें व लोकोपयोगी असें लेखनाचें अंग जोडण्याची तुमची तयारी असल्यास, तुम्हांस नोकरी मिळण्याचा संभव आहे. इतर अनेक वर्तमानपत्रकारांनाहि त्यांच्या कचेरींत नोकरी मिळवूं इच्छिणारांना असेंच सांगावें लागत असेल. ही झाली पगारी नोकर होऊं इच्छिणारांची गोष्ट. पण मतप्रकाशनाची हौस, लेखनकलेची हौस ज्यांना आहे अशा लोकांना घरबसल्याहि वर्तमानपत्रांत लिहितां येऊं शकतें. त्यांच्या लेखांना, ते तसेच चांगले असल्यास, प्रसिद्धी मिळते व मोबदलाहि मिळूं शकतो.

पुण्यांत काय किंवा जिल्हानिहाय काय, बुद्धिमान लोक म्हणजे लेखक होण्याच्या योग्यतेचे लोक किती तरी आहेत. तथापि, जिल्हानिहाय वर्तमानपत्रें चालविणें फायदेशीर होत नाहीं. याचें कारण कांहीं थोडें लिहिण्याची हौस कमी, पण कांहीं थोडें असेंहि खरें कीं बाहेरगांवच्या लोकांना अद्यापि वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याची गोडी असावी तितकी नाहीं. एरवीं एक जिल्हा म्हटला म्हणजे लाखों लोकांची वस्ती. त्यांच्याविषयीं बातमी व त्यांना बोधप्रद असें लेखन ज्यांत आहे असें दर जिल्हानिहाय निदान एक वर्तमानपत्र चालून फायदेशीर होण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, या सर्व दृष्टींनीं पाहतां वर्तमानपत्री शिक्षणाची शाळा आज कितपत चालेल याची शंकाच आहे. तथापि दिवस मात्र असे येत आहेत कीं, वर्तमानपत्राच्या धंद्याचीं कांहीं कांहीं अंगें मुद्दाम शिकवून लोक तयार करतां येतील तर बरें. समाजाचा संसार सर्व बाजूंनीं इतका वाढला आहे कीं, श्रमविभाग करण्याचीच वेळ येत आहे. वर्तमानपत्राच्या एक एक वेगवेगळ्या अंगांसंबंधानें एक एक तज्ज्ञ शिकून किंवा अनुभवानें तयार होईल तर चांगलें. आतां लोकांना तात्त्विक लेखनापेक्षां बातम्या, गोष्टी, संवाद, विनोद, चटकदारपणा या गोष्टी अधिकाधिक आवडूं लागल्या आहेत. या सर्वांना वर्तमानपत्रांतून स्थान मिळालें पाहिजे. कारण वर्तमानपत्र हेंच भावी लोकशिक्षणाचें मुख्य साधन होणारें आहे.

# वृत्तव्यवसायांतील माझा अनुभव

[ पुणें पत्रकार-संघाच्या स्वाध्याय मंडळातर्फे श्री. न. चिं. केळकर यांचें केसरी-कार्यालयाच्या सभागृहांत ता. २ मार्च १९४६ रोजीं मराठी वृत्तव्यवसायाविषयीं स्वानुभवकथनात्मक जें व्याख्यान झालें त्याचा सारांश या पुस्तकाचा ' उपसंहार ' म्हणून पुढें दिला आहे.

—**संपादक** ]

वृत्तपत्रकार संघानें मला निमंत्रण करून आपले अनुभव सांगण्याविषयीं विनंति केली, त्याबद्दल मी संघाचा आभारी आहें. तथापि, मी जें कांहीं सांगणार आहें, त्यांत व्यक्तिशः मजविषयीं असें कांहीं सांगणार नाहीं. कारण तें पुष्कळसें येथें जमलेल्या मंडळींना विदितच आहे. म्हणून मी जें सांगणार त्याला संकलित अनुभवाचें स्वरूप राहील व त्यांतून मार्गदर्शन निघेल तें होईल. उपदेश करण्याची श्रेष्ठ भूमिका मला घ्यावयाची नाहीं.

मी आज पन्नास वर्षें, ज्याला " जर्नालिझम् " असें इंग्रजींत म्हणतात त्याचा व्यवसाय करीत आलों आहें. येत्या ता. १७ मार्च या दिवशीं मी " केसरी " संस्थेस येऊन मिळाल्याला पन्नास वर्षें पुरीं होतात, व या संस्थेशीं इतका दीर्घ संबंध राहिल्याचा मला सहजच अभिमान वाटतो. पण येथें येण्यापूर्वींहि मी हा व्यवसाय सातार्‍यास करीत होतों. तो असा कीं, तेथील वर्तमानपत्र " बोधसुधाकर " व मासिक " महाराष्ट्र कोकिळ " यांमध्यें मी लेख लिहीत होतों. कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांच्या ' करमणूक ' पत्रांत माझ्या कविताहि मधून मधून प्रसिद्ध होत असत. आणि अशा तर्‍हेची या व्यवसायाच्या आवडीची माझी पूर्वभूमिका तयार असल्यामुळें, वकिली व मुनसफी सोडून मी " केसरी—मराठा " संस्थेला येऊन मिळालों. मी आलों त्या वेळीं टिळकांना केसरीकडे कोणीच मदतगार नव्हता व मराठ्याकडे होता तो सोडून जाणार होता. तथापि, मजकडे प्रथम काम आलें तें इंग्रजी लिहिण्याचेंच आलें. आणि १८९७–९९ या सालांत मी केसरीचा कायदेशीर संपादक होतों तरी मराठी लेख असे थोडे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ३८८८९ विः निबंध
९५८८ ... दि ३।६।६५



लिहिले. केसरीकडील माझें खरें व भरपूर काम १९१० सालीं सुरू झालें. व संपादक-संचालक या नात्यानें तें काम मी १९३७ पर्यंत केलें. मध्यंतरीं सुमारें वीस वर्षें ( १८९८–१९१८ ) मराठ्याच्या संपादकाचें काम केल्यावर तें विलायतेस जातांना सोडलें. तथापि, इंग्रजी लिहिण्याची मला आवड असल्यामुळें 'मराठ्या 'शीं प्रत्यक्ष संबंध नसतांहि पुढें मी किती तरी लेख त्यांत लिहिले आहेत.

मी प्रथम पुण्यास आलों तेव्हां केसरींत कचेरीव्यस्थापकाची किंवा उपसंपादकाची जागा नव्हती. ग्रंथसंग्रहहि नव्हता. त्या वेळीं इंग्रजी-मराठी वर्तमानपत्रें इतकीं थोडीं आमच्याकडे येत कीं, तीं एका लहानशा टेबलावर मला मांडून ठेवतां येत. त्या वेळच्या पत्रांत प्रमुख म्हणजे इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन, हिंदु, अमृतबझारपत्रिका व मुंबईचीं अँग्लो-इंडियन पत्रें. मी आलों तेव्हां केसरी चारच पानांचा निघे व त्यातील संपादकीय लेख बहुधा सर्व टिळकच लिहीत. उलट मराठ्यांतील बहुतेक संपादकीय लेख मी लिही. मात्र तें लिहिणें थोडें नसून, मोठ्या आकाराच्या मराठ्याचे सरासरी आठ कॉलम मी आपल्या हातानें लिही. १८९६ चा मराठा व १९१८ चा मराठा पत्र हीं काढून पाहिल्यास त्यांत प्रगति काय झाली न झाली हें माझ्यापुरतें बोलतां येईल. तसेंच १८९७ चा केसरी, १९२८ चा केसरी व १९४६ चा केसरी असे पाहिले म्हणजे केसरीची वाढ, प्रगति कशी झाली तेंहि दिसून येईल.

हिंदुस्थानांतील सर्व वर्तमानपत्रें डोळ्यापुढें आणून, या पन्नास वर्षांत वृत्तपत्रांच्या स्वरूपांत व तसेंच व्यवसायांत स्थित्यंतर काय झालें याविषयीं सूत्ररूपानेंच माहिती देतों–( १ ) संपादकीय म्हणून जें एकहाती लिखाण असतें तें कमी झालें. जें वाढलें आहे तें बाहेरच्या लोकांनीं पगाराकरितां म्हणा, किंवा प्रसिद्धीकरितां म्हणा, लिहून पाठविलेलें असतें. मात्र या बाहेरून आलेल्या लेखांत वैचित्र्य, सूक्ष्म अभ्यास, इत्यादि गोष्टी वाढल्या आहेत. त्या इतक्या कीं, टाईम्ससारख्या पत्रांतहि संपादकीय लेख येतात ते 'आहे कांहीं तरी उगीच ' असें म्हणून इतर भागच अधिक आस्थेनें वाचले जातात. उलट मी स्मरणपूर्वक सांगतों कीं, पन्नास वर्षांपूर्वीचे या इंग्रजी पत्रांतील संपादकीय

लेख विद्वत्तेच्या दृष्टीनें अधिक सरस असत. संपादकीय लेखांत चालू विषयच लिहावयाचे हें खरें; तथापि तेहि वाङ्मयदृष्ट्या सजवून लिहिले जाऊं शकतात. आणि लंडन टाईम्सचे " थर्ड " म्हणजे तिसरें छोटें आर्टिकल असतें तें इतकें चांगलें असतें कीं, दोनदोनदां वाचावेंसें वाटतें. मुंबईचा टाईम्सहि या गोष्टीचें अनुकरण करतो. मी ही दृष्टि, म्हणजे लेख वाङ्मयदृष्ट्या शक्य तितके सजवून लिहिण्याची दृष्टि, केसरींत व मराठ्यांतहि ठेवली होती. आणि दुर्दैवानें दिल्ली असेंब्लीच्या भाषणांतहि ती मला टाळतां आली नाहीं ! एकंदरीनें वृत्तपत्रांतून वाङ्मयाची बाजू कमी झाली; पण इतर जागतिक माहितीनें त्याची भरपाई झाली असें म्हणतां येईल.

( २ ) व्यक्तिमतप्रदर्शनापेक्षां पक्षप्रदर्शन वाढलें. जुन्या काळींहि संघटित पक्ष अगदींच नव्हते असें नाहीं. पण होते ते अति अल्प प्रमाणांत होते. पण दुसरा महत्त्वाचा फरक हा कीं, पूर्वीं पक्षाचा पुढारी हा खरा नेता व इतर लोक अनुयायी असे होते, त्याऐवजीं आतां पक्षनेत्याला अनुयायांच्या भीतीमुळें व्यक्तिमतप्रदर्शनाला मुरडच काय पण दडपणहि घालावें लागतें. कदाचित् एखादा ' ट्रायब्यून 'च्या कालिनाथ रॉयसारखा संपादक केवळ व्यक्तिछापाचीं मतें लिहून मान्यता मिळवील. मुंबईचे नटराजन् यांनाहि मी या वर्गांतच घालीन.

( ३ ) तारा व बातमीपत्रें हीं हल्लीं फारच वाढलीं. केसरींत पूर्वीं पत्रव्यवहार हें सदर चांगलें होतें. कारण त्यांत ज्ञान, विज्ञान, वाङ्मय यांचे विषय अभ्यासू लोक चर्चीत. परंतु तेव्हां या सदराखालीं बाहेरचीं बातमीपत्रें अशीं येत नसत. केवळ टिळकांच्या प्रेमांतल्या अशा पांच चार व्यक्ति होत्या कीं, त्यांनीं हवा तो मजकूर पाठवावा व तो ' केसरी 'नें घालावा. बाहेरगांवीं पगारी बातमीदार असा एकहि नव्हता, आणि आजच्यापेक्षां तेव्हांचे हे सहाय्यक स्वतःच्या प्रसिद्धीपेक्षां ' केसरी 'च्या लोभाने लिहीत. तारांनीं तर आज क्रांतीच केली. मी ' केसरी–मराठ्या ' चा संपादक असतां वर्ष सहा महिन्यांत एखादी चार ओळींची तार कोणी अगदीं महत्त्वाची बातमी म्हणून पाठविली तर यावयाची. आज देखील केसरींत दैनिक पत्राइतकीं तारांचीं भाषांतरें घालीत नाहींत. पण चांगलेंसें

दैनिक हातीं घेतलें तर त्यांत तारांचा भरणाच बहुतेक आढळतो. मी केसरींत असतांना, न्यूज एजन्सीज्–बातम्या पाठविणाऱ्या संस्था नांवा-रूपाला आल्या नव्हत्या. रूटरची एजन्सी व कांहीं अंशीं ॲसोसिएटेड प्रेस ही देखील परकी व सरकारजमा वाटे. म्हणून उघड सेनसॉरशिप असल्या-सारख्याच जवळजवळ माफक नेमस्त अशा बातम्या येत. आतां कांहींच निर्बंध राहिलेला नाहीं. लेखणी, जीभ व कृति हीं तीनहि, कालाच्या प्रभावानें, इतकीं स्वैर झालीं आहेत कीं, त्यांना यापुढें कोणीच लगाम लावूं शकणार नाहीं. मी प्रथम ' मराठ्या 'चा संपादक झालों तेव्हां " सेल्फ–गव्हर्न्मेण्ट " हा शब्द घातला म्हणजे " बुइदिन दि एम्पायर " हें मला तेथें लिहावेंच लागे. कारण तें नसलें तर " सेल्फ गव्हर्न्मेण्ट " म्हणजे इंग्रजांचें अधिराज्य नसलेलें राज्य असा अर्थ होऊन खटला भरला जावयाचा. पण आतां रस्त्यांतलें टारगें पोरदेखील, साहेबाच्या तोंडावर व वर्तमानपत्रीं लेखांतून स्वातंत्र्य, चले जाव, इन्किलाब झिंदाबाद, आझादी, हे शब्द मुक्तकंठानें बोलूं शकतें; आणि या यशांत वृत्तपत्रांचा भाग बराच आहे यांत शंका नाहीं. कारण देशांतील चळवळ यथास्वरूप प्रकट करण्याचें धैर्य वृत्तपत्रांनीं दाखविलें नसतें, तर प्रत्यक्ष चळवळ करणारांना तितका जोर आला नसता. The Press is the Fourth Estate of the Realm. ही म्हण हिंदुस्थानांत आतां मात्र खरी ठरूं पाहात आहे. सांगत होतों तें तारांसंबंधीं. मी केसरींत होतों तेव्हां टेलिप्रिंटरची कल्पनाही मला नव्हती. पण विलायतेंत १९३२ सालीं एका वर्तमानपपत्राच्या कचेरीला भेट दिली तेव्हां असें पाहिलें कीं, टेलिप्रिंटर मधून खालीं पडणारे कागदी टेपाचे भारे एक उपसंपादक हातांनीं गोळा करकरून फेकून देत होता. या बाबतींत मागणीपेक्षां पुरवठा फारच अधिक होऊं लागला आहे. पण टेलिप्रिंटर म्हणत असेल ' माझें काम मी करतों, तुम्हांला हवें तेवढें ध्या. माझा जुलूम कोठें आहे ? '

( ४ ) तारा काय, बातमीपत्रें काय, सर्वांनाच छापील ठशाचें रूप येऊं लागल्यामुळें दुसरी बाजू, मतवैचित्र्य, बुद्धिचातुर्य या गोष्टी फारशा प्रकट होत नाहींत.

( ५ ) बाहेरच्या बातमीपत्रांतून, निदान मराठी वृत्तपत्रांपुरतें बोलावयाचें तर, चांगलें वाचनीय असें एकहि बातमीपत्र नसतें. रुक्ष घटनांची खोगीर-भरती असतें. मला व्यक्तिशः बातमीपत्रें फार आवडतात, माझ्या कल्पने-प्रमाणें तीं असतील तर ! आणि याविषयींची माझी हौस मी पुरेपूर पुरवून घेतली आहे. मीं पुण्याबाहेर कामगिरीवर कोठेंहि गेलों, आणि केसरीकडे कॉलम दोन कॉलमचें बातमीपत्र पाठविलें नाहीं असें सहसा घडलेंच नाहीं. माझ्या दिल्लीच्या बातमीपत्रांचा स्वतंत्र ग्रंथच झाला आहे. विलायतेंत असतांहि वेळांत वेळ काढून मी केसरीला बातमीपत्र पाठवीत असें; आणि मी अभिमानानें सांगतों कीं, मुंबई-टाईम्समध्यें सर स्टॅनले रीड जीं लंडनचीं बातमीपत्रें पाठवितो त्यापेक्षां माझीं बातमीपत्रें कदाचित् सरसरच ठरलीं असतील.

( ६ ) ह्या नव्या स्थित्यंतरांत बाहेरील स्थानिक वर्तमान, संस्था, कार्यक्रम, सभा, समारंभ इत्यादींची बातमी व हकीकत येते ती इष्ट वाटते. कारण त्यांत समाजाचें चालतें जीवन दिसून येतें, तसेंच केसरींत देणग्यांची कंटाळवाणी यादी येते त्याविषयीं मी अशी वकिली करीन कीं, आज समाजामध्यें सार्वजनिक देणग्यांचा प्रवाह कसा सुरू झाला आहे हें दिसून येऊन थोडें बरें वाटतें.

( ७ ) संपादक हे क्वचित सजवून लिहितात. परंतु उपसंपादकांच्या लिहिण्याला मात्र जवळजवळ भाषांतराचें स्वरूप येऊं पाहात आहे. पण उपसंपादकीय लिखाण चटकदार असूं नये असा कांहीं नियम नाहीं; आणि उपसंपादकांनीं जर ईर्षा धरली कीं, संपादकीय अग्रलेख टाकून वाचक स्फुटें अधिक आस्थेनें वाचतील असें लिहूं, तर तें वावगें ठरणार नाहीं.

( ८ ) अलीकडे ' रिपोर्टरा 'ची कला चांगली परिणत झाली आहे, लघु-लेखक तयार होऊं लागले आहेत. आणि सभेला जाऊन भाषण ऐकल्याचा आनंद बराचसा घरबसल्या भाषणाचा रिपोर्ट वाचून मिळतो असेंहि क्वचित् घडतें. पण लघुलेखनाचीच आवश्यकता नाहीं. सभेंत नुसतीं टिपणें घेऊन, घरीं येऊन त्याचा विस्तार केला तरी, रिपोर्टिंग यशस्वी होऊं शकतें असा माझा स्वतःचा अनुभव आहे. याविषयीं फार जुन्या

काळीं केसरीचे मुंबईचे बातमीदार अनंत गजाननराव वैद्य यांचें, व तसेंच अलीकडील ज्ञानप्रकाशांतील कोकजे यांचें उदाहरण मी देईन. लघु-लेखन पद्धतीनें लिहून घेतलेलें सगळें भाषण छापणें शक्यच होत नाहीं; म्हणून मागाहून त्या रिपोर्टांत संक्षेप करण्यापेक्षां प्रथमच सारग्राह्य पद्धतीनें लिहिलेलें अधिक चांगलें सजतें.

( ९ ) तारांविषयीं वर सांगितलेंच; पण त्यांतहि परदेशी ताराच फार. त्यांना ' जागतिक ' असें मोठें विशेषण देऊन समर्थन केलें तरी होणार नाहीं. तारांचें संपादन करतांना विवेक ठेवावा तितका ठेवला जात नाहीं असें माझें निश्चित मत आहे; आणि थट्टेनें उदाहरण द्यावयाचें म्हणून मी ' जुगोस्लाव्हिया ' या देशांतून आलेल्या तारांच्या भाषांतराचें देत असतों! सांगायचें तात्पर्य हेंच कीं, तार आली म्हणून ती छापलीच पाहिजे असें मनानें कां घ्यावें? तसेंच लंडन, टोकिओ, बर्लिन, मॉस्को, वॉशिंग्टन अशाहि ठिकाणच्या तारा असल्या तरी त्यांचा संक्षेप करून, दैनिक पत्राची कॉलम दीड कॉलम जागा वांचवून ती इतर चटकदार मजकुराला देण्याची मी प्रतिज्ञा करू शकेन. शिवाय बाहेरून बातम्या येतात त्यांतहि मनाला आनंद देणाऱ्या किती व दुःख देणाऱ्या किती हें पाहिलें म्हणजे खरोखर वाईट वाटतें. तारा वाचणें नको असें वाटतें. कदाचित् तारा पाठविणारांना अशीच शिकवण मिळत असेल कीं, वाईट, भयंकर उत्पातकारक, दुःखप्रद, चमत्कारिक असलीच क्षोभकारक बातमी पाठवावी. पण एखादें दैनिक पत्र वाचून खालीं ठेवलें आणि जगाच्या भलेपणाची वार्ता कानीं येऊन बरें वाटलें, असा सहसा अनुभव येत नाहीं. दैनिक वर्तमानपत्रें वाचण्याची संवय जात नाहीं हें खरें. पण जेथें तीं वाचावयास मिळत नाहींत अशा एखाद्या ठिकाणीं चार-आठ दिवस मुक्काम पडला तर ते माझे दिवस सुखाचे गेले असें मला वाटतें.

(१०) ज्याला " फीचर रायटिंग " असें म्हणतात तें हल्लीं वाढलें आहे हें मोठें चांगलें आहे. त्यांत स्वतंत्र व्यक्तिदर्शन व कालदर्शन होऊं शकतें. म्हणून उपसंपादकादिकांनीं इतर रीतीनें आपल्या वर्तमानपत्रासंबंधानें करावयाचें तें कर्तव्य करून, शिवाय स्वाधीनचें कलम म्हणून, ही बाब शिकावी; व संपादकानेंहि त्यांना ती शिकण्यास सवड द्यावी.

(११) क्रीडांगण, नाणेबाजार, दरदाम यांचें सदर विस्तारलें आहे व तें योग्य आहे. कारण खेळ-सामने वगैरे गोष्टींनाहि भारतीयच काय पण आखिल जागतिक स्वरूप येऊं लागलें आहे. तीच गोष्ट आर्थिक दृष्टीनें नाणेबाजार, शेअरबाजार यांची; आणि वर्तमानपत्रांच्या वाचकांपैकीं एक निश्चित वर्ग असा आहे कीं, जो वर्तमानपत्रांतील नेमकें हेंच वाचतो. मात्र मराठी वर्तमानपत्रांतून फलज्योतिषाला जी जागा देण्यांत येते ती मला आवडत नाहीं. तें धड फलज्योतिष असत नाहीं, धड वाङ्मयहि असत नाहीं. दोहोंचें वाईट मिश्रण असतें. वाईट इतकेंच वाटतें कीं, केवळ वाचकांची संख्या वाढावी किंवा टिकावी म्हणून या ज्योतिषाच्या सदराला कांहीं चांगलीं वर्तमानपत्रेंहि स्थळ देतात ! विलायती पत्रांत जाहिरातबाजी पुष्कळ आहे. खोट्या गोष्टीहि लिहितात. खोट्या बातम्या लिहितात. अनेक रीतींनीं भडकपणा आणतात. पण त्यांत फलज्योतिषाला जागा नाहीं असें वाटतें. एखादें याच विषयाला वाहिलेलें वर्तमानपत्र असेल तर ती गोष्ट वेगळी. माझ्या मतें प्रतिष्ठित वर्तमानपत्रांनीं ही फलज्योतिषाची प्रवृत्ति कमी करण्याला झटलें पाहिजे. केसरीचे संपादक ( ज. स. करंदीकर ) फलज्योतिषावर विश्वास ठेवणारे असतां देखील हें सदर ते केसरींत घालीत नाहींत.

(१२) चित्रछपाई एकंदरीनें पुष्कळच वाढली. पन्नास वर्षांपूर्वीं फोटो-ब्लॉक पद्धति नव्हती. कॉपर प्लेट, वुडकट् यांच्या साहाय्यानें चित्र छापीत. पण आतां चित्रकलेंत फारच प्रगति झाली आहे. याला खर्च लागतो म्हणून देशी भाषेंतील पत्रांना चित्रें घालणें फारसें परवडत नाहीं; परंतु चित्रकलेची मदत जाहिरातींनीं किती घेतली आहे हें अमेरिकेंतील " लाइफ " सारख्या पत्रांवरून दिसून येईल. तें पत्र हातांत घेतल्यावर त्यांत बुडी मारमारून मजकूर काय तो हुडकूनच काढावा लागतो ! एरवीं सहज वाचलें तर ती शेवटीं जाहिरातच आहे असें लक्षांत घेऊन वाचक फजित व खजिल होतो. जाहिरात ही अशीच गोष्ट आहे कीं, तींत कोणीं काय वाटेल तें लिहावें. तिच्या मजकुराची जबाबदारी संपादकावर येत नाहीं. तथापि, अश्लील व बीभत्स हें जाहिरातींतून काढून टाकण्याचा हट्ट जुटीनें धरला तर तो पुरा पडेल असें वाटतें.

(१३) एकंदरीनें काव्य, कविता यांची वाढ वाङ्मयदृष्ट्या झाली असली

तरी, गद्यानें पद्याला जवळजवळ नामशेष करून टाकलें आहे. मासिकें, वृत्तपत्रें यांमधून शेंकडा एकदोन इतकीहि जागा कवितेला मिळत नाहीं आणि छापून येतात त्या कविताहि फारशा चांगल्या नसतात. पण खरी काव्यप्रतिभा ही इतकी विपुलप्रसव असतच नाहीं ! चांगलें काव्य एखादेंच निर्माण होतें. परंतु वर्तमानपत्रांतून कवितेचें सदर ठेवावें, अगदींच काढून टाकूं नये. कारण पद्यांत, कांहीं केलें, तरी, खेळकरपणा असतो. तो गद्यांत येऊं शकत नाहीं. हल्लीं टाईम्समध्यें ए. सी. जी. या सहीवर कविता येतात. 'काळ' पत्रांत कोणी पेठे अशाच कविता लिहितात. मात्र त्यांना थट्टेचें किंवा खेळकरपणाचेंच रूप राहूं शकतें. रसगांभीर्यादिकांची अपेक्षा त्यापासून करण्यांत अर्थ नाहीं.

( १४ ) निबंधलेखन हा प्रकार एकंदरीनें कमी झाला. पूर्वीं इंग्लंडांत टॅटलर-रॅम्बलर यांसारखीं पत्रें केवळ वाङ्मयीन विषयांना वाहिलेलीं असत; व ॲडिसन, स्टील, जॉन्सन् असले लेखक तीं चालवीत. हल्लीं देखील " स्पेक्टेटर ", " न्यू स्टेट्स्मन् " अशा पत्रांत निबंध येतात. मराठी वृत्तपत्रांतून हें सदर नाहींसें होत चाललें आहे; आणि मासिकांतहि केवळ गोष्टी, लघुकथा यांचाच भरणा होत आहे ! जुनें " विविधज्ञानविस्तार " नाहींसें झालें. " सह्याद्री " ला हें स्वरूप मीं हट्टानें कांहीं थोडेंसें ठेवलें आहे, आणि तेंच त्याचें वैशिष्ट्य रहावें अशी माझी इच्छा आहे. ज्याला स्टाइल किंवा भाषापद्धति म्हणतात ती दिसण्याला निबंध हेंच एक स्थान आहे; किंवा निबंध हीच तिची खरी कसोटी होऊं शकते. कथा कादंबऱ्या यांना चांगली भाषापद्धति उघडच साहाय्य करूं शकते. परंतु तें त्यांचें मुख्य लक्षण होऊं शकत नाहीं. मराठी वृत्तपत्रांनीं, माझ्या मतें, केवळ निबंधस्वरूपाच्या वाङ्मयाला कांहीं जागा देत जावी.

( १५ ) दैनिक पत्रांची वाढ झाल्यामुळें सगळा ताजा शिधा व ताजा स्वयंपाक असेंच ज्ञानाला स्वरूप येऊं लागलें आहे. स्वस्थपणें मनन करण्याला अवकाशच उरत नाहीं. अद्भुताच्या लाटांवर लाटा घेऊन थडकतात. आतां दैनिकाच्या एका दिवसांत एकाहून अधिक आवृत्त्या निघण्याचेंच राहिलें आहे; व तसें झालें म्हणजे स्वस्थ निर्विकार मनानें विचार व मनन करण्याला सवडच राहणार नाहीं. मुंबईत हल्लीं कित्येक घरांतून घरच्या

चुलीवरील स्वयंपाक बंद पडून खानावळींत जाऊन किंवा खानावळींतून डबे आणून सर्व अन्नव्यवहार नाइलाजानें चालतो. तसा प्रसंग या वैचारिक स्वयंपाकावर आला आहे. अर्थात् घरच्या स्वयंपाकांतील शुद्धता व स्वाधीनता बाहेरून आणलेल्या अन्नाला रहात नाहीं.

( १६ ) समाजजीवनाचें दर्शन करण्याचें काम मासिकांनीं उचललें. पण तें सर्व शृंगारिक लघुकथांना वाहून सोडलें. आणि वृत्तपत्रांना राजकारणानें घेरलें. यामुळें सामाजिक विषयांवरील स्वतंत्र, निर्भीड, विचारपरिप्लुत, असे लेख कोठेंच वाचावयास मिळत नाहींत. वर सांगितल्याप्रमाणें निबंध या प्रकाराला वृत्तपत्रांतून निश्चित स्थान मिळेल तरच ही गोष्ट घडेल. राजकीय विषयांनीं सामाजिक धार्मिक विषय मागें टाकले; आणि समाजांत घडून प्रसिद्ध होणाऱ्या गोष्टी तेवढ्याच कानावर येऊन समाजस्थिति काय लक्षांत येईल ती, असें घडत आहे. नवरा-बायकोच्या उलटसुलट नोटिसांनीं समाजांत काय चाललें आहे हें एका अंगानें दिसतें. पण मध्यम वरिष्ठ वर्गांतील समाजजीवन यथार्थपणें प्रकट होत नाहीं.

( १७ ) गेल्या सुमारें पंचवीस वर्षांत, अच्युतराव कोल्हटकर इत्यादिकांच्या पुढारीपणानें व्यक्तिनिंदा, व्यक्तिच्छल हें अंग वर्तमानपत्रांतून पुष्कळ वाढलें; परंतु नवीन वृत्तपत्र-संघाकडून या गोष्टीला आळा पडेल अशी अपेक्षा व आशा आहे. माझ्यापुरतें मी सांगू शकेन कीं, अच्युतराव कोल्हटकर व विविधवृत्त यांनीं मला वीस वर्षें सतत छळलें, तरी मीं केसरींत आपण होऊन व्यक्तिनिंदेला कधींहि स्थान दिलें नाहीं.

( १८ ) नव्या युगांत एकाच मनुष्यानें अनेक पत्रें निरनिराळ्या नांवानें काढून तीं चालविण्याची घटनाहि होत आहे. याला “ सिंडिके-टिझम् ” असें नांव आहे. अमेरिकेंत हर्स्ट, इंग्लंडमध्यें नॉर्थक्लिफ्, वीव्हरब्रुक अशांनीं जें केलें त्याचें अनुकरण मुंबईस अमृतलाल शेठ यांनीं कांहींसें केलें. तात्त्विक दृष्ट्या याला हरकत घेतां येत नाहीं, परंतु परिणामीं तो भांडवलशाहीच्या जुलमाचा एक प्रकार ठरतो.

असो. तात्पर्य, माझ्या अनुभवामध्यें वृत्तपत्रव्यवसायांत स्थित्यंतरें काय झालीं याचें हें वर्णन मीं केलें आणि वृत्तपत्र घेतलें तर सामान्यतः त्यांत काय किती असतें हें लक्षांत यावें म्हणून गेल्या आठवड्यातील कांहीं

वर्तमानपत्रांचा एक एक अंक घेऊन मीं पृथक्करण केलें आहे. तें पुढें देतों.

| | एकूण कॉलम | जाहिरातीं कॉलम | तारा | नाणेबाजार क्रीडांगण इ. | संपादकीय उप. | बातमीपत्रें लि. आ. | खास रिपोर्टर सब् एजि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| फ्री–प्रेस | ८४ | ८ | २१ | ७ | २+२=४ | ३६ | ८ |
| टाईम्स इ. | ७० | ३० | १२ | ७ | २ | ९ | १० |
| केसरी | ६० | २७ | ७ | १ | ९ | ११ | ५ |
| काळ | २८ | ५ | १० | ० | १ | १० | २ |
| ज्ञानप्रकाश | ३२ | ९ | ७ | २ | २ | ८ | ४ |

( अ ) वरील विवेचनावरून झालें काय व व्हावें काय याविषयींचें माझें मत कळेलच. परंतु व्हाव्या अशा आणखी कांहीं इष्ट गोष्टींचें दिग्दर्शन करतों. ( १ ) पूर्वीं सांगितलेलें " फीचररायटिंग " वाढवावें. तसें झाल्यानें वृत्तव्यवसायाला वाहून घेतलेल्या उपसंपादकांना आपलें व्यक्तिमत्त्व प्रकट करण्याला संधि मिळेल. कांहीं अर्थशास्त्रज्ञ असें म्हणतात कीं, मोठमोठ्या कारखान्यांत कामाची वांटणी होऊन श्रमविभाग झाल्यासारखा दिसतो. पण त्यांत असेंहि घडतें कीं, एक खिळा तर खिळाच, स्क्रू तर स्क्रूच करीत कामगाराला जन्महि घालवावा लागतो. यांत त्यांचें ठरीव काम चांगलें होत असेल, पण त्याच्या इतर सुप्तशक्ति मारल्या जातात. म्हणून संपादकानें उपसंपादकांना अशी संधि मुद्दाम द्यावी कीं, त्यांनीं आपल्या नांवानें लेख लिहावे व त्यामुळें त्यांचें नांव व्हावें. कित्येक ठिकाणीं उपसंपादकांना अशी संधि मिळत नाहीं. पण उलट कित्येक ठिकाणीं ही संधि मिळत नाहीं या सबबीखालीं कांहींना लपूनहि राहतां येतें! म्हणून संपादकानें उपसंपादकांना " तुम्ही पुढें या, आपल्या नांवानें प्रकट व्हा, आणि तुमच्या अंगीं असेल तो गुण दाखवा " असें म्हणावें आणि असें झालें म्हणजे जी एका बाजूनें संधि तीच दुसऱ्या बाजूनें चॅलेंज किंवा आव्हानहि ठरतें! माझ्या वेळीं मीं 'केसरी'च्या सर्व उपसंपादकांना, कारकुनांना सुद्धां, अशी संधि देऊं केली होती. ( २ ) रिपोर्टिंगचें सदर वाढवावें आणि

मजकुरांत प्रत्यक्षपणा अधिक आणावा. हा प्रत्यक्षपणा, इंग्रजींत ज्याला डायरेक्ट कन्स्ट्रक्शन म्हणतात ही अधिक वापरल्यानें येईल. ( २ ) उप-संपादकांना किंवा इतरांना प्रवासी बातमीदार, स्पेशल कॉरस्पॉण्डण्टस्, रोव्हिंग एडिटर्स असे ठेवावे. गरीब वर्तमानपत्रांना हें शक्य नाहीं. पण विलायतेंतील, अमेरिकेंतील पत्रें याविषयीं करतात तसें कोणचींहि देशी पत्रें करतांना आढळत नाहींत. पण हें अवश्य व्हावें. त्याशिवाय निरनिराळ्या प्रांतांतील लोकस्थिति वाचकांना कळण्याला मार्ग नसतो. सर व्हॅलंटाईन चिरोल यांच्यासारखे स्पेशल कॉरस्पॉण्डण्टस् प्रधानमंडळांत जाण्याच्या लायकीचे होते. देशांतरीं फिरून रिपोर्टरचें काम करण्याला त्यांना कमीपणा वाटला नाहीं. ( ४ ) तारांची बातमी अवश्य हवी; पण माझ्या मतें त्यांचीं भाषांतरें करून देण्यांत विवेक संक्षेप अवश्य हवा. ( ५ ) छापण्यास कंपॉझिटर्सच्या हातीं देण्याची लेखी प्रत ही हल्लींहून अधिक स्वच्छ, शुद्ध व सुबोध करण्याचा प्रयत्न व्हावा हें मला इष्ट वाटतें. हल्लीं कंपॉझिटर लोकांत निरक्षरांचाहि भरणा होऊन, ते कंपोज करीत करीत लिहावयास शिकतात असें म्हणतां येईल ! पण त्याच्याच जोडीला लेखक जी " कॉपी " म्हणून देतात तीहि बहुशः निष्काळजीपणानें लिहिलेली असते. यामुळें छपाईच्या चुका फार राहतात व तें एक लांच्छन होऊं शकतें. मराठी शुद्धलेखनाचे नियम निश्चित नाहींत हें मीं जाणतों. तथापि, प्रत्येक वर्तमानपत्राला तरी आपापल्यापुरता हा निश्चितपणा ठरवितां येईल. कॉपी खर्डावयाची व कंपॉझिटरच्या अंगावर फेकावयाची अशीच प्रथा आज आढळते. याविषयीं संपादकानें अधिक दक्षता घेतली पाहिजे असें मला वाटतें. शुद्ध भाषा आणि सोपीं वाक्यें, तुटक वाक्यें लिहिण्याचें वळणहि सक्तीनें अंमलांत आणलें पाहिजे. नाहीं तर दहा दहा ओळींचीं वाक्यें बनविलेलीं आढळतात ! ( ६ ) इंग्रजींत ज्याला न्यूज सेन्स म्हणतात तें वाढविलें पाहिजे. समाजांत घडतात व लोकनिदर्शनाला येण्याला पात्र असतात अशा गोष्टी अनेक असतात. परंतु बाहेरचीं बातमीपत्रें व तारा यांवर सर्व भर पडून स्थानिक प्रांतिक घटनांकडे दुर्लक्ष होतें. हें न होण्याचा उपाय म्हणजे जो कोणी बातमी म्हणून चांगली आणून देईल त्याला मोबदला व उत्तेजन देण्यांत येऊं लागलें पाहिजे.

यानंतर आतां वृत्तपत्रव्यवसायाविषयीं कांहीं सर्वसामान्य व तात्त्विक स्वरूपाचें मी बोलूं इच्छितों. पहिली गोष्ट ही कीं, वर्तमानपत्र याऐवजीं 'वृत्तपत्र' हा शब्द वापरीत जावा. वर्तमान याला क्षणिकपणाचा अर्थ येतो. वृत्त याला समाजजीवनाचा वास येतो. वृत्तपत्राचा धंदा म्हणण्यापेक्षां वृत्तपत्रव्यवसाय हा व्यापक शब्द वापरीत जावा. त्यामध्यें वृत्ति, आजीव उद्योग, धंदा, व्यापार, पेशा, कला, हौस या सर्व गोष्टींचा समावेश होतो. पण प्रकार वेगवेगळे असतात. वृत्ति म्हणजे हातातोंडाची गांठ पडण्याचा उद्योग. आजीव याचाहि अर्थ कोणीकडून तरी जगण्याचा उद्योग. परंतु धंदा म्हटला म्हणजे त्याला अधिक व्यापक रूप येतें. इंग्रजींत याशीं समानार्थक शब्द कॉलिंग, ऑक्युपेशन, व्होकेशन, वर्क, बिझिनेस, ट्रेड, इंडस्ट्री, प्रोफेशन इत्यादि होत. म्हणून वृत्तपत्रव्यवसायी याची व्याख्या निश्चित करणें कठिण असते. एका टोंकाला संपादकाच्या टेबलावरील पत्रें जुळवून ठेवणारा, व दुसऱ्या टोंकाला केवळ प्रतिभा सुचवील तेव्हां कलात्मक अंकनिर्मिति करणारा, हे दोनहि वृत्तपत्रव्यवसायी म्हणतां येतील. मायकेल जोसेफ नांवाच्या एका इंग्लिश ग्रंथकारानें जर्नालिस्ट याची व्याख्या अशी केली आहे : 'The engineers responsible for printing machines, the advertisement manager and his canvassors who secure advertisements, the clerks at the counting house of a newspaper, the printers, readers are in a sense all journalists." पण ही व्याख्या फारच व्यापक झाली. दुसरी एक व्याख्या अशी सांगतां येईल कीं, The man who takes to ink, as others take to drink, is a journalist. याचा अर्थ ज्याच्या अंगांत रक्ताबरोबर शाईहि भिनली आहे तो जर्नालिस्ट खरा ! ! एका अर्थानें हें खरें आहे. कारण लिहिण्याची हौसच नव्हे, तर जवळ जवळ व्यसनच ज्याला आहे तोच खरा जर्नालिस्ट होऊं शकेल. सांगकाम्या, जुलमानें लिहिणारा, किंवा स्वतःची फार घमेंड असल्यानें आपला शब्द मापून मोजून विकला जावा असा अहंकार वाहणारा हे लोक कधीं वृत्तपत्रव्यवसायी होऊं शकणार नाहींत. माझी म्हणून मी एक चालचलाऊ व्याख्या अशी बनवितों कीं, ज्याचे निदान सहा लेख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध

झाले तो वृत्तपत्रव्यवसायी म्हणावा. कारण छापलेले सहा लेख म्हणजे फाडून टाकलेल्यांसुद्धां बारा-पंधरा लेख होतात, व त्यावरून लिहिण्याची संवय सिद्ध होते. दुसऱ्या बाजूनें संपादकाला ते छापावेसे वाटले यावरून लेखकाचा लेखनगुण सिद्ध होतो. असो. तथापि, या व्यवसायांत कांहीं लोक जसे हौसेनें पडतात तसें इतर कांहीं पोटार्थी म्हणूनहि पडतात. पण त्यांच्या गुणाला पुढें कसोटी आपोआप लागते, व त्यांना मिळालेली कीर्ति किंवा अपयश हीच ती कसोटी ठरते. या विषयांतहि पेशा म्हणून एक उत्पन्न होतोच; व तोच सर्वांत प्रतिष्ठित ठरतो. धंद्यापेक्षांहि पेशा हा वरच्या दर्जाचा. धंद्यांत केवळ द्रव्यार्जनावर दृष्टि असते; पेशा म्हटला म्हणजे त्याचा संबंध विद्यानैपुण्य व मान्यता यांशीं येतो. तो आपल्या गुणांची विक्री म्हणून करीत नाहीं. मान्यतेनें मिळालें तर घेतो. याचें उदाहरण म्हणून मुंबईच्या हरेश्वर ज्योतिष्यांचें देईन. पूर्वीं या विद्येवर त्यांनीं लाखो रुपये मिळविले. आतां स्वतःचा बंगला बांधून व मोटार ठेवून ते राहतात. सामान्य प्रश्नपत्रिका ते पाहात नाहींत. त्या कामाला घरचे शिष्य बटु ते पाठवितात. कारण घरीं विद्येचें शिक्षण चालूंच आहे. पण स्वतः स्वारी मुहूर्त सांगण्याला जाईल ती एखाद्या राजा–महाराजांचें बोलावणें आलें तर मोटारींतून जाईल ! कदाचित् मानाचा विडा एवढाच मोबदला घेऊन येईल ! किंवा क्वचित् हजार रुपयांचा तोडाहि आणील ! पण हा धंदा नव्हे, हा पेशा होईल. इंग्रजींत ज्याला बिझिनेस किंवा व्यापार म्हणतात तोहि करणारे वृत्तपत्रव्यवसायी असूं शकतात. मग त्यांना स्वतःला लिहितां येवो किंवा न येवो. स्वतः गवळी नसतां गवळ्याचा धंदा करणारे डेअरीवाले व हे व्यवसायी सारखेच म्हणावेत. पण यापलीकडील एक पायरी आहे, ती अशी कीं, श्रीमान् कोट्यधीश हेहि क्वचित् आपलीं म्हणून वर्तमानपत्रें चालवितात ! त्यांना स्वतःला त्यांत पैसा मिळवावयाला नको असतो. परंतु पदरीं कवि कलावंत असणें हें जसें राजा भूषण मानतो, तसेच आमचे बिर्ला–डालमिया हे मानूं शकतील, व आपल्या पैशानें संपादक ठेवून वर्तमानपत्रें चालवितील. पण त्यांत कधीं स्वतः चार ओळी लिहिणार नाहींत.

आतां शेवटीं या व्यवसायांत मालक व कामगार हा प्रश्न हल्लीं निघाला आहे तो एका अर्थानें योग्य आहे. वृत्तपत्रव्यवसायाला किमानपक्ष कांहीं

पगार देणें योग्य होईल. पण जशी पगाराची किमान मर्यादा, तशी गुण व कार्यक्षमता यांचीहि कांहीं किमान मर्यादा असलीच पाहिजे. नाहीं तर कोणाहि अपात्र मनुष्याला त्याची गरज व याचा उपकार म्हणून, जागा द्यावी व मग त्यानें जुलमी अर्थशास्त्र मदतीला घेऊन किमान पगार मागावा हा न्याय होत नाहीं ! म्हणून माणसें थोडींच पण निवडून घ्यावीं. घेतलीं त्यांना पगार चांगला द्यावा. काम पुष्कळ घ्यावें. न बनेल तेव्हां कांहीं ठराविक मुदतीच्या नोटिशीनें एकमेकांची सोडवणूक करून घेतां यावी. हाच नियम उपयुक्त ठरेल असें मला वाटतें. गुणपरीक्षा कसोशीनें न घेतां खोगीरभरती केली म्हणजे त्यांत कोणाचाहि फायदा नाहीं.

आतां वृत्तपत्रव्यवसायाला त्या धंद्यांतील शिक्षण देणारी संस्था, पदवी, अभ्यासक्रम इत्यादि असावी अशी कल्पना आहे. उपजत गुणाच्या बीजाला खत मिळालें तर हवेंच. चित्राला चौकट शोभिवंत बरी. कामकऱ्याला हत्यार घासलें पुसलेलें हवें. कलावंताला चांगले कुंचले व रंगसंग्रह हवा. परंतु कवीप्रमाणें वृत्तपत्रव्यवसायी हा देखील जन्मतः सिद्ध असतो; शिकवून तयार होत नाहीं ! लंडनमध्यें फ्लीटस्ट्रीट नांवाची या व्यवसायाची मुख्य पेठ आहे. पण त्यांत विद्यापीठाची पदवी मिळून झालेले संपादक फार थोडे, व स्वतः सिद्ध गुणानें पुढें आलेले पुष्कळ. किमान वेतन म्हणून आठवड्याला कांहीं ठराविक शिलिंग पौंड अंगावर फेकले जातील. परंतु पदवीचें पदक नसलेला संपादक प्राइम मिनिस्टरइतका, म्हणजे पांचसहा हजार पौंड इतका पगार सालिना मिळवूं शकतो. आणि जगभर जीं नांवें आज वृत्तपत्रव्यवसायी म्हणून झळकतात तीं अशा जन्मसिद्ध गुणांचींच द्योतक आहेत. तथापि, एखादी शाळा काढून, अभ्यासक्रम ठरवून, उपसंपादक तयार करण्याचा उद्योग व्यर्थ आहे असें मात्र मी म्हणणार नाहीं. कांहीं विद्यापीठांतून तो शिक्षणक्रम व ती पदवी ठेवलेली आहे. महाराष्ट्रांत नवीन निघणाऱ्या विद्यापीठांत तो उपक्रम केला जाईल. पण स्वतंत्र एखादा शिक्षणवर्ग निघण्यासहि हरकत नाहीं. कारण अभ्यास हा कधीं फुकट जात नाहीं. कांहीं तरी फल देतोच.

ᛟ ᛟ ᛟ

परिशिष्ट

# माझ्या कांहीं आठवणी

केसरी व मराठ्याचें नांव मी प्रथम १८८२ सालीं टिळक-आगरकरांना कोल्हापूर-प्रकरणांत शिक्षा झाली त्या वेळीं ऐकलें. त्या वेळीं मी शाळेंत शिकत होतों. बेअब्रूच्या गुन्ह्याकरितां संपादकाला तुरुंगवासाची शिक्षा होणें ही गोष्ट आम्हांला नीटशी कळण्याजोगी नव्हती. पण फौजदारी होऊन तुरुंगवासाची शिक्षा होणें ही गोष्ट मात्र देव-दानवांच्या युद्धाइतकी रोमहर्षक वाटे. माझे बंधु केसरीचे १८८७ सालीं वर्गणीदार झाले तेव्हां मी केसरी प्रथम वाचला. पुढें पुण्यांत येऊन १८८९ सालीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें दाखल झालों. गांवांत जोगेश्वरीच्या बोळांत ज्या घरीं होतों तेथेंच केसरी छापखान्यांतला एक प्रूफ-रीडर बिऱ्हाडानें राहत असे. सोमवारीं रात्रभर जागरण करून मंगळवारीं पहाटे तो घरीं येत असे. त्याचा तो श्रमलेला चेहरा, आणि जागरणानें आरक्त झालेले डोळे पाहून एखादा योद्धा रणांगणावरून परत यावा असा त्याच्याबद्दल आम्हांला आदर वाटत असे. त्याच सालीं मीं एका कंपॉझिटरचा वशिला लावून आर्यभूषण छापखाना पाहिला ! केसरीच्या मजकुराची जेथें जुळणी होई त्या दुतर्फा कंपॉझिटरांच्या रांगांमधून त्यानें मला फिरवून आणलें.

१८९१ सालीं मी डेक्कन कॉलेजमध्यें असतांना शनवारवाड्यासमोर टिळकांचें संमतिबिलाविरुद्ध भाषण झालें. त्या वेळीं मीं टिळकांना प्रथम पाहिलें. त्याच वर्षीं डेक्कन कॉलेजांत त्यांनीं ' ओरायन 'वर व्याख्यान दिलें. कॉलेजच्या संमेलनांत आम्ही मृच्छकटिक नाटक करणार होतों. त्या वेळीं विरोधी पक्षानें प्रि. सेल्बी यांचे कान भरले. त्यावेळीं तरुणांचे जन्मसिद्ध पुढारी या नात्यानें आम्ही टिळकांना भेटलों आणि ' केसरी 'च्या मदतीनें विरुद्ध पक्षाची दाणादाण केली.

१८९५ सालीं पुण्यांत राष्ट्रीय सभा भरली त्या वेळीं पुनः टिळकांचें भाषण ऐकलें. मात्र सामाजिक परिषदेला राष्ट्रीय सभेचा मंडप देऊं नये या

टिळकांच्या मताशीं माझें सहमत नव्हतें. पण प्रत्यक्ष टिळकांशीं बैठकीवर बसून चर्चा करण्याचा योग १८९६ च्या फेब्रुवारी महिन्यांत आला. या वेळीं मी नुकताच वकील होऊन साताऱ्यास प्रॅक्टिस करीत होतों. टिळक कायदे कौन्सिलचे सभासद निवडले गेले असल्यामुळे एका बागेंत स्थानिक मंडळींनीं त्यांना मेजवानीला बोलावलें होतें. आणि साताऱ्च्या सार्वजनिक जीवनांत होतकरू वक्ता म्हणून मी पुढाकार घेत असल्यामुळें टिळकांशीं चर्चा व संभाषण करण्यांतहि पुढारीपण साहजिकच माझ्याकडे आलें. कसा योगायोग आहे पाहा. पुढच्याच महिन्यांत मराठ्याचा संपादक व लॉ क्लास-मध्यें शिक्षक होण्याकरितां टिळकांकडून मला पाचारण झालें. स्थानिक वर्तमानपत्रांत या वेळीं मी हौसेनें लिहीत असे आणि एकदां तर किंकेड-साहेबांच्या अरेरावीविरुद्ध मी निर्भयपणानें स्थानिक वर्तमानपत्रांत टीका केली होती हीहि गोष्ट कदाचित् टिळकांच्या कानांवर पडून माझ्याविषयी त्यांचें अनुकूल मत झालें असेल. कसेंहि असो, १८९६ च्या मार्चमध्ये सहकारी संपादक व मित्र या नात्यानें मी लो. टिळकांकडे कायमचा आलों !

पुढच्याच वर्षीं १८९७ सालीं केसरीवर राजद्रोहाचा खटला झाला यामुळें टिळकांनंतर ओघानेंच मी केसरी व मराठ्याचा जबाबदार संपादक झालों. या काळांत मीं ज्या रीतीनें वर्तमानपत्रें चालविलीं त्यानें टिळकांचें पूर्ण समाधान झालें; यामुळें पुनः वकिली करण्याचा विचार माझ्या डोक्यांत तर कधीं आला नाहींच, पण मिरज संस्थानांत मी न्यायाधीश होण्याकरितां मला विचारणा केली होती त्याला मीं नकार दिला.

पुढें १९०१ सालीं ताईमहाराज प्रकरण सुरू होऊन दिवाणी आणि फौजदारी कामांचें शुक्लकाष्ठ टिळकांविरुद्ध सुरू झालें. यांत माझें वकीलपत्र टिळकांच्या वतीनें तीन वर्षें दाखल असून त्यांत औरंगाबाद, उमरावती येथें कमिशनपुढें आलेल्या साक्षीदारांची तपासणी करणें वगैरे कामें होतीं. ताई महाराजांनीं प्रोबेट रद्द करण्याकरितां डिस्ट्रिक्ट जज्ज ॲस्टन यांच्या-कडे अर्ज केला होता; त्या वेळीं टिळकांच्या वतीनें मीच ॲस्टनसाहेबांपुढें बचावाचें भाषण केलें होतें.

१९०८ सालीं टिळकांना सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर १९१० सालीं मी पुनः केसरीचा संपादक झालों. १८९७ सालापासून

मराठ्याचें संपादकत्वहि माझ्याकडेच होतें. टिळकांच्या गैरहजेरींत या वेळीं संपादकत्व निभावून नेणें ही एक परीक्षेचीच वेळ होती. पण केसरीच्या हजारों वाचकांना तसेंच लो. टिळकांनाहि माझ्या कामगिरीनें पूर्ण समाधान वाटलें; यामुळें माझे टिळकांशीं व केसरी संस्थेशीं असलेले संबंध पूर्वीपेक्षांहि अधिक दृढतर झाले. आणि १९१४ सालीं टिळक सुटून आल्यावर दिपवाळीच्या देणगीनिमित्त टिळकांनीं एकमुठीनें मला पांच हजार रुपये इनाम बक्षीस दिले !

तुरुंगांतून सुटल्यावर टिळकांनीं स्वराज्याची चळवळ जोरानें सुरू केली. या काळांत अनेक परिषदांचें अध्यक्षपद माझ्याकडे आलें व या सभांना स्वतः टिळक हे सन्मान्य पाहुणे म्हणून हजर असतांना अशा अनेक परिषदांचें चालकत्व मीं यथासांग पार पाडलें. १९१८ सालीं त्यांच्या-बरोबर होमरूल लीगचा चिटणीस म्हणून मी विलायतेला गेलों व १९१९ सालीं परत आल्यावर त्यांच्याच अनुमतीनें केसरीचा संपादक झालों. याच सुमारास टिळकांनीं मृत्युपत्र केलें त्या अन्वयें केसरी व मराठ्याचा संपादक, तसेंच आपले चिरंजीव व केसरीचे मॅनेजर यांत मतभेद झाल्यास लवाद किंवा सरपंच म्हणून टिळकांनी माझी नेमणूक केली. टिळकांच्या चिरंजीवांनीं त्यांच्या मृत्यूनंतर केसरीचा ट्रस्टी म्हणून माझी नेमणूक करून मृत्युपत्रांतील टिळकांच्या इच्छा शेवटास नेण्यास मदत केली. हें सर्व पाहून मनांत येतें कीं, लो. टिळकांत व माझ्या अंगच्या गुणांत किती तरी महदंतर ! त्यांचे एकेक लोकोत्तर गुण, विद्वत्ता, प्रभावी राजकीय पुढारीपण हीं पाहिलीं तर वाटतें कीं, कुठें लो. टिळक आणि कुठें मी ! त्यांच्या पसंतीस आपण उतरावें, त्यांच्या कार्यांत हौसेनें भाग घ्यावा आणि त्या कार्याचें मुख्य साधन किंवा हत्यार जें केसरी पत्र त्याची सेवा अधिकाधिक उपयुक्तपणें आपण करावी आणि टिळकांची शाबासकी मिळवावी, याहून मी तरी अधिक इच्छा कशाची करणार होतों ?

१९२० सालीं लो. टिळक वारले त्या वेळीं आपला राजकीय पक्ष आणि केसरी हीं त्यांनीं परमोत्कर्षाच्या स्थितींत पाहिलीं. मी केसरींत येऊन सुमारें पंचवीस वर्षें या वेळीं झालीं होतीं आणि वर्तमानपत्रांशीं नित्य संबंध

या दृष्टीने माझाच लो. टिळकांशीं अधिक संबंध आला. लो. टिळक पाठीशीं होते व अवश्य तेव्हा स्वतः लिहीतहि. केसरीची जबाबदारी त्यांनीं माझ्यावर सोपविली असली तरी स्वतःबद्दल मी इतकेंच म्हणतों कीं, ज्या विश्वासानें आणि अपेक्षेनें ही जबाबदारी माझ्यावर टाकली ती त्यांची अपेक्षा चुकली किंवा विश्वासाचा भंग झाला असें कधींहि घडलें नाहीं. लो. टिळकांच्या लोकोत्तरपणाला शोभेल असा माझ्यापेक्षांहि अधिक लायक किंवा पराक्रमी सहकारी टिळकांना मिळावयास हवा होता. पण एका दिव्यावर दुसरी दीपज्योति तितक्याच तेजाची उजळतां येते तसें लोकोत्तर व्यक्तीच्या बाबतींत घडत नाहीं याला कोण काय करणार ? पांडवांनीं आपलीं शस्त्रास्त्रें शमीवृक्षावर ठेवलीं होतीं त्याप्रमाणें केसरीची तेजस्वी प्रकाशज्योत मी यथाशक्ति जळती ठेवली, विझूं दिली नाहीं इतकें जरी माझ्याबद्दल कोणीं म्हटलें तरी त्यांत माझें समाधान आहे. आगामी भावी काळांत लो. टिळकांइतका लोकोत्तर आणि टिळकांच्या राजकीय पराक्रमाचा वारसा पुढें चालविणारा मनुष्य पुढें आल्यास त्याच्या हातीं केसरी व मराठा हीं टिळकांचींच साधनें पडावीं आणि आम्ही जतन केलेल्या स्फुलिंगाच्या साहाय्यानें पराक्रमाचा वडवानल पेटविण्यास त्यास साहाय्य व्हावें !

—अनुवादक : **का. न. केळकर**

**समाप्त**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38451 वि: निबंध
क्रमांक 9578 नों वि: 3|11|66

# कांहीं उपयुक्त पुस्तकें


1. **Royal Commission on Press. 1947-49**
( Parliamentary Report )
2. **Report of the Press Commission 1954**
3 **History of Indian Journalism**
( Publications Division )
4. **A Free and Responsible Press**
( U. S. Commission on the Freedom of Press
5. **Brass Check** — Upton Sinclair
6. **History of The Times** — London. 1955
7. **The Press — Wickham Steed**—Penguin, 1938
8. **Mobilising for Chaos — Regel,** 1934
9. **Propoganda and Dictatorship**
—Childs. H. L. — 1936
10. **Grammer of Politics** — Laski.
11. **Press, Parliament and People.**
— Williams Fancis, London. 1948
12. **Profession Training for Journalism**
— UNESCO.
13. **The Daily Press in 1952** — UNESCO.
14 **Falsehood in War Time** — Ponsby. 1928
15. **Journalism — C. L. R. Shastri**
16. **Tilak Trial 1908** - N. C. Kelkar
17. **The Contempt of Court Case** — N. C. Kelkar

१. **मराठी नियतकालिकांचा इतिहास** — रा. गो. कानडे
२. **वृत्तपत्र-व्यवसाय** — रमेश मंत्रि
३. **विलायतचीं बातमीपत्रें** — न. चिं. केळकर

REFBK-0014371